**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे )**

**पृ.शी.** : राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल.

**मु.शी.**: राज्याच्या विकासात निर्माण झालेला प्रादेशिक असमतोल या विषयासंबंधी सर्वश्री प्रवीण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, ॲड. निलय नाईक सर्वश्री चंदुभाई पटेल, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला )

**तालिका सभापती :** आता म.वि.प.नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात होईल. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड हे ऑनलेग आहेत. त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी तसेच थोडक्यात भाषण आटोपते घ्यावे. कारण आपणास मंत्री महोदयांच्या उत्तरासह या प्रस्तावावरील चर्चा सकाळी ११.४५ पर्यंत पूर्ण करायची आहे.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, आमच्या पक्षातीलकडील अजून १५-१६ सदस्यांना या प्रस्तावावर बोलायचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आपण भाषणास सुरुवात करावी.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, एखाद्या प्रस्तावावर किती दिवस चर्चा करायची याबाबत काही तरी निर्णय घ्यावा लागेल. आता सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांचे भाषण झाल्यावर उत्तरास सुरुवात करु द्यावी. दोन दोन दिवस फक्त एकच बाजू समोर येत आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, आम्ही पहिल्या दिवसापासून सभागृहात उपस्थित आहोत. माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांचेशिवाय आमच्या पक्षाच्या वतीने कोणीही बोललेले नाही. आपण वेळ कमी करा पण आम्हाला बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर आतापर्यंत ३ तास २२ मिनिटे चर्चा झाली आहे सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.प्रवीण दरेकर, डॉ.रणजित पाटील, श्री.किशोर दराडे हे बोलले आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड ऑनलेग आहेत. त्यांनी भाषणास सुरुवात करावी. उपमुख्यमंत्री महोदय उत्तर देण्यासाठी येथे बसलेले आहेत. आपले कामकाज पूर्ण होईल. आपण बोलण्यास सुरुवात करावी.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, सभागृहाचे रेकॉर्ड काढावे व चेअरवरुन उप सभापती महोदयांनी काय निदेश दिलेले आहेत ते पहावे. आम्ही पहिल्या दिवसापासून सभागृहात कशाला बसलो आहोत.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, नियम २६० प्रस्तावावर बोलत असताना राज्यात निर्माण झालेल्या प्रादेशिक असमतोलाबाबत बोलत असताना विशेष करुन कोकण या विषयावर बोलणार आहे. कोकणाला नंदनवनापासून पोरके करण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले आहे. कोकणाला पूरमुक्त न करण्याचे पाप या सरकारने केले आहे, कोकणाला विकासापासून दूर नेण्याचे काम या सरकारने केले आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड.......

सभापती महोदय, मुंबई गोवा महामार्गाबाबत प्रत्येक वेळेला केंद्र सरकारकडे बोट दाखविले जाते. उपमुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत, ते देखील मान्य करतील की, केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांची कामाची पध्दत कशी आहे. एनएचआयच्या माध्यमातून राज्यात रस्त्यांचे जाळे पसरले आहे त्यात त्यांची भूमिका किती स्पष्ट व चांगली आहे. परंतु राजय सरकारने ज्या पध्दतीने मुंबई गोवा महामार्गाकरीता मदत करायला हवी ती मदत सातत्याने होत नाही. परशुराम घाटाचा विषय, देवस्थान व गावांमधील विषय आहेत. कारण कोकणातील बऱ्याच जमीन देवस्थान व गावातील लोकांच्या वादामध्ये अडकल्या आहेत. सरकारने यात स्वत: लक्ष घालावे. खासदार श्री.सुनील तटकरे हे या सभागृहाचे सदस्य होते, राज्याचे मंत्री होते. आता ते खासदार आहे. त्यांनी याकडे लक्ष घातले तर मुंबई गोवा महामार्ग जो रायगड व रत्नागिरी जिल्हयातील काही भागात अडकलेला आहे. या रस्त्याकरीता केंद्र सरकार निधी देणार आहे पण राज्य सरकारचे पाठबळ मिळाले तर संयुक्त पाठबळ मिळाले तर तो निश्चित पूर्ण होईल.

सभापती महोदय, मी रत्नागिरी जिल्हयातील काही विषय प्रामुख्याने उपमुख्यमंत्री महोदयांसमोर आणणार आहे. पण समोरच्या बाकावरुन आम्हाला विषय मांडायला देणार नसाल तर मी खाली बसतो.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर ३ तास २२ मिनिटे चर्चा झालेली आहे असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, गणपतीपुळे विकास आराखडयास माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात तेव्हाचे अर्थमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी १०२ कोटीचा निधी दिला होता. परंतु मी रत्नागिरी जिल्हयातील असल्याने सातत्याने विद्यमान पालकमंत्री श्री.उदय सामंत यांचेशी सातत्याने चर्चा करीत असतो. जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी पत्रही दिलेली आहेत. परंतु गणपतीपुळे विकास आराखडा तेव्हाच्या सरकारने बनवला होता त्यामध्ये बदल केला गेला. मी उपमुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो की, आपण अधिक १० कोटीचा निधी

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड ...........

त्यात दिलेला आहे. पण साडेतीन वर्ष उलटले तरी गणपतीपुळे विकास आराखडा पूर्ण होऊ शकला नाही. गणपतीपुळे येथे राज्यातून व देशातून गणपतीबाप्पाचे दर्शन घेण्यासाठी भाविक येत असतात.

सभापती महोदय, प्रादेशिक नळ पाणी योजनेबाबत बोलायचे झाले तर ५८ कोटी रुपयांची प्रादेशिक नळ पाणी योजना रत्नागिरी शहरासाठी दिली गेली पण त्यापैकी किती पूर्ण झाली व आज शहरात किती लोकांना पाणी मिळते व किती कोटीचा भ्रष्टाचार झाला हे येथे सांगण्याची गरज नाही, परंतु यामध्ये सरकारने लक्ष घातले पाहिजे. रत्नागिरी शहर आज विकासाकडे चालले आहे, तेथे प्रचंड प्रमाणात उद्योग येत आहेत. त्याबाबत देखील सरकारने लक्ष घातले पाहिजे, रत्नागिरी नगरपालिकेची हद्द वाढविण्याचा प्रस्ताव आहे, उपमुख्यमंत्री महोदयांना मी विनंती करतो की, हद्द वाढवून हे शहर मोठे केले तर निश्चितपणे त्याचा फायदा होईल. चुकीच्या पध्दतीने वाळू उत्खननचा विषय उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. याबाबत नियमावली केली तर कोकणातील वाळू उत्खननाचा अनधिकृत व्यवसाय बंद होईल, निश्चितपणे त्यातून काही लोकांना रोजगार मिळेल. कोस्टल रोडचे नवीन भूत सरकारने पुढे आणले आहे. मला वाटते की, कोस्टल रोडच्या अगोदर मुंबई गोवा हायवे पूर्ण केला तर निश्चितपणे त्याला फायदा होईल.

सभापती महोदय, चिपळूणाबाबत सभागृहातील बहुतेक सदस्यांनी सांगितले आहे. २००० वर्षापूर्वी वसलेले हे शहर असून येथे बेफाम थंडी, जोरदार पाऊस व जोरदार गरमी असते. मागील तीन पावसाळयात हे शहर सातत्याने पूर्णत: बुडून जाते. आमची विनंती आहे की, वशिष्टी नदीचा गाळ काढून पाणी फिरविण्याची व मराठवाडयाला नेण्याची पॉवरग्रीड योजनेबाबत राज्यातील पाणी व धरणे या विषयावर सातत्याने प्रचंड काम उपमुख्यमंत्री महोदयांनी केलेले आहे. माझी त्यांना विनंती आहे की, कोयनेतून वीज निर्मिती केल्यानंतर जे पाणी खाली उतरते, त्यातील क्षार कमी झाले असले तरी, ते पिता येत नसले तरी रत्नागिरी किंवा लोटे एमआयडीसीला पुरविले जावे. कोकण व रत्नागिरी जिल्हयात प्रचंड पाऊस होऊनही

श्री.प्रसाद लाड .........

पाणीटंचाईच्या वेळी पाणी मिळत नाही. म्हणजे त्यातून कोकणातील गावकऱ्यांना पिण्यास पाणी मिळेल. घनकचरा प्रकल्पासाठी ३० कोटीवरुन ४० कोटी रुपयांचा निधी करण्यात यावा जेणेकरुन जिल्हयातील कचरा व्यवस्थापन नीट राहील. लोटे एमआयडीसी परिसरात सातत्याने आग लागून जळण्याचे प्रकार वाढत आहेत. सातत्याने ऑडीट केले तर बरे राहील. पेडे परशुराम, मुंबई गोवा महामार्गाबद्दल तसेच अर्जून नदीबाबत मी आताच आपणास बोललो आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्गचे काही प्रश्न मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणणार आहे. वैभववाडी ग्रामीण रुग्णालयात गट अ ते गट ड संवर्गातील २५ पदे आहेत. आतापर्यत १२ पदे भरली गेली. उरलेली १२ पदे भरली तर निश्चितपणे ग्रामीण रुग्णालयात कोरोना काळात चांगली सेवा मिळू शकेल. देवगडमध्ये आनंदवाडी येथे अत्याधुनिक सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याच्या प्रकल्पाचा समावेश पंचावार्षिक योजनेत करुन शासनाने पूर्ण केला तर निश्चितपणे देवगड तालुक्याला मत्स्यव्यवसायाला मोठी भरारी मिळेल. ७०० किलोमीटर लांबीच्या कोकण समुद्रकिनाऱ्यावरील व परिसरातील मच्छिमारांना न्याय मिळेल ही माझी मागणी आहे.

सभापती महोदय, देवगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील आंबा व काजू उत्पादनासाठी सरकारने व्हेदर स्टेशन्स उभी केली आहेत, या माध्यमातून नुकसान भरपाई दिली जाते, पण ही स्टेशन्स चालत नाहीत. त्यामुळे शेतकरी व फळ बागायतदारांना नुकसान भरपाई मिळत नाही, यामुळे कोकणातील माणूस तसाच राहतो. निसर्ग व तोक्ते चक्रीवादळात आपण पाहिले असेल, आपण व मुख्यमंत्री महोदय तेथे गेले होते. पण आजही तशीच परिस्थिती तेथे आहे. देवगड कोर्टाची नवीन इमारत मंजूर झालेली आहे पण अजूनपर्यत त्याचे काम झालेले नाही. गड संवर्धनामध्ये विजयदुर्ग, सिंधुदुर्ग किल्ला असावा, आपण सिंधुदुर्ग किल्लयाला निधी दिला आहे, परंतु विजयदुर्ग किल्ल्याची डागडुजी करणे तेवढेच जरुरीचे आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड ............

जिल्हापरिषदेचा जो निधी शासनाकडे परत गेलेला आहे, तो जरी पुन्हा जिल्हयाला मिळाला तर सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेमध्ये चांगले काम करता येईल.

ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था, पाटबंधारे विभागाचे रखडलेले प्रकल्प, कोकण आपत्ती व्यवस्थापनाचे कार्यक्रम, सिंधुदूर्गामध्ये जाहीर झालेल्या सर्व गोष्टी, कोकण वैधानिक विकास महामंडळ आदि बाबी या कोकणाकरिता नितांत गरज असलेल्या बाबी आहेत. माननीय उप मुख्यमंत्री महोदय, या प्रस्तावावर आपण स्वत: उत्तर देणार आहात. या समस्यांवर निश्चितपणे आपण स्वत: शासन म्हणून लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय,कृषी सुधारणा आणि मच्छिमारांच्या बाबतीत बोलायचे झाले तर कृषी विषयासंदर्भात कोकणात प्रचंड प्रमाणात भेदभाव केला जातो. कोकण आणि इतर विभागांतील शेतकऱ्यांना वेगवेगळया प्रकारचा न्याय दिला जात आहे. एमएसपीच्या माध्यमातून, आंबा खरेदी, काजू खरेदी, बांबू उत्पादक शेतकऱ्यांच्या माध्यमातून शासनाने सातत्याने मदत केली तर कोकणात निश्चितपणे कृषी सुधारणा होऊ शकेल. यामुळे कोकणात देखील कृषी उत्पन्न वाढून त्यातून देखील रोजगार निर्मिती होऊ शकते.

सभापती महोदय, वीज-तोडणीचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी सातत्याने सभागृहात मांडलेला आहे. कोकणात देखील विजेची टंचाई कायम असते. ग्रामीण भागात आठ तासांच्या वर सर्वसामान्यांच्या घरामध्ये, शेतात, शेतकऱ्यांच्या घरात वीज नसते. यासंदर्भात आवश्यक ते निर्देश शासनाने दिले तर निश्चितपणे याचा देखील फायदा होईल.

( वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते.)

सभापती महोदय, मच्छिमारांचा देखील विचार यामध्ये करणे आवश्यक आहे. मुंबई ते कोकणापर्यंतच्या मच्छिमारांकडे म्हणजे भुमिपुत्रांकडे अन्नपुरवठा करणारा घटक म्हणून पाहिले पाहिजे. त्यांना देखील शेतकरी म्हणूनच गणले पाहिजे, ही माझी

असुधारित प्रत

श्री.प्रसाद लाड .......

शासनाला विनंती आहे. शेतकऱ्यांना शासनाने ३३००० कोटींची कर्जमाफी दिली. त्यापैकी २३८८८ कोटी रुपयांची नियमित कर्जफेड २०,००,००० शेतकऱ्यांना मिळाली. भू-विकास बँकेकडून ३४,७७८ कर्जदारांना ९६४ कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. माझी शासनाकडून अशी अपेक्षा आहे की, मुंबई आणि कोकणातील मच्छिमारांचे एनसीडीसी अंतर्गत ४५०-५०० कोटी रुपयांचे जे मच्छिमारांचे कर्ज आहे, ते शासन माफ करेल. मच्छिमारांच्या डिझेलचा परतावा जो दोन-दोन वर्षे मिळालेला नाही. तो परतावा शासनाने मच्छिमारांना द्यावा. जाळया बांधण्याकरिता लागणारा निधी शासनाने मच्छिमारांना द्यावा. बोटी बांधण्याकरिता लागणारा निधी देखील मच्छिमारांना शासनाने द्यावा. मुंबईसह कोकणातील भुमिपूत्रांना न्याय द्यावा, अशी विनंती करुन मी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आभार मानतो.

-----------------------------

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस (उस्मानाबाद-बीड-लातूर स्था.प्रा.संस्था): सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, मी माननीय सहकार मंत्रीमहोदयांना विनंती करणार आहे. राज्यामध्ये आणि विशेषत: मराठवाडयात मोठया प्रमाणात अतिरिक्त ऊस आहे. बीड, लातूर, उस्मानाबाद या जिल्हयातील अतिरिक्त ऊसाचे नियोजन होण्याची आवश्यकता आहे. कालच उसरा, ता.वडवली येथे चिंचकर आडनावाचे जे शेतकरी आहेत. त्यांचा जवळ जवळ १५ एकर ऊस जळून गेला. २००-२५० एकर ऊस जळणार होता, तो लोकांनी वाचविला. परंतु सद्य:स्थितीत काही शेतकऱ्यांकडून १४०० रुपये....आता....डायरेक्ट...."१४०० रुपयात आम्हाला ऊस द्या, आम्ही कुठेतरी नेऊन सोडतो," येथपर्यंतची परिस्थिती ओढवलेली आहे. साखर कारखाने परस्पर बंद होऊ देऊ नयेत, राज्य शासनाने त्यावर लक्ष केंद्रित करावे. ज्या भागात साखर कारखानदारी पूर्णपणे बंद आहे, जेथील साखर कारखाने अवसायनात निघालेले आहेत, अशा भागातील शेतकऱ्याचा ऊस जेथे साखर कारखाने चालू आहेत, तेथील लोकांनी तो ऊस उचलावा, अशी माझी विनंती आहे.

दुसरे असे आहे की, इथेनॉलची पॉलिसी आल्यामुळे साखर कारखाने चांगले चालू आहेत, असे वाटत आहे. काही काही शेतकरी तर आपल्या शेतात ट्रॅक्टर घालत आहेत. १६-१८ महिन्यांचा ऊस मोडून टाकत आहे, असे देखील फेसबुक..... मोडलय ना ! आपल्याला उदाहरणासकट माहिती देतो. एवढी चिड या बाबत लोकांच्या मनात येत आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

सभापती महोदय, कृष्णा-मराठवाडयाच्या २३.६६ टीएमसी पाण्यापैकी प्रत्यक्ष ७ टीएमसी पाणी आम्हाला दिलेले आहे. याबाबतचा निर्णय लवकरात लवकर व्हावा, यामध्ये उस्मानाबाद आणि बीड हे दोन जिल्हे या ठिकाणी येतात. कांदा उत्पादक शेतऱ्यांच्या बाबतीत काहीतरी निर्णय घेण्याची आवश्यकत आहे. चौदा दिवसांमध्ये १८ रुपयांनी दर कमी आलेले आहेत.

असुधारित प्रत

श्री.सुरेश धस......

स्टोरेज आणि कांदा चाळीच्या बाबत चांगल्या प्रकारचे निर्णय शासनाकडून अपेक्षित आहेत. एका जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात जे लाईट्स जातात, ते पुरेशा दाबाने न गेल्यामुळे, पुरेशा दाबाने लाईट न मिळाल्यामुळे लोणी जिल्हापरिषद गट आणि दौला-वडगाव या दोन पॉकेट्सचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. वीज खात्याचे मंत्री सभागृहात आता उपस्थित नाहीत. परंतु माननीय उप मुख्यमंत्री यांना मी विनंती करतो की, १३२ के.व्ही.च्या सब- स्टेशनला जागा न मिळाल्यामुळे ८-८ वर्षे त्याची कामे चालू होत नाही, अशा प्रकारची याबाबत येथे स्थिती आहे. याबाबतचे काम लवकरात लवकर सुरु व्हावे, अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, सहकार मध्ये काहीतरी नाविन्य आणले पाहिजे. पाच-पाच तालुक्यामध्ये एक याप्रमाणे काम चालू आहे, इतकी वाईट परिस्थिती सहकाराची होत चालली आहे. नवीन सहकारात पुढच्या पिढीला काहीतरी संधी मिळेल, अशी मी अपेक्षा करतो. सुशिक्षित बेकारांची सहकारी संस्था असे काहीतरी...नवीन रजिस्ट्रेशन यामध्ये होतच नाही. आम्ही केवळ सहकारावर बोलतो. परंतु नवीन कोणत्या सहकारी संस्थेची रजिस्ट्रेशन होत आहे, याबाबत तपासणी करण्याची आवश्यकता आहे. या सर्व बाबींकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी मी विनंती करतो. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**उप सभापती :** आता आपण जरा सारांशानेच बोलावे. कारण की, अर्थसंकल्पीय सत्राचे शेवटचे दोन दिवस बाकी आहेत. साडे दहा वाजता उत्तराला सुरुवात होईल.

आता सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे आपल्या भाषणास सुरुवात करतील.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करत असतात.)

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदया, आमच्याकडचे अजून कोणीच बोलले नाही.

डॉ.परिणय फुके (माईक बंद): सभापती महोदया, आम्हाला सांगितले गेले होते की, तिसरा आणि चौथा नंबर आमचा आहे. आम्ही तीन दिवसांपासून या प्रस्तावावर बोलण्यकारिता सकाळी सभागृहामध्ये नियमितपणे येत आहात.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे, या बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य बोललेले आहेत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करत असतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, कामकाजाची एक पध्दत असते आणि पध्दतीपेक्षाही नियम महत्त्वाचे आहेत. नियमाचे एक पुस्तक असते. सचिव महोदयांनी याबाबत मार्गदर्शन केले पाहिजे. चर्चा साधारणत: अडीच तासाची असते. त्यापैकी निम्मा वेळ विरोधी पक्ष आणि निम्मा वेळ सत्ता पक्षाला मिळतो. या प्रस्तावावरील उत्तराकरिता २५ टक्के वेळ राखीव असतो. परंतु याप्रमाणे सभागृहात कधी चर्चा होतच नाही. आम्हाला प्रस्तावावरील चर्चेकरिता अपेक्षित उत्तर मिळतच नाही. .....अडथळा......माझे बोलणे तरी पूर्ण होऊ द्या......अडथळा....आमच्यावर देखील अन्याय होत आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत. प्र.पाटील यांचे म्हणणे पूर्ण ऐकून घ्यावे. आपण सर्वांनी शांतपणे खाली बसावे. सर्व जण एकदम बोलले तर सर्वांचा चर्चेचा वेळ वाया जाईल. याबाबत आपण माननीय सभापती महोदयांना विचारुन घ्यावे.

डॉ.रणजित पाटील (माईक बंद ): सभापती महोदया, सत्ता पक्षाकडून तीन सदस्य आणि विरोधी पक्षाकडून केवळ एक सदस्य अशा प्रकारे बोलण्याकरिता संधी दिली जात आहे, हे योग्य नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करत असतात.) यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**उप सभापती :** मी नियम काय आहे आणि वेळ किती होता तो वाचून दाखविणार आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी पध्दत काय आहे ती मला शिकवू नये. मी उपलब्ध वेळ किती आहे ते वाचून दाखवित आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना सांगू इच्छिते की, हे मी यापूर्वी सभागृहात वाचून दाखविले होते. त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित होता. शिवसेनेला २५ मिनिटांचा वेळ असून, त्यांच्या पक्षातील एकाही सन्माननीय सदस्यांनी भाषण केले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला १८ मिनिटांचा वेळ असून,.... ते १८ मिनिटे बोलले आहेत काय ? ते केवळ ४ मिनिटेच बोलले आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस... मी सचिवालयातील माझ्या खाली बसलेल्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे की,... विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकाच वेळी का बोलता ? भारतीय जनता पार्टीला ५० मिनिटांचा वेळ होता. मी सचिवालयातील माझ्या खाली बसलेल्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे की, भारतीय जनता पार्टीतील सन्माननीय सदस्यांनी एकूण किती वेळ भाषण केलेले आहे. ते मला त्वरित सांगत आहेत. मी त्यांना हिशेब करायला सांगितलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके..... असे काहीच होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांनी माझा मुद्दा समजून घ्यावा किती वेळ उपलब्ध होता आणि किती वेळ सदस्यांनी वापरला आहे. याची वजाबाकी नीट करुन सांगा असे मी सचिवालयातील माझ्या खाली बसलेल्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे. त्यांनी मला फक्त उपलब्ध वेळ आणि कोणते सन्माननीय सदस्य किती वेळ बोलले आहेत त्याचा चार्ट दिला आहे. मी उभ्याने गणित करण्यासाठी प्रत्येक पक्षाचा उपलब्ध वेळ किती आहे ते मी माझ्या सचिवालयातील माझ्या खाली बसलेल्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे. विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणासाठी वेळेला मर्यादा नसते हे जरी खरे असले तरी सुध्दा.... पूर्ण ऐकून घ्यावे. आपण ऑग्युमेंट करु नये. हे बरोबर नाही. शिवसेना पक्षातील सन्माननीय सदस्यांनी केवळ ६ मिनिटे भाषण केलेले आहे. मी माझ्या सचिवालयातील माझ्या खाली बसलेल्या अधिकाऱ्यांना सांगू इच्छिते की, आपण पुनश्च मला उपलब्ध वेळ सांगितला नाही, आपल्याला वजाबाकी करता येत नाही

**उप सभापती........**

काय, का ती देखील मीच करु. मला सर्व सन्माननीय सदस्यांना असे सांगावयाचे आहे की, माननीय विरोधी पक्षनेते १ तास ५५ मिनिटे बोलले आहेत. आपल्याला अजून ५० मिनिटांचा वेळ आहे. या ५० मिनिटांपैकी आपल्या प्रतोदांनी मला सांगावे, त्यांच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे की, या ५० मिनिटांपैकी आमचे सन्माननीय सदस्य एवढे मिनिटे बोलले आहेत. त्याप्रमाणे उरलेल्या वेळामध्ये विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी बोलावे. प्रत्येक पक्षाला माझी तिच विनंती आहे. असे अजिबात नाही की, मी उजवीकडे नियम लावणार नाही आणि डावीकडेच नियम लावणार याबाबत विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी गैरसमज करु नये.

आता सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी थोडक्यात बोलावे.

डॉ. मनिषा कायंदे ( ) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांनी विरोधी पक्षातर्फे म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी काही गंभीर प्रकारचे विषय या ठिकाणी मी उपस्थित करीत आहे. मला संरक्षण द्यावे. मला बोलायचे आहे.

डॉ. परिणय फुके : सभापती महोदया, मला बोलू देणार आहात की नाही ? मला गेल्या तीन दिवसांपासून या प्रस्तावासंबंधी बोलायला दिले नाही.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांना सांगू इच्छिते की, किती वेळ उपलब्ध आहे तो तुम्ही पण कॅलक्युलेट करा आणि मी पण कॅलक्युलेट करते आणि २ मिनिटात सांगते त्यामुळे तुम्ही शांत रहा. ते गणित करुन सांगत आहेत.

श्री. अजित पवार : सभापती महोदया, मी विधानसभा आणि विधानपरिषदेची तुलना करीत नाही. विधानसभेत माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी

असुधारित

दिलेली आहे. ते स्वत: काही बोलले नाही. विधानसभेत माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस हे महत्वाच्या विषयावर बोलतात आणि इतर वेळेस इतर सन्माननीय

**उप सभापती.....**

सदस्यांना बोलण्याची संधी देतात. विधानपरिषदेत सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड आणि डॉ. रणजित पाटील यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यानुसार माननीय उप सभापती महोदयांनी ॲडजस्टमेंट केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आताच माहिती दिलेली आहे. निम्मा वेळ विरोधी पक्ष आणि निम्मा वेळ विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना दिला जातो आणि त्यातील निम्मा वेळ हा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी आणि सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना दिला जातो. मग अशा वेळी ६ तास झाले तरी काहीच प्रश्न नाही. विरोधी पक्षाला ३ तास दिले तर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना देखील ३ तासांचा अवधी दिला पाहिजे.

श्री. प्रसाद लाड : सभापती महोदया,.....

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांना प्रत्येक पक्षाचा उपलब्ध वेळ पुनश्च एकदा मी वाचून दाखविते. त्यामध्ये आपल्या पक्षातील सन्माननीय सदस्य किती वेळ बोलले आहेत ते देखील आपल्याला कळून येईल. हे सर्वांना माहीत आहे. सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांना मी काय बोलत आहे ते ऐकून घ्यावे. त्यांनी नुसते ओरडू नये. आपण मंत्री होता. मी उलट्या क्रमाने वाचत आहे, त्यामुळे आपल्या सर्वांची मने शांत होतील. पुरोगामी गटातील ३ सन्माननीय सदस्य बोलले असून, त्यांना भाषणासाठी ६ मिनिटांचा अवधी होता आणि भाषण कोणीच केलेले नाही. भाजपा आणि पाठींबा देणारे एकूण २६ सन्माननीय सदस्य आहेत. त्यांच्या पक्षाला ५० मिनिटांचा अवधी होता. यापैकी तीन सन्माननीय सदस्यांनी भाषणे केलेली आहेत. त्यामध्ये २ तास ३५ मिनिटांचा वेळ भाषणासाठी घेतलेला आहे. काँग्रेस पक्षातील

असुधारित प्रत

केवळ एकाच सन्माननीय सदस्यांनी केवळ १२ मिनिटांचे भाषण केलेले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील सांगतात की, सत्ताधारी पक्षातील ३ सन्माननीय सदस्य बोलल्यानंतर विरोधी पक्षातील एकाच सन्माननीय सदस्यांना

**उप सभापती.....**

भाषण करण्यासाठी संधी दिली जाते. असे नाही. माझे पूर्ण होऊ द्या. राष्ट्रवादी काँगेसने भाषणासाठी २९ मिनिटांचा अवधी घेतलेला आहे आणि शिवसेनला २५ मिनिटांचा वेळ होता, त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र दराडे हे केवळ ६ मिनिटेच बोलले आहेत. मी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना किती वेळ उपलब्ध आहे हे मी सांगितलेले आहे. माननीय श्री. अजितदादा पवार म्हणतात ते देखील बरोबर आहे. आपल्या पक्षाच्या वेळेचे नियोजन कसे करायचे हे पक्षाचे नेते आणि प्रतोदांनी मिळवून ठरवायचे असते. तरी कृपया विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे. सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांना सांगू इच्छिते की, आपल्या पक्षाच्या प्रतोदांनी मला चिठ्ठीद्वारे आपल्याला भाषण करण्यासाठी द्यावे असे सांगितले तर मी लगेचच आपल्याला भाषण करण्याची संधी देणार आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी माझ्याशी वाद-विवाद करु नये.

आता सन्माननीय सदस्या डॉ. मनिषा कायंदे यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी थोडक्यात बोलावे.

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदया, मी आपली आभारी आहे. आपण माझे तिसऱ्यांदा नाव पुकारलेले आहे. आमच्या पक्षाचा वेळ चालला आहे.

सभापती महोदया, म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावासंबंधी बोलण्यासारखे खूप आहे. विरोधी पक्षातील सन्मानीय सदस्यांनी भाषणे केलेली असून, त्यासंबंधी निश्चितच विचार करुन समाचार घेण्याचा माझा मानस आहे.

सभापती महोदया, राज्य सरकारी बँकेवर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी टीका केली असून, तो त्यांचा अधिकार आहे. राज्य सरकारी बँकेवर निवृत्त माननीय न्यायाधीशांकडून चौकशी झाली. त्यानंतर प्रशासक नेमण्यात आला होता. सहकार विभागांतर्गत ज्या सहकारी संस्था येत आहेत त्यामध्ये सामान्य माणसांचा पैसा गुंतलेला असतो. मागील २ वर्षात विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आताच्या या दोन वर्षातील विषय कधीच उपस्थित केलेला नाही. जे राज्य सहकारी बँकेसंबंधी बोलत होते. त्यावर प्रशासक नेमला गेला. अनेक बँकांचे विषय उपस्थित करण्यात आले. परंतु, मागील ५ वर्षात हे विषय कधीच उपस्थित का केले नाहीत असा माझा प्रश्न आहे. म्हणजे त्यांच्यावर तत्कालीन माननय मुख्यमंत्री महोदयांचा विश्वास नव्हता असे समजायचे काय ? त्यावेळी हे सर्व गप्प का बसले असा माझा प्रश्न आहे. गेल्या ५ वर्षात हे विषय कधीच उपस्थित करण्यात आले नाही. मुंबै बँकेत ४ हजार सोसायट्यांमध्ये सदस्य काम करीत आहेत. त्यांचा नित्यनियमाने दररोज व्यवहार होतो. कोट्यवधी रुपयांची ऊलाढाल होते. सामान्य नागरिक मोठ्या विश्वासाने त्या बँकेत पैसे ठेवतात. हौसिंग सोसायट्या या मध्यमवर्गीय आहेत. त्या श्रीमंत नाहीत. त्यामध्ये अनेक लोकांचे पैसे आहेत. माननीय विरोधी पक्षनेते *** यांच्यावर मुंबै बँकेवर बोगस श्रीमंत मजूर असा ठपका प्रशासकांनी ठेवलेला आहे. त्या बँकेचे अनेक घोटाळे बाहेर आलेले आहेत. ही जी दरोडेखोरी, दरोडेखोर फाईल्स ही जगातील सर्व लोकांनी पाहिलेली आहे. बोगस मजुरांनी कोठे रंग लावले आणि कोठे रंग लावायचा आहे या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. आपण

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

डॉ. मनिषा कायंदे........

चौकशीला का घाबरता असा माझा प्रश्न आहे. मुंबै बँकेवर गुन्हा दाखल झालेला आहे. आता धावपळ सुरु आहे. आपण सर्वजण त्यासंदर्भातील बातम्या वर्तमानपत्रातून वाचत आहोत. रमाबाई आंबेडकर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. एवढेच नव्हे तर सन २०१३ मध्ये सहकार विभागाने सहकार कायदा १९६० कलम ८९(अे) अंतर्गत केलेल्या चौकशी अहवालामध्ये ७०० कोटी रुपयांहून अधिक भ्रष्टाचार झाल्याचा ठपका ठेवला आहे. या अहवालातील निष्कर्शात मुंबै बँकेच्या संचालक मंडळाने बँकेचा व ठेवीदारांचा विश्वासघात आणि संगनमताने फसवणूक केली आहे. माझ्याकडे सर्व अहवाल आहेत. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक चाचणी लेखी परीक्षणाचा अहवाल आहे तो सन २०१५-२०१६ ते सन २०१९-२०२० मधील आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

डॉ.मनिषा कायंदे.....

माझ्याकडे मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा ८९ (a) अन्वये केलेल्या तपासणीचा अहवाल आहे. या अहवालातील प्रत्येक ओळ वाचण्यासारखी आहे. परंतु तो सर्व तपशील वाचून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. अशा प्रकारच्या अहवालातून अनेक गोष्टी उघडकीस आलेल्या आहेत. सामान्य माणूस मोठ्या विश्वासाने या बँकेकडे पाहत आहे. या अहवालातील पृष्ठ क्र.१२४ वर शेवटी नमूद करण्यात आलेले निष्कर्ष अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामध्ये विधानपरिषदेचे विद्यमान विरोधी पक्ष नेते यांनी मुंबई बैंक आणि ठेवीदारांच्या संगनमताने ही फसवणूक केल्याचे लक्षात येते. त्यांनी एकप्रकारे विश्वासघात केला आहे. या बँकेत सामान्य माणसाचा पैसा असल्यामुळे या बँकेवर प्रशासक नेमावयास पाहिजे. रिझर्व्ह बँक आणि नाबार्डने सुद्धा या बँकेवर ठपका ठेवलेला आहे. रिझर्व्ह बँकेने मुंबै बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन व त्या ठिकाणी प्रशासक नेमून सखोल चौकशी करण्याचा अहवाल दिलेला असताना मागच्या सरकारमधील मुख्यमंत्र्यांनी कारवाई करणे तर दूरच, उलट रिझर्व्ह बँकेचा अहवाल दडवून ठेवला आहे की काय असा आम्हाला संशय येत आहे.

सभापती महोदया, ज्यांच्यावर गरीब मजूर म्हणून ठपका आहे त्यांच्या प्रतिज्ञापत्राचा विषय तर वेगळाच आहे. आमदारकीच्या अर्जाच्या विषयावर मी येथे आता बोलणार नाही. तो स्वतंत्र असा विषय आहे. परंतु गेल्या १० वर्षात त्यांनी मजुराची कोणती कामे केली, कोणती प्रमाणपत्रे आणली हा सर्वात मोठा विषय आहे. या माध्यमातून त्यांनी किती मजुरी मिळविली याची माहिती मिळेल काय ? अशाप्रकारे खोटेनाटे प्रमाणपत्र सादर करुन आपण बिझनेस असल्याचे नमूद केले. प्रतिज्ञापत्रात सुद्धा मजूर-रंगारी असे का लिहिले नाही, हा माझा प्रश्न आहे. या सर्व पार्श्वभूमीवर त्यांना या सभागृहातून अपात्र का करु नये, असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदया, मुंबै बँकेत संचालक असलेले विधानपरिषदेचे विद्यमान विरोधी पक्ष नेते यांच्या काळात नियमबाह्य कामे करुन कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. नियम धाब्यावर बसवून कर्ज वाटप करण्यात आलेले आहे. स्वत:च्या

डॉ.मनिषा कायंदे.....

नातेवाईकांना नियमबाह्य कर्जवाटप करण्यात आलेले आहे. आर्थिक गुन्हे विभागाकडे बोगस मजूर संस्था तसेच भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे पडून आहेत. काही गुन्हे आर्थिक गुन्हे शाखेकडे देखील दाखल झाले आहेत. सी-समरी असताना सुद्धा सी-समरी का झाली नाही, त्याचे पुढे काय झाले, हे समजले पाहिजे. ऑडीट रिपोर्ट वगैरे बऱ्याच गोष्टी यात आहेत. अशा परिस्थितीत मुंबै बँकेवर प्रशासक नेमला पाहिजे. ज्यांनी ज्यांनी या बँकेत भ्रष्टाचार केला त्यांना तुरुंगात टाकावे. तसेच ही दरोडेखोर फाईल आणि इतर सर्व फाईल्स.... आम्ही असे हजारो पेन ड्राईव्ह देऊ शकतो. आम्ही दिलेल्या पेन ड्राईव्हमध्ये काय काय निघेल. मुंबै बँकेने सामान्य माणसाची लूट चालविलेली आहे. त्यामुळे या बँकेवर तातडीने प्रशासक नेमला पाहिजे. तसेच या सर्व भ्रष्टाचार प्रकरणी बँकेचे संपूर्ण संचालक मंडळ बरखास्त करावे. माननीय विरोधी पक्ष नेते येथे आहेत, खालच्या सभागृहातील असतील, परंतु हे संपूर्ण प्रकरण दडपण्याचे काम करण्यात आले आहे. तत्कालीन शिक्षण मंत्री होते. मी आपल्या परवानगीने त्यांचे नाव घेते. तत्कालीन शिक्षण मंत्री *** यांनीच हा संपूर्ण भ्रष्टाचाराचा विषय बाहेर काढला होता. या ठिकाणी माननीय सहकार मंत्री उपस्थित आहेत. आर्थिक गुन्हे शाखेकडे हा विषय अगोदरच गेलेला आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडे सर्व कागदपत्रे पाठवून, या प्रकरणी चौकशी लावावी, त्या बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन यातील दोषींना तुरुंगात डांबावे. या सर्वांना तुरुंगात डांबले पाहिजे.

(विरोधी बाजूने अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, माझी हरकत आहे......

**उप सभापती** : मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, सन्माननीय सदस्यांचा बोलण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आपण का म्हणून हरकत घेत आहात ? माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्यांना सभागृहात बोलण्याचा अधिकार आहे. या प्रकरणी न्यायालयात कार्यवाही सुरु आहे. अशाप्रकारे वागण्याची पद्धत

*** आदेशानुसार विलोपित मजकूर.

असुधारित प्रत

**उप सभापती....**
योग्य नाही. सन्माननीय सदस्यांचे बोलणे पूर्ण होऊ द्यावे. जर त्यांनी भाषणात काही नावांचा उल्लेख केला असेल तर ती काढून टाकण्यास सांगते. परंतु आपण त्यांना त्यांचे भाषण पूर्ण करु द्यावे. आपण आरडाओरड करुन इतरांचा वेळ घेता, परिणामी इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्यास वेळ मिळत नाही.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदया, मी विरोधी पक्षाला विचारु इच्छिते की, आपल्याला मिर्च्या का झोंबल्या ?

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी बोलताना विरोधी पक्ष नेत्यांचे नाव घेतले आहे.

**उप सभापती** : मी आपल्या निदर्शनास आणून देते की, मी विधानपरिषद विशेषाधिकार समितीची समिती प्रमुख होते. गुन्हेगारी संदर्भात संबंधित आमदाराचे नाव घेण्यास बंदी नाही. विशेषाधिकार समितीमध्ये अनेक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये मी प्रकरणे हाताळलेली आहेत. गुन्हेगारी प्रकरणांत पोलिसांमध्ये गुन्हा दाखल झाल्यावर सभागृहात नाव घेता येते. त्यामुळे आपण जे म्हणता तसे नाही. भारतीय जनता पक्षाला देय असलेली वेळ संपलेली आहे. परंतु तरी सुद्धा सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके आणि इतरही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यायची आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांचे भाषण संपल्यामुळे आता मी पुढील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देते.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांना अजून भाषणासाठी अर्धा-तास दिला तरी माझी हरकत नाही. अजून किती दरोडेखोर आहेत तेही त्यांनी सांगावे. मी तर महाराष्ट्रातील दरोडेखोरांची नावेच दिली नाहीत. तसेच दुसरी बाब अशी की, आम्ही कोणाला घाबरत नाही. सन्माननीय सदस्यांनी विरोधी पक्ष नेत्यांचे नाव घेताना त्यांनी नियमानुसार नोटीस द्यावयास

पाहिजे होती. नोटीस न देता वाट्टेल ते बोलणे योग्य नाही. सभागृहाचे काही नियम

श्री.प्रवीण दरेकर....

आहेत. मी भाषण करताना माझ्याकडे महाराष्ट्रातील अख्खी यादी माझ्याकडे होती. परंतु मी कोणाचेही व्यक्तीश: नाव घेतले नाही. मी केवळ संबंधित विषय निदर्शनास आणून दिला. जर नावेच घ्यायची असतील तर आपण परवानगी दिल्यास राईट ऑफ रिप्लायमध्ये नावानिशी बोलेन. आपण धुतल्या तांदळासारखे आहोत असा आव आणण्याचे कारण नाही. आम्ही सुद्धा सर्वांची नावे काढू. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मला परवा माननीय सभापतींनी सांगितले की, सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे आपण त्यावर भाष्य करता कामा नये. मी माननीय सभापतींचा सन्मान आणि आदर करुन त्या विषयावर भाष्य केले नाही. परंतु सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून अशा प्रकारचे वक्तव्य करुन त्यांना काय साध्य करायचे आहे ? या विषयी चौकशी सुरु आहे, हे प्रकरण न्यायालयात. न्यायालयामध्ये या प्रकरणी जो काही निर्णय व्हायचा आहे तो होईल. जर आमची चूक असेल तर आम्ही आतमध्ये जाऊ.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, आपला हरकतीचा मुद्दा माझ्या लक्षात आला आहे. मी ही बाब तपासून घेते.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया,,,

**उप सभापती** : आता कोणीही बोलता कामा नये. मी सांगितलेले आहे की, मी ही बाब तपासून घेऊन नावे काढण्यास सांगते. माननीय विरोधी पक्ष नेते बोलले आहेत. आता सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.शशिकांत शिंदे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या २६० च्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, या प्रस्तावावर बोलताना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही गोष्टींचा उल्लेख केला. कारखानदारीच्या संदर्भात बोलताना काही कारखाने वेगळ्या पद्धतीने घेण्यात आले अशा प्रकारचा आरोप त्यांनी केला. परंतु मी त्यावर फार भाष्य करणार नाही. परंतु अशा प्रकारचे कारखाने बऱ्याच लोकांनी घेतले, परंतु या ठिकाणी केवळ एकाच कारखान्याचा उल्लेख केला गेला. सभापती महोदया, १९८१ ते १९८७ या कालावधीत अनेक लोकांच्या सहकार्याच्या माध्यमातून, सभासदांच्या माध्यमातून हा कारखाना उभा केला. १२५० मे. टन क्षमता असलेल्या कारखान्याने २५०० मे.टन उत्पादन करावे अशी अपेक्षा त्या विभागातील शेतकऱ्यांची होती. सातारा जिल्ह्यात प्रचंड प्रमाणात ऊस उत्पादन वाढले होते. हे उत्पादन वाढत असताना या कारखान्याकडून सामान्य शेतकरी आणि सर्वांची अपेक्षा असताना दुर्दैवाने हा कारखाना चुकीच्या व्यवस्थापनामुळे अडचणीत आला.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण सारांशरुपाने भाषण करावे. कारण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला असलेली वेळ संपलेली आहे. कारण मंत्री महोदयांना सुद्धा द्यावयाचे आहे.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाने हा कारखाना व्यवस्थित चालविला नाही. १९९९ मध्ये या कारखान्यात मोठ्या प्रमाणात अनुत्पादक खर्च झाल्यामुळे हा कारखाना बंद पडला. के.एम.शुगर असेल, वारणा समूह असेल, स्नेहा शुगर असेल, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या माध्यमातून सुद्धा स्नेहा शुगरने हा कारखाना चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु अंतर्गत वाद, व्यवस्थापनाशी वाद, हुकूमशाही पद्धतीने ज्यांनी हा कारखाना चालविण्यास घेतला त्यांनी तो परत केला. गुरु कमोडिटीने हा कारखाना चालविण्यास घेतला. मी एवढेच सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी ५० हजार ते १.५० लाखाचे क्रशिंग होत होते. आताच्या व्यवस्थानाने हा कारखाना ताब्यात घेतल्यानंतर

अमुद्रित प्रत

श्री.शशिकांत शिंदे....

हा कारखाना त्या भागात ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना लाभदायक ठरतो, ही वस्तुस्थिती आहे. आज गोविंद साखर कारखाना बंद पडला, प्रतापगड साखर कारखाना बंद पडला, खंडाळा साखर कारखाना बंद पडला.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. शशिकांत शिंदे ....

आपण आरोप करतो. कारखाना चालवित असताना त्याची वाढ साडे सात हजार टनाच्या वर म्हणजे १५ हजार टन आज क्रशिंग होत आहे. मी अभिमानाने सांगेन. कारखाना कोणी घेतला आहे, वाद काय आहे हे पहायचे का ? सन्माननीय विरोधी पक्षनेते सातारा जिल्हा दौऱ्यावर आले होते, त्यावेळी अनेक शेतकऱ्यांनी व्यथा मांडल्या होत्या. मी सदनाला माहिती देण्याची गरज आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. भाई गिरकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य उत्तर देत आहेत का ?

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, मी तेथील भावना मांडत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. परिस्थितीवर बोलत आहेत.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, हा कारखाना चालवित असताना ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

श्री. भाई गिरकर : सभापती महोदया, हे काय चालले आहे ?

**उप सभापती** : वस्तुस्थितीची माहिती देत आहेत.

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, सातारा जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला या कारखान्याने आधार दिला आहे.

**उप सभापती** : आपण त्यांचे भाषण सेन्सॉर करणार आहोत का, आपण सेन्सॉर आहोत का ?

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, योग्य भाव, योग्य वजनकाटा अशी या काररखान्याने मदत केली आहे. त्यामुळे हजारो, लाखो शेतकऱ्यांना मदत झाली

असुधारित प्रत

श्री. शशिकांत शिंदे ....

आहे. ही वस्तुस्थिती असल्यामुळे या कारखान्याच्या संदर्भात आजही शेतकऱ्यांची चांगली भूमिका आहे. शेतकरी पूर्णपणे त्याच्या पाठीमागे उभा आहे. हा काररखाना चांगल्या पध्दतीने चालविला याबाबत निश्चितपणे व्यवस्थानाबाबत शतकरी आनंदाने समाधान व्यक्त करीत आहे. आरोप-प्रत्यारोप होतात, कोणी कारखाना घेतला यावर टीका होते. कुठून कारखाना घेतला यावर टीका होते. पण मला एवढीच वस्तुस्थिती पटलावर आणायची होती की, त्या कारखान्यामुळे आज इतके क्रशिंग होत आहे, इतक्या मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती मांडायची नाही का ?

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदया, यामध्ये राजकारण आणू नये. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी निश्चितपणे मी शेतकऱ्यांच्या वतीने धन्यवाद देतो आणि एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----

असुधारित प्रत

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर, आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. आपण सभागृहात अनेक भाषणे ऐकली आहेत. आपण सेन्सॉर बोर्ड आहोत का, आपल्याला असे कसे करता येईल ?

श्री. भाई गिरकर : सभापती महोदया, आम्हाला देखील बोलावयाचे आहे.

**उप सभापती** : आपण सेन्सॉर बोर्डाची भूमिका घेऊ शकत नाही. आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. आपण यादी दिली. त्यामध्ये आपलेही नाव आहे. आपण आता बोलणार आहात का ? आपल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे नाव आहे. मी क्रमाने जाणार आहे. आपण सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके यांना समजावून सांगावे. मी नावे वाचून दाखविते. आपण क्रमांक लक्षात ठेवावेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांच्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर आहेत, त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे आहेत, त्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके आहेत. आता आपण सारखा हात वर करायचा नाही. मी वेळेनुसार जाणार आहे. तुमच्या पक्षाचा वेळ संपला आहे आणि तरीही मी बोलण्यासाठी संधी देत आहे. एकमेकांची भाषणे सेन्सॉर करु नका असे चालणार नाही.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महादेया, आम्हाला बोलायचे आहे. आण सगळ्यांना बोलू देता. आपण दोन वेळा असे सांगितले. आपण शेवटच्या टप्यात असे करीत आाहत. आपण अगोदर वेळेचे नियोजन करीत नाही. अगोदर तास, अर्धा तास वेळ देता.

**उप सभापती** : तुमच्या पक्षाचा वेळ संपला आहे. तुम्ही इतरांचा वेळ घालवू नका.

असुधारित प्रत

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, चुकीच्या पध्दतीने चालले आहे.

**उप सभापती** : आपण माननीय सभापतींना जाऊन सांगावे. आपण सर्व सन्माननीय गटनेते, सन्माननीय विरोधी पक्षनेते मिळून चर्चा करु या आणि कोणाचा किती वेळ झाला ते पाहू या.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महादेया, सर्वांना बोलण्यास संधी दिली पाहिजे. आपण असे करु नका.

**उप सभापती** : असे चालणार नाही. तुम्ही तुमच्या मनाने सभागृह चालवू शकत नाही.

श्री. गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, आपण चुकीच्या पध्दतीने कसे करीत आहात ? आपण अगोदर दोन तास देत आहात आणि नंतर शेवटी भाषण करणाऱ्या सन्माननीय सदस्यांना थोडक्यात बोलण्याविषयी सांगत आहात.

**उप सभापती** : आपण माननीय सभापतींकडे चर्चा करु या. आपण प्रत्येक जण उभे राहून १० मिनिटे भाषण करीत आहात. तुमच्या पक्षाचा वेळ संपला आहे आणि तरीही मी बोलण्यास संधी देत आहे. मात्र तरीही तुम्ही माझ्याशी असे बोलत आहात का ? सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाषणास सुरुवात करावी.

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री या चर्चेसाठी उपस्थित आहेत. मी मागच्या वेळी देखील सांगितले होते की, माननीय श्री. अजितदादा पवार ऊर्जा मंत्री होते, त्यानंतर आमचे नवीन सरकार आले. मात्र त्यांच्या काळात शेतकऱ्यांकडे १४ हजार कोटी रुपयांचे थकीत होते. माननीय श्री. देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये शेतकऱ्यांकडील थकीत वाढून ४२ हजार कोटी रुपये झाले. माननीय श्री. शरद पवार साहेबांनी हल्लाबोल कार्यक्रम, मोर्चा आयोजित केला, तेव्हा त्यांनी सूचना दिल्या होत्या की, महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत आहे. मी ऊर्जा मंत्री असताना माननीय श्री. अजितदादा पवार यांनी सभागृहात अनेक वेळा सांगितले होते की, तुम्ही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापू नका. शेतकऱ्यांना वीज द्या. त्या काळात शेतकऱ्यांकडील थकीत ४२ हजार कोटी रुपयांचे झाले.

सभापती महोदया, आज दादांनी राज्यातील तीनही कंपन्यांची बॅलन्स शीट मागविली पाहिजे. तुमच्या काळातील १४ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांकडील थकीत आमच्या काळातील ४२ हजार कोटी रुपये झाले आणि तरीही ४७१५ कोटी रुपयांनी तीनही कंपन्या नफ्यामध्ये होत्या. तुम्ही त्यांची बॅलन्स शीट मागवून घेतली पाहिजे, जेणेकरुन महाराष्ट्रातील जनतेला समजेल की, या कंपन्या कशामुळे डुबत आहेत. मी देत असलेली २-३ उदाहरणे महत्त्वाची आहेत. कंपन्या का डुबतात हे समजेल.

सभापती महोदया, नवीन सरकार आल्यानंतर विदर्भ, मराठवाड्यामधील मागासलेपणाचा विचार करुन तेव्हाच्या सरकारने निर्णय घेतले. आपण कधीही उद्योगाकडून विद्युत शुल्क घेत नाही. कारण तेथील उद्योग वाढले पाहिजेत. हा निर्णय महाविकास आघाडी सरकारच्या काळात झाला. एमईआरसीने तो निर्णय केला. सरकार हा निर्णय करीत नाही. एमईआरसीकडे प्रस्ताव गेला आणि एमईआरसीने निर्णय केला की, विदर्भ, मराठवाडा येथील उद्योगांकडून कोणतेही विद्युत शुल्क घ्यायचे नाही. पण हा नियम मोबाईल टॉवरला होता का ? हा नियम मोबाईल टॉवरला

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

नव्हता. पण या सरकारने एमईआरची परवानगी न घेता संपूर्ण मराठवाडा, विदर्भ येथील मोबाईल टॉवरला आता सरळ विद्युत शुल्क माफ करुन टाकले आहे. २ हजार कोटी रुपये मोबाईल टॉवरच्या घशात गेले आहेत. २ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त पैशांनी या कंपन्या डुबत आहेत. आता जो भार वाढला, त्यामध्ये २ हजार कोटी रुपये आहेत. आपण एकीकडे ५००, १०००, २००० रुपयांकरिता शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापत आहात. माननीय श्री. अजितदादा पवार यांच्यासरखे उप मुख्यमंत्री सभागृहात जाहीर करतात की, आम्ही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कापणार नाही. माननीय मंत्री येतात आणि सांगतात की, आम्ही कनेक्शन कापणार आहोत. माझी विनंती आहे की, विदर्भ, मराठवाडा येथील मोबाईल टॉवरला विद्युत शुल्क कोणत्या आधारावर माफ केले याची चौकशी केली पाहिजे आणि तातडीन जेवढे शुल्क माफ केले असेल तेवढे वसूल केले पाहिजे. कारण हे उद्योग नाहीत. हे कमर्शिअल तत्वारील व्यवसाय आहेत. त्यामुळे आपण त्या विद्युत शुल्काचा नक्की विचार केला पाहिजे आणि त्या संदर्भात बैठक घेतली पाहिजे.

सभापती महोदया, आपण एमईआरसीच्या नियमाप्रमाणे १३२ कि.वॉ. यावर उद्योग असतात त्यांना ५६ पैसे बिलिंग चार्ज माफ करतो. माझ्याकडे जयदिप मेटॅलिक, सुर्या थेरस अशा कंपन्यांची नावे आहेत. माझ्याकडे अजून १०-१२ कपंन्याची नावे आहेत. मी त्या सर्व कंपन्यांची नावे आपल्याकडे देईन. आपण २२ व ३३ कि.वॉ. अशा कंपन्यांना कधी बिलिंग चार्ज माफ करीत नाही. मात्र आपण या विशेष कंपन्यांना कोणत्या आधारे बिलिंग चार्ज माफ केले ? तुम्हाला एमईआरसीने स्पष्ट आदेश दिले आहेत की, १३२ कि.वॉ. ....

**उप सभापती** : आपला एक मिनिट राहिला आहे. अर्धवट थांबविणे बरे वाटत नाही म्हणून मी सांगितले आहे. आपल्या पक्षाचा वेळ झाला आहे. मी तरीही संधी देत आहे, जेणेकरुन प्रत्येकाचे भाषण पोहोचले पाहिजे. आपण देखील इतर सन्माननीय सदस्यांचा विचार करावा. माननीय मंत्र्यांचे उत्तर देखील आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, जालना जिल्ह्यातील एक कंपनी आहे, त्या कंपनीला ९ डिसेंबरला प्रमाणपत्र घेतले. आपण विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र व वाडा या परिसरातील उद्योगांना ७५ पैसे युनिट सबसिडी देतो. एसआरजी पिट्टी या प्रकल्पाला ९ डिसेंबरला प्रमाणपत्र आणले आणि सांगितले की, नवीन उद्योग असल्यामुळे सबसिडी पाहिजे. एक दिवसाच्या आत सर्व ८ अधिकाऱ्यांनी सीएमडीपर्यंत सह्या केल्या आणि २८ कोटी रुपयांची सबसिडी दिली. ३० तारखेला त्याची तक्रार झाली की, हा उद्योग त्यामध्ये बसत नाही. तेव्हा २८ कोटी रुपयांची फाईल सरकारकडे पाठविली आणि सांगितले की, सरकारने निर्णय घ्यावा.

सभापती महोदया, अशा खिरापती वाटून  वीज मंडळाचे वाटोळे करण्यापेक्षा शेतकऱ्यांना वीज दिली पाहिजे. शेतकऱ्यांकडून कोणतेही पैसे घेऊ नयेत. शेतकऱ्यांना ३ वर्षे पहावे. शेतकरी पश्चिम महाराष्ट्रातील असोत किंवा कोणत्याही भागातील असोत, अडचणीत आहेत. उद्या त्याची परिस्थती राहणार आहे. शेतकऱ्यांचे कनेक्शन कापले तर आपणा सर्वांना अडचणी येणार आहेत. आपण याचा निर्णय होत नाही तोपर्यंत या प्रकरणात लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदया, मुख्यमंत्री सौर वाहिनी योजना सुरु केली पाहिजे. २५ हजार रुपये हेक्टरी नुकसानभरपाई देणार होतो. तो राजकारणाचा मुद्दा झाला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचे १७ हजार कोटी रुपये सरकारकडे बाकी आहेत. अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. सरकारने या संदर्भात निर्णय घेतला पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभागाला ४ हजार कोटी रुपये थकीत आहेत. आपण समृध्दी महामार्गाची इक्विटी वाढवून ३५ टक्के केली. पण त्यामुळे काही कामे थांबली आहेत. आपण त्यामध्ये लक्ष घातले पाहिजे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

सभापती महोदया, माझी अशी विनंती आहे की, आम्ही सर्व सिनिअर सदस्य आहोत, २० वर्षापासून सदनाचे सदस्य आहोत, विदर्भ व मराठवाड्याच्या चर्चेवर बोलण्यासाठी चार ते पाच मिनिटांचा वेळ मिळत असेल तर सभागृहात आम्ही येण्याला काहीही अर्थ राहत नाही. किमान १२ ते १५ मिनिटांचा वेळ आम्हाला भाषण करण्यासाठी मिळायला पाहिजे. विदर्भ व मराठवाड्यातील प्रश्न मी तीन मिनिटांत मांडावे हे काही शक्य नाही. ठीक आहे, आपण निर्णय घेतला त्याबाबत मी धन्यवाद देतो.

**उप सभापती** : रेकॉर्डवर अयोग्य गोष्ट राहू नये त्यासाठी मी आपणाला पुन्हा समजावून सांगते की, भारतीय जनता पक्षाला या प्रस्तावावर बोलण्यासाठी एकूण ५० मिनिटांचा वेळ होता. १ तास ५० मिनिटे माननीय विरोधी पक्ष नेते बोलले आहेत. अन्य सदस्यांमध्ये सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील २७ मिनिटे, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड २९ मिनिटे व सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस हे पाच मिनिटे व आता आपण आठ ते नऊ मिनिटे बोलला आहात. विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील जे बोलले ते पक्षातर्फे बोलले आहेत. वैयक्तीक तुलना करायला लागला तर प्रत्येकाला वेगळे स्थान आहे. आम्हाला येथे कोणाचाही उपमर्द करायचा नाही. सन्माननीय सदस्यांना थांबविणे आमच्या ही जीवावर येते. वेळ पाहिला तर विरोधी पक्ष नेते १ तास ५० मिनिटे बोलेले आहेत. अन्य भाजप सदस्य १ तास एक मिनिटे बोलले आहेत. आपण जितक्या वेळा बोलणार तितक्या वेळा मी या बाबी रेकॉडवर घेणार आहे. कारण बाहेर चुकीचा संदेश जायला नको की, आम्ही सदस्यांना बोलायला देत नाही. हरकतीमध्ये किती वेळ घालविला तो मी मोजलेला नाही. आता सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी भाषणाला सुरुवात करावी.

------

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके (भंडारा तथा गोंदिया स्थानिक प्रा.संस्था) : सभापती महोदया, विरोधी पक्ष नेत्यांनी नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, विदर्भातील महत्वाचे प्रश्न नागपूर येथील अधिवेशनात सोडविण्याचे काम आपण दरवर्षी करतो. मागील दोन वर्षापासून नागपूर येथे अधिवेशन होत नसल्यामुळे विदर्भातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. विदर्भातील अधिवेशन घेण्याची परंपरा थांबविण्याचे काम महाविकास आघाडी शासनाने केले आहे. विदर्भ महाराष्ट्रात सामील होत असताना जो करार करण्यात आला त्या कराराचे उल्लंघन या सरकारने केले आहे. विदर्भात अनेक सिंचनाचे छोटे व मोठे प्रकल्प प्रलंबित आहेत. विदर्भातील विकासाचा समतोल राखण्याकरिता वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली होती. त्यांची मुदत ३० एप्रिल, २०२० रोजी संपुष्टात आली. दोन वर्षे झाले तरी त्यासाठी मुदतवाढ देण्यात आली नाही. घटनेतील कलम ३७१ (२) अन्वये मागास भागाचा समतोल विकास होण्याकरिता व अनुषेश दूर होण्याकरिता १९९४ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती यांनी या वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली होती. वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून राज्यपाल महोदयांना अनुशेषाची माहिती होत होती. या अनुशेषानुसार राज्यपाल महोदय वेळोवेळी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यास शासनाला भाग पाडत होते. विदर्भातील असमतोल दूर करण्याकरिता व अनुशेष कमी करण्याकरिता कोणतीही उपाययोजना सरकारकडे अस्तित्वात नाही. अर्थमंत्री महोदयांनी दोन वर्षापूर्वी सांगितले होते की, लवकरात लवकर वैधानिक विकास मंडळाना मुदतवाढ देण्यात येईल. अद्यापर्यंत मुतदवाढ देण्यात आलेली नाही. त्यामुळे विदर्भात मोठ्या प्रमाणात सिंचनाचा अनुशेष आहे. अमरावती विभागात सर्वात जास्त म्हणजे १ लाख ६० हजार हेक्टर सिंचनाचा अनुशेष आहे. सन २०१९-२०२० व २०२०-२१ मध्ये ९५४३ कोटी रुपये येणे बाकी होते. ही रक्कम देण्यात आली असती तर अमरावती विभागात १ लाख ७० हजार हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ झाली असती. अर्थमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, विदर्भातील प्रकल्पांना भरीव निधी द्यावा. अमरावती विभागात १७ सिंचन प्रकल्प पुनर्वसनाच्या अभावामुळे पूर्ण होऊ शकले नाही. १७ प्रकल्पाच्या माध्यमातून

डॉ.परिणय फुके...

जवळपास १ लाख १० हजार हेक्टर सिंचन क्षेत्रात वाढ झाली असती. पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणात मामा तलाव आहेत. पूर्व विदर्भात १ लाख १० हजार हेक्टर सिंचनाचा अनुशेष आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर येथे मोठ्या प्रमाणात मामा तलाव आहेत. ३०० वर्षापूर्वी गोंड राजे यांच्या गाळात या तलावांचे बांधकाम करण्यात आले होते. त्या भागातील शेतकरी व कोळी समाज यांनी श्रमदानाने व स्वत:च्या पैशातून तलाव खोदले होते. त्यातून धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शाश्वत पाणी उपलब्ध होत होते. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर १०० हेक्टरपेक्षा मोठे तलाव पाटबंधारे विभागाला देण्यात आले. १०० हेक्टरपेक्षा कमी तलाव जिल्हापरिषदेकडे देण्यात आले. मागील ६० ते ७० वर्षात या तलावांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या तलावात गाळ साचून ते बंद होत आहेत. या सर्व तलांवामधील गाळ काढल्यास पूर्व विदर्भातील सिंचन क्षमता १ लाख १६ हजार हेक्टरने वाढू शकते. मच्छिमारांच्या संदर्भात अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. जो निधी देण्यात आला तो फक्त खाऱ्या पाण्यात मच्छिमारी करणाऱ्या लोकांना देण्यात आला आहे. सरकार फक्त खाऱ्या पाण्यातील मच्छिमारांसाठी योजना जाहीर करते. विदर्भात गोड पाण्यावर मच्छिमारी करण्यात येते. त्यांच्यासाठी काही उपाययोजना करायला पाहिजे होत्या. सन २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीत कोविड व अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे. सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालावधीतील तलावाचे ठेके माफ करायला पाहिजे होते. भंडारा व गोंदिया जिल्ह्यात तीन लाख मासेमारी करणारे लोक आहेत. त्यांना रोजगार देण्यासाठी सर्व तलाव मच्छ व्यवसाय विभागाला द्यायला पाहिजे होते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य आपली वेळ संपलेली आहे, आपले काय म्हणणे आहे त्याबाबत आपण मंत्री महोदयांना निवेदन द्यावे.

---------

श्री.अंबादास दानवे (औरंगाबाद तथा जालना प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निमय २६० अन्वये जो प्रस्ताव मांडला त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, शेतकरी कर्जमुक्तीबाबत काही बाबी बोलल्या गेल्या आहेत. अर्थमंत्री महोदयांनी या बजेटमध्ये ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता जाहीर केला आहे. त्यामुळे शेतकरी याबाबत अतिशय समाधानी आहेत. मराठवाड्याबाबत काही बाबी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या आहेत. महाविकास आघाडी शासन मागील दोन वर्षापासून मराठवाड्यात अनेक चांगल्या योजनांची अंमलबजावणी करीत आहे. वैधानिक विकास मंडळाबाबत भारतीय जनता पक्ष सातत्याने आवाज उठवित आहे. वेगवेगळया भूमिका मांडते, भारतीय जनता पक्षाचे सरकार होते व माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते त्यावेळी मागील पाच वर्षाच्या काळात मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी १३ कोटी ९९ लक्ष रुपये व दुसऱ्यांदा ४१ कोटी रुपये राजकीय सोईसाठी देण्यात आले होते. मराठवाडा वैधानिक विकास मंडळाविषयी बोलणे हे मराठवाड्यावर पुतना मावशीचे प्रेम व्यक्त करण्यासारखे आहे. हे सर्व करीत असताना अतिवृष्टीविषयी आवाज उठविला जातो. महाविकास आघाडी शासनाने अतिवृष्टीसाठी १० हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले व ७० ते ८० टक्के रक्कम शेतकऱ्यांपर्यंत पोहचली आहे. त्या उलट केंद्र शासनाने पाच राज्यांना निधी दिला, महाराष्ट्राला त्यातून जाणीवपूर्वक वगळण्यात आले आहे. त्याचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. मागील सरकारच्या काळात जलयुक्त शिवार योजनेचे काय झाले हे पाहायला पाहिजे. इतका मोठा खर्च झाला तर जलयुक्त शिवारमुळे किती शेतकऱ्यांचा फायदा झाला, याबाबत विचार केला पाहिजे. महाविकास आघाडी शासन पुढील काळात जालना येथे सीडस् पार्क निर्माण करीत आहे. संभाजी नगर या शहरात १६८० कोटी रुपयांची सर्वात मोठी पाणीपुरवठा योजना सुरु आहे. मराठवाड्याकडे हे सरकार दुर्लक्ष करते हे म्हणणे अतिशय चुकीचे आहे. महाविकास आघाडी शासन अतिशय वेगाने व विकासात्मक कामे करीत आहेत. मेडीकल कॉलेज परभणी येथे झाले आहे. धाराशीव येथे मेडिकल कॉलेज होत आहे. हिंगोली येथे हळदीचा प्रोजेक्ट होत आहे. नांदेड येथे मोठे प्रकल्प होत आहेत. समृध्दी मार्गाची

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे....

सीमा नांदेड ते जालन्यापर्यंत वाढविण्यात आली आहे. संभाजीनगर या शहरासाठी २६०० कोटी रुपयांचा निधी मागील काळात महाविकास आघाडी शासनाने दिला आहे.मागच्या सरकारपेक्षा हे सरकार मराठवाड्याकडे अतिशय चांगल्या प्रकारे लक्ष देत आहे. इतके बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

**उप सभापती :** आता उप मुख्यमंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम २६० अन्वये.....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांना ५ मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती :** आपण कृपया वेळेची मर्यादा पाळावी. आपल्या पक्षाला दिलेला वेळ संपलेला आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आपण आमचे म्हणणे ऐकून घ्यावे. त्यानंतर आपण निर्णय द्यावा. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर नियम २६० अन्वये प्रस्तावावर बोलणार होते. मघाशी आपण त्यांचे नाव वाचून दाखविले. परंतु त्यांनी सांगितले की, माझ्या ऐवजी सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर बोलतील. आपण सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांना ५ मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती :** मी सभागृहाला पुन्हा सांगू इच्छिते की, आपण प्रत्येक पक्षासाठी वेळ निश्चित करुन दिलेला आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी बोलताना वेळेची मर्यादा पाळली पाहिजे. सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांना वेळेअभावी बोलण्याची संधी मिळत नाही याचे मला खूप वाईट वाटते. आपल्या पक्षाला नियमापेक्षा जास्त वेळ मिळालेला आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, मला दोन मुद्दे मांडण्याची परवानगी द्यावी.

**उप सभापती :** आपल्या पक्षाला दिलेला वेळ संपलेला आहे. आपली पहिलीच टर्म आहे. आपण कृपया सभागृहात शांतता ठेवावी. ही पद्धत बरोबर नाही.

असुधारित प्रत

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदया, मागील दोन दिवसांपासून नियम २६० अन्वये प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चेत माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री अभिजीत वंजारी, अमोल मिटकरी, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री अनिकेत तटकरे, प्रसाद लाड, सुरेश धस, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री शशिकांत शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.परिणय फुके, श्री.अंबादास दानवे यांनी भाग घेतलेला आहे.

श्री.गोपिचंद पडळकर : सभापती महोदया, ***

**उप सभापती :** आपण कृपया अशा प्रकारे भाष्य करु नये.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती :** मला असे वाटते की, आपल्याला मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यायचे नाही. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी म्हटले की, *** हे बरोबर नाही. ते माझ्यावर आरोप करीत आहेत. मी या संदर्भात भूमिका घेतली तर सभागृहाचा वेळ वाया जाईल.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, नियम २६० अन्वये प्रस्तावावर दोन दिवसांपासून चर्चा सुरु आहे. या निमित्ताने राज्यातील विविध प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षित होती. परंतु काही विशिष्ट प्रश्नच चर्चेला आलेले आहेत. सभागृहातील वातावरण बघता विरोधी पक्षाला मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यायचे नाही असे वाटते.

श्री.प्रवीण दरेकर : आम्हाला मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यायचे आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदया, आपण कृपया विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती :** विरोधी पक्षाला दिलेला वेळ संपलेला आहे. आपण दिवसभर प्रस्तावावर बोलणार आहात काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदया, आम्ही ३० वर्षांपासून सभागृहात काम करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी कृपया उत्तर ऐकून घ्यावे.

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे बोलणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांचे वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल. आता पर्यंत त्यांनी दोन वेळा अशा प्रकारे भाष्य केलेले आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. नियम २६० अन्वये प्रस्तावात अनेक विषयांचा समावेश आहे. सन्माननीय सदस्यांनी सर्वच विषयांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझे उत्तर संपल्यानंतर माननीय सहकार मंत्री श्री.बाळासाहेब पाटील उत्तर देतील. सभागृहाने आमची उत्तरे ऐकून घ्यावीत, अशी माझी सभागृहाला विनंती आहे. आमची उत्तरे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना पटतीलच अशातला भाग नाही. आम्ही महाविकास आघाडी सरकारची भूमिका सभागृहात मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या संदर्भात कोकण, विदर्भ, मराठवाड्याला कमी निधी दिला असे सांगितले. आपण अनेक वर्षांपासून एकमेकांना ओळखतो. एखाद्या विभागाला कमी निधी द्यायचा अशा प्रकारची भूमिका माझी कधीही नव्हती आणि यापुढेही असणार नाही. आपण निधी वाटप करताना जिल्ह्यातील लोकसंख्या विचारात घेतो. ग्रामीण लोकसंख्येसाठी २० टक्के, जिल्ह्यातील क्षेत्रफळासाठी ३० टक्के आणि मानव विकास निर्देशांकासाठी २० टक्के निधी अशी परंपरा वर्षानुवर्षे चालत आलेली आहे. परंतु पूर्वीचा काळ वेगळा होता. आताचा काळ वेगळा आहे. माननीय विरोधी पक्षनेते आपण पूर्वी मुंबई शहराचे प्रतिनिधीत्व करीत होते. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी २५ टक्के लोकसंख्या ठाणे, मुंबई व मुंबई उपनगर परिसरात आहे. त्यामुळे माननीय

श्री.अजित पवार.......

असुधारित प्रत

मुख्यमंत्री व आम्ही सर्वांनीच पूर्वीचे ३०, २०, ३० अशा प्रकारे जे १०० टक्क्याचे सूत्र आहे त्यामध्ये बदल केला. शहरी भागासाठी तेथील लोकसंख्येचा विचार करुन अधिकचे १ हजार कोटी रुपये द्यावेत, असा निर्णय घेण्यात आला. मी सांगू इच्छितो की, मुंबई शहराला पूर्वी २५० कोटी रुपये मिळत होते. आता ३१५ कोटी रुपये मिळतात. उपनगरासाठी ६५० कोटी रुपये मिळत होते. अनेक आमदार उपनगराचे प्रतिनिधीत्व करतात. आता नवीन धोरणानुसार उपनगरासाठी ८४९ कोटी रुपये मिळतात. ठाण्यासाठी ४७५ कोटी रुपये मिळत होते, आता नवीन सुत्राप्रमाणे ६१८ कोटी रुपये मिळतात. आपण पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा सर्व जिल्ह्यांसाठी निधी दिलेला आहे. आपण उप राजधानी म्हणून नागपूरसाठी अधिकचे १०० कोटी रुपये दिलेले आहे. तसेच औरंगाबाद मराठवाड्याचे प्रवेशद्वार असल्यामुळे तेथे जास्तीचा निधी दिलेला आहे. आपण नाशिक, अमरावती, पुणे, मुंबई अशा सर्वच ६ विभागांसाठी अधिकचा निधी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण निधीचे वाटप करताना कोणताही भेदभाव केलेला नाही. उलट मराठवाडा, विदर्भाला जास्तीचा निधी कसा देता येईल किंवा जेथे लोकसंख्या जास्त आहे तेथे जास्तीचा निधी कसा देता येईल अशा प्रकारचा प्रयत्न आपण केलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके व इतर सन्माननीय सदस्यांनी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचा मुद्दा उपस्थित केला. सभागृहाला कल्पना आहे की, दिनांक ९ मार्च, १९९४ रोजीच्या अधिसुचनेनुसार वैधानिक विकास मंडळे अस्तित्वात आली आणि ती ५ वर्षासाठी असावीत असा निर्णय झाला. सन १९९९ मध्ये ५ वर्षे संपली. त्यावेळी आम्ही सत्तेवर होतो. आम्ही वैधानिक विकास मंडळांना ५ वर्षे मुदतवाढ दिली. सन २००४ मध्ये ती मुदत संपल्यानंतर पुन्हा १ वर्षे मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर सन २०१६ मध्ये सन २०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सन २०१० मध्ये पुन्हा १ वर्षे मुदतवाढ दिली आणि त्यानंतर सन २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर मात्र मुदतवाढ देण्यात आली नाही. परंतु मी या निमित्ताने सभागृहाला व राज्यातील जनतेला सांगू

श्री.अजित पवार.......

इच्छितो की, वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ दिलेली नसली तरी राज्यपाल महोदयांच्या सुत्रानुसार विदर्भ, मराठ्यासाठी जो निधी दिला जातो, वैधानिक विकास मंडळ असताना माननीय राज्यपालांचे निधीचे सूत्र विदर्भासाठी २३ टक्के, मराठवाड्यासाठी १८.७५ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ५८ टक्के होते. विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी देखील विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला होता. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, आम्ही विदर्भासाठी २६ टक्के निधी दिलेला आहे. म्हणजे वैधानिक विकास मंडळे नसताना देखील जास्तीचा निधी दिलेला आहे. मराठवाड्यासाठी १८.७५ टक्के निधी दिलेला आहे. उर्वरित महाराष्ट्रासाठी ५८ टक्के निधी द्यावयाचा होता त्याऐवजी ५५ टक्के म्हणजे ३ टक्के निधी कमी दिलेला आहे. वैधानिक विकास मंडळाला मुदतवाढ दिलेली नसली तरी माननीय मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने मराठवाडा, विदर्भावर अन्याय होऊ दिलेला नाही, हे मला स्पष्टपणे सर्वांच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार आपण ६५८८ कोटी रुपयांच्या वित्तीय अनुशेषाचे निर्मूलन केलेले आहे आणि बाकीचे निर्मूलन करण्याचे काम सुरु आहे.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

एक गोष्ट खरी आहे की, यापूर्वी कोकणकरिता स्वतंत्र विकास मंडळ करावे आणि उर्वरित महाराष्ट्रातून पश्चिम महाराष्ट्र काढून उत्तर महाराष्ट्राचे एक स्वतंत्र विकास मंडळ करावे अशा पद्धतीने आपण वेळोवेळी ठराव केलेले आहेत. ही मंडळे स्थापन करण्यासंबंधी संसदेला अधिकार आहेत. माझी या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते तसेच सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, तुम्ही याबाबतीत प्रयत्न करावा. तसेच आम्ही देखील याकरिता प्रयत्न करतो. त्यानंतर संसदेने त्याकरिता मान्यता दिल्यास कोकण आणि उत्तर महाराष्ट्रकरिता वेगळी विकास मंडळे करण्यासंबंधी आपल्याला कार्यवाही करता येऊ शकेल. राज्याने दिलेल्या एकूण निधीमध्ये विदर्भाला २३ टक्क्यांऐवजी २६ टक्के, मराठवाडयाला १८.७५ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राला ५८ टक्क्यांऐवजी ५५ टक्के निधी दिलेला आहे. कोकणचा निधी कमी झालेला नाही. शासनाने सिंधुदुर्ग व रत्नागिरीकरिता ३०० कोटी रुपयांचा कार्यक्रम दिलेला आहे व त्याकरिता वेगळया प्रकारचा निधी दिला आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी मंत्रिमंडळामध्ये बोलत असताना नेहमी सांगत असतो की, सोयाबीन, धान, ऊस किंचा चक्री वादळ असो, या निमित्ताने विविध भागांना निधी दिला जातो. त्या पटीत सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि ठाणे या जिल्हयांना निधी मिळत नाही. त्यामुळे त्या जिल्हयांकडून कोणताही प्रस्ताव आल्यास त्याकरिता अर्थ मंत्री म्हणून झुकते माप देण्याचा माझा प्रयत्न असतो. रेवस रेडी येथील रस्ते किंवा पर्यटनाला चालना देण्याचे काम असो, विविध बीचेसला वेगळया गोष्टी करणे, जलवाहतुकीला प्राधान्य देणे, जेट्टी करणे या सर्व गोष्टींचा फायदा कोकण किनारपट्टीलाच होणार आहे. तसेच तेथे इंडस्ट्रीज आणण्याकरिता माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उद्योग मंत्री श्री.सुभाष देसाई असे आम्ही सर्व जण प्रयत्न करीत आहोत. तेथे इंडस्ट्रीज आणत असताना पर्यावरणाचा विचार समोर ठेवून पर्यावरणाची कोणताही हानी होणार नाही याची देखील खबरदारी आम्ही घेत असतो.

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुरेश धस, शशिकांत शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे, अंबादास दानवे, डॉ.मनिषा कायंदे, डॉ. परिणय फुके यांनी या प्रस्तावासंबंधी आपापली भूमिका मांडली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगू इच्छितो की, तुम्ही व मी ऊर्जा विभाग सांभाळलेला आहे. माझ्या कामाची पद्धत तुम्ही देखील अनुभवली आहे. बिलांची वसुली झाली पाहिजे अशा प्रकारची कडक भूमिका मी घेत होतो. परंतु आता मात्र तुम्ही विदर्भ आणि मराठवाडयात विद्युत शुल्क घ्यावयाचे नाही, तसेच आता मोबाईल टॉवरचे विद्युत शुल्क माफ केलेले आहे. आपण मला या संदर्भातील सविस्तर माहिती द्यावी. मी या संदर्भात जरुर खोलात जाईन. तसेच सध्या तिन्ही कंपन्याची परिस्थिती लक्षात घेता मोबाईल टॉवर कंपन्यांना विद्युत शुल्क माफ करण्याचे काही कारण नाही. त्यामुळे असे का करण्यात आले ? आपण त्या विभागांना अधिकचा निधी देण्याचा प्रयत्न करीत असतो. जालना कंपनीच्या सबसिडीचे एक दिवसामध्ये २८ कोटी रुपये दिले. आपण त्याबाबतची सविस्तर माहिती माझ्याकडे द्यावी. मी त्या संदर्भात खोलात जाईन. तसेच याबाबतीत विभागाकडे सुध्दा विचारणा करीन. आपण या संदर्भात जे २-३ मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याबद्दल नेमकी काय वस्तुस्थिती आहे ? या संदर्भात दोन्ही बाजू लक्षात घेऊन त्यात एखादी बाजू बरोबर होत नसल्यास ती दुरुस्त करण्याची राज्य शासनाची निश्चितपणे तयारी राहील. मी स्वत: अर्थ मंत्री म्हणून त्यात लक्ष देईन अशी मी आपल्याला खात्री देऊ इच्छितो.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी एवढे मुद्दे उपस्थित केलेले आहेत की, कोणकोणत्या मुद्दांना न्याय द्यावयाचा ? माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण सुरु असताना मी सदनात नव्हतो. परंतु मी त्यांचे भाषण ऐकत होतो. त्यांनी खूप मोठे भाषण केले. अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. ते विरोधी पक्षनेते आहेत. तसेच त्यांनी खूप आरोप केलेले आहेत. आपण त्या दिवशी केलेल भाषण पाहिल्यास आम्हाला त्या दिवशी तुम्ही फार तापलेले, पेटलेले वाटलात. मी

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

आपल्याला यापूर्वी सदनात अशा प्रकारे एवढे तापलेले, पेटलेले असल्याचे कधी पाहिले नव्हते. मी या सदनामध्ये माननीय श्री.नितीन गडकरी तसेच श्री.विनोड तावडे यांचे देखील कामकाज पाहिलेले आहे. परंतु आपला त्या दिवशीचा एकत्रित रागरंग बघून "दरेकर साहब को गुस्सा क्यों आता है?" असे आम्हाला वाटत आहे. त्याकरिता काही कारणे असू शकतात. ती खास करुन आपल्या स्वत:ला माहिती आहेत. मी सहकारातून पुढे आलेला कार्यकर्ता आहे. मी १९९१ मध्ये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा चेअरमन झालो होतो. त्यानंतर मला त्या भागातील लोकांनी खासदार म्हणून निवडून दिले. मी ६ महिन्यांनंतर खासदारकीचा राजीनामा देऊन राज्य मंत्रिमंडळामध्ये आलो. त्यामुळे मी सहकार अतिशय जवळून पाहिलेले आहे. माननीय मंत्री श्री.बाळासाहेब पाटील तसेच इतर अनेक जण सहकारातून पुढे आलेले आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, स्वर्गीय वसंतदादा पाटील, स्वर्गीय वसंतराव नाईक त्यानंतरच्या काळात माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांनी नेहमी सहकाराला ताकद देण्याचे काम केले आहे. ही बाब संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेली आहे. आता त्या काळातील पिढी राहिलेली नाही. विशेषत: कोल्हे, काळे, विखे असतील. आता त्यांच्या कुटुंबातील चौथी पिढी काम करीत आहे. त्यात सन्माननीय सदस्य डॉ.निलय नाईक आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. मी आपल्या सर्वांच्या वतीने सन्माननीय सदस्य डॉ.निलय नाईक यांना वाढदिवसाच्या खूप हार्दिक शुभेच्छा देतो.

सभापती महोदया, मध्यंतरीच्या काळात राज्यातील साखर कारखाने विकले गेले व त्यातून मोठा भ्रष्टाचार झाला आहे, दरोडे घातलेले आहेत, लुटालूट झाली आहे असा उल्लेख करण्यात आला. मी या चर्चेच्या निमित्ताने सदनाला एकच गोष्ट सांगू इच्छितो की, माननीय श्री.प्रवीण दरेकर हे मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अनेक वर्षे चेअरमन होते. आता तेथे श्री.सिद्धार्थ कांबळे चेअरमन आहेत. त्यापूर्वी तेथे अनेक जणांनी चेअरमन म्हणून काम केलेले आहे. आपल्याला माहीत असेल की, सुंदरबाग को.ऑप.सोसायटीच्या काही ठेवी मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

ठेवण्यात आल्या होत्या. मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सदर ठेवी लीड बँक म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमध्ये ठेवल्या होत्या. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने त्या काळात मोठया प्रमाणावर सहकारी साखर कारखान्यांना कर्जवाटप केले होते. मला आठवते की, त्याकरिता राज्य शासनाकडून १२ कोटी रुपये भाग भांडवल, ४ कोटी रुपये शेतकऱ्यांनी जमा करायचे आणि २४ कोटी रुपये बँकांकडून दिले जात होते. अशा प्रकारे सुरुवातीच्या काळात ४० कोटी रुपयांमध्ये अडीच हजार मेट्रीक टनाचे साखर कारखाने निर्माण झाले होते. तसेच लोकप्रतिनिधींना देखील असे वाटत होते की, आपल्याला आपल्या भागामध्ये अस्तित्व टिकवायचे असल्यास आपण साखर कारखाना काढला पाहिजे. त्यानंतर आपल्याला तेथे काही माणसे कामाला लावता येतात. मोठया प्रमाणात आर्थिक सुबत्ता आणता येते, त्यातून आपल्याला मोठया शिक्षण संस्था निर्माण करता येतात. अशा प्रकारे आपल्याला साखर कारखान्यांच्या माध्यमातून अनेक चांगल्या गोष्टी करता येऊ शकतात. अशा प्रकारे महाराष्ट्रामध्ये ६० वर्षांपासून चांगल्या प्रकारे सहकारी साखर कारखाने सुरु असून तेथे चांगल्या प्रकारे नेतृत्त्व केले जात आहे. त्यामुळे ज्या भागांमध्ये साखर कारखाने नाहीत, परंतु ऊस आहे. तेथे सहकारी साखर कारखाने व्हावेत असे त्या भागातील लोकांना वाटते. राज्य सहकारी बँक सहकारी साखर कारखान्यांना कर्ज वाटप करीत असते. ते कर्ज वसूल करण्यासाठी सुंदरबाग को.ऑप.सोसायटीने उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ६७/२००७ दाखल केली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या लिलावासंबंधी कारवाई करावी असे आदेश दिले. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना अतिशय जबाबदारीने सांगतो की, हे आदेश महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिलेले नाहीत. सुंदरबाग को.ऑप.सोसायटीने उच्च न्यायालयात जनहित याचिका केल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने असे आदेश दिले होते की, त्या कारखान्यांना संधी द्यावी. तसेच ते कारखाने पैसे देत नसल्यास ते Securitisation Act खाली काढावेत. उच्च

असुधारित प्रत

श्री.अजित पवार....

न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांनी नोटीस ऑफ मोशनच्या संदर्भात याचिका क्रमांक १८१/२०१० दाखल केली. नोटीस ऑफ मोशनच्या अनुषंगाने जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्याने दिनांक १५ एप्रिल, २०१० आणि २० एप्रिल, २०१० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे अर्ज केला.

यानंतर श्री.गागरे ....

असुधारित प्रत

श्री.अजित पवार .....

तीन महिन्याच्या आत रक्कम अदा करण्याचे आदेश दिले व कारखान्याने अशी रक्कम अदा न केल्यास बँकेकडून सदर कारखान्याचा ताबा घेण्याचे निर्देश दिल्यानुसार दिनांक ३०.४.२०१० अन्वये बँकेने ताबा घेतला. त्याच्या आधी तो कारखाना त्यावेळची मॅनेजमेंट चालवत होती. शालिनीताई पाटील या सभागृहाच्या देखील सदस्य होत्या. परंतु दुर्दैवाने त्यांना तो कारखाना नीट चालविता आला नाही. त्या काळात आम्ही देखील मनापासून मदत करीत होतो. परंतु तो कारखाना बाहेर निघायला तयार नव्हता. त्यानंतर झुनझुनवाला यांना त्यावेळी दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी विनंती केली, त्यांनी तो चालवायला घेतला, झुनझुनवाला यांना त्यामध्ये नुकसान झाले. यानंतर स्नेहा शुगर सांगलीची पार्टी आहे, यांनाही त्यामध्ये नुकसान झाले. वारणाचे प्रमुख श्री.विनय कोरे यांनी चालवायला घेतला, त्यांनाही यामध्ये नुकसान झाले. सुरुवातीपासून राज्य सरकारने यामध्ये कोणताही भाग घेतला नव्हता, मॅनेजमेंटने तो कारखाना पुढे दिला होता, पण कोणालाही तो नीट चालविता आला नाही. त्यानंतरच्या काळात पुन्हा दिनांक ३०.४.२०१० अन्वये बँकेने ताबा घेतल्यावर उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कारखान्याला सदर रक्कम अदा करण्याबाबत पुन्हा संधी देण्यात आली. त्यानुसार कारखान्याने घेतलेल्या बैठकीत १८ कोटी रकमेचा प्रस्ताव बँकेसमोर ठेवला परंतु बँकेने तो नाकारला, १८ कोटी रुपयात आम्ही तुम्हाला कारखाना कसा द्यायचा. त्यानंतर पुन्हा दिनांक १५.६.२०१० रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये २६ कोटी ५० लाख रकमेचा प्रस्ताव बँकेकडून दिला, बँक म्हणाली की, एकंदर थकबाकी ९८ कोटी रुपये आहे, वन टाईम सेटलमेंट करायची म्हटले तरी इतक्या कमी रकमेत करु शकत नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकेच्या निर्णयानुसार सिक्रटायझेशन ॲक्ट २००२ नुसार कारखान्याचा ताबा देऊन वसूली करण्याबाबत एमएससी बँकेकडून निर्णय घेण्यात आला.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते यांचे पूर्ण भाषणाला ऐकायला मी येथे उपस्थित नव्हतो. परंतु त्यांनी बोलताना असे सांगितले की, मुद्दाम लुटालुट केली, मुद्दाम दरोडे टाकले. मी सांगू इच्छितो की, आम्ही लोक देखील शेतकरी आहोत.

असुधारित प्रत

श्री.अजित पवार .....

यामुळे शेतकरी शेतकऱ्याच्या मुळावर कधीही उठणार नाही. कारखानदारी टिकावी व चांगली चालावी हीच आमची सर्वांची भावना आहे. जरांडेश्वर सहकारी साखर कारखान्याने एमएससी बँकेकडून सिक्रटायझेशन ॲक्ट २००२ अंतर्गत होणाऱ्या लिलावाच्या विरुध्द रिट याचिका क्रमांक ९२३६/२००९ अन्वये आव्हान देऊन लिलावाला स्थगिती देण्याबाबत विनंती केली, सदर याचिका उच्च न्यायालयाने निकाली काढली. तद्नंतर बँकेच्या सिक्रटायझेशन कायदा २००२ नुसार होणाऱ्या लिलावाविरुध्द कारखान्याने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली एसएलपी क्रमांक १५३१०/२०१० सर्वोच्च न्यायालयानेही फेटाळली. ती केवळ उच्च न्यायालयात नाही तर सर्वोच्च न्यायालयातही फेटाळली. त्यानुसार एमएससी बँकेने लिलावाची कार्यपध्दती अंतिम केली. बँकेच्या संचालक मंडळाच्या दिनांक १२.१०.२०१० च्या बैठकीत निविदा उघडण्यात आली व त्यात गुरु कम्युनिटीज प्रायव्हेट लि. सर्वात जास्त म्हणजे ६५ कोटी ७५ लाख रुपयाची निविदा निघाली. माननीय विरोधी पक्ष नेते यांना मी सांगू इच्छितो की, येथे राजाराम बापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे प्रमुख तथा मंत्री महोदय श्री.जयंत पाटील बसलेले आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली कारखाना चालतो. त्यांनीही टेंडर भरले होते. यामध्ये दौंड शुगर व विनय कोरे यांनीही टेंडर भरले होते. तेव्हा कर्नाटकच्या काही पार्टीने टेंडर भरले होते. बऱ्याच जणांनी टेंडर भरले होते. परंतु त्यात सर्वात जास्त टेंडर ६५ कोटी ७५ लाखाचे आल्याने हे टेंडर फायनल केले गेले. त्यावेळी बोर्डामध्ये श्री.जयंत पाटील हे देखील होते. सभागृहात एखाद्या सदस्याने माहिती दिली तर ती ग्राहय मानतो, ती तशी माहिती असू शकेल. अशा प्रकारे ते सर्व झाले व तो कारखाना गुरु कम्युनिटीने चालवायला घेतला. त्यात पहिल्यांदा दिवाणी दावा झाला, नंतर फौजदारी झाला, नंतर डीआरटी झाले, कोरेगाव येथे याबाबत एक फौजदारी मॅटर होते, जेएमएफसी कोर्टाने कलम १२० ब, २०१, ४०९, ४१८, ४२०, , ४२७, ४६५ व कलम ४७१ सह भादंवि कलम ३४ नुसार आदेश पारीत केले. नंतर एमएससी बँकेने अतिरिक्त सत्र न्यायालय सातारा येथील क्रिमीनल रिव्हीजन १०८/२०११ अन्वये जेएमएफसी कोरेगाव यांच्या आदेशाला स्थगिती देण्याबाबत रिव्हीजन अर्ज दाखल केला. त्यानंतर सत्र न्यायाधीश

श्री.अजित पवार .....

सातारा यांनी बँकेचा अर्ज मान्य करुन भादंवि २०२ अन्वये या प्रकरणी सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले. जेएमएफसी न्यायालय कोरेगाव यांच्या आदेशाला स्थगिती दिली, तसेच अंतिम निकालाममध्ये सदर बँकेने केलेली कारवाई ही सरफेशी कायद्यान्वये केलेली असून सदर बँकेची कारवाई योग्य असल्याचे नमूद केले. सत्र न्यायाधीश सातारा यांचे उपरोक्त आदेशाविरुध्द जरांडेश्वर सहकारी साखर कारखाना यांनी उच्च न्यायालयात रिट पिटीशन ३६५७/२०१२ ३५६३/२०१२ अन्वये दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने दिनांक १०.४.२०१३ रोजी फेटाळली. त्यानंतर डीआरटीमध्येही गेले, येथे ही प्रक्रिया राबविताना प्रथमदर्शनी कोणतीही चूक दिसून येत नाही. या प्रकरणी चौकशी अतिरिक्त सत्र न्यायाधीश सातारा केली असून ते उच्च न्यायालयात वैध ठरविले. याबाबत पुन्हा चौकशीसाठी अर्ज करणे म्हणजे माननीय न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन तसेच अवमान केल्यासारखे होईल. या बाबी पाहता त्या सर्वांचा विचार झाला पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छितो की, सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन तेथेपर्यंत टिकलेले आहे. तरी देखील आता ईडी यांनी त्याची ॲटॅचमेंट केलेली आहे. त्याबद्दल मला टीका टिपणी करण्याचे कारण नाही व मला अधिकारही नाही.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी हा विषय मांडल्यामुळे मी बारकाईने माहिती काढण्याचा प्रयत्न केला. तेव्हा माझ्या एक गोष्ट लक्षात आली, मागील काळात या खात्याचे मंत्री हर्षवर्धन पाटील हे होते, तेव्हा अर्थमंत्री श्री.जयंत पाटील होते. सहकार राज्यमंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर होते. अशा तिघांची एक समिती असायची. साखर कारखाना विक्रीबाबत या समितीकडून काही निर्णय झाले. मला एक गोष्ट लक्षात आणून द्यायची आहे की, साखर कारखाने कशा प्रकारे विकले गेलेले आहेत. त्याच्या किमती तुम्ही पाहिल्या तर आश्चर्यचकीत व्हाल पण त्याची चर्चा यत्किंचीतही होत नाही. संजय कारखाना ३ कोटी ५२ लाख रुपयांना विकला गेला, २०१३ साली सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी निर्णय घेतला. २५०० मेट्रीक टन क्षमतेचा हा कारखाना होता, एका अक्षराने त्याबद्दल कोणी चर्चाही केली

असुधारित प्रत

श्री.अजित पवार .....

नाही. आता तेथील जमीन राहिली आहे, जमीन विक्री एमएससी बँकेकडून चालू आहे. हा कारखाना विकल्यानंतर सागर नावाने जालना जिल्हयात स्थलांतरीत होऊन आला आहे. अशाच प्रकारे हनुमान सहकारी साखर कारखाना हा देखील २८ कोटीला २०१२ मध्ये विकला गेला. अशा प्रकारे त्या काळात काही कारखाने राज्य सरकारने पुढाकार घेऊन विकलेले आहेत. ती यादी देखील आमच्याकडे आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांना माहिती आहे की, बँका चालविताना किती वेगवेगळया अडचणी येत असतात. तुमचा आरोप आहे तसेच सन्माननीय सदस्य सुरेश धस यांनी सांगितले की, अतिरिक्त ऊस मोठया प्रमाणावर आहे. मी, सहकार मंत्री व मंत्रिमंडळाची सहकारी श्री.शेखर गायकवाड यांना विरात असतो की, काय परिस्थिती आहे. आज सकाळी माझ्याकडे मंत्री महोदय श्री.राजेश टोपे आले होते. त्यांच्या भागात इतर कारखान्याच्या टोळया पाहिजेत, मी टोळया पाठविण्याबाबत फोन करुन सांगितले, कारण उन्हाची तीव्रता वाढत चालली आहे या टोळया पूर्वीसारखा ऊस तोडत नाहीत व जायचे म्हणतात.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.अजित पवार...........

अशा पध्दतीची परिस्थिती आता निर्माण झालेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस, विरोधी पक्ष नेते महोदय, श्री.प्रवीण दरेकर आणि सर्व सभागृहाला मी असे सांगतो की, संपूर्ण ऊस संपेपर्यंत आम्ही त्या त्या भागातील सहकारी व खाजगी साखर कारखाने बंद होऊ देणार नाहीत. आता ज्या भागात फारच लांबून ऊस आणावा लागेल, परंतु मी तर आता ठरविलेले आहे, त्या संदर्भात मी मंत्रीमंडळाला देखील विश्वासात घेणार आहे. मुख्यमंत्रीमहोदयांची देखील परवानगी घेणार आहे. जर यदाकदाचित मे च्याही पुढे काही कारखाने जायला लागले आणि त्यावेळी रिकव्हरी जर ढासळली तर...मागील काळात..... स्व.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार होते, त्यावेळी आम्ही रिकव्हरी लॉस आणि ट्रान्सपोर्ट सबसिडी दिली होती. आता त्याप्रमाणे आम्ही काहीही देणार नाही. शेवटी शेवटी याचा विचार आम्ही करु. जर ऊस शिल्लक राहिला तर हजारो कोटी रुपये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी लागेल. यंदा आताच्याच तारखेपर्यंत दर वर्षी क्रशिंग होते, त्याच्यापेक्षा जास्तीचे क्रशिंग झालेले आहे. याच्या पुढे आणखी काही काही कारखाने एप्रिल-मे पूर्ण चालणार आहेत. यांच्याच भागातील कारखाने १५ मे पर्यंत चालतील. कृष्णा-सहयाद्री वगैरे तिकडच्या भागातील सर्व कारखाने मे पर्यंत चालतील. राजाराम बापू कारखाना देखील जास्त काळ चालेल. अशा प्रकारचा प्रयत्न आमचा देखील चालू आहे. मंत्रिमंडळातील अनेक जण सहकारी साखर कारखान्यांशी संबंधित असल्यामुळे सर्वांना त्यातील अनेक बाबी बारकाईने माहिती आहेत. कधीही कोणत्याही ऊस उत्पादकाचे नुकसान होणार नाही, अशा प्रकारची खबरदारी शासन घेईल.

सभापती महोदया, मला दुसरी एक गोष्ट लक्षात आणून द्यायची आहे की, हे कारखाने काही जाणीवपूर्णक विक्रीला काढलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत आता सभागृहात उपस्थित नाहीत. आज देखील भाडे तत्त्वावर देण्याकरिता ११ कारखने शिल्लक आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड आपल्याला यात इंटरेस्ट असेल तर आपण सांगावे. सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत

श्री.अजित पवार

श्री.महादेवराव जानकर सध्या तुमच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. दुसरे मित्र जवळ आल्यामुळे सध्या आपल्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. यामुळे तुम्हाला यापैकी एखादा कारखाना चालवायला घ्यायचा असेल तर तसे सांगावे. यातील गंमतीचा भाग वगळता परंतु आज खरोखर गंगापूर सहकारी साखर कारखाना, गंगापूर येथील विनायक सहकारी साखर कारखाना, वैजापूर येथील शिवाजीराव निलंगेकर सहकारी साखर कारखाना, लातूर येथील गजानन सहकारी साखर कारखाना, बीड येथील महेश सहकारी साखर कारखाना, कडा येथील पाजराकार सहकारी साखर कारखाना, साक्री येथील जयजवान सहकारी साखर कारखाना, चाकूर येथील यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर येथील स्व.बापूराव देशमुख सहकारी साखर कारखाना, वर्धा-हिंगणघाट येथील जय किसान सहकारी साखर कारखाना, दारव्हा-बोधंगाव येथील दत्त सहकारी साखर कारखाना असे हे कारखाने आज देखील चालवायला.....चालवायला....नाही...एक मिनिट... सभागृहाच्या माध्यमातून मला राज्यातील जनतेला सांगायचे आहे की, कारखाने चालविण्याकरिता घेण्यासाठी २५ वर्षांकरिता चालवायला दिले जातात. कारखाना किती जुना आहे, त्याच्यावर ते सर्व ठरतं, त्यामध्ये ५०लाखापासून देखील कारखाना चालवायला देतात. जर कारखाना १२५०० टनचा असेल तर ५०,०००,०० पहिल्या वर्षी नंतर १ कोटी, त्यानंतर दीड कोटी, त्यानंतर दोन कोटी रुपये दिले जातात. पोत तयार झाले की, टॅगिंग लावताच शंभर रुपये. त्याने जर तीन लाख पोते तयार केले तर तीन कोटी रुपये त्यांना भरायला लागतात. अशा पध्दतीने कारखाने चालवायला मिळतात.

सभापती महोदय, २५,००० कोटींचा घोटाळा, १०,००० हजार कोटींचा घोटाळा असे काही जण म्हणत आहेत. आकडे तर असे काढतात की, आकडे ऐकल्यानंतरच माणूस निम्मा बेजार झालाच पाहिजे ! कुठंतरी आमच्यावर यायला लागल की, काहीतरी थोडंस तुमच्यावर येणारच ना ! हा मनुष्यस्वभाव यालाच तर म्हणतात ! वास्तविक आपल्यालाही यातील वस्तुस्थिती माहिती आहे. तुम्ही काय बोलला की, काही काही कारखाने तर १५ कोटी रुपयांना घेतले, आता पंधरा कोटी

असुधारित प्रत

श्री.अजित पवार.....

रुपयांना कोणते कोणते कारखाने कोणी कोणी घेतलेले आहेत, त्यांची नावे मी घेत नाही. आज ते राष्ट्रीय पातळीवर अतिशय चांगले काम करीत आहेत. त्यांचे तीन-तीन कारखाने आहेत. परंतु ते उत्तम पध्दतीने चालविले जात आहेत. परंतु तरीही ते म्हणतात की, माझ्या आयुष्यात सगळयात मोठी चूक जर कोणती केली असेल तर ते मी कारखाने चालवायला घेतले. असे ते स्पष्टपणे म्हणणे मांडतात, ते त्यांची भूमिका लपवित नाहीत.

सभापती महोदया, हे कारखाने घेतल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, एखादा कारखाना ६५-७० कोटी रुपयांना घेतला आणि त्याकरिता ५००-६०० कोटी रुपये कर्ज दिले गेले. मी आपल्याला सांगतो की, येथे सन्माननीय श्री.जयंत पाटील, सन्माननीय मंत्री श्री. बाळासाहेब पाटील यांनाही विचारावे. जर तुम्ही ५ लाख पोती तयार केली, एका पोत्यावर ३२००-३३०० प्रमाणे ९० टक्के रक्कम प्लेजवर दिली जाते. ५ लाख पोती तयार केली की, दीडशे कोटी रुपये बँक पोती घेते आणि देतेच. यात कारण नसताना एक समज असा निर्माण झालेला आहे. याने पंधरा कोटी रुपयात कारखाना घेतला आणि याला दीडशे कोटी रुपये कसे दिले. आता तर मी येथे ५ लाख पोत्यांचे सांगितले. एक कारखाना असा आहे की, ज्याच्यावर आपण आरोप केलेला आहे, तो यंदा २५ लाख पोती तयार करेल. म्हणजे त्याला २५ गुणिले ३ याप्रमाणे ७५० कोटी रुपये त्यांना रितसर प्लेजवर मिळणार आहेत. यामध्ये काहीही चुकीचे नाही. कारण तेवढा माल बँकेकडे मॉर्टगेज करुन ठेवलेला आहे. पोतं विकले की, पहिले पैसे बँकेला जाणार आणि नंतर.....अडथळा.....शेतकऱ्यांचे पैसे देण्याकरिता प्लेजवर दिले जातात. तोडणी,वाहतूक, शेतकरी, साखर कारखानदारीमध्ये असलेले कामगार यांच्याकरिता प्लेजवर पैसे दिले जातात. यामध्ये चुकीचे असे काहीही नाही. परंतु आताच्या काळात जसे मी यापूर्वी सांगितले की, काही कारखाने राज्य सरकारने विकले, त्याच्याबद्दल कुठेही चर्चा नाही. त्यामध्ये काही कारखाने विकत घेतले गेले परंतु ते आता बंद आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील सभागृहात

श्री.अजित पवार.....

उपस्थित आहेत, त्यांनाही विचारावे की, शंकर सहकारी साखर कारखान्याच्या बाबत आपण कितीदा प्रयत्न केला, मनापासून प्रयत्न केला होता. आम्ही याकरिता प्रयत्न करत असताना दुजाभाव करत नाही. आता पीडीसीच्या बँकेचा विषय विरोधी पक्षाने काढला. आज राज्यात दोनच बँका नावाजलेल्या बँका म्हणून ओळखल्या जातात. एक सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि दुसरी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्या ठेवी व एकंदरीत इतर सर्व बाबी व्यवस्थित चालू आहेत.

सभापती महोदया, मी यापूर्वी यादी सांगितली, त्या व्यतिरिक्त परवा सहकार मंत्रीमहोदयांनी बैठक घेतल्याप्रमाणे किसनवीर सहकारी साखर कारखाना ५२००० सभासद असूनही चालू नाही. खंडाळा सहकारी साखर कारखाना अजूनही चालू नाही. प्रतापगड सहकारी साखर कारखाना अजूनही चालू नाही. याकरिता प्रयत्न चालू आहेत. ते दिल्लीमध्ये देखील वरिष्ठांना भेटले. याकरिता कसे कर्ज मिळेल, याकरिता प्रयत्न केले जात आहेत. परंतु दुर्दैवाने हे सर्व कारखाने आता अडचणीत आलेले आहेत. आज हे नवीन कारखाने निघाले नसते तर दयनीय अवस्था साखर उद्योग व ऊसाची झाली असती, हे सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस आपल्यालाही मान्य करावे लागेल. मला सभागृहाला सांगायचे आहे की, स्व.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना पहिल्या टर्मलाच त्यांनी आम्हाला सांगितले होते, त्यावेळी अर्थमंत्री श्री.जयंत प्र.पाटील हे होते. येथून पुढे भाग भांडवल देऊन सहकारी साखर कारखाने द्यायचे नाहीत. जेवढी काही महाराष्ट्राची रिक्वायरमेंट होती, ती आता फुलफिल झालेली आहे. येथून पुढे कारखाने द्यायचे म्हटले तर खाजगी तत्त्वावर काढायचे तर काढावे, याकरिता राज्य शासन एक रुपयाही देणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस सभागृहात उपस्थित आहेत,कोणाकोणाला कारखाने देण्यास ते जबाबदार आहे. त्यांनी मला एकदा फोनवर साखर कारखान्याबाबत सांगितले. कुठेही पारदर्शकता नाही, असे झालेलेच नाही. हे सर्व कारखाने देत असताना येथून पुढे कारखाने दिले जाणार नाही. जसे स्व.विलासराव देशमुख यांनी सांगितले होते,

श्री.अजित पवार......

त्याप्रमाणे विद्यमान माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ठरविले की, येथून पुढे कोणत्याही सहकारी साखर कारखान्यांना हमी द्यायची नाही. तुम्हाला आता तुमच्या ताकदीवर कारखाने चालवायला लागतील. पहिल्यांदा काहीतरी पाच कारखान्यांना ऑफर दिली गेली होती. त्याच्यामध्ये राजगड सहकारी साखर कारखाना, भारत भालके यांचा सहकारी साखर कारखाना होता. धनंजय महाडिकांचा एक सहकारी साखर कारखाना कल्याण काळेंचा एक सहकारी साखर कारखाना होता. आता ती नावे माझ्या लक्षात नाहीत. परंतु पाच-सहा कारखान्यांना भेद-भाव न करता भाग-भांडवल दिले गेले होते. त्यावेळी श्री. धनंजय महाडिक व श्री.कल्याण काळे तुमच्याकडे होते. श्री.धनंजय महाडिक आजही तुमच्याकडेच आहेत. यामध्ये आम्ही कधीही भेदभाव केलेला नाही. कारखानदारी देखील चालावी परंतु प्रत्येक बाबतीत राज्य शासनावर अवलंबून राहू नये, अशा प्रकारची भूमिका मुख्यमंत्री महोदयांनी घेतलेली आहे. ते पचवायला आम्हाला ते थोडं जड गेले. शेवटी आम्हीही सर्वांना सांगितले की, तुम्हाला तुमच्या स्वत:च्या ताकदीवरच पुढील काळात पुढे जावे लागेल. आता या पुढील काळात साखर कारखान्यांनी राज्य शासनावर अवलंबून राहू नये, अशी भूमिका शासन म्हणून आम्ही स्वीकारलेली आहे. दुसरी गोष्ट जसे मी पूर्वी थोडी कारखान्यांची नावे वाचून दाखविली. तशाच पध्दतीने काही काही कारखान्यांच्या किंमती म्हणजे व्हॅल्युएशन....तुम्ही जरण्डेश्वरचे फार सांगत होता. जरण्डेश्वरचे व्हॅल्युएशन ३९.७७ कोटी रुपये इतके झालेले होते.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. अजित पवार.........

कारखाना ६५ कोटी ७५ लाख रुपयांना विकला आहे. यवतमाळ येथील शंकर कारखान्याचे २२ कोटी रुपयांचे व्हॅल्यूएशन झालेले आहे आणि तो कारखाना १९ कोटी ५५ लाख रुपयांना विकला आहे. राम गणेश गडकरी कारखान्याचे २६ कोटी रुपयांचे व्हॅल्यूएशन झालेला असून, तो कारखाना १३ कोटी रुपयांना विकला आहे. विदर्भात ऊस पिकत नसल्यामुळे सहसा कोणीही कारखाने चालविण्यासाठी पुढे येत नाही. वैनगंगा सहकारी कारखाना हा १४ कोटी ८ लाख रुपयांचा होता. तो कारखाना १४ कोटी १० रुपयांना विकत घेतला आहे. ही खूप मोठी यादी आहे. विदर्भातील कारखाने सोडून इतर कोणताही कारखाना कमी पैशात घेतलेला नाही. ऊलट ते जास्त भावात विकत घेतले आहेत.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या एका गोष्टीकडे लक्ष वेधणार आहे. अनेक बँकांनी कारखाने विकण्याची कामे केलेली आहेत. त्यावेळी माननीय उच्च न्यायालयाने सर्व कारखाने विकण्यास परवानगी दिली नव्हती. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेशी संबंधित असणाऱ्या कारखान्यांबाबत सांगितले होते. इतर कारखाने चालत नसल्यामुळे अवसायानात काढले होते आणि ते चालवायला दिले. माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी कारखाने चालविण्यास घेतले तर काहीच हरकत नाही. रयत सहकारी साखर कारखाना, उदयसिंग सहकारी साखर कारखाना आणि कोल्हापूरमधील इंदिरा सहकारी साखर कारखाना हा कर्नाटकमधील भाजपचा आमदार चालवित आहे. तो कोणत्या पक्षाचा असावा हा तो त्यांचा अधिकार आहे. कोल्हापूरमध्ये परराज्यातून श्री. दालमिया येऊन तेथील कारखाना चालविण्यासाठी घेतलेला आहे. स्व. शिवाजीराव देशमुख यांनी शिराळा तालुक्यात निनाईदेवी सहकारी साखर कारखाना काढला पण तो त्यांना चालविता आला नाही. श्री. दालमियांनी तो साखर कारखाना चालविण्यासाठी विकत घेतलेला आहे. कारखान्याची कॅपेसिटी पाहून वर्षाला आणि टनाला १०० रुपये

श्री. अजित पवार.........

बँकेला द्यावे लागतात. अशा प्रकारे कारखाने चालविण्यासाठी मिळू शकतात. माझे आज देखील असे म्हणणे आहे की, कोणालाही कारखाना चालविण्यासाठी आवड असेल तर त्यांनी जरुर कारखाना चालविण्यासाठी घ्यावा.

**उप सभापती** : मी सभागृहाची वेळ माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे आणि राईट टू रिप्लाय होईलपर्यंत वाढवित आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेबद्दल बरीचशी माहिती दिलेली आहे. त्यासंदर्भातील रिपोर्ट माझ्याकडे आहे. मी सुरुवातील त्या बँकेत ७ वर्षे अध्यक्ष होतो. त्या बँकेत ११ हजार ५०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. लोन ८ हजार कोटी रुपयांचे दिलेले आहे. एनपीए ४.८२ आहे. नेट एनपीए हे मायनस ६ आहे. म्हणजे ६०० ते ६५० कोटी रुपयांची अधिक तरतूद पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेने केलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड. राहूल कूल यांच्या नेतृत्वाखाली भीमा सहकारी साखर कारखाना सुरु आहे. त्या कारखान्यात ११३ कोटी रुपयांची मुद्दल आणि ६२ कोटी रुपयांचे व्याज आहे. महाविकास आघाडी सरकार भेदभाव करीत नाही. त्यांना निधी दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली राजगड सहकारी साखर कारखाना सुरु आहे. त्या कारखान्याचे ९ कोटी आणि ८.५० कोटी रुपयांचे व्याज आहे. उर्वरित कोणत्याही कारखान्यांची थकबाकी नाही. सर्व कारखान्यांचे व्यवस्थितपणे रिपेमेंट सुरु आहे. यंदाच्या वर्षी ढोबळमानाने २६० कोटी रुपायांचा नफा होणार आहे आणि निव्वळ नफा ७० कोटी रुपये होईल अशा प्रकारे दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत आकडेवारी येईल. हाच अंदाज मी एसएसईबी बँकेच्याबाबतीत घेतलेला आहे. एसएसईबी बँकेचा ढोबळमानाने ७०० कोटी रुपायांचा नफा होणार आहे आणि निव्वळ नफा ४०० कोटी रुपये नफा दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत होईल. विजय मल्ल्या आणि निरव मोदींनी बँकांचे हजारो कोटी रुपये डूबवून परदेशी पलायन केलेले आहे. त्यांनी बँका संपवल्या आहेत. पण

श्री. अजित पवार.........

आपली एमएसईबी बँकेची आर्थिक परिस्थिती खूपच चांगली आहे. हे सर्वांना मान्यच करावे लागेल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पीडीसीसी बँकेचा उल्लेख केलेला आहे. त्या बँकेवर एकाच विचाराचे संचालक बोर्ड निवडून आलेले आहे. ती बँक चांगली आहे. मी नेहमी माननीय सहकार मंत्री महोदयांना असे सांगत असतो की, त्यांचा पक्ष बघू नका, बँका कोण चालवित आहे हे न बघण्यापेक्षा जर चुकीचे काम होत असेल मग तो अध्यक्ष हा सत्ताधारी किंवा विरोधी पक्षातील असला तरी त्यांच्याविरोधात ॲक्शन घेण्यासाठी मागे पुढे पाहू नये. अशा कार्यवाही केलेली आहे. अनेक सहकारी साखर कारखान्यांच्या चौकशा सुरु आहेत. त्यांना कोणत्याही परिस्थितीत शासनाने स्थगिती दिलेली नाही. नाशिक जिल्हा बँक ही सर्व पक्षातील लोक मिळून चालवित आहेत. पण आता त्या ठिकाणी प्रशासक नेमलेला आहे आणि ती बँक आता हळूहळू सुधारत आहे. सोलापूर जिल्ह्यातील मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक आहे. हे मी सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांना सांगू इच्छितो. पूर्वीच्या तुलनेत बँकेत आता सुधारणा होत आहे. बँक सुधारते म्हणून शासन त्या ठिकाणी निवडणुका लावत नाही. निवडणुका झाल्यानंतर निकाल काय येणार आहे तो सर्वांना माहीत आहे. जोपर्यंत ती बँक ही पूर्णपणे आजारातून बाहेर पडत नाही तोपर्यंत त्या ठिकाणी निवडणुका घ्यायच्या नाहीत अशा प्रकारची भूमिका शासनाने घेतलेली आहे. माननीय सहकार मंत्री श्री. बाळासाहेब पाटील यांचा स्वभाव कसा आहे, तो सर्वांना माहीत आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकरांच्या नजरेस आणखी एक गोष्ट आणून देणार आहे. काही लोकांनी कारखाने विकत घेतले आहेत. पण त्यांना ते चालविता आले नाहीत. कारण ऊस नाही. काही कारखाने ठराविक लोकांनी घेतले पण ते दुसऱ्या लोकांना चालविण्यासाठी दिलेले आहेत. जरंडेश्वर कारखान्याने बीव्हीजी कंपनी काढली होती. आपण त्यांना खाजगीत विचारु शकतो. तो म्हणेल की, मी माझी कंपनी ही त्याची पत्नी, त्यांचा पार्टनर आणि त्यांची पत्नी अशी सर्वांनी

असुधारित प्रत

श्री. अजित पवार.........

मिळून काढली होती. त्यांना देखील तोटा आलेला आहे. आता मॅनेजमेंटने अडीच हजार टनाचा कारखाना साडेबारा हजार टनाचा केला. तेव्हा कोठे आता परिस्थिती बदलत आहे. कर्ज आहे. रिपेमेंट मात्र व्यवस्थित सुरु आहे. महाविकास आघाडी सरकार कोणत्याही प्रकारे भेदभाव करणार नाही हे मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. नियमाच्या चौकटीत राहून सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली असेल तर निश्चितपणे महाविकास आघाडी सरकार किंवा आमचा सहकार विभाग त्या सहकारी संस्थेला मग तो साखर कारखाना असेल, सूत गिरणी किंवा दूध संघ असेल तर त्यांना मदत करण्याची मानसिकता आहे. नागपूर जिल्हा बँक, नागपूर, वर्धा, बुलडाणा, सोलापूर, बीड आणि नाशिक या ६ जिल्हा मध्यवर्ती बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत कलम ८३ नुसार मुंबई, परभणी, अमरावती आणि यवतमाळ येथील बँकांची चौकशी सुरु आहे. मुंबई बँकेत कोणाचे मॅनेजमेंट आहे याची सर्वांना कल्पना आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश वरपूडकर विधानसभेतील सन्माननीय सदस्य हे परभणी बँकेचे अध्यक्ष आहेत. अमरावती बँक ही काँग्रेसच्या ताब्यात आहे. यवतमाळ जिल्हा बँक ही काँग्रेसच्या ताब्यात आहे. त्यामुळे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे भेदभाव केला जात नाही. ८८ प्रमाणे राज्यात नाशिक जिल्हा बँक, सोलापूर जिल्हा बँक, रत्नागिरी जिल्हा बँक, अमरावती जिल्हा बँक, बीड जिल्हा बँक, सांगली जिल्हा बँक, नागपूर जिल्हा बँक, धुळे जिल्हा बँक आणि नंदुरबार जिल्हा बँकेची चौकशी सुरु आहे. तुम्ही आणि मी कायमचे त्या ठिकाणी नसणार आहोत. पण सहकारी बँका या कामयच्या राहणार आहेत. त्यामुळे त्या मजबूतच राहिल्या पाहिजे. त्या ठिकाणी पारदर्शी कारभार सुरु राहिला पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर यांच्या मुंबै जिल्हा बँकेला महाविकास आघाडी शासनान हमी दिली होती. तसे मुंबै बँक, नांदेड बँक आणि उस्मानाबाद बँकेबद्दल हमीचे पैसे मिळावेत अशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मागणी आहे.

असुधारित प्रत

श्री. अजित पवार.........

साखर कारखान्यांकडील थकित कर्जासंबंधी शासकीय थक हमीपोटी बँकेस देय रक्कमेबद्दल प्रधान सचिव श्री. देवरा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित केलेली आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.अजित पवार.....

श्री.देवरा यांना या तिन्ही बँकांचा आढावा घेऊन त्यांना किती पैसे दिले पाहिजेत याची माहिती घेण्यास सांगितले. वास्तविक पाहता मला हा विषय ३१ मार्च पूर्वी संपवायचा होता. मी आजच श्री.देवरा यांच्याकडून या विषयी माहिती घेतली. परंतु त्यांनी सांगितले की, या संदर्भातील आढावा घेण्यासाठी अजून काही कालावधी लागेल. त्यामुळे मला हा विषय आता ३१ मार्च पूर्वी संपविता येणार नाही. या कामात थोडासा उशीर होईल. परंतु या बँकांना टप्प्याटप्प्याने रक्कम देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल.

सभापती महोदया, मध्यंतरीच्या काळात सहकारी साखर कारखान्यात प्रचंड भ्रष्टाचार झाला, त्या ठिकाणी चुकीचे काम झाले असे आरोप करण्यात आले. मी सांगू इच्छितो की, आज स्टीलचा भाव प्रती टन ९० हजार रुपये झालेला आहे. तरी सुद्धा अजूनही कोणी काही कारखाने चालविण्यासाठी पुढे येत नाहीत. कारण कारखाना चालवित असताना अनेक अडचणी येत असतात. त्या सर्व अडचणींना तोंड द्यावे लागते. शिवाय त्यात एफआरपीची ठराविक रक्कम द्यावीच लागते. त्यात टाळाटाळ करुन चालत नाही. आता आम्ळी एफआरपीच्या बाबतीत थोडासा वेगळा निर्णय घेतला आहे. काही लोकांचा त्या निर्णयाला विरोध आहे. एखाद्या कारखान्याची गेल्या वर्षाची रिकव्हरी ११ टक्के असेल तर या वर्षी ११ टक्क्यांनी एफआरपी देणे, हे थोडेसे चुकीचे धोरण आहे. जर त्यांची या वर्षी १२ टक्के रिकव्हरी निघाली तर ११ टक्के रक्कम १२ टक्के रिकव्हरी असलेल्यांना का म्हणून द्यायची ? हा भेदभाव आहे. त्यामुळे या बाबतीत एक सूत्र ठरविले आहे. त्या सूत्रात लगेच रक्कम जात नाही. परंतु सुरुवातीला विचार करुन १० टक्के रक्कम दिली जाते व त्यानंतर कारखाना बंद होताना अंदाज घेऊन ऊर्वरित रक्कम देण्यात येते. ही बाब शेतकऱ्यांच्या फायद्याची आहे. कारण कधी कधी हंगाम लांबला तर रिकव्हरीवर कमी-अधिक प्रमाणात परिणाम होतो. या बरोबरच आम्ही इथेनॉलला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत आहोत. या कामी माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी साहेब अतिशय मनापासून मदत करीत आहेत. केंद्र सरकार सुद्धा मदत करीत आहे.

श्री.अजित पवार.....

इथेनॉल प्लांट उभे करण्यासाठी केंद्र सरकारने ६ टक्के व्याजाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला आहे. याचा फायदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कशा पद्धतीने देता येईल या बाबत प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदया, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, देशाच्या इतिहासात कधी नव्हे इतकी साखर या वर्षी निर्यात केली आहे. अजूनही साखर निर्यात करण्यासाठी राज्य सरकारचा प्रयत्न सुरु आहे. यामध्ये केंद्र सरकारचे सर्वतोपरी सहकार्य आहे. मध्यंतरी केंद्र सरकारने एक चांगला निर्णय घेतला. माननीय डॉ.मनमोहन सिंग, प्रणव मुखर्जी किंवा पी.चिदंबरम हे केंद्रीय अर्थ मंत्री असताना, मी आणि माननीय श्री.जयंत पाटील हे माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या शिष्टमंडळासोबत जाऊन केंद्रीय अर्थ मंत्र्यांची भेट घ्यायचो. त्यावेळी आयकर लावण्यात आलेला होता. माननीय केंद्रीय मंत्री श्री.अमित शहा साहेबांमुळे हा सर्व विषय सुटला आणि बहुतेक साखर कारखान्यांवरील टांगती तलवार दूर झाली आहे. त्यामुळे जे चांगले झालेले आहे त्याला आम्ही चांगलेच म्हणणार. त्यावर टीकाटिप्पणी करण्याचे काहीच कारण नाही. परंतु पुढील काळात वाटचाल करीत असताना विरोधी पक्ष नेते म्हणून तुम्ही असाल, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस असतील किंवा सत्ताधारी वा विरोधी पक्षाचे सदस्य असतील, त्यांनी केव्हाही आम्हाला हक्काने सांगावे की, आपण सभागृहात एक बोलता आणि सहकारामध्ये राजकारण आणता. मी स्पष्ट करु इच्छितो की, सहकारामध्ये आमच्याकडून कसल्याही प्रकारचे राजकारण केले जाणार नाही. चांगल्याला चांगलेच म्हटले जाईल व त्याला मदत केली जाईल, अशा पद्धतीची ग्वाही मी आपल्याला देतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी थकबाकीचा मुद्दा मांडला. मी त्या बाबत माहिती घेतली. त्यानुसार जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर व औरंगाबाद या चार-पाच जिल्ह्यात एकंदरीत शेतकऱ्यांच्या निम्मी थकबाकी आहे. कोकणात विशेष थकबाकी नाही. केवळ ७

असुधारित प्रत

श्री.अजित पवार.....

कोटी रुपये, ८ कोटी रुपये, १२ कोटी रुपये एवढी थकबाकी आहे. कोल्हापूरला सुद्धा कमी थकबाकी आहे. परंतु मराठवाड्यामध्ये, पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगांव आणि अहमदनगर या दोन जिल्ह्यात १० हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. सोलापूर जिल्ह्यात ५ हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. अशाप्रकारे १५ हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. माननीय ऊर्जा मंत्री डॉ.नितीन राऊत यांनी तीन-चार महिने शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन कट न करण्याचे जाहीर केलेले आहे. मी या प्रस्तावावरील उत्तराच्या अनुषंगाने निदर्शनास आणून देतो की, ही सवलत आताचे रब्बी पीक पदरात पडण्यापुरती आहे. कारण वीज कनेक्शन कट केल्यामुळे पीक जळायला लागले होते. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारने चार महिन्यांसाठी ही सवलत दिली आहे. परंतु रब्बीचे पीक पदरात पडल्यानंतर शेतकऱ्यांना चालू बाकी द्यावी लागेल. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी व्याज आणि दंडनीय व्याज माफ केलेले आहे. आता कोणत्याही प्रकारची सवलत द्यायचे राहिले नाही. अहमदनगर जिल्ह्यात ५ हजार ३६ कोटी रुपये, बीडमध्ये २,२३० कोटी रुपये, औरंगाबादमध्ये २,६६४ कोटी रुपये, जळगावमध्ये ३,३४६ कोटी रुपये, नाशिकमध्ये ३ हजार कोटी रुपये, पुणे ३,१०० कोटी रुपये, सोलापूर जिल्ह्यात ५ हजार कोटी रुपये थकबाकी आहे. शेतकऱ्यांना वीज सुरळीत द्यावी, त्यांचे वीज कनेक्शन कट करु नये या बद्दलचा निर्णय माननीय ऊर्जा मंत्र्यांनी जाहीर केलेला आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, हा निर्णय चार महिन्यापुरता, रब्बीचे पीक हातात येईपर्यंतच आहे. त्यानंतर मात्र वीज देयक भरावे लागेल. कारण राज्याला सुद्धा महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या कंपन्या टिकवायच्या आहेत. राज्य सरकार आता शून्य टक्के व्याजाने पीक कर्ज देत आहे. तसेच नियिमत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० रुपये प्रोत्साहनपर अनुदान देत आहोत. अशा वेगवेगळया गोष्टी सरकारने केलेल्या आहेत.

श्री.अजित पवार.....

सभापती महोदया, मुख्यमंत्री कृषी सौर वाहिनी योजना सुरु ठेवण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. मी सांगू इच्छितो की, मुख्यमंत्री कृषी सौर वाहिनी योजना सुरुच आहे. केंद्र सरकारच्या PMKUSUM च्या योजना राज्याच्या योजनेसारख्याच आहेत. या योजनांसाठी केंद्र सरकारकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्या योजनांचा लाभ घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विकेंद्रीत सौर प्रकल्प राबविणे आणि कृषी वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करणे, याकडे माननीय ऊर्जा मंत्री आणि विभागाचे लक्ष आहे. या ठिकाणी मोबाईल टॉवरचा मुद्दा मांडण्यात आला. या बाबतीत संबंधितांशी चर्चा करण्यात येईल. जर हे काम अयोग्य झाले असेल तर ते योग्य करण्यात येईल. अयोग्य झाले नसेल तर आपणास त्या बाबत स्पष्टपणे सांगण्यात येईल. माझ्या उत्तराची वेळ संपत आलेली आहे. परंतु माझ्या उत्तरामध्ये मी जास्तीत जास्त मुद्दे कव्हर करण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदया, एकंदरीत राज्य सरकारने, जिल्हा बँकांनी किंवा राज्य सहकारी बँकेने साखर कारखाने विकत असताना.... मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर साहेबांना सांगू इच्छितो की, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात सुद्धा काही कारखाने विकले गेले आहेत. आपण त्या कारखान्यांची किंमत बघावी. आपल्या निदर्शनास येईल की, कुठेही फार काही भेदभाव झालेला नाही. आम्ही सरकारमध्ये आल्यानंतर आम्हाला राज्य सहकारी बँकेची निवडणूक लावता येत होती. कारण कलम-११ खाली जास्तीत जास्त पाच वर्षे प्रशासक ठेवू शकतो. परंतु आम्ही राज्य सहकारी बँकेची निवडणूक लावली नाही. या बँकेवर मागच्या सरकारच्या काळात प्रशासक होते आणि आमच्या सरकारच्या काळात सुद्धा आम्ही त्यांना कायम ठेवले आहे. त्यामुळे आमच्या सरकारने भेदभाव केला असे म्हणता येणार नाही. ज्या ठिकाणी चांगले काम करण्यात येत असेल त्या ठिकाणी राजकारण न आणता, त्यांना पूर्णपणे सहकार्य करण्याची भूमिका महाविकास आघाडी सरकारची आहे. भविष्यातही सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा प्रयत्न राहणार आहे. कारण सहकाराचा मूळ उद्देशच हा आहे. हा उद्देश

असुधारित प्रत

श्री.अजित पवार.....

कसा साध्य करता येईल यासाठी आम्ही सर्वजण माननीय श्री.उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली कटीबद्ध आहोत, अशा प्रकारचा विश्वास मी सभागृहाला देतो व माझे उत्तर संपवितो.

----------

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदया, २६० च्या प्रस्तावामध्ये बऱ्याच मुद्यांचा समावेश होतो. परंतु केवळ एकाच मुद्यावर फार चर्चा झाल्यामुळे त्या मुद्याचे मला उत्तर देणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या २६० च्या प्रस्तावावर दोन दिवस चर्चा झाली. या प्रस्तावाला उत्तर देताना माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी काही मुद्यांचा उल्लेख केला आहे.

सभापती महोदया, राज्यामध्ये सहकाराची फार मोठी परंपरा आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून राज्यामध्ये, विशेषत: ग्रामीण जीवनामध्ये आर्थिक परिवर्तन निश्चितपणे घडलेले आहे. हे परिवर्तन घडत असताना विविध विकास सोसायट्या, जिल्हा बँका, सहकारी साखर कारखाने, दुग्ध संस्था, मत्स्य संस्था, मजूर संस्था यांचा यामध्ये समावेश आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून या राज्यात खऱ्या अर्थाने आर्थिक परिवर्तन घडले आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ. मनिषा कायंदे)**

श्री. बाळासाहेब पाटील ....

दूध संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारचा दर देण्याची भूमिका दूध संस्थांनी घेतली आहे. ग्रामीण भागात मोलमजुरी करणारी मंडळी दुधाकडे दुसरी व्यवस्था म्हणून पाहतात. त्याची त्यांच्या संसाराला निश्चितपणे जोड मिळते. त्या माध्यमातून देखील चांगल्या प्रकारचे काम झाले आहे. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे फार मोठे जाळे त्या माध्यमातून उभे करण्यात आले आहे. ग्रामीण भगातील अनेक मुले, मुली उच्चशिक्षित झाली, डॉक्टर झाली, इंजिनिअर झाली, परदेशात गेली आणि हे निव्वळ सहकाराच्या माध्यमातून घडले आहे.

सभापती महोदया, सहकार क्षेत्रामध्ये काम करणारी मंडळी देखील सामाजिक बांधिलकी ठेवून प्रत्येक वेळी सहकार्य करतात. राज्यात महापूर आला, त्यावेळी सहकार्य करतात, दुष्काळी परिस्थितीत सहकार्य करतात. कोविडच्या काळामध्ये देखील सहकारी संस्थांच्या माध्यमातून राज्यामध्ये साधारणपणे ६६०३ संस्थांनी ३५ कोटी ९७ हजार म्हणजे ३६ कोटी रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीला दिली आहे. सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून हे काम सुरु आहे. महात्मा ज्योतिराव फुले कर्जमाफी योजनेचा उल्लेख झाला. राज्य सरकारने ही योजना जाहीर केली. अल्पमुदतीचे पीककर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना करण्यात आली. ही योजना जाहीर झाली, त्याच वर्षीच्या अधिवेशनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांनी जाहीर केले की, आम्ही जे रेग्युलर कर्ज भरत आहेत, त्यांच्यासाठी सुध्दा प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देऊ. परंतु दुर्दैवाने मार्च महिन्यामध्येच कोरोनाचा प्रादूर्भाव सुरु झाला आणि त्यामुळे योजनेच्या बाबतीत काही अडचणी आल्या. आपण पाहिले आहे की, संपूर्ण जग ठप्प झाले होते, देश ठप्प झाला होता, राज्यामधील दळणवळण थांबले होते आणि असे असताना महसुलामध्ये ज्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक होते, त्या प्रमाणात वाढ झाली नाही आणि त्याचा परिणाम या योजनेवर झाला. अधिवेशनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी त्यासाठी जे ५० हजार रुपयांचे अनुदान द्यायचे आहे,

श्री. बाळासाहेब पाटील ....

त्याबाबत घोषणा केली आहे. या आर्थिक वर्षामध्ये ही योजना पूर्ण करणार आहोत आणि शेतकऱ्यांना त्या दृष्टीने दिलासा देणार आहोत. साधारणपणे यासाठी सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षामध्ये १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदया, पुणे जिल्ह्याच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी उल्लेख केला. त्यांनी सविस्तर खुलासा केला आहे. सोनेतारणाचा एक विषय होता, त्याबाबतीत देखील संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यावर गुन्हा नोंद केला आहे. अनेक जिल्हा बँकांच्या कारवाईबाबत दादांच्या भाषणामध्ये उल्लेख आला आहे. त्यामध्ये त्याही बँकांचा उल्लेख त्यांनी केला आहे. सहकारामध्ये सर्व बँकांच्या माध्यमातून ग्रामीण भागात परिवर्तन व्हावे अशी भूमिका निश्चित महाविकास आघाडी शासनाची आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचा उल्लेख झाला. श्री. जयवंत कडू हे एक मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून तेथे काम पाहत होते. त्यांची मुदत संपली. बँकने त्यांना सांगितले की, तुम्ही पुढील निर्णय होईपर्यंत तेथे काम करावे. नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात दिली. त्यांनी १६ मार्चला राजीनामा दिला. साधारणपणे ३१ मार्चपर्यंत त्यांनी राहणे अपेक्षित होते. त्यांना मूळ मुदतवाढ दिली होती. आपण म्हणत आहात की, आम्ही सुध्दा सहकारातील सर्व चौकशी करु. त्यामुळे काही तरी मुद्दे काढले जातात. तसेच या बँकांच्या बाबतीत झाले. कराडच्या जनता बँकेचाही उल्लेख केला. ही जनता बँक कराड शहर परिसरात काम करीत होती. सन २०१७ मध्ये आरबीआयने तिला निर्बंध लावले. दिनांक ९.८.२०१९ ला बँकेवर प्रशासकाची नेमणूक करण्यात आली. दिनांक ७.१२.२०२० ला रिझर्व्ह बँकेने बँकेचा परवाना रद्द केला. यामध्ये साधारणपणे १९९०१७ ठेवीदारांच्या ५२७ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, त्यापैकी १९८४१५ ठेवीदारांच्या ५ लाख रुपयांपर्यंतच्या ४४२ कोटी रुपयांच्या ठेवी तेथे होत्या. रुपये ५ लाख रुपयांच्या आतील ठेवीबाबत डीआयसीजीसीकडून निधी प्राप्त झाला असून सध्या साधारणपणे ३९५०० ठेवीदारांना ३३६ कोटी रुपयांचे वाटप

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब पाटील ....

करण्यात आले आहे. उर्वरित काम सुरु आहे. ५२६ कर्जदारांकडून ९५९ कोटी रुपयांची कर्जवसुली करण्यात आली आहे. कर्जवुसलीची गती वाढविण्याचे काम सुरु आहे.

सभापती महोदया, येथे काही कर्जखात्याचा उल्लेख केला आहे त्याबाबत देखील बँकेच्या वतीने कारवाई केली आहे. राज्यात काम करताना अनेक सहकारी संस्था येतात. एक संकल्पना अशी पुढे आली की, मजुरांची संस्था असावी. जे मजूर कष्ट करतात, राबतात, त्यांची संस्था असावी. त्या संस्थेच्या माध्यमातून त्यांना काम देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला. राज्यात साधारणपणे ११०४६ मजूर संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून काम सुरु आहे. सदर विषय यासाठी पुढे आला की, मुंबई जिल्हा बँकेची निवडणूक लागली. त्यामध्ये सन्माननीय श्री. प्रवीण दरेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आणि तसे करीत असताना त्यांनी मजूर संस्थेमधूनही केला आणि बँकेच्या माध्यमातूनही केला. तेथे प्रतिनधीत्व करीत असताना ते या संस्थेमार्फत सन १९९९ पासून सन २०२१ पर्यंत प्रतिनिधीत्व करीत होते. हे चालले होते. पण त्यांनी सांगितले की, मजुराने मजूर रहावे का ? मजुराने मजूर राहू नये. कष्ट करणाऱ्या माणसाला न्याय मिळाला पाहिजे. परंतु त्या वर्गवारीतून पुढे गेल्यानंतर मागचे विसरले पाहिजे. ते त्यांच्याकडून अनावधाने राहून गेले. त्यांनी तो अर्ज तेथे दाखल केला. सहकार विभागाने त्याची सखोल चौकशी केली. कारण सन्माननीय श्री. प्रवीण दरेकर यांनी तेथे पुन्हा विधानपरिषदेचा अर्ज भरत असताना माझा स्वतंत्र व्यवसाय असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना मजूर या संज्ञेतून अपात्र केले आहे. तसे केल्यानंतर ते संचालक म्हणून ज्या गटातून निवडून आले होते, त्याचा त्यांनी राजीनामा दिला ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदया, आप पक्षाचे श्री. धनंजय शिंदे यांनी गुन्हा दाखल केला आहे, त्याचा तपास सुरु आहे. पण त्याबाबतचे नियोजन आहे. एखाद्या सन्माननीय

सदस्यांवर जर गुन्हा दाखल झाला तर त्याबाबतीत निवेदन सादर करायचे ही सरकारची भूमिका असते आणि तसे निवेदन विधानसभेत सादर केले आहे. येथे

श्री. बाळासाहेब पाटील ....

बोलत असताना ते मी या ठिकाणी पटलावर ठेवतो. एवढीच वस्तुस्थिती आहे. राज्यातील इतर संस्थांच्या बाबतीत या अनुषंगाने त्यांनी उल्लेख केला. इतर मजूर संस्थांमध्ये कोण आहेत असे विचारले. जरुर त्याही गोष्टीची चौकशी केली जाईल.

सभापती महोदया, एशिया मॅग्नेट प्रकल्पाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे. मूल्य साखळीतील अंतर्गत घटक म्हणजे शेतकरी संस्था आहेत. आपण पाहिले आहे की, काढणी पश्चात फळांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून एशिया बँक आणि राज्य सरकार यांच्या माध्यमातून हा मॅग्नेट प्रकल्प आणला आहे आणि त्यामध्ये १० फळांचा समावेश करण्यात आला आहे. सदर बाबतीतील करार दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ ला झाला आहे. करार होऊन नुकतेच ३ महिने झाले आहेत, त्याची कार्यवाही सुरु आहे. मला खात्री आहे की, या मॅग्नेट प्रकल्पाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचे काम राज्यात होईल. आज आपण सहकारी कारखान्यांच्या माध्यमातून इथेनॉलला चांगल्या प्रकारचे प्राधान्य दिले आहे. ऊसाच्या बाबतीत दादांनी उल्लेख केला आहे की, सर्व ऊसाचे गाळप करण्याचा निर्णय करणार आहे. राज्यात साधारणपणे सहकारी कारखान्यांच्या सभासदांची संख्या २० लाख आहे. कर्मचाऱ्यांची संख्या २ लाख आहे. ऊस उत्पादकांची संख्या ३५ लाख आहे. १५ ते २० लाख लोकांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. राज्यातील सहकारी कारखान्यांची उलाढाल साधारणपणे ५५ हजार कोटी रुपयांची आहे आणि यातून सरकारला ६ हजार कोटी रुपये इतका महसूल मिळतो. सन २०१८-१९ च्या हंगामात राज्यात २३२८१ कोटी रुपये शेतकऱ्यांना एफआरपीच्या माध्यामतून मिळाले. सन २०१९-२० मध्ये सिजन कमी झाला, त्यामुळे शेतकऱ्यांना १४३१८ कोटी रुपये मिळाले. सन २०१०-२१ मध्ये ३१८०६

असुधारित प्रत

कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. या हंगामात दिनांक १५ मार्चपर्यंत २५९३१ कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. सहकारी कारखान्यांच्या माध्यमातूनच हे सर्व झाले

श्री. बाळासाहेब पाटील ....

आहे. एखादा कारखाना विकला गेला, कमी किंमतीत विकला गेला. मात्र आपण हे पाहिले पाहिजे की, त्या भागातील तो सहकारी कारखाना चालू झाल्यानंतर तेथील शेतकऱ्यांचा ऊस तेथे गेला का ?

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

श्री.बाळासाहेब पाटील....

तेथील लोकांना रोजगार मिळाल्यामुळे व हा पैसा त्याच ग्रामीण भागात आल्यामुळे तेथील बाजारपेठेत ते पहायला मिळते. त्यामुळे तेथे जे मजुरी करतात त्यांना मोठा दिलासा मिळतो. आज आम्ही सहकारी पट्ट्यात काम करतो, कारखान्याकडून रक्कम देण्यात आल्यावर तेथील बाजारपेठांमध्ये उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढते. त्याचा विचार साकल्याने करणे गरजेचे आहे. या वर्षी ऊसाचे अतिरिक्त उत्पन्न आहे, त्याचे नियोजन करण्याचे काम सहकार खात्यामार्फत सुरु आहे. असा विश्वास मी या निमित्ताने देत आहे. हे सरकार सत्तेवर आल्यावर दोन वर्षात ज्या साखर कारखान्यांचे एक्सपांशन करण्याचे विषय आले त्यांना मान्यता देण्यात आली. त्यामध्ये आम्ही असा निर्णय घेतला की, त्या भागातील ऊस उत्पादकांचा विचार करण्यात यावा. सरकार सत्तेवर आल्यावर कारखाना कोणाचा आहे हे न पाहता त्या कारखान्याला थकहमी द्यायची. ज्यांना आम्ही थकहमी दिली त्या कारखान्याचा उल्लेख मी पक्ष म्हणून करीत नाही. बीड मधील एका कारखान्याला शासनाने थकहमी दिली. सातारा जिल्ह्यातील किसनवीर सहकारी साखर कारखान्याला थकहमी देण्यात आली. त्यांनी दुसऱ्या खंडाळा येथील कारखान्याला थकहमी घेतली. त्या व्यक्तीने किसनवीर व खंडाळा सहकारी साखर कारखाना सुरु केला नाही. त्यामुळे त्यांच्यावर शासनाला कारवाई करावी लागली. कारवाई केल्यावर विरोधी पक्ष म्हणतो की, आमच्या कारखान्यावर तुमच्या पक्षाने कारवाई केली. कारखान्याने थकहमी घेतली तर त्या रकमेचे काय केले त्याचा तपास करण्याचा अधिकार सहकार विभागाला आहे. इतकेच मी या निमित्ताने सांगतो. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी अनेक कारखान्यांचा उल्लेख केला. त्यामध्ये कलाशीव, वसंतदादा पाटील व आदरणीय यशवंतराव चव्हणा यांच्या साखर कारखान्याच्या नावांचा उल्लेख वारंवार केला. मला व्यक्तीश: असे वाटते की, येथून पुढे सहकारी संस्थांना नावे देतांना काही तरी विचार करणे आवश्यक आहे. आम्ही म्हणतो वसंतदादा बँक बुडाली. हा

श्री.बाळासाहेब पाटील...

कारखाना बुडला. त्यामुळे याबाबत विचार करण्याची गरज आहे. नियम २६० च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही माहिती मी सदनासमोर ठेवली आहे.

----

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदया, नियम २६० च्या प्रस्तावामध्ये जलसंपदा विभागाचे काही मुद्दे व उल्लेख करण्यात आलेला आहे मी त्याबाबत थोडक्यात स्पष्टीकरण करतो. उशीर झाला याची मला जाणीव आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस यांनी कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला पाणी उपलब्ध झाले नाही असा उल्लेख केला आहे. २३.६६ टीएमसी पाण्यामधील या प्रकल्पाला ६ टीएमसी पाणी उपलब्ध झाले आहे. उर्वरित १६.६६ टीएमसी पाणी कसे उपलब्ध करता येईल याचा विचार सुरु आहे. टाटा जलविद्युत प्रकल्पामधून पाणी कोकणात जाण्याऐवजी इकडे घ्यायचे काय याचा अभ्यास करण्यासाठी सुर्वे समिती नियुक्त केली आहे. त्या समितीचा अहवाल आल्याशिवाय काही करता येत नाही. कृष्णा लवादात या खोऱ्यातील पाणी बाहेरच्या खोऱ्यात देण्यास मान्यता नाही. पुढील राज्यांनी पोलावरमचे पाणी ट्रान्सफर केले तर त्यात काही वाटा आपल्या राज्याला मिळाला आहे. नदीतून पाणी तिकडे जाण्याऐवजी ते इकडे वाढविण्यात येईल. तसा केल्यास पुढील राज्यांना त्यांचा शेअर्स द्यावा लागतो. त्यामुळे आपल्या राज्याच्या वाट्याला येणारे पाणी मर्यादित असते. या सर्व बाबींचा अभ्यास केला पाहिजे. हे थोडे किचकट आहे, राज्य सरकारची पाणी देण्याची इच्छा आहे, परंतु त्यामध्ये काही अडचणी येत असल्या तरी आष्टी पाटोदा मतदारसंघासाठी त्या भागातील प्रकल्पाला गती देण्याचा प्रस्ताव एसएलडीसी समोर सादर केला असून त्यासंदर्भातील निर्णय लवकर होईल. तेथील विधानसभा सदस्य श्री.आसबे हे सतत त्या प्रकल्पाचा पाठपुरावा करीत आहेत. ते तुम्हाला या प्रकल्पाबाबत अधिक माहिती नक्की देतील. ते किती प्रयत्न करीत आहेत ते तुम्हाला भेटल्यावर नक्की सांगतील. तो प्रकल्प लवकर मार्गी लागेल.

सभापती महोदया, वळण बंधाऱ्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातून पश्चिमेचे पाणी पूर्वेला आणण्याचा प्रयत्न करीत आहो त.त्या प्रकल्पाला गती आली आहे. हा तपशील मोठा आहे, त्याचा उल्लेख करुन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. काही प्रकल्प जून २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. धोंडाळपाडा ननाशी, गोलशी महाजे हे प्रकल्प जून २०२२ पर्यंत पूर्ण होणार आहेत. या प्रकल्पाची

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील....

कामे ८० ते ९० टक्के झाली आहेत. काही ठिकाणी भूसंपादनासाठी विरोध असल्यामुळे त्यात थोडा बदल केला आहे, पायरपाडा हा प्रकल्प जून २०२३ पर्यंत पूर्ण होईल.वैतरणा प्रकल्पातील पाणी मुकणे धरणाकडे ट्रान्सफर करण्यासाठी त्या धरणात एक सॅडल वॉल होती ती काढून तेथे एक छोटे धरण बांधायचे आहे. पूर्वी त्याचे डिझाईन करताना एक टीएमसी पाणी वैतरणातून मुकणे धरणात ट्रान्सफर होईल असे होते. मी तेथे स्वत: जाऊन त्या जागेची पाहणी करुन काही सूचना केल्या. ११ टीएमसी पाणी ट्रान्सफर होईल त्या अनुषंगाने डिझाईन पूर्ण झाली आहे, त्याचे टेंडर निघणार आहे. या महिन्यात ते फायनल होऊन वैतरणातून मुकणे धरणात पाणी ट्रान्सफर करण्यासाठी आपणाला यश येईल. गोदावरी खोऱ्यात इतके पाणी पहिल्यांदा येते. मांजरपाड्याचे पाणी वळविण्यात येत आहे. उत्तरेतील खोऱ्यात काही पाणी येत आहे. असेच बरेच प्रकल्प आहेत त्यातील १४ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. ते छोटे छोटे आहेत, त्यातील एक टीएमसी पाणी ट्रान्सफर करु शकलो. ११ प्रोजेक्ट चे सर्वेक्षण भविष्यकाळात करण्यात येणार आहे. त्यातील काही प्रोजेक्ट वन खात्याच्या मंजुरीविना अडकले आहेत. इतर परवानग्या घेण्यासाठी अडकले आहेत. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी मुख्य अभियंता व त्यांची टीम स्वतंत्रपणे सतत काम करीत आहे. मला विश्वास आहे की, दोन वर्षात हे चित्र बरेच स्पष्ट होईल. गोदावरी खोऱ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आणू शकतो. नदीजोड अंतर्गत दमणगंगा, एकधरे, गोदावरी, दमणगंगा-वैतरणा, कडवा नदी-गोदावरी, पार गोदावरी उपसा योजना क्रमांक ३, ४ नार-पार गिरणा नदी जोड योजना असे बरेच प्रकल्प आहेत. त्यामुळे गोदावरी खोऱ्यात जास्तीत जास्त पाणी आणून गोदावरीतील पाण्याची तूट भरुन काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी विदर्भातील अमरावती विभागातील अनुशेष भरुन काढण्याबाबत मुद्दा मांडला आहे. राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार विदर्भात २५.६५ टक्के, मराठवाड्यात २२.५४ टक्के ऊर्वरित महाराष्ट्रात ५१.८१ टक्के हे प्रदेश निहाय सूत्रानुसार पाटबंधारे विकास

श्री.जयंत पाटील...

महामंडळ निहाय नियतव्ययाचे वाटप सन २०२०-२१ मध्ये देण्यात आले आहे. सन २०२०-२१ मध्ये राज्यपाल महोदयांनी दिलेले निदेश आधारभूत मानण्यात आले आहेत. सन २०२२-२३ मध्ये राज्यपाल महोदयांचे निदेश आले नाहीत. त्याच सूत्राप्रमाणे सन २०२२-२३ ला लोकसंख्या निवड, पेरलेले क्षेत्र याचा भार लक्षात घेऊन हे वाटप केले आहे. राज्यपाल महोदयांच्या सन २०२०-२१ च्या निदेशानुसार आर्थिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये विदर्भ, मराठवाडा व ऊर्वरित महाराष्ट्रात १०१७१ कोटी रुपयांचे वाटप केले आहे. राज्यपाल महोदयांनी नियुक्त केलेल्या निर्देशांक अनुशेष समितीने ९ विकास क्षेत्राचा अनुशेष परिगणित केला. त्या संदर्भातील ॲक्शन टेकन रिपोर्ट राज्यपाल महोदयांनी मान्य केला आहे. निर्देशांक अनुशेष समितीने जून १९९४ अखेर राज्यातील तत्कालीन ३० जिल्ह्यापैकी १५ जिल्ह्यामध्ये १३८३ हजार हेक्टर रब्बी समतुल्य इतका भौतिक अनुशेष व २३ जिल्ह्यात ६०४१८ कोटींचा आर्थिक अनुशेष दाखविला होता.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित

श्री.जयंत पाटील.......

कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग, नाशिक विभागातील नाशिक व धुळे आणि मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर आणि विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, अमरावती, बुलडाणा, अकोला, यवतमाळ अशा १५ जिल्ह्यातील अनुशेष शिल्लक होता. या संदर्भात बरीच कार्यवाही झालेली आहे. सन २०११ पर्यंत जवळपास सर्व जिल्ह्यातील आर्थिक अनुशेष दूर झाला. त्यावेळी चलनवाढ, बांधकाम कालावधी वाढ, किमती वाढ, भौतिक अनुशेष दूर करण्यात तेवढे यश मिळाले नाही. आता अनेक जिल्ह्यातील भौतिक अनुशेष दूर होऊन प्रदेश निहाय अनुशेष शिल्लक आहे. मराठवाड्यात ९८ टक्के, विदर्भात ८१ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रात १०० टक्के दूर झालेल्या अनुशेषाची टक्केवारी आहे. अमरावती विभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी १०० निवडक प्रकल्पांचे सुधारीत नियोजन करण्यात आले. जून, २०२१ अखेर अनुशेष कार्यक्रमातील ६४ प्रकल्प पूर्ण झाले असून ३६ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर असून त्याद्वारे उर्वरित अनुशेष सुमारे १.२२ लाख असून सदर अनुशेष सन २०२३-२४ पर्यंत दूर करण्याचे नियोजन आहे. अमरावती प्रदेशातील अनुशेष निर्मूलनासाठी २४५७ कोटी रुपयांची तरतूद १५०० कोटी रुपयांच्या अतिरिक्त तरतुदीसह प्रस्तावित करण्यात आली असून जून, २०२३ पर्यंत सुमारे ५३ हजार हेक्टर इतका अनुशेष दूर करण्याचे नियोजन आहे. जून, २०२४ पर्यंत संपूर्ण अनुशेष निर्मूलन करण्याचे आमच्या सरकारने ठरविले आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.परिणय फुके यांनी भंडारा जिल्ह्यातील मालगुजारी तलावांच्या नियोजनबद्ध विकासाबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. एकूण २८ मालगुजारी तलाव असून त्यापैकी २० मालगुजारी तलावांची दुरुस्ती प्रगतीपथावर असून त्यांना वर्षनिहाय दिलेल्या निधीची स्थिती पुढील प्रमाणे आहे. सन २०२०-२१ मध्ये १९ तलावांसाठी ३.३४ कोटी रुपये, सन २०२१-२२ मध्ये २० तलावांसाठी २.७५ कोटी रुपये आणि सन २०२२-२३ मध्ये २० तलावांसाठी ३ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.......

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांनी कोयना अवजलाचा वापर चिपळूनसाठी करावा अशी सूचना केलेली आहे. आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. वीज निर्मितीनंतर कोळकेवाडी धरणातून ६७.५ टीएमसी पाणी वशिष्ठी नदीतून समुद्रात सोडण्यात येते. यापैकी १७.५ टीएमसी पाणी दक्षिण कोकणात वशिष्ठी खोऱ्यात सिंचनासाठी व चिपळून शहरासाठी पिण्याचे पाणी व औद्योगिक वापरासाठी वापरणे नियोजित आहे. जे ५० टीएमसी पाणी शिल्लक आहे ते उत्तर कोकणात मुंबईसाठी, आपण मुंबई म्हणतो परंतु आता मुंबई पर्यंत पाणी आणण्याची आवश्यकता नाही. दिल्ली-मुंबई कॉरिडॉर दिघी बंदरापर्यंत होणार आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील दक्षिण भागात भविष्यात मोठ्या प्रमाणावर डेव्हलपमेंट होणार आहे. तेथपर्यंत पाणी नेले तरी त्या भागातील लोकसंख्येला, नवीन गुंतवणुकीसाठी फायदा होईल. म्हणून ५० टीएमसी पाणी मुंबई पर्यंत आणणे, वापरणे, नियोजित करणे यासाठी वॅपकॉस नवी दिल्ली या संस्थेमार्फत काम सुरु आहे. मी आज सकाळी माझ्या दालनात बैठक घेतली. वशिष्ठी नदीतील पाणी चिपळून पासून उत्तरेकडे आणणे यासाठी छोटा गट तयार करण्यात आलेला आहे. जलसंपदा विभागाचे सचिव श्री.भुषण गगराणी यांना सिडकोतील कामाचा अनुभव आहे. आम्ही छोटा ग्रुप तयार केलेला आहे. अलीकडे रायगड जिल्ह्यातील अलिबाग व दक्षिणेकडील भाग विकसित होत आहे. अगदी नवी मुंबई पर्यंत पाण्याची गरज आहे. नवी मुंबई शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वत:चे धरण आहे. आता आपण दमणगंगा, पैंजाळचे ३०-३२ टीएमसी पाणी ग्रॅव्हीटीने आणू शकतो. कदाचित मुंबई शहराला पाण्याची गरज नाही असे मत तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात व्यक्त करण्यात आले आहे. आता मुंबई, ठाणे शहरापेक्षा वसई, विरार, भाईंदर या एमएमआर रिजनमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या आहे. त्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्याकरिता चौफेर अभ्यास सुरु आहे. वरच्या भागातून किती ग्रॅव्हीटीने पाणी येऊ शकते, ते पाणी खालून वर लिफ्ट करावे लागेल, या दोन्हीचा समन्वय साधून जास्तीत जास्त पाणी या परिसरात आणण्याचा प्रयत्न आहे.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील.......

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी अकोला बॅरेज संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यासाठी निश्चितपणे न्याय दिला जाईल. त्याबाबत लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदया, नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चेत जलसंपदा विभागावर बोलताना सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्या मुद्यांची उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

**उप सभापती :** माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, राईट टू रिप्लाय हा आपला अधिकार आहे. परंतु मला वेळेअभावी आपल्या व्यतिरिक्त अन्य सन्माननीय सदस्यांना राईट टू रिप्लायच्या माध्यमातून प्रश्न विचारण्याची संधी देता येणार नाही. सभागृहाची वेळ सकाळी ११.५० वाजता संपणार होती. त्यानंतर दुपारी १२.०० वाजता प्रश्नोत्तरे सुरु करावयाची होती. नियम २६० अन्वये प्रस्तावावर २ तास ४० मिनिटांऐवजी ४.३० ते ५ तास चर्चा झालेली आहे. आपण थोडक्यात प्रश्न विचारावेत, अशी माझी विनंती आहे. आपल्याला मंत्री महोदयांच्या उत्तरासह १० मिनिटात प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे. त्यानंतर आपण विधेयक चर्चेला घेऊ. आपण विधेयक चर्चेला घेण्यासाठी सहकार्य करीत आहात त्यासाठी मी आपल्याला धन्यवाद देते.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, या अधिवेशनात विरोधी पक्षातर्फे नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला प्रथमच सविस्तर उत्तरे मिळाली त्याबद्दल मी समाधान व्यक्त करतो. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी स्वत: उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची सविस्तर उत्तरे मिळालेली आहेत. माननीय सहकार मंत्री श्री.बाळासाहेब पाटील व माननीय जलसंपदा मंत्री श्री.जयंत पाटील साहेबांनी देखील प्रस्तावावरील चर्चेला उत्तर दिलेले आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.......

सभापती महोदया, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी सांगितले की, दरेकर को घुस्सा क्यो आता है. आपण मूळ विषयालाच हात घातलेला आहे. कारण, सहकाराच्या प्रांगणात राजकारणाचे जोडे बाजूला काढून सहकार चालवावा, असा मंत्र, आदर्श सहकार धुरीणांनी दिलेला आहे. वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण व त्यानंतर माननीय श्री.शरद पवार साहेबांनी देखील सहकाराचा गाडा टिकावा, वाढावा, त्यातील अडचणी दूर व्हाव्यात यासाठी प्रयत्न केलेले आहेत यामध्ये कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. परंतु अलीकडच्या काळात सहकारात ज्या पद्धतीने राजकारण सुरु आहे त्यामुळे मूळ मंत्रालाच हरताळ फासला जात आहे. खरे म्हणजे सहकाराच्या मुळाशी जाऊन सहकाराचे प्रश्न सोडवून अडचणीत आलेल्या संस्थांना उर्जीतावस्था मिळवून देण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भात व्यापक चर्चा करुन नियोजन करुन त्या संस्था अडचणीतून बाहेर आणल्या पाहिजेत. राज्यातील ३५-३६ जिल्हा मध्यवर्ती बँकांपैकी ४-५ जिल्हा मध्यवर्ती बँका चांगल्या सुरु आहेत. पुणे, सातारा व मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकांचा त्यामध्ये समावेश आहे. माझे असे म्हणणे आहे की, आपण एनपीए शून्य टक्के असल्याचे सांगितले, सीआरएआर बाबत सांगितले. आपली बँक नफ्यात आहे. त्याच धर्तीवर मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक काम करीत आहे. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचा एनपीए शून्य टक्के आहे, ती बँक नफ्यात आहे, बँकेने सीआरएआर मेन्टेन केलेला आहे. मग असे असताना मागील १५ वर्षापासून त्या बँकेची पुन्हा-पुन्हा चौकशी होते. आमची त्यासाठी हरकत नाही, आणखी १० वेळा चौकशी करावी. कोर्टाने रिट पिटीशन निकाली काढले, सी समरी झाली तरी पुन्हा शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न केला गेला. माझी अशी विनंती आहे की, ज्या १० मुद्यांच्या आधारे मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेची चौकशी सुरु केली त्याच मुद्यांच्या आधारे मी काही बँकांची चौकशी करण्याची मागणी केली. परंतु त्या संदर्भात उत्तर मिळाले नाही.

यानंतर श्री.सांगळे.....

श्री.प्रवीण दरेकर ....

परंतु सहकारमध्ये असा दुजाभाव होऊ नये अशी माझी त्या मागील प्रांजळ भूमिका होती. श्री.सुरेश धस यांना बीडमध्ये कर्ज दिले, त्यांचे मुंबईत कार्यालय नाही असा आक्षेप घेऊन त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुणे जिल्हा बँकेमध्ये कर्ज काढतो. आपण आऊट ऑफ कार्यक्षेत्रात कन्सोरशिएममध्ये कर्ज देतो. राज्याच्या बाहेर कर्ज दिले जाते आणि त्यांची कार्यालये पुण्यामध्ये असतात. अशा प्रकारे कन्सोरशिएमच्या माध्यमातून कर्ज देण्याची कार्यवाही केली जात असते. परंतु त्याच गोष्टीसंबंधी आमच्यावर आक्षेप घेतला जातो. तसेच ज्या लोकांनी एकही सहकारी संस्था चालविली नाही असे लोक या संदर्भात प्रशासक नेमावा, कारवाई करावी असे सांगत असतात. परंतु तेथे जे कोण काम करीत आहेत त्यांनाच याबाबत कळत असते. मुंबै बँकेत माझे मित्र श्री.कांबळे अध्यक्ष आहेत. श्री.सुनील राऊत आमदार आहेत. परंतु एकाकडे बोट दाखवित असताना इतर चार बोटे आपल्याकडे असतात याचे भान दुर्दैवाने दिसत नाही. माझी अशी मागणी आहे की, सहकारी संस्थांवर कारवाई होत असताना कारवाईपेक्षा उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. सहकारमध्ये २-५ संस्था, १० टक्के लोक चुकीचे असू शकतील. परंतु त्यासाठी ८०-९० टक्के लोकांना त्रास द्यायचा. आता अशी मोडस ऑपरंडी झाली आहे की, एक पत्र द्यायचे. त्यानंतर वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आणायची. त्यानंतर संबंधित रजिस्ट्रार व पोलिसांकडे जायचे. त्यांनी आपले म्हणणे ऐकले नाही तर पुन्हा वर्तमानपत्रामधून बातमी छापून आणायची. आता *** यांनी असे स्टेटमेंट दिले आहे की, गृहमंत्री प्रवीण दरेकरांना पाठीशी घालत आहेत. माझ्याकडे रोज ५०-५० पोलीस येत आहेत, १०-१० चौकशा होत आहेत. ही मानसिकता सहकार चळवळीसाठी अतिशय वाईट आहे. मी सहकार मध्ये २५ वर्षांपासून काम करीत आहे. जिल्हा बँकेत काम करीत असल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था तेथील सहकारी संस्था ...

---

**** आदेशानुसार विलोपित मजकूर.

असुधारित प्रत

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते, आपण सदनामध्ये अशाप्रकारे तक्रारदाराचे नाव घेऊ शकत नाही. आपण नियमानुसार चालतो.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण तक्रारदाराचे नाव घेऊ शकत नाही असे कोणत्या नियमामध्ये आहे ? आपण मला तो नियम सांगावा. ते सदनाचे सदस्य नाहीत. त्यांनी बाहेर तक्रार केली आहे. सभापती महोदया, आपण त्यांच्या पत्रावर रिमार्क मारुन पाठविला आहे. म्हणून कदाचित आपण त्यांची बाजू घेत असाल. माझी त्याबाबत काही हरकत नाही.

**उप सभापती** : मी याबाबत सचिवांना विचारल्यानंतर आपल्याला याबाबत सांगितले आहे. हे संकेत आहेत.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आपण ते पत्र घेऊन सभापतींकडे जायचे, त्यावर रिमार्क मारुन घ्यायचा. ही मोडस ऑपरंडी आपल्या सहकारासाठी वाईट आहे. कारण तक्रार करायला अक्कल लागत नाही. तसेच एखादी सहकारी संस्था अडचणीत आल्यानंतर पुन्हा त्या संस्थेला उभारी देण्यासाठी किती अडचणी येत असतात याची माहिती जे लोक संस्था चालवतात त्यांनाच याबाबत कळत असते. राज्यामध्ये वर्धा, यवतमाळ किंवा बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असो, त्या अतिशय अडचणीत आहेत. त्या बँका पुनरुज्जीवित करण्यासाठी आपल्याला काही तरी कृती आराखडा तयार केला पाहिजे. सभापती महोदया, जरंडेश्वर सहकारी साखर कारखान्यासंबंधी सांगायचे झाल्यास तो सहकारी साखर कारखाना होता. त्या कारखान्यावर २०-२२ कोटी रुपयांची लायबिलिटी असताना त्या कारखान्याचे व्हॅल्यूएशन ६० कोटी रुपयांपर्यंत केले. तो सहकारी साखर कारखाना सभासदांचा व त्यांच्या मालकीचा होता. आपण तो कारखाना लिलावात काढला. त्यानंतर तो कारखाना चांगल्या प्रकारे चालतो.

श्री.अजित पवार (खाली बसून) : तो कारखाना न्यायालयाने काढला होता.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, आम्हीच त्या कारखान्यासंबंधी तक्रार दिली होती. सुंदरबाग पतपेढीच्या माध्यमातून आम्हीच न्यायालयात गेलो होतो.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

कन्सोरशिएमच्या माध्यमातून राज्य सरकारी बँकेने त्या कारखान्याला कर्ज दिले होते त्यात आमचा शेअर आला नव्हता. म्हणून आमची एक सभासद संस्था कोर्टात गेली व त्या आधारे आपण सांगितल्याप्रमाणे कारखान्याच्या लिलावाची प्रक्रिया सुरु झाली होती. माझा मूळ मुद्दा असा आहे की, राज्यात सहकार चळवळीने महाराष्ट्रातील संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती झाली. परंतु राज्यातील ७० ते ८० टक्के सहकारी साखर कारखाने आता खाजगी कारखाने झालेले आहेत. अशा प्रकारे खाजगी साखर कारखाना झाल्यानंतर तो अतिशय चांगल्या प्रकारे चालतो, चांगल्या प्रकारे गाळप करतो. त्या कारखान्याकडून सर्व बिले वेळेत दिली जातात. सभापती महोदया, राज्यातील सहकार चळवळ जिवंत ठेवायची असल्यास सहकारी संस्थांना ताकद देऊन ती सहकारी संस्था आपल्याला जगवता का येत नाही ? हा मूळ प्रश्न आहे. शासनाने सहकारी साखर कारखान्यांना थकहमी दिली, त्यात काही चूक नाही. सहकारी साखर कारखान्यांना थकहमीची आवश्यकता असते. थकहमी असल्यास त्यांना बँकांकडून कर्ज दिले जाते. परंतु काही निवडक सहकारी साखर कारखान्यांना थकहमी देऊन हा विषय सुटणार नाही. राज्यात अनेक सहकारी सूत गिरण्या, सहकारी संस्थांना आपण थकहमी देणार आहोत की नाही ? आपण सातत्याने सांगतात की, याकरिता पैसे कोठून आणायचे ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. परंतु या सर्व विषयाचा एकत्रितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. राज्यातील सहकारी सूत गिरण्या बंद का पडत आहेत, त्या अडचणीत का येत आहेत ? त्या सहकारी सूत गिरण्या पुन्हा सुरु करता येतील का ? राज्यात अनेक सहकारी साखर कारखाने बंद आहेत, त्या बाबत आपण आवाहन केले, ते कारखाने कोणी घ्यावेत ? माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांनी असा उल्लेख केला होता की, सद्यस्थितीत एखाद्याचे वाटोळे करायचे असल्यास त्याला कारखाना चालू द्यायचा. याचे कारण असे आहे की, आता कारखाना चालविणे सोपे राहिले नाही. परंतु या ठिकाणी जो भेदभाव केला जात आहे, मी त्या बाबत बोलत आहे.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर ....

सभापती महोदया, मंत्री महोदयांनी मजूर संस्थांच्या बाबतीत योग्य माहिती दिली आहे. माझा मूळ प्रश्न असा आहे की, राज्यातील १५ हजार मजूर सहकार संस्थांच्या भविष्यासंबंधी काय करणार आहात ? त्यावर राज्यातील ३-४ लाख लोक आपला उदरनिर्वाह करीत आहेत. त्यात १०-२० टक्के मजूर संस्था बोगस असू शकतील. मी त्यांना याबाबत क्लिनचीट देत नाही. परंतु डीपीडीसी, आमदार निधी, खासदार निधीतील लहान मोठी कामे, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा म्हाडाची कामे असो, ही सर्व कामे मजूर सहकारी संस्थांकडून केली जातात. अशा परिस्थितीत आपण त्या सर्व मजूर सहकारी संस्थांवर गुन्हे दाखल करणार आहात का ? त्यात काम करणारे सर्व मजूर आहेत. ९९ टक्के लोक आयकर भरत आहे अशी परिस्थिती आहे. अन्यथा आपण ही चळवळ बंद तरी करुन टाकावी. त्या चळवळीतून काही व्यक्ती संचालक म्हणून बँकावर जात असतात. आज उत्पादक संस्था कर्मचारी म्हणून काम करीत आहात. आपण त्यांना देखील रद्द करणार आहात का ? आपण या संदर्भात सर्वंकष विचार करावा. मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती करतो की, सहकार चळवळीमध्ये काही दोष असल्यास आपण एकत्रितपणे चर्चा करुन ते दूर करु. आम्ही आपल्यासमवेत एकत्र बसतो. परंतु याबाबतची असलेली संज्ञा नीट करावी. फक्त प्रवीण दरेकर विरोधी पक्षनेता आहे म्हणून त्यांच्यावर कारवाई करायची. माझी याबाबत काही हरकत नाही. आपण या संदर्भात सर्व कायदेशीर कारवाई कराव्यात. आम्ही त्याला रितसर सामोरे जाऊ. परंतु त्याचबरोबर सिस्टीम व्यवस्थित करणार आहात की नाही ? माझ्यावर कारवाई करुन दमल्यानंतर आता सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांच्यावर कारवाई केली जात आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड पगारदार आहेत का ? त्यांची कर्मचारी सोसायटी आहे. त्या सोसायटीत ते सदस्य आहेत. परंतु त्यांच्या संदर्भात देखील तीच मोडस ऑपरंडी वापरली जात आहे. एक पत्र द्यायचे. त्यानंतर ॲथॉरिटीकडे तक्रार करुन त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आणायची. त्यानंतर पत्रकार परिषद घ्यायची. मघाशी आपण १० हजार कोटी रुपयांसंबंधी तसेच मुंबई बँकेत २ हजार कोटी रुपयांचा

असुधारित

श्री.प्रवीण दरेकर ....

घोटाळा झाल्यासंबंधी उल्लेख केला होता. सभापती महोदया, मुंबई बँकेत १२ कोटी रुपयांचा नफा होत असताना २ हजार कोटी रुपयांचा घोटाळा कसा होऊ शकतो ? माझी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांना विनंती आहे की, आपण या संदर्भात पुढाकार घेऊन या गोष्टी कशा थांबतील, याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. ही सायकल ठरलेली आहे. एखाद्याला टारगेट करायचे असल्यास फार सोपे आहे. मी विरोधी पक्ष असताना दोन अडीच वर्षांमध्ये कोणत्याही सहकारी संस्थांबाबत कोणतीही तक्रार केली नाही.

( काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलत असतात.)

सभापती महोदया, काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलत आहेत. आपण कृपया त्यांना समज द्यावी. स्वत: सहकारी संस्था चालवित नसल्यामुळे दुसऱ्या संस्था चालविणाऱ्यांना बोलणे सोपे असते. तसेच ते भाषण करीत असताना आपण त्यांना एक तास बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये. आपण याबाबत वारंवार सांगत असतो. मी त्यांना उभे राहून बोलण्यास अनुमती देत असते.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, हीच मूळ अडचण आहे. आज सन्माननीय सदस्य श्री.प्रसाद लाड यांच्यासंबंधी तक्रार करण्यात आली. अशा प्रकारे एकमेकांवर दोषारोप करताना त्यातून सहकारी संस्था विस्कळीत होते. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण यासंबंधी पुढाकार घेऊन लाईन ऑफ ॲक्शन ठरविणे आवश्यक आहे. आपण एकमेकांवर टीकाटिप्पणी, आरोप करीत आहोत. परंतु हे अतिशय टोकाला गेले आहे. अशा प्रकारे एकमेकांवर आरोप, टीकाटिप्पणी होत असल्यामुळे आपण या गोष्टींना वैयक्तिकरित्या सामोरे देखील जात असतो. परंतु त्यावेळी त्या संस्था अडचणीत येत असतात. अशा प्रकारे घडू नये अशी माझी विनंती आहे. सभापती महोदया, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

कारखानदारीसंबंधी गाळपासाठी वेळ वाढवित असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे अतिरिक्त ऊसाचा प्रश्न निश्चितपणे मार्गी लागणार आहे. मी याबाबत त्यांचे अभिनंदन करतो व आभार व्यक्त करतो.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

केंद्र सरकारने आयकर रद्द केला, एफआरपीमध्ये वाढ केली. निर्यातीचा कोटा वाढला, केंद्र सरकारने अनेक सवलती या कारखानदारीकरीता दिल्या आहेत, या कारखानदारीचे योगदान आर्थिक घडामोडीमध्ये किती आहे याची जाणीव आहे. म्हणून इथेनॉलला परवानगी दिली, आज इथेनॉलच्या माध्यमातून हजारो कोटीचा महसूल कारखान्यांना मिळणार आहे. म्हणून या निमित्ताने माझी विनंती राहणार आहे की, राज्यात सहकारी संस्था खाजगीकरणाकडे मोठया प्रमाणावर जात आहेत. आपल्या सर्वांना वाटत असेल की या संस्थांचे खाजगीकरण थांबले पाहिले, या संस्था ताकदवान झाल्या पाहिजेत. त्यासाठी पैसेही लागणार नाहीत. सहकारामध्ये एवढे पैसे आहेत की, त्याचे नीट नियोजन केले व एकमेकांना अडचणीच्या काळात मदत केली तर सर्व सहकारी संस्था निश्चित ताकदीने पुढे उभ्या राहतील अशा प्रकारचा विश्वास मला निश्चित आहे. आजच्या विषयात प्रादेशिक असमतोलाच्या बाबतीत अनेक सदस्यांनी मुद्दे मांडले आहेत. हे खरे आहे की, विदर्भ व मराठवाडयात उद्योग व सिंचनात निश्चितच कमी लक्ष आहे. कोकणात सर्वात कमी सिंचन आहे, मात्र कोकणात सर्वाधीक पाऊस पडतो. (वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते.)

सभापती महोदया, मी भाषण करीत नाही. मी थांबतो.

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छिते की, तुम्ही असे का करता ते कळत नाही. आम्ही देखील विरोधी पक्षात काम केलेले आहे व आमचेही विरोधी पक्ष नेते या सभागृहात होऊन गेले आहेत.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, **** माननीय उपमुख्यमंत्री हे उत्तर देणार असल्याने आम्ही सहन केले. आता राईट टू रिप्लाय हा माझा अधिकार आहे. मी विषय मांडले आहेत.

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विचारु इच्छिते की, आपणास अजून किती वेळ लागणार आहे. आपण १५ मिनिटांपासून बोलत आहात.

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, अजून १०-१५ मिनिटे लागतील. नाही तर मी बसतो व सभागृहाचा पूर्ण वेळ वाचवितो. ****

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छिते की, तुम्ही मला धमक्या देऊ नका.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आता जे काही शब्द उच्चारले. आपण या सभागृहाच्या प्रथा व परंपरा लक्षात घेता साधारणपणे पीठासीन अधिकारी यांचा अधिक्षेप होणार नाही अशाच प्रकारचे वक्तव्य आपल्याकडून झाले पाहिजे. माझी आपणास विनंती आहे की, त्यांनी केलेले वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, हरकत नाही. सभागृहाच्या पटलावरुन ते काढून टाकण्यास हरकत नाही. पण अशा प्रकारे सभागृहात सर्वांना समान न्यायाची भूमिका असावी.

**उप सभापती** : आपणास बोलण्याकरीता किती वेळ लागेल हे विचारले तर मी काय गुन्हा केला.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, **** पाहिजे तर रेकॉर्ड तपासून बघावे.

**उप सभापती** : प्रत्येक वेळी तुम्हाला वेळ दिला नाही असे कसे म्हणता.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आपण तीन वेळा तसे रेकॉर्डवर आणले आहे.

**उप सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छिते की, तुम्हाला पाहिजे तितका वेळ व आज दिवसभर बोला. हा प्रस्ताव संपेपर्यंत आपण कामकाज चालवू. राईट टू रिप्लाय आम्ही पाहिले किंवा ऐकले नाहीत का ?

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मी मुद्दा सोडून बोललो असेल तर सांगावे.

---

**** शब्द मागे घेण्यात आले.

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेते मुद्दयावर बोलत आहे त्याबाबत काही अडचण नाही. पण राईट टू रिप्लाय हा भाषणापेक्षा लहान असावा. साधारणत: १/१० असावा. पण आपले भाषण वाढायला लागले आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, ठीक आहे, १/१० म्हणजे २० मिनिटे होतात, पण मी १० मिनिटे बोलतो.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश धस व श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना राईट टू रिप्लाय आहे की नाही ?.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, चार पाच मुद्दे मी येथे मांडत आहे. जलसंपदा विभागाबाबत बोलतो. कोथेरी, कुरला वगैरे अशी महाड येथे चार धरणे आहेत. ११६ कोटीची प्रशासकीय मान्यता मागील सरकारच्या काळात घेतलेली आहे. पण अडीच वर्षात त्यातील कोणतेही काम पुढे गेलेले नाही. तसेच कोकणातील एकूणच सिंचनाचा विषय आहे. अनेक लघुसिंचन प्रकल्पाची माहिती दिली आहे, ६०-७० मध्यम प्रकल्प होते. माझी जलसंपदा मंत्री महोदयांना विनंती आहे की, कोकणातील रखडलेल्या प्रकल्पाच्या संदर्भात संयुक्त बैठक घेण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, प्रादेशिक असमतोल करीत असताना मराठवाडा वॉटर ग्रीडबाबत भाष्य झालेले नाही. वैनगंगा –पैनगंगा प्रकल्पातून कोकणातून पाणी वर उचलून देण्याबाबतचा प्रकल्प देखील बासनात गुंडाळला आहे. हे दोन्ही महत्वाचे प्रकल्प झाले तर मोठया प्रमाणावर सिंचनाचा व पाण्याचा प्रशन सुटेल.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी यावर उत्तर देण्यापूर्वी मी सभागृहाला अवगत करते की, मी माननीय सभापती यांना निरोप दिला आहे की, आपण येथे येऊन बसावे. सभागृहात उद्गगार काढल्याबद्दल मी अत्यंत व्यथीत झालेली आहे. अचानक माननीय सभापती येथे आले तर असे वाटेल की, मला त्यांनी काही निरोप दिला आहे का. पण मीच त्यांना निरोप दिला आहे की, आपण इकडे यावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदया, वैनगंगा प्रकल्पात पाण्याची उपलब्धता ७५ टक्के डिपेंडबिलिटी ऐवजी ५९ टक्के येत आहे. त्याबाबत काय करायचे याची चर्चा सुरु आहे व ते आपल्या प्रायोरिटीवर आहेत. मराठवाडा वॉटर ग्रीडचा उल्लेख मी केला नाही कारण पाणीपुरवठा व स्वच्छता तो विषय हाताळत आहे. प्रायोगीक तत्वावर एक लिंक करण्याबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून असे काही तरी ठरविण्यात आलेले आहे, पण त्याचा तपशील माहिती नाही, म्हणून मी उल्लेख केला नाही.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी उपमुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आमची एकदा कार्यशाळा घेण्यात यावी.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छिते की, मी आपणास थांबवू शकत नाही, तुम्हाला पाहिजे तितका वेळ बोला. आमच्यावर हेत्वारोप केल्यानंतर आम्ही काय करणार?

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, शेवटचे एक दोन मुद्दे मांडतो. एमएमआरडीए कार्यक्षेत्रात जवळपास ३०-३५ टक्के जनता राहते. त्या तुलनेत मुंबई, ठाणे किंवा एमएमआरडीए रिजनमध्ये तुलनात्मकदृष्टया कमी निधी दिला गेला आहे त्यामुळे अधिक निधी देण्याची मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदया, आपण व्यथीत आहात तसा मी देखील व्यथीत आहे, हे सभागृह व्यथीत भावनेने चालता कामा नये. याची आपण सर्व मिळून दक्षता घेऊया. धन्यवाद.

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदया, एक चुकीची माहिती सभागृहासमोर आलेली आहे, त्याबाबत मी सांगतो. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जरांडेश्वर कारखान्याचा उल्लेख केला त्याची मुळ ऑफसेट प्राईज ४० कोटी १ लाख होती. तो ६५ कोटी पेक्षा अधिक रकमेला घेतला आहे. सभागृहासमोर वारंवार चुकीची माहिती येत होती म्हणून मी हे सांगितले आहे. हे सरकार स्थापन झाल्यानंतर

माननीय पवार साहेबांनी मला सांगितले की, जेथे ऊस आहे त्या साखर कारखान्यांना थकहमी देण्याची भूमिका घ्यावी, तेथे पक्ष पाहू नका. म्हणून बीड जिल्हयातील कारखाना किंवा आमच्या जिल्हयातील मदन भोसले यांचा कारखाना त्यांनाही थकहमी दिलेली आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या तक्रारींबाबत सहकार आयुक्तांकडे चौकशी सुरु आहे, ते आल्यानंतर आपणास कळविले जाईल. खाजगी व सहकारी साखर कारखाने सुरु झाले नसते तर राज्यातील उसाचे काय करायचे हा प्रश्न निर्माण झाला असता असेही मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी चिडून म्हटले की, तक्रारदारास अक्कल नसते. अनेक पक्षातील अनेक मंडळी तक्रार करीत असतात मग त्यांनाही अक्कल नसते असे म्हणायचे का. त्यामुळे असे शब्द असतील तर आपण ते मागे घ्यावेत.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

असुधारित प्रत

**पृ.शी.:** महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुद्धच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक

L.A. BILL NO. LII OF 2020

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF EXCLUSIVE SPECIAL COURTS FOR THE SPEEDY TRIAL OF CERTAIN SPECIFIED OFFENCES AGAINST WOMEN AND CHILDREN AND CONSTITUTION OF IMPLEMENTATION MACHINERY FOR SUCH OFFENCES AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.दिलीप वळसे पाटील (गृह मंत्री ): सभापती महोदया, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन २०२० चे विधेयक क्रमांक ५२ महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालय विधेयक २०२० मी आपल्या अनुमतीने मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदया, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५२ महाराष्ट्र अनन्य विशेष न्यायालय विधेयक २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, महिलांवर होणारा अत्याचार आणि अन्याय या संदर्भात तातडीने कारवाई करता यावी, याकरिता दोन्ही सभागृहांनी संयुक्त समितीच्या अहवालानंतर विधेयक क्रमांक ५१ मंजूर केले. ते विधेयक महाराष्ट्राच्या राज्यपालांनी मान्यता देऊन केंद्राकडे पाठविलेले आहे. अजूनही ते विधेयक होम डिपार्टमेंटमध्येच फिरत आहे, राष्ट्रपतींच्या कार्यालयापर्यंत पोहोचलेले नाही. तरीदेखील आपल्याला ते विधेयक मंजूर केल्यामुळे जे काही अधिकार प्राप्त झालेले आहेत, त्याच्या अंतर्गत आपल्याला पुढील व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून विधेयक क्रमांक ५२ सभागृहामध्ये आणले गेलेले आहे.

सभापती महोदय, मी थोडक्यात याबाबत सांगू इच्छितो की, हे विधेयक क्रमांक ५२ या सभागृहात दिनांक १४.१२.२०२० रोजी मांडले होते. सदर विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यासंदर्भातील प्रस्ताव दिनांक २७.१२.२०२१ रोजी संमत करण्यात आला. संयुक्त समितीच्या चार बैठका झाल्या. त्या चार बैठकानंतर ३.३.२०२२ च्या बैठकीत अंतिम अहवाल सुधारणासह स्वीकृत करुन ते विधेयक संयुक्त समितीसमोर मांडले. बालकांच्या संदर्भातील मी केवळ चार वाक्ये वाचून दाखविणार आहे.

" सदर विधेयकाद्वारे महिला व बालकांच्या विनिर्दिष्ट गुन्हयांबाबत आरोपासंदर्भात अनन्य विशेष न्यायालये नव्याने स्थापित करता येतील किंवा अस्तित्वात असलेल्या न्यायालयांना विनिर्दिष्ट देखील करता येईल. प्रस्तुत विधेयकाद्वारे विशेष न्यायालये स्थापन होणार आहेत. तथापि, प्रसंगानुरुप उपलब्ध न्यायालयांना देखील हा दर्जा देऊन त्यांनाही निर्देशित करणे शक्य असल्याने त्यानुसार बदल करण्यात यावे." या अनुषंगाने बदल करण्यात आलेले आहेत. "विशेष सरकारी अभियोक्ता" व " एक किंवा अधिक सरकारी अभियोक्ता" नियुक्त करणे असा शब्दप्रयोग अधिक योग्य होईल, त्यानुसार खंड ७ मधील उप खंड १ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. महिला व बालकांच्यावरील अत्याचाराच्या

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

संदर्भामध्ये गुन्हेगारांना योग्य शिक्षा करणे अत्यंत आवश्यक असल्याने असा विशेष सरकारी अभियोक्ता बदलण्याचे व त्याच्या ऐवजी विशेष सरकारी अभियोक्ता नेमण्याबाबत खंड ७ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदया, खंड ८ मध्ये विनिर्दिष्ट अपराधांचे अन्वेषण करण्याकरिता राज्य शासनाकडून विशेष पोलीस पथक गठित करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस अधीक्षक किंवा पोलीस अधिकारी यांना अपराधाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर अपराधाचे अन्वेषण विशेष पथकाकडे सोपविण्याचे अधिकार असतील. साधारणत: या अशा प्रकारच्या तरतुदी असलेले हे विधेयक मी सभागृहासमोर मांडलेले आहे. विधानसभेमध्ये हे विधेयक एकमताने मंजूर केलेले आहे. विधानपरिषदेत देखील हे विधेयक एकमताने हे विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते १४ ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ५२ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती :** सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ५२ संमत झाले आहे.

------------

अप्रकाशित

महिलांवरील अत्याचार व अन्याय या संदर्भातील विधेयक सभागृहाने एकमताने मंजूर केल्याबद्दल आभार करण्यासंबंधी

**उप सभापती :** सर्व दृश्य व अदृश्य महिला प्रतिनिधी आणि समाजातील भगिनींच्या वतीने दोन्ही सभागृहांमध्ये हे विधेयक एकमताने मंजूर केले गेले. विधेयक क्रमांक ५१ आणि ५२ स्त्रियांवरील अत्याचार न्यायाच्या प्रकाशापर्यंत नेण्यारिता उपयोगी होईल. याकरिता सर्व सभासदांनी त्यांचे योगदान दिलेले आहे, त्यांचे, सरकारचे, माननीय मुख्यमंत्री, गृहमंत्री महोदय, अधिकारी वर्ग ज्यांनी विधेयक बनविण्यामध्ये सहभाग दिलेला आहे. सर्वपक्षीय महिला आमदार, आमदार बांधव जे जे या संदर्भातील संयुक्त समितीमध्ये नियुक्त केले गेले होते, त्या सर्वांचे मी आभार मानत आहे.

---

असुधारित प्रत

**पृ.शी.** स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक

L.A.BILL NO. XIII OF 2022

(A BILL TO PROVIDE FOR THE USE OF MARATHI LANGUAGE FOR THE OFFICIAL PURPOSES OF THE LOCAL AUTHORITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.सुभाष देसाई (मराठी भाषा मंत्री): सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १३ महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या शासकीय प्रयोजनांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक १३ महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या शासकीय प्रयोजनांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, हे विधेयक एवढयाचसाठी आणलेले आहे की, १९६४ चा राजभाषा अधिनियम जो आहे, त्याच्यामध्ये स्थानिक प्राधिकरणांमध्ये मराठी राजभाषेचा वापर करण्यामध्ये स्पष्टता किंवा स्पष्ट सूचना नव्हत्या. त्यामुळे काही पळवाटा तयार झाल्या. अनेक स्थानिक प्राधिकरणांमध्ये मराठी भाषेचा वापर पूर्णपणे होत नव्हता. अनेक तक्रारी आल्या. त्या तक्रारींची दखल शासनाने घ्यायचे ठरविले. त्यामुळे त्या त्या शहरांमधील फलक इंग्रजीमधून असणे, संकेतस्थळ जी नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध झालेली आहेत. त्या संकेतस्थळांवर हिंदी आणि इंग्रजीचा वापर होत आहे. काही ठिकाणी तर चित्रफीतीमध्ये देखील इंग्रजीचा वापर केल्याचे लक्षात येत आहे. मेट्रो-रेल्वेवरील अनेक फलक केवळ इंग्रजी आणि हिंदीमधून दिले जातात, असे लक्षात आल्यामुळे हे विधेयक आणून अशा प्रकारच्या पळवाटा बंद करायच्या आणि सर्व प्राधिकरणांनी मराठीचा वापर केलाच

पाहिजे,याकरिता हे विधेयक आणले गेलेले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, सभागृहाने विधानसभेप्रमाणे येथेही एकमताने हे विधेयक मंजूर करावे, आपल्या मराठी भाषेचा गौरव वाढवावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधेयक चांगले आहे. मंत्रीमहोदय आपण या सभागृहामध्ये अनेक वेळा असे आश्वासन दिलेले आहे की, इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषय शिकविला जाईल. मराठी विषय इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये शिकविला गेला पाहिजे. या आश्वासनाची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन मंत्रीमहोदय देतील का ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या बाबीचा उल्लेख केलेला आहे, त्यासंदर्भातील विधेयक शासनाने मंजूर केलेले आहे. कोरोनाकाळात प्रत्यक्ष शाळाच बंद होत्या. आता शाळा सुरु झालेल्या आहेत. आता त्यांना विधेयकाप्रमाणे अंमलबजावणी करावीच लागेल. अन्यथा विधेयकातील तरतुदींप्रमाणे संबंधित शाळांवर कठोरातील कठोर कारवाई केली जाईल, यासंदर्भातील माहिती घेण्याचे काम चालू आहे. या संदर्भातील विधेयकाची निश्चितपणे अंमलबजावणी होईल, असे मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो. आता विधेयक क्रमांक १३ सभागृहाने एकमताने संमत करावे, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.सोनावणे.....

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी माननीय मंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. त्यांनी एक महत्वाचा टप्पा सन १९६४ मध्ये.... हा विषय मी नेहमीच मांडत आलेलो आहे. सन १९६४ मध्ये कायद्यानुसार राजभाषा निर्माण झालेली आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०२२ साल उजाडलेले आहे. मराठी भाषा अंमलात आणण्यासंदर्भातील अपंगता काय आहे ती लक्षात येत आहे. मी या विधेयकाचे स्वागत करीत आहे. या विधेयकातील उद्देश क्रमांक दोनमध्ये असे म्हटले आहे की, "स्थानिक प्राधिकरणाच्या सर्व कार्यालयांमध्ये या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या विवक्षित शासकीय प्रयोजनांकरिता इंग्रजीचा वापर करता येईल, अशी तरतूद करणे", पुनश्च इंग्रजीला एक फट पाडून दिल्यानंतर ते विवक्षित कारण प्रत्येक ठिकाणी हेच असेल आणि म्हणून इंग्रजी भाषा वापराल तर ती एक सबब निर्माण होईल. फाईलला मराठीत नस्ती म्हटले जाते. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, ही नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हापरिषदा आणि पंचायत समितीमधील सन्माननीय सदस्यांनी मराठी भाषेतूनच बोलले पाहिजे. कारण मराठी ही राजभाषा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत अनेक लहान मोठे कार्यकर्ते निवडून आलेले असतात. ते स्थानिक असतात आणि त्यांनी मराठीतूनच भाषण केले पाहिजे. पण त्या ठिकाणी जर कोणी आगाऊपणा करणार असेल आणि असे म्हणत असेल की, मला हा घटनेने दिलेला अधिकार आहे, असे जर कोणी छातीठोकपणे बोलत असतील तर त्यांच्या छाताडावर आपण मराठी भाषा घेऊन नाचले पाहिजे. काल मी माझ्या भाषणात मराठी भाषावर बोललो नाही. राजभाषा ही मराठी आहे आणि महाराष्ट्रातील सर्वोच्च सदन आहे. या सदनात सन्माननीय सदस्यांना पाऊल टाकावयाचे असेल तर प्रत्येकाला मराठी भाषा आलीच पाहिजे आणि ती अनिवार्य केली पाहिजे. मला हिंदी, इंग्रजी, तामिळ आणि तेलगू भाषा येतात. क्वचित प्रसंगी हिंदीतून भाषणे केली जातात. अनेक सन्माननीय सदस्य हे हिंदीतून बोलतात. निवडून आलेला सन्माननीय सदस्य सभागृहात शपथ घेते वेळी त्यांचा समज असतो की, मी

असुधारित प्रत

श्री. दिवाकर रावते......

आता आमदार झालो. ज्यावेळी एखादा सन्माननीय सदस्य हिंदी किंवा इंग्रजी भाषेतून शपथ घेतो त्यावेळी माननीय सभापती महोदय हे त्यांच्या आसनावरुन त्यांना थांबवित नाही. त्यामुळे या सदनात मराठीचा एक विद्रुप असा अवमान केला जातो त्यावेळी मनाला खूप वेदना होतात. चहा पिताना "कैसे आये, क्या किया" इथपर्यंत ठीक आहे. नागपूरवाले हिंदीशिवाय बोलतच नाही. यासाठी कोणालही मोठेपण द्यावयाचे नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना सूचना आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सन्माननीय सदस्यांनी मराठीतूनच बोलले पाहिजे. मी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, नागपूर अधिवेशन हे कोरोनाच्या महामारीमुळे होत नाही. माननीय श्री. उद्धव बाळासाहेब ठाकेर यांचे सरकार आल्यानंतर पहिले अधिवेशन हे नागपूरमध्ये झाले होते. त्यावेळी स्वागत का केले नाही. आपल्या सदनात देखील मराठीतूनच कामकाज चालले पाहिजे याची अनिवार्यता माननीय सभापती महोदयांकडून केली पाहिजे. मला माननीय सभापती महोदयांनी बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

----------

असुधारित प्रत

श्री. सुनील शिंदे ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सदनात एक चांगले विधेयक मंजूर होत आहे. त्याचा मला विशेष आनंद होत आहे. मी शासनाचे आणि राजभाषा मंत्री माननीय श्री. सुभाष देसाई यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. आज मला शिवसेना नेते स्व. सुधीरभाऊ जोशी यांची आठवण येते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने या विषयासाठी केली आहेत. बँका, विदेशी बँका, विमान कंपन्या आणि विमा क्षेत्रात मी वेळोवेळी आंदोलने करुन जवळ जवळ १० ते १२ पोलीस गुन्हे अंगावर घेतलेला कार्यकर्ता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत मराठी भाषेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी याकरिता हे चांगले विधेयक आणलेले आहे आणि त्याचा उद्देश खूपच चांगला आहे. या विधेयकाची अंमलबजावणी करीत असताना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मराठी भाषा ही साधी, सरळ आणि सोपी असावी अशी आमची प्रामाणिक अपेक्षा आहे. कधी कधी इंग्रजी भाषा परवडली पण मराठी भाषा समजत नाही अशा तऱ्हेचे अनेक शब्द वापरले जातात. त्यामुळे ती गोष्ट लक्षात घ्यावी. सदनात मराठी भाषेतून कामकाज चालले पाहिजे याकरिता माननीय सभापती महोदयांनी नोंद घेतली पाहिजे. त्रिभाषा सुत्रीनुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय बँका, विमान कंपन्या, मोनो, मेट्रो आणि व्यापार संकूलामध्ये गेल्यानंतर तेथील माणूस इंग्रजीमधून बोलायला सुरुवात करतो. आता आम्ही न शिकलेली माणसे असल्यामुळे आमची त्या ठिकाणी अडचण होते. मी मराठी भाषेचा अभिमान बाळगतो. प्रवेशद्वारापासून ते रोख व्यवहार होईपर्यंत इंग्रजी भाषेचा सर्रास वापर होताना दिसून येतो. तांत्रिक आणि अतांत्रिक पदे त्या ठिकाणी भरली जातात. त्रीभाषा सुत्रीप्रमाणे स्थानिक भरतीच्या निकषांचे योग्य पध्दतीने पालन केले जात नाही. अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असते. त्या ठिकाणी मराठीकरणासाठी आपला कोणताही अंकुश नाही. मी यापूर्वी विधानसभेत हा प्रश्न विचारला होता. त्यावेळी मंत्री महोदयांनी मला सांगितले होते की, आयएएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली मॉनेटरिंग करण्यासाठी एक कमिटी नेमण्यात येईल. परंतु, त्याची त्यावेळी अंमलबजावणी झाली नव्हती. इंग्रजी अंगवळणी पडलेली असल्यामुळे आम्हाला त्या ठिकाणी बोलताना दुसरे शब्द आठवत नाही. तेच शब्द आठवत आहे. मी सदनाची माफी मागतो. यावर शासनाचा

श्री. सुनील शिंदे......

अंकुश असला पाहिजे. शासन यावर अंकुश ठेवण्यासाठी स्वत:ची एक यंत्रणा आणली जात असून, त्याची कडकपणे अंमलबजावणी व्हावी, अशी माझी मागणी आहे. पुनश्च एकदा मी या चांगल्या विधेयकाचे आणि माननीय मंत्री महोदयांचे मनापासून अभिनंदन करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ( विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदया, माननीय राजभाषा मंत्री श्री. सुभाष देसाई यांनी मराठी भाषा आणि मराठी अस्मिततेसंदर्भात एक चांगले विधेयक मंजुरीसाठी आणलेले असून, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे. अंमलबजावणी हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

प्रचलित कायदा अस्तित्वात आहे, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. जर कायदा करुनही त्याची अंमलबजावणी योग्यप्रकारे झाली नाही तर हा कायदा पुन्हा एकदा कागदावरच राहील, अशा प्रकारची आम्हाला भीती आहे.

सभापती महोदया, या विधेयकाच्या निमित्ताने मी काही बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. महानगरपालिकेच्या शाळांना मुंबई पब्लिक स्कूल असे इंग्रजी भाषेतील नाव देण्यात आलेले आहे. कदाचित सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना याचे वाईट वाटत असेल, परंतु ते यावर का बोलले नाहीत हे मला माहीत नाही. आता या शाळांचा लोगो 'एमपीएस' असा केला आहे. जे कायदा करीत आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महानगरपालिका आहे, परंतु त्या ठिकाणी महापालिकेच्या शाळांना 'एमपीएस' असे बोलले जाते. आपली जर मराठी भाषेच्या बाबतीत कायदा बनविण्याची भावना असेल तर त्या दृष्टीने कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, मी दुसरे उदाहरण देतो. साधारणत: १५० शिक्षक हे मुंबई महापालिकेच्या मराठी शाळेतून शिकले. त्यांनी आझाद मैदान येथे आंदोलन केले होते. मी तेथे गेलो होतो. ते महापालिकेच्या मराठी शाळेतून शिकल्यामुळे त्यांना नोकरीवर घेतले जात नाही. मुंबई महानगरपालिकेत सत्ता असलेली शिवसेना मराठी माध्यमातून शिकल्यामुळे जर त्या शिक्षकांना कामावर घेणार नसेल तर हा कायदा काय कामाचा आहे ? माझी विंनती आहे की, या १५० शिक्षकांना तत्काळ सेवेत घ्यावे. हा कायदा करीत असताना आपण त्या माध्यमातून अंमलबजावणी करु शकतो हा मेसेज त्या निमित्ताने जाईल. शिक्षक पदासाठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण झाले पाहिजे आणि तो निकष होता असे त्या शिक्षकांना सांगितले गेले. या सरकारकडून त्या आंदोलनाची साधी दखल सुद्धा घेण्यात आली नाही.

सभापती महोदया, मी मराठी माध्यमांच्या शाळांचे वास्तव सांगतो. आपण कायदा आणत आहात त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. हा कायदा लागू झाल्यानंतर ग्रामपंचायत असेल, नगर पंचायत असेल, स्थानिक स्वराज्य संस्था

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

असतील किंवा सर्व महानगरपालिका असतील, त्या ठिकाणी मराठीतून व्यवहार होईल, पत्रव्यवहार होईल. परंतु आज मराठीची काय अवस्था आहे ? आपण मराठी भाषेसाठी कायदा करीत आहोत. मराठी भाषेच्या अनास्थेमुळे आज मुंबईतील मराठी माध्यमांच्या शाळांची स्थिती काय आहे ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदया, २०१०-११ मध्ये मुंबईत मराठी माध्यमांच्या ४१३ शाळा होत्या व विद्यार्थी पटसंख्या १,०२,२१४ होती. २०११-१२ मध्ये मराठी माध्यमांच्या शाळांची संख्या कमी होऊन त्या ३९६ झाल्या व विद्यार्थी पटसंख्या सुद्धा कमी होऊन ९२,३३५ झाली. २०१२-१३ मध्ये पुन्हा शाळांची संख्या कमी होऊन त्या ३८५ झाल्या आणि विद्यार्थी संख्या ८१,११६ इतकी कमी झाली. २०१३-१४ पुन्हा या शाळांची संख्या कमी होऊन ३७५ इतकी झाली आणि विद्यार्थ्यांची संख्या ६९,३३० इतकी कमी झाली. २०२०-२१ मध्ये मराठी माध्यमांच्या २८० शाळा असून विद्यार्थी संख्या ३३,११४ विद्यार्थी आहेत.

सभापती महोदया, मुंबईत माध्यमनिहाय विद्यार्थ्यांची स्थिती काय आहे ते मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. हिंदी माध्यमांच्या २२७ शाळा असून तेथे विद्यार्थ्यांची पटसंख्या ६३,२०२ आहे. ऊर्दू माध्यमांच्या १९३ शाळा असून तेथे विद्यार्थ्यांची पटसंख्या ६२,५१६ आहे. याचाच अर्थ हिंदी-ऊर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या ६२-६३ हजार आणि मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या केवळ ३३,११४ इतकी आहे. आपण या बाबत आत्मपरीक्षण करणार नसू आणि मराठी भाषेच्या वापरासाठी कायदा करणार असू तर आपल्या करनी आणि कथनीत फरक आहे हे यातून दिसून येते. राज्यात बंद पडणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळा वाचविण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले हे सांगितले पाहिजे. मराठी भवन, मराठी भाषा संवर्धन, भूमिपुत्रांना नोकरीत प्राधान्य या केवळ घोषणाच राहिल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे साहेब, आपण स्थानिय

श्री.प्रवीण दरेकर....

लोकाधिकार समितीच्या माध्यमातून मोठी चळवळ उभी केली. परंतु आता किती मराठी मुलांना रोजगार मिळतो हा संशोधनाचा विषय आहे.

सभापती महोदया, हे विधेयक चांगले आहे. या विधेयकामुळे महाराष्ट्रात मराठी भाषा बोलली जाईल, पत्रव्यवहारात तिचा वापर होईल. परंतु या संदर्भात सरकार आणि मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून कडकोट अंमलबजावणी झाली पाहिजे. तसेच या संदर्भात प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे. केवळ घोषणेपुरता का कायदा कागदावर राहता कामा नये. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांगीण कामगिरी करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करुन माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई यांनी सदरहू विधेयक आणल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. धन्यवाद.

-------

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-१३ वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, मी या विधेयकाच्या अनुषंगाने लांबलचक भाषण करणार नाही. सदरहू विधेयक संमत करताना राज्यातील सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक केला आहे काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. याच प्रश्नाच्या अनुषंगाने विचारु इच्छितो की, राज्यात राज्य मंडळ, सीबीएसई, आयसीएसई आणि आयबी बोर्डाच्या शाळा मोठ्या प्रमाणावर आहेत. या बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा बंधनकारक केली आहे काय किंवा करण्यात येणार आहे, काय या बाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा, एवढीच माझी विनंती आहे.

----------

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-१३ वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने अतिशय अभ्यासपूर्ण मत व्यक्त केले आहे. मराठी भाषा जपण्याच्या दृष्टिकोनातून हे विधेयक मांडल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. सन्माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई असतील किंवा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते असतील, त्यांची पोटतिडीक आहे की, मराठी भाषा ही दैनंदिन व्यवहारात असली पाहिजे, संसदीय कामकाजात असली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी सांगितले की, आता कामकाजात क्लिष्ट शब्द येता कामा नयेत. ते शब्द सुटसुटीत व सोपे वापरले पाहिजेत. आम्ही या सभागृहात नवीन सदस्य आहोत. या ठिकाणी बोलताना पॉईंट ऑफ इन्फर्मेशन, राईट टु रिप्लाय असे शब्दप्रयोग केले जातात. या बाबी मराठी भाषेतून बोलण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण देणार आहात, हा महत्त्वाचा भाग आहे.

सभापती महोदया, हे विधेयक चांगले आहे. परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी मराठी शाळेची जी परिस्थिती मांडली ती १०१ टक्के खरी आहे. मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा मराठी भाषिक म्हणून आपण सामोरे जातो त्यावेळी त्याला काहीच किंमत राहत नाही. ग्रामीण भागात मराठी माध्यमांच्या शाळेची दुरवस्था आहे. या बाबींमध्ये केवळ विधेयक आणून सुधारणा होणार नाही. त्यासाठी कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, या प्रामाणिक मताचा मी आहे. सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी दोन-तीन मिनिटे बोलले. परंतु त्यांच्या बोलण्यातील अर्धे शब्द हे इंग्रजी भाषेतील होते.

सभापती महोदया, माझे एवढेच म्हणणे आहे की, अगदी सुटसुटीत व सोप्या भाषेत आगामी काळात ग्रामपंचायत, पंचायत समित्या, मराठी माध्यमांच्या शाळा या ठिकाणी मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे. हे विधेयक आणल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मराठी माध्यमांच्या

श्री.अमोल मिटकरी....

शाळांबाबत जे मत मांडले त्याचाही गांभीर्याने विचार व्हावा, अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

----------

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदया, सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-१३ वर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय मराठी भाषा मंत्री श्री.सुभाष देसाई यांनी वि.स.वि.क्रमांक-१३, राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या शासकीय प्रयोजनांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडलेले आहे. अशा प्रकारचे विधेयक आणल्याबद्दल सर्वप्रथम मी माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई आणि माननीय श्री.उद्धव ठाकरे सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच आपण उचललेल्या निर्णयाचे वा पावलाचे स्वागत करतो. आपण या राज्यातील चौथे राज्यकर्ते आहात की ज्यांनी मराठी भाषेच्या दिशेने अत्यंत मजबूत पाऊल उचलले आहे. पहिले राज्यकर्ते गौतमी पुत्र सातकर्णी हे होते. त्यांनी राज कारभारात मराठीचा राजभाषा म्हणून वापर करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मराठी भाषा असे बोलले जात नव्हते, त्यावेळी महाराष्ट्री भाषा असे बोलले जात होते. याला २ हजार वर्षे होऊन गेले आहेत. त्या आधारावर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारसोबत भांडत आहे. त्यानंतर दुसरे राज्यकर्ते हे मलिक अंबर होते. त्यांनी मराठीला राजभाषा म्हणून मान्यता दिली. तिसरे राज्यकर्ते म्हणजे या राज्याचे अराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज होय. त्यांनी राजभाषा व्यवहार कोष करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदया, महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर आपण मराठी राजभाषा म्हणून स्वीकारली. परंतु त्या भाषेचा वापर प्रशासनात, महापालिकेत, बाजारात, उद्योगात आणि व्यवसायात होत नव्हता. त्या ठिकाणी केवळ इंग्रजी भाषेचा वापर होत होता. माननीय मंत्री श्री.सुभाष देसाई यांनी अभिजात भाषेच्या बाबतीत या ठिकाणी भूमिका मांडली होती. त्यावेळी मी त्यांना आठवण करुन दिली होती की, मुंबई महानगरपालिकेचा कारभार आजही इंग्रजी भाषेत चालतो. झोपडी पाडायची असेल तर झोपडपट्टीवासीयाला जाणारी नोटीस इंग्रजी भाषेत पाठविली जाते. प्रत्येक टेबलावरील टिप्पणी इंग्रजी भाषेतून तयार होते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. कपिल पाटील ....

नोट म्हणजे टिप्पणी. ती नोट नव्हे. मी टिप्पणीच्या संदर्भात बोलत आहे. आधी तेथे मराठी यायला हवी. ज्या दिवशी मुंबई महानगरपालिकेमध्ये मराठी येईल त्या दिवशी येथील मराठीचा वापर मुंबईच्या भोवती उभ्या राहिलेल्या उद्योग व्यवसायातही सुरु होईल. मुंबईच मराठी बनेल. तुमचे त्या दिशेने उचलले पाऊल आहे. त्यामुळे मी माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई व माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते व सुनील शिंदे यांना सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेमध्ये मराठीचा पहिला वापर ज्या दोन नेत्यांमुळे झाला, त्यांची आवठण आज केली पाहिजे, त्यांच्यातील पहिले नाव जॉर्ज फर्नांडिस आणि दुसरे नाव मृणाल गोरे आहे. या दोघांनी नगरसेवक असताना पहिल्यांदा तुमच्या महानगरपालिकेत ठराव आणला आणि मराठीमध्ये कारभार सुरु झाला, तोपर्यंत मुंबई महानगरपालिकेतील कारभार इंग्रजीत होत होता. आजही तिचा प्रभाव संपलेला नाही. पण तो प्रभाव संपविण्याचे काम तुम्ही करीत आहात याचे स्वागत केले पाहिजे. हे स्वागत करताना इंग्रजी हटविण्याकरिता करीत आहोत का तर ते इंग्रजी हटविण्यासाठी नाही.

सभापती महोदय, मी मघाशी माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई यांच्या जवळ जाऊन विचारले की, मुंबई महानगरपालिकेत हे होईल का तर ते म्हणाले की, शंभर टक्के होईल. मग मी म्हटले की, आज दुसऱ्यांदा तुमचे यासाठी स्वागत करतो. तुम्ही सोय केली आहे. न्यायालयीन काम आहे, इतर राज्यांशी व्यवहार करायचा आहे, आंतरराष्ट्रीय करारमदारांशी तुमचा संबंध येणार आहे, परदेशाशी संबंध येणार आहे, तेथे मात्र तुम्हाला इंग्रजीचा वापर करता येईल आणि तो करायला काही बिघडत नाही. हे भांडण मराठी विरुध्द इंग्रजीचे नाही तर आपल्या मातृभाषेचे, राजभाषेचे अस्तित्व टिकविणे, ते संवर्धित करणे, वाढविणे हा मुद्दा आहे. कारण ज्या दिवशी भाषा संपते त्या दिवशी संस्कृती संपते आणि ज्याची संस्कृती नसते, त्या माणसाची ओळखही संपते आणि मग त्याचे अस्तित्वही उखडले जाते. आज मुंबईतून मराठी माणसाचे

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील ....

अस्तित्व उखडले गेले आहे, त्याचे मुख्य कारण भाषेवर आलेली गदा आहे. हे खरे कारण आहे. अस्तित्व टिकविण्यसाा‍ठी स्थानिय लोकाधिकारातून दिलेली लढाई असेल, त्याला आज मजबुतीचा पहिला आधार तुम्ही देत आहात. त्यामुळे तुमचे स्वागत करीत आहे. परंतु इंग्रजीची पिछेहाट किंवा हकालपट्टी नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील शिंदे यांनी प्रश्न मांडला की, अनेक क्लिष्ट शब्द मराठी शब्द आहेत, ते मराठी आहेत की नाहीत याचा संशय येतो. ते खरोखर मराठी नसतात आणि असे शब्द आपल्यावर पदनाम कोषाचा नावाखाली, राज्यव्यवहार कोषाच्या नावाखाली महाराष्ट्र सरकारनेच लादले, ज्याचा प्रतिवाद आचार्य अत्रे यांनी बदनाम कोष म्हणून केला. ते आपल्या डोक्यावर इतके बसले आहेत की, आजही आपण फाईलला नस्ती म्हणतो. नस्ती ही नसती कटकट असते. कधीच आपल्या कामाला येत नाही. फाईल निगेटिव्ह बनते. नस्ती असते. कारण तिचा अर्थच नसती आहे. तो काही मराठी शब्द नाही. नस्ती नुसता वेळ खाते. कारण तो शब्द मराठी नाही. फाईल हा मराठी शब्द आहे. फाईल हा मराठी शब्द कसा ? लोकमान्य टिळकांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून भाषण केले. आताही राजकीय नेते त्यामध्ये जातात. त्यावेळी लोकमान्यांनी सांगितले की, जोवर मराठी उद्योग, व्यापाऱ्याची भाषा बनणार नाही तोवर मराठी प्रस्थापित होणार नाही. तुम्ही जर कवटाळत बसला तर तुम्ही मराठी संकुचित कराल. मराठीच्या भाषाशुध्दीचे प्रयोग नंतर काही नेत्यांनी केले. पण त्यातून मराठी मेली. मराठी वाढली नाही. टिळकांनी सांगितले आणि टिळकांनी भाषण केले. त्यावेळी शब्दरत्नाकर नावाचा शब्दकोष होता. त्यामध्ये मराठीचे शब्द दोन लाख होते आणि त्याच वेळी इंग्रजीच्या शब्दकोषामध्ये ५ लाख शब्द होते. गेल्या वर्षी इंग्रजीचा शब्दकोष आला. त्यामध्ये ५ लाखांचे १० लाख इंग्रजी शब्द झाले. मात्र मराठीचे काही हजारांनी शब्द वाढले की नाही हे मला माहीत नाही. शक्यता कमी आहे.

सभापती महोदय, इंग्रजीत शब्द का वाढले तर इंग्रज जेथे गेले, ज्या देशात त्यांनी राज्य केले, जेथे साम्राज्य पसरले, तेथील स्थानिक भाषेतील शब्द त्यांनी

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील ....

स्वीकारले. "भाकर" हा शब्द मराठी आहे, तो इंग्रजीत जाऊन पोहोचला आहे. "पक्का" हा शब्द येथील व्यवहारातील आहे, तो तेथे जाऊन पोहोचला आहे. "गर्दी" हा शब्द तेथे इंग्रजीत जाऊन पोहोचला आहे. असे किती तरी शब्द आहेत. "चक्काजाम" हा तेथे गेलेला शब्द आहे. इंग्रजीने जगातील सर्व भाषांमधील शब्द जे इंग्रजीत नव्हते ते स्वीकारले म्हणून इंग्रजी समृध्द झाली. मराठी समृध्द करायची असेल तर मराठीची सर्व कवाडे उघडावी लागतील. आज या घडीला मराठीची कवाडे उघडी नाहीत. तिच्यावर जाडजुड पांघरुन आहे आणि ते संस्कृतचे आहे. ते एक घोंगडे आहे. संस्कृतचा काही संबंध नाही.

सभापती महोदय, संस्कृत तर सरहद्दीच्या पलीकडून, वायव्येच्या पलीकडून आलेली भाषा आहे, परकीय भाषा आहे. इंग्रजी पश्चिमेकडून आली असेल. वायव्येकडून संस्कृत आली आहे. संस्कृत थोडी अगोदर आली आहे. ३ हजार वर्षे अगोदर आली आहे. इंग्रज ३ हजार वर्षांनंतर आले असतील, पण ही भाषा तर तिकडून आलीआहे.

सभापती महोदय, त्याच्या आधी या देशात भाषा नव्हत्या का, या देशात माणसे नव्हती का, ती बोलत नव्हती का, व्यवहार करीत नव्हती का, येथे संस्कृती नांदत नव्हती का ? येथे सिंधू संस्कृतीपासून दक्षिणेपर्यंत, अंदनामापर्यंत सर्व लोक आपापल्या भाषेत बोलत होते. येथे द्रविडी भाषा होती, तमिळ भाषा होती, प्राकृत भाषा होती, महाराष्ट्रीय भाषा होती, मगधी भाषा होती, पाली भाषा होती. या सर्व भाषा भगिनी होत्या. संस्कृत भाषा नंतर आली. पण त्या संस्कृतची सत्ता आजही इतकी घट्ट आहे की, त्या संस्कृतच्या वर्चस्वामुळे तुम्हाला मराठी भाषेचा अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी अडचणी येत आहेत. ज्या दिवशी अभिजात मराठीचा पहिला ठराव मांडला गेला त्या दिवशी असे मांडले गेले की, मराठी ही संस्कृतोद्भव आहे. बिलकूल नाही. संस्कृतची मराठी एकतर भगिनी असेल किंवा मराठी त्या

श्री. कपिल पाटील ....

अगोदरची भाषा होती, अडीच हजार वर्षांपूर्वीची ती भाषा होती.

सभापती महोदय, मराठीच्या बऱ्याच बोली आहेत, त्याचा वापर आपण करीत नाही. बुलढण्याची निहाली भाषा आहे, ती ४० हजार वर्षे जुनी आहे. त्यात बरेच विलक्षण शब्द आहेत. आपण ते का स्वीकारायचे नाहीत ? गोंडिया आहे, माडिया आहे, अहिराणी आहे, झाडीपट्टीतील भाषा आहे, कोरकू आहे, मालवणी आहे, कोंकणी आहे, मानदेशी आहे, वाडवळी आहे, वऱ्हाडी आहे अशा कितीतरी भाषा आहेत. या प्रत्येक भाषेतील शब्दप्रयोग आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीतील ५०० शब्द एका अभ्यासिकेने शोधले की, जे प्रमाण मराठी भाषेत वापरले जात नाहीत. ते मराठी आहेत असे माहीतच नाही. मग ते कोणते शब्द आहेत ? ते मराठीच आहेत, पण वेगवेगळया मराठी बोलीतील शब्द त्यांनी आणले, तोपर्यंत आपण फक्त संस्कृत मराठी जी सामान्य माणसाला कळत नाही, तिला कवटाळून बसलेलो होतो. त्यामुळे मराठीचा व्यवहार संपला. मराठीपासून लोक दूर जातात याचे ते मुख्य कारण आहे. आपली मुले आपण इंग्रजी माध्यमात यासाठी पाठवितो, कारण जगाच्या खिडक्या आपल्या मुलांसाठी उघड्या राहिल्या पाहिजेत. आपल्या मुलांनी परत आपले काम करावे असे वाटत नाही. मोलकरणीला वाटते का की, माझ्या मुलीने पुन्हा भांडी घासत बसावे. ती पोटाला चिमटा काढते आणि आपल्या मुलीला इंग्रजी शाळेत घालते. मुंबई पब्लिक स्कूलमध्ये आपली मुले जात असतील तर जाऊ द्यावीत. ती जायला पाहिजेत.

सभापती महोदय, "पब्लिक" हा शब्द मराठी शब्द आहे. तो इंग्रजी शब्द आहे हे कोणी सांगितले ? "स्कूल" हा शब्द देखील मराठी शब्द आहे. त्यामुळे त्यांचे स्वागत केले पाहिजे. आपण स्वीकारले नाही तर हे होणार नाही. मी माननीय मंत्री श्री. आदित्य ठाकरे साहेबांचे अभिनंदन केले. त्यांनी त्या दिवशी निर्णय घेतला. मी म्हणालो की, तुम्ही पहिले पाऊल उचलले आणि मराठीला प्रथम भाषा बनवून इंग्रजी

शाळेचे दरवाजे झोपडपट्टीतील गरीब मुलांना उघडले. हे चांगले आहे. तुमच्या सरकारनेच केले आहे म्हणून त्याचे स्वागत केले पाहिजे. तुम्ही याला छातीठोकपणे

श्री. कपिल पाटील ....

उत्तर दिले पाहिजे की, होय, आम्ही केले आणि मराठी मुलांना अधिक ताकदवान बनविण्यासाठी केले. त्यामध्ये काय चूक आहे ? उत्तम इंग्रजी, हिंदी आले पाहिजे.

सभापती महोदय, आमच्या मराठी मुलांना जगातील अनेक भाषा येतील. युक्रेनी भाषा आली तर युक्रेनच्या विद्यापीठात मेडिकलला मुले जातात. रशियन भाषा आली तर रशियन विद्यापीठामध्ये जातील. चिनी भाषा आली तर चिनी विद्यापीठामध्ये मुले जातील. आपली मुले का जाऊ नयेत ? भाषेच्या संदर्भात आपण जो अट्टहास धरतो की, ती भाषा नको, तो शब्द नको तसे करता कामा नये. माझी माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई यांना विनंती आहे की, आपल्या राज्यात अनेक बोलीभाषा आहेत. अनेक बोलीभाषांचा मराठीशी दुरान्वयाने संबंध नसेल. माडियाचा नसेल, कोरकूचा नसेल, गोंडीचा नसेल पण त्यांच्यासाठी स्वंतत्र मंडळ तयार करावे, अभ्यास मंडळ तयार करावे आणि त्यांचा वापर अधिक कसा होईल, त्या भाषा अधिक समृध्द कशा होतील आणि मराठीशी त्यांचे असलेले नाते कसे दृढ होईल या दृष्टीने प्रयत्न करावा. आपण असे केले तर बरे होईल. कारण तुम्ही मराठी भाषा मंत्री आहात. त्यामुळे या सर्व बोलींच्या संवर्धनाची जबाबदारी तुमच्यावर येते. निहाली भाषा तर राहिली पाहिजे. जगातील भाषा संपुष्टात येत आहेत आणि अशा वेळी ज्या जुन्या भाषा आहेत त्या टिकविणे ही आपली जबाबदारी आहे.

सभापती महोदय, डॉ. गणेश देवींनी ७८० भाषांचा शोध घेतला आणि त्या पुन:प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. आपण ते काम महाराष्ट्रापुरते तरी करु शकलो तरी एक मोठे काम होऊ शकेल. आपण जुने धरतो. मी आग्रह धरतो. आपली लिपी तरी देवनागरी होती का ? आपली लिपी देवनागरी नव्हती. आपली मोडी लिपी होती. शिवाजी महाराज मोडी लिपीमध्ये लिहायचे. छत्रपतींची भाषा स्वीकारायची असेल तर मोडी लिपी का नको ? मी आज आग्रह धरत नाही की, मोडी लिपीकडे जा. आता

असुधारित प्रत

देवनागरी व्यापक लिपी झाली आहे. त्यामुळे तिचाच आग्रह आपल्याला धरावा लागेल. पण मोडी लिपी शिकली देखील पाहिजे, सांभाळली देखील पाहिजे, ती नष्ट

श्री. कपिल पाटील ....

होता कामा नये. ती लिपी देखील टिकली पाहिजे. आपण आपला जुना ऐवज घरामध्ये ठेवतो, जुने दागिने ठेवतो.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील....

सासूने दिलेल्या, आजीने दिलेल्या, वडिलांनी दिलेल्या काही वस्तू आपण सांभाळून ठेवतो. हा आपला ऐवज आहे तो आपण सांभाळला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी मघाशी असा उल्लेख केला की, त्यासाठी एक नवीन समिती नियुक्त करावी. त्यामध्ये मराठी भाषेत व्यवहारातील जे शब्द वापरले जातील त्या दिवशी प्रशासनातील, मंत्रालयातील, महानगरपालिकांमधील व स्थानिक स्वराज्य संस्थामधील भाषा सोपी होईल. जे अमराठी भाषिक व संस्था आहेत, त्यांना आपल्या मराठी भाषेत व्यवहार करणे व त्यांना ती भाषा समजणे सोपे होईल. त्यांना परके म्हणून नाकारण्याचे काही कारण नाही. त्यांना ती कामे सोपे जातील. असे केले तर यातून दोन गोष्टी होतील मराठी नोकऱ्यांचा टक्का वाढेल. ज्या दिवशी स्थानिक व्यवहार मराठीमध्ये सुरु करण्यात येतील त्या दिवशी अंबानी पासून अदानीपर्यंत सर्वांना मराठी अधिकारी ठेवावे लागतील. ते लोक आपल्याशी व्यवहार करायला येतील. त्यांचे पहिले पत्र इंग्रजीत केले, गुजरातीमध्ये केले तर लगेच त्याचे मराठीत भाषांतर करण्यासाठी दोन मराठी अधिकारी ठेवावे लागतील. या विधेयकातून शेकडो माणसांचा रोजगार वाढणार आहे. हा मराठीचा मुद्दा नाही. यातून असंख्य रोजगार तयार होतील. उत्तम मराठी, इंग्रजी, गुजराती, हिंदी भाषा येणाऱ्या अशा मराठी लोकांना नोकऱ्या मिळू शकतील. त्या भाषेतील व्यवहार व व्यापार आपणाला कळेल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करायला पाहिजे अशी मी विनंती करतो. मराठी भाषेसाठी ज्या संस्था व व्यक्ती काम करीत आहेत त्यांना शासनाने मदत केली पाहिजे. माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी जो प्रयोग केला तो सार्वत्रिक करावा लागेल. त्यासाठी माननीय शिक्षण मंत्री महोदयांशी चर्चा करावी.

सभापती महोदय, तुमच्या काळात किंवा त्या अगोदरच्या पिढीत सर्व शाळा बायलिंगल म्हणजे द्विभाषीक होत्या. त्यामुळे तुमचे इंग्रजी व मराठी भाषेचे ज्ञान उत्तम आहे. आमचे मराठी चांगले नाही व इंग्रजी भाषेचा पत्ता नाही. बाळासाहेब खेर यांनी गडबड करुन ठेवली आहे. (....अडथळा...) त्यांनी काय केले ते माननीय श्री.बाळासाहेब थोरात सांगतील कारण त्यांचे वडील इंग्रजीत उत्तम व्यवहार करीत

असुधारित

श्री.कपिल पाटील....

होते, बोलू शकत होते. श्री.बाळासाहेब थोरात शिक्षण मंत्री असतांना त्यांनी ही बाब सभागृहात सांगितली होती. त्याची आठवण करुन दिली होती. त्यांनी इंग्रजी हद्दपार केली होती. त्यांनी थेट आठवी नंतर इंग्रजी आणली होती.

**सभापती** : यामध्ये एक पिढी निघून गेली.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, त्यावेळी बायलिंगल शाळा होत्या. माझे वडील आजही उत्तम इंग्रजी मसूदा तयार करतात. स्वत: बाळासाहेब थोरात यांनी शिक्षणमंत्री म्हणून भाषण करतांना सांगितले की, माझे वडील उत्तम इंग्रजीत व्यवहार करायचे व बोलत होते. मी शिक्षण घेताना आठवीपासून इंग्रजी विषय सुरु झाला. आठवी नंतर आपल्या मनाची कवाडे बंद होतात. आकलन करण्याची किंवा ग्रहन करण्याची कवाडे वयाच्या ११ वर्षापर्यंत खुली असतात. त्यामुळे वयाच्या ११ वर्षापर्यंत आपण चार ते पाच भाषा शिकू शकतो. त्यामध्ये कोणतीही अडचण येत नाही. त्यामुळे ती कवाडे मोकळी ठेवली पाहिजे. सर्व मराठी शाळा बायलिंगल करण्यासाठी प्रयत्न केला तर उत्तम इंग्रजी सर्वांना येईल त्यासाठी हे सर्व खुले करावे आम्ही तुमच्या बरोबर आहोत, मी पुन्हा आपले अभिनंदन करतो व थांबतो.

-----

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे (नाशिक स्थानिक प्रा.संस्था) : सभापती महोदय, विधेयक क्रमांक १३ वर मी बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयक क्रमांक १३ सभागृहात मांडले त्याबाबत मी मंत्री महोदय श्री.सुभाष देसाई व महाविकास आघाडी शासनाचे अभिनंदन करतो. या विधेयकावर बोलतांना मी एक विनंती करतो की, ज्यांनी मराठी भाषा वापरली नाही त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. इतके बोलून मी थांबतो.

-------

असुधारित प्रत

श्री.प्रवीण पोटे-पाटील (अमरावती स्थानिक प्रा.संस्था) : सभापती महोदय, या विधेयकावर मला बोलण्यास संधी दिली त्याबाबत मी आपला आभारी आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे मराठी भाषेवर प्रेम होते, मराठी भाषा जपण्यासाठी जे विधेयक मांडण्यात आले त्यासाठी मी सरकारचा आभारी आहे. हे विधेयक मांडत असताना विधेयक क्रमांक १३ हे इंग्रजीत आहे. मराठी भाषा जपायला सुरुवात झाली त्याचा इतिहास छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून पाहिला तर मराठी भाषा ही जपायला पाहिजे हे प्रामुख्याने दिसत आहे. मधल्या काळात महाविकास आघाडी शासनाने दुकानावरील इंग्रजी पाट्या मराठीत बदलण्याबाबत मोठा पुढाकार घेतला परंतु तो फार काही सक्सेस झाला नाही असे वाटते. हे विधेयक पाहिल्यानंतर माझ्या मनात शंका आली की, इंग्रजी पाट्या काढून त्या मराठीत करण्याचा निर्णय घेतला परंतु तो यशस्वीरित्या सक्सेस झाला नाही असे म्हणावे लागेल. हे शब्द मी वारंवार यासाठी मांडतो की, मोनो ट्रेन, मोनो रेल, ब्युटी पार्लर, टायलेट, वाशिंग रुम, व्हीडीओ, सलून, आईस्क्रीम, स्टेशनरी या सर्व शब्दांना नवीन मराठीत प्रतिशब्द दिला पाहिजे. मी मराठी माणूस आहे, मराठीबाबत मला प्रेम आहे. हे विधेयक मांडत असताना यामध्ये अनेक फाटे फुटतात. वेगळया व रेग्युलर पध्दतीने हे चालले पाहिजे असे मला वाटते. माझ्या मनात आणखी एक शंका आली की, येणाऱ्या काळात निवडणुका आहेत, त्यासाठी हे विधेयक मंजूर करण्यात येत आहे काय ? मराठी भाषेला आपण मातृभाषा म्हणतो त्यामुळे इंग्रजीचे शब्द जे मराठीत आले त्यांना काही पर्यायी शब्द सूचविले पाहिजेत. आता दहावी व बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. सर्व टीचर्स लोक पेपर सुरु आहेत असे म्हणतात अशा अनेक बाबी आपण पाहतो. मंत्रिमंडळात जेव्हा विधेयके येतात तेव्हा त्यामध्ये इंग्रजी भाषा वापरण्यात येते.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी एक विषय मांडला की, २८८ मराठी शाळा असताना शाळेचे विद्यार्थी कमी झाले आहेत. मराठी शाळेतील शिक्षकांना आपण वाचवू शकत नाही.

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी हात वर केला तर ते योग्य होणार नाही. यानंतर आपणाला प्रश्नोत्तरे घ्यावयाची आहेत.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, मराठी शाळांचे शिक्षक वाचवू शकत नाही ही महाराष्ट्राची शोकांतिका असेल तर मराठी भाषा आपण कशी वाचवू शकतो याबाबत माझ्या मनात शंका आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी दोन बाबींचा उल्लेख केला. हिंदी व ऊर्दु भाषेबाबत त्यांनी उल्लेख केला आहे. या शाळांतील विद्यार्थी कमी झाले नसून मराठी शाळेतील विद्यार्थी कमी होत असतील तर हा महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. हे विधेयक मांडल्याबाबत मी मंत्री महोदय व सरकारचा आभारी आहे. धन्यवाद.

----------

असुधारित प्रत

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मराठी भाषेचा मुद्दा आहे विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्यांनी जे नवीन मुद्दे मांडले आहेत त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. इतर तपशीलात मी जात नाही. १५० शिक्षकांचा मुद्दा मांडलेला आहे. विधेयकाच्या चर्चेत काही नवीन मुद्दे आले व ते त्या विषयाशी निगडीत आहेत.

**सभापती** : सर्वच सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल तर हे बरोबर नाही, मला सभागृहाने सांगावे की, प्रश्नोत्तरे पुढे ढकलायची आहेत काय ? प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी प्रत्येक विषयावर बोलायला पाहिजे असा कोठे नियम आहे काय ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हे दोन मुद्दे या विधेयकाच्या हेतूशी निगडीत आहेत. मुंबई महानगरपालिकेतील अमराठी भाषिक शिक्षकाने मराठी भाषेची परीक्षा उशिरा दिली असेल तर त्यांना दंडीत केले जात आहे. या दोन्ही बाबी बदलल्या पाहिजेत.

या नंतर श्री.बोरले..

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन २०२२ चे वि.स.वि.क्र.१३-महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत ते महत्वाचे आहेत. मी सांगू इच्छितो की, आपण शाळांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबत विधेयक संमत केले असून त्याची निश्चितपणे अंमलबजावणी होत आहे. कोरोना काळात प्रत्यक्ष शाळा बंद होत्या आणि तेथे निरीक्षकांना जाणे सुद्धा कठीण होते. अर्थात याची अंमलबजावणी शालेय शिक्षण विभाग करणार आहे. शालेय शिक्षण विभाग व मराठी भाषा विभागाच्या या संदर्भात सातत्याने बैठका होतात. त्यामुळे त्याची अंमलबजावणी कठोरात कठोर पद्धतीने केली जाईल. ज्या शाळा मराठी भाषेचा वापर करणार नाहीत अशा शाळांना कोणतीही सूट दिली जाणार नाही.

सभापती महोदय, आपण मराठी पाट्या लावण्याबाबत विधेयक संमत करीत आहोत. ज्या छोट्या दुकानांमध्ये १० पेक्षा कमी कर्मचारी संख्या होती त्यांना पूर्वीच्या विधेयकातून वगळण्यात आले होते. १० कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त कर्मचारी असणाऱ्या आस्थापना, कार्यालये, दुकानांसाठी तो नियम लागू होता. बहुसंख्य दुकानांमध्ये कर्मचारी संख्या कमी असते. त्यामुळे तेथे मराठीचा वापर होत नव्हता. आता ही पळवाट बंद झालेली आहे. आम्ही या संदर्भात यंत्रणा निर्माण करीत आहात. जेणे करुन त्यावर नियंत्रण ठेवले जाईल, यातून कोणतीही पळवाट राहणार नाही. आपल्याला येथून पुढे बाजारपेठांमधील सर्व दुकाने, आस्थापना व कार्यालयाच्या पाट्या मराठी भाषेतून झळकलेल्या दिसतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुलभ मराठी संदर्भात मुद्दा मांडलेला आहे. व्यवहारातील, राज्य कारभारातील काही शब्द क्लिष्ट असल्यामुळे ते सोपे करता येणार नाहीत काय याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सूचना केलेली आहे. आम्ही ते काम समितीकडे सोपविलेले आहे. आता त्या समितीचे पुष्कळ काम पूर्ण झालेले आहे. आपण सुलभ मराठी व्यवहारकोष काढणार आहोत. त्यामुळे वाचन करताना यापेक्षा दुसरी भाषा परवडली असे म्हणण्याची वेळ येणार नाही. आपण सुलभ शब्द

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई........

घेताना दक्षता बाळगत आहोत. बोली भाषेत खूप चांगले शब्द आहेत. आपण ते शब्द स्वीकारत नव्हतो. इंग्रजी किंवा संस्कृत प्रचूर असे क्लिष्ट शब्द घेण्यापेक्षा बोली भाषेतील सुलभ शब्द घेऊन आपण राजभाषा व्यवहारकोष तयार करीत आहोत. तसेच, मराठी शाळा व मराठी शाळेतील मुलांची संख्या कमी होते याबाबत आपल्या सर्वांना खेद आहे. १ लाख विद्यार्थी संख्येवरुन ३३ हजार विद्यार्थी संख्या झाली. मग उर्वरित ६६ ते ६७ विद्यार्थी कोठे गेले ? पालकांनीच त्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल केले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, आत्मपरीक्षण केले पाहिजे. पालक मुलांना मराठी शाळेत घेऊन आले आणि त्यांना संधी मिळाली नाही असे होत नाही. मराठी शाळेतील जागा, वर्ग खोल्या वर्षानुवर्षे रिकाम्या राहतात. शाळेतील पटसंख्या कमी झाल्यामुळे ती संख्या कमी होत आहे. आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केला तर मराठी शाळांमधील मुलांची संख्या टिकेल आणि शिक्षक देखील अतिरिक्त होणार नाहीत. शाळेतील पटसंख्या कमी झाल्यामुळे शिक्षकांच्या नोकऱ्यांवर गदा येते. अर्थात हा शिक्षण विभागाचा विषय आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी काही ठिकाणी इंग्रजी भाषेचा वापर करता येईल असे विधेयकात नमूद असल्याचे सांगितले. हे विधेयक येण्यासाठी विलंब झाला. विधी व न्याय विभागाने सर्व कायदेशीर बाबी पुन्हा-पुन्हा तपासून बघितलेल्या आहेत. आम्ही तज्ज्ञांकडून देखील माहिती घेतलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, आपले काही हितचिंतक विधेयकाला आव्हान देण्यासाठी सर्वोच्च व उच्च न्यायालयात धाव घेतात. तेथे सुद्धा विधेयक टिकले पाहिजे. ती काळजी घेण्यामध्ये वेळ लागला. आपण ज्याला वर्जित प्रयोजन म्हणतो त्या वर्जित प्रयोजनांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी स्पष्टता आणलेली आहे. भारतीय दुतावास, वाणिज्यिक कार्यालये, व्यापार विषयक आयोग, भारत सरकार व त्यांच्या अंतर्गत असलेल्या कार्यालयांबरोबर पत्र व्यवहारासाठी मुभा ठेवली नाही तर आपला आंतरराष्ट्रीय व्यवहार किंवा इतरांबरोबर सुरु असलेला व्यवहार अडचणीत

श्री.सुभाष देसाई........

येईल. तसेच, संविधानाच्या अनुच्छेद ३४६ च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जे करार असतात त्या संदर्भातील व्यवहार करण्याची मूभा ठेवण्यात आलेली आहे. ही मूभा ठेवली नाही तर संपूर्ण विधेयकच अडचणीत येईल. त्यामुळे आपण यामध्ये वर्जित प्रयोजने स्पष्टपणे नमूद केलेली आहेत, ती प्रयोजने वगळता इतर सर्व ठिकाणी मराठी भाषेचाच वापर केला पाहिजे. सदर विधेयक कोर्टात देखील टिकेल, अडचण येणार नाही, अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माहितीच्या महाजालावर चिवचिवाट केला जातो. मी मराठी शब्दाचा वापर केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब याची दखल घेतील. त्यांनी चिवचिवाट शब्दासाठी इंग्रजी शब्द आठवावा. (...अडथळा...) मी ट्विट शब्द वापरलेला नाही. आपण त्या शब्दाचा उल्लेख केला. अनेक आयुक्त माहितीच्या जालावर इंग्रजी भाषेतून चिवचिवाट करतात. व्हॉट्सॲपवर ते चिवचिवाट येतात. महानगरपालिका आयुक्तांचे संदेश इंग्रजी भाषेतून येतात. त्यांना मिळालेल्या पुरस्काराची माहिती ते आठवनीने पाठवितात. परंतु तो चिवचिवाट इंग्रजी भाषेत असतो. आता मात्र आयुक्त, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मराठी भाषेचाच वापर केला पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना मराठी भाषेला डावलता कामा नये अशा प्रकारे आपण हे विधेयक शक्तीशाली केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दौंड यांनी स्वामी मुकुंदराज यांच्या स्मरणार्थ मराठी भाषा विषयक उपक्रम करावा अशी सूचना केलेली आहे. तो विधेयकाच्या स्कोपच्या बाहेरचा विषय आहे. तसेच, मराठी शिक्षकांबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. नवीन शाळांमधील इंग्रजी अध्यापन जास्त प्रभावीपणे इंग्रजी भाषेतच व्हावे आणि इतर खाजगी शाळांच्या तुलनेत या शाळा मागे पडू नयेत म्हणून त्यांनी तो आग्रह धरलेला आहे. मी या संदर्भात महानगरपालिका व शिक्षण विभागाबरोबर नक्कीच चर्चा करणार आहे. आपल्याला हा विषय पुढे कसा नेता येईल यासाठी आपण सर्व प्रयत्न करु.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, मी दोन स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. महानगरपालिकेने १५० मुलांना नोकरीसाठी शिफारस पत्र दिलेली आहेत. परंतु त्यांनी महानगरपालिकेच्या मराठी शाळेतून शिक्षण घेतले म्हणून त्यांना नाकारण्यात आले. आपण चांगले विधेयक मांडलेले आहे. आपण १५० मुलांना सामावून घेण्याबाबत घोषणा करावी, अशी माझी विनंती आहे. तसेच, पालकांना दोष देऊन चालत नाही. पालकांनी मुलांना कोणत्या शाळेत दाखल केले, पालकांनी आत्मपरीक्षण करावे, असे म्हणून चालत नाही. आपल्या शाळा चांगल्या दर्जाच्या असतील, तेथे चांगले शिक्षण मिळत असेल तर मुलाचे नाव मराठी माध्यमाची शाळा सोडून कॉन्व्हेंटमध्ये दाखल करील असा कोणताही पालक नाही. पालक मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत का दाखल करतात. इंग्रजी शिक्षणामुळे उद्योग धंद्यात, नोकरी, व्यवसायात प्राधान्य मिळते. आपण उद्योगधंद्यात मराठी भाषेची सक्ती करावी. मराठी असेल तर ते तिकडे जातील. पालकांना दोष देऊ नये. मराठी शाळांमध्ये आधुनिक यंत्रसामुग्रीसह दर्जेदार शिक्षण दिले तर कोणीही इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जाणार नाही. आपण पालकांना दोष न देता शाळेचा दर्जा सुधारावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.सांगळे........

असुधारित प्रत

श्री.संजय दौंड : सभापती महोदय, माझी या विधेयकासंबंधी एक सूचना आहे....

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण कृपया खाली बसावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मला या विधेयकावर अनेक मुद्दे मांडायचे होते. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता मी थोडक्यात माझे म्हणणे मांडतो. मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात असा उल्लेख केला आहे की, दुकानांवरील पाटया मराठी भाषेत केल्या जातील. या संदर्भात शासनाने परिपत्रक व शासन निर्णय काढला तरी त्याबाबतची अंमलबजावणी होत नाही. दुकानांच्या पाटयांवर इंग्रजीमध्ये मोठया अक्षरांमध्ये आणि लहान अक्षरांमध्ये मराठी नाव असते.

**सभापती** : हा विषय अगोदरच झालेला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या संदर्भात कडक पद्धतीने अंमलबजावणी केली जाणार आहे का ? तसेच जे दुकानदार याबाबतची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्यावर पोलीस गुन्हे दाखल करणार आहेत का ? या संदर्भात शासन कोणता निर्णय घेणार आहे ? .......

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते १२ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक – १३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक – १३ संमत झाले आहे.

----------

असुधारित प्रत

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**सभापती :** मी आता सदनाची बैठक स्थगित न करता प्रश्नोत्तरे घेणार आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मला खालच्या सदनामध्ये कामकाज असल्यामुळे आपण सन २०२२ चे विधेयक क्रमांक – ११ – महाराष्ट्र (सुधारणा) विधेयक चर्चेला घ्यावे.

**सभापती :** ठीक आहे.

असुधारित प्रत

**पृ.शी.** : मुद्रांक (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. XI OF 2022

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT)

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – ११ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येत आहे.

-------

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

## नवी मुंबई येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्यालय इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) * १२८८३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्यालयाची प्रशासकीय तीन मजली इमारत कांदा-बटाटा मार्केटमध्ये असून, या इमारतीची दुरवस्था झाली आहे तसेच दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील लेखा विभागाचा स्लॅब धोकादायक झाल्यामुळे पोलादी रॉडचे टेकू लावण्यात आले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचा स्लॅब कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने कांदा-बटाटा मार्केट आवारातील प्रशासकीय कार्यालयात संचालक मंडळाच्या बैठकीनिमित्त येणारे अधिकारी/ कर्मचारी तसेच तेथील अभियांत्रिकी, लेखा अधिकारी व अन्य अधिकारी/ कर्मचारी, व्यापारी व नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त इमारतीच्या पुनर्विकासाची प्रक्रिया कार्यान्वित असताना मा.उच्च न्यायालयात दावे दाखल झाल्याने पुनर्विकासाचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, सदर दावे कोणी दाखल केले आहेत व त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यापूर्वीही कांदा-बटाटा मार्केटच्या आवारात बांधकाम कोसळण्याची घडलेली घटना लक्षात घेता, सर्व संबंधितांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२८८३ ....

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवी मुंबईच्या कांदा-बटाटा मार्केटमधील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर दुरावस्था झाली आहे. त्याअनुषंगाने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबईने सदर ठिकाणाची दुरूस्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र.११३३४/१३ मधील दिनांक २१/०४/२०१५ मधील आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेऊन दुरूस्तीचे काम करण्याबाबत निर्देश दिले आहेत. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७/०४/२०१७ रोजीच्या आदेशामध्ये दुरूस्तीच्या कामकाजासंदर्भात प्राप्त आक्षेपांचा नियमानुसार विचार करून पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्णय घेण्यात यावा व बाजार समिती निवडणूकांबाबत सद्य:स्थिती मा.उच्च न्यायालयास कळवावी असे निर्देश दिलेले आहे. मा.उच्च न्यायालयात सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, सदर प्रकरणी काही व्यापारी कोर्टात गेलेले आहेत. ही न्यायालयीन बाब आहे. सदर प्रकरणी कोर्टाने निर्णय दिला आहे. या संदर्भात मंत्री महोदयांनी एक बैठक घेऊन या विषयासंबंधी मार्ग काढतील का ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, ही न्यायालयीन बाब असल्याची वस्तुस्थिती आहे. मी यापूर्वी सदर कांदा-बटाटा मार्केटला भेट देऊन पाहणी केली होती. सदर मार्केट तेथे स्थलांतरित झाल्यानंतर शासनाने त्यांना अल्प किंमतीमध्ये गाळे दिले होते. त्या माध्यमातून त्यांनी तेथे व्यवसाय सुरु केला. त्या काळात त्यांच्याकडून अशी मागणी करण्यात आली होती की, शासनाने किंवा पणन मंडळाने याबाबतचा खर्च द्यावा. यावर आम्ही त्यांना असे सांगितले होते की, तुम्ही तेथे

अस्थापित प्रत

ता.प्र.क्र.१२८८३ ....

श्री.बाळासाहेब पाटील....

व्यवसाय करीत असल्यामुळे तुमचा देखील त्यात शेअर असला पाहिजे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे सदर विषयासंबंधी बैठक घेतली जाईल.

**सभापती :** ठीक आहे.

------------

असुधारित प्रत

**रायगड जिल्ह्यातील शेतजमिनी विविध औद्योगिक प्रकल्पांकरिता संपादित करण्यात येत असल्याबाबत**

**(२) * १२२१० श्री.जयंत प्र.पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथे एमआयडीसी व जेएसडब्ल्यू प्रकल्पासाठी आणि विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी तसेच रोहा (ता.मुरुड) येथे फार्मा पार्क प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडखळ (ता.पेण) परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी तसेच मुरूड तालुक्यातील १० गावे व रोहा तालुक्यातील ७ गावे अशा एकूण १७ गावांतील ३ हजार हेक्टर जमिनी संपादित केल्या जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील गत २० वर्षात सुमारे ३९ हजार २६४ हेक्टर शेतजमिन म्हणजेच जवळपास ९८ हजार १६० एकर शेतजमिन अनेक औद्योगिक प्रकल्पांसाठी संपादित करण्यात आल्या असून अन्य ५२ हजार ६२ एकर क्षेत्र शेतजमिन अन्य कारणांसाठी शासनाकडून संपादित करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यात यापूर्वी औद्योगिक प्रकल्पांसाठी जे भूसंपादन करण्यात आले आहे, त्यातील हजारो एकर जागा विनावापर पडून आहेत तसेच पाताळगंगा, रोहा, महाड एमआयडीसीतील अनेक उद्योगधंदे बंद पडल्याने त्यांची जागाही विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करताना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जात नसून, स्थानिकांनाही नोकरीत सामावून घेतले जात नाही तसेच सदर प्रकल्पांचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून उक्त परिसरातील शेतकऱ्यांना व प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या भूसंपादित क्षेत्रातील जागा परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ता.प्र.क्र.१२२१०.....

**श्री.सुभाष देसाई :** (१) हे अंशत: खरे आहे.

पेण (जि.रायगड) एमआयडीसीसाठी तसेच जेएसडब्ल्यू प्रकल्पासाठी तसेच रोहा (ता.मुरुड) येथे फार्मा पार्क प्रकल्पासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. तसेच विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून भूसंपादनाची प्रक्रिया प्रस्तावित आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

म.औ.वि. महामंडळाने डोलवी औद्योगिक क्षेत्रासाठी वडखळ (ता.पेण) मधील ११ व अलिबाग तालुक्यातील १ अशा १२ गावातील खाजगी व सरकारी मिळूण एकूण ८५८.६०२१ हे.आर. तसेच रोहा मुरुड औद्योगिक क्षेत्रासाठी मुरुड तालुक्यातील १० व रोहा तालुक्यातील ७ अशा एकूण १७ गावातील खाजगी व सरकारी मिळूण एकूण १९९४.९६९ हे.आर. असे दोन्ही औद्योगिक क्षेत्राकरिता एकूण २८५३.५७११ हे.आर. क्षेत्राकरिता म.औ.वि.अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ ची अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) औद्योगिक क्षेत्राकरिता जमिनीचे भूसंपादन करताना स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन जमिनीच्या नुकसान भरपाईचा दर वाटाघाटीने निश्चित करण्यात येतो. म.औ.वि. महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांना उद्योग धंद्यासाठी सवलतीच्या दरात विकसीत पीएपी भूखंड वाटप करण्यात येतात. तसेच प्रकल्पामध्ये भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी रोजगारासाठी लागणारे कौशल्य आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या अधिपत्याखाली स्थापन झालेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये उदा. तळोजा, पाताळगंगा, रोहा, उसर, विळेभागाड, महाड, नागोठणे येथे मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित झालेले आहेत. मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होवून तेथे स्थानिक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच ते स्वतंत्रपणे स्वयंरोजगार देखील करु शकतात. म.औ.वि.महामंडळाच्या दिनांक २६/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकानूसार प्रकल्पग्रस्तांना १० टक्के परतावा भूखंड वाटप करण्याचे धोरण ठरलेले आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२२१० ...

श्री.सुभाष देसाई ...

सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये स्थापन झालेल्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेले सांडपाणी खोल समुद्रात १० कि.मी. आत सोडण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पातून होणारे वायु प्रदूषण व रासायनिक प्रदूषण याबाबत संबंधित उद्योजकाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत त्यांच्या प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल तपासून उद्योजकांना परवानगी देण्यात येतात. त्यांच्या नियंत्रणाखाली वेळोवेळी उद्योगांची तपासणी करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विषयासंबंधी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली होती. त्यावर मंत्री महोदयांनी समर्पक उत्तर देखील दिले होते. मंत्री महोदयांनी या संदर्भात असे आश्वासन दिले होते की, मूळ मालकाला त्यांचा ५० टक्के हिस्सा दिला पाहिजे. यासंबंधी अधिवेशन संपण्यापूर्वी विधेयक आणले जाईल. परंतु अद्याप त्या संदर्भात सदनामध्ये विधेयक आलेले नाही. मंत्री महोदयांनी याबाबत सदनाला माहिती द्यावी.

**सभापती** : सदर प्रकरणी अध्यादेश काढण्यासंबंधी आपण मंत्री महोदयांना सांगितले पाहिजे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यासाठी २ दिवस शिल्लक राहिले आहेत. आम्ही या विषयासंबंधी लवकरात लवकर विधेयक आणणार आहोत. मालकांना ५० टक्के हिस्सा देण्यासंबंधी आमच्या विभागातील अधिकारी विधी व न्याय विभागासमवेत सातत्याने चर्चा करीत आहेत. सदर मुद्दा निघाल्यास सदर विधेयक जास्त अर्थपूर्ण होईल. आम्ही यासाठी प्रयत्न करीत आहोत. आम्ही आपल्याला आश्वासन नव्हेतर खात्रीपूर्वक सांगत आहोत की, आम्ही या संदर्भातील विधेयक आणणार आहोत. तसेच आपण त्यासंबंधी कार्यवाही करु याबद्दल काही शंका नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२२१० ...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या विषयासंबंधी असलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत चर्चा केली होती. म्हणून मी ही बाब सदनाच्या पटलावर आणत आहे. अन्यथा त्यात वेगळ्या प्रकारे काही झाल्यास आम्ही काय करणार ? म्हणून मी ही बाब रेकॉर्डवर आणत आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सदर विधेयक येण्यास वेळ लागणार असल्यास शासनाने त्यासंबंधी अध्यादेश काढावा.

**सभापती** : ठीक आहे. आता आपण पुढे जाऊ.

-----------

असुधारित प्रत

## ठाणे जिल्ह्यातील प्रलंबित वनहक्क दावे निकाली काढण्याबाबत

**(३)** * **१२४३४ श्री.रवींद्र फाटक :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात शेकडो वनहक्क दावे प्रलंबित असून मुरबाड-२९, शहापूर-२०३, कल्याण-३ व अंबरनाथ-२१ इ. तालुक्यांतील एकूण २५६ वनहक्क दावे तसेच वनहक्क दाव्यांवरील प्रलंबित अपिलांची संख्या मुरबाड-३०३, शहापूर-६८, कल्याण-२६ व अंबरनाथ-५६ असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनहक्क दावे निकाली काढण्याबाबत पाठपुरावा करुनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने उपविभागीय कार्यालय, ठाणे येथे श्रमिक मुक्ती संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे पत्र संघटनेने जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कल्याण, अंबरनाथ, शहापूर व मुरबाड तालुक्यातील वनहक्क दावे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्रमिक मुक्ती संघटना, मुरबाड यांनी वनहक्कधारकांचे प्रलंबित दावे, अपिले व अन्य प्रलंबित प्रश्नांच्या निपटाऱ्याच्या मागणीसाठी दिनांक १३/१२/२०२१ रोजी उपविभागीय कार्यालय, कल्याण यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते.

(३) कल्याण तालुक्यातील ०३ वनहक्क दाव्यांपैकी ०२ दावे जिल्हास्तरीय समितीने अमान्य केले असून १ दावा जी.पी.एस. मोजणीकरिता वनक्षेत्रपाल, कल्याण यांच्याकडे प्रलंबित आहे. तसेच प्रलंबित २६ अपिलांबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण यांचे कार्यालयात दिनांक २०/१२/२०२१ रोजी शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये दावेदारांनी सादर केलेले पुरावे अपिलांच्या मूळ दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात आले असून त्याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२४३४ ...

ॲड. के.सी. पाडवी ...

मुरबाड तालुक्यातील २९ प्रलंबित वनहक्क दाव्यांबाबत दिनांक ०६/०१/२०२२ व दिनांक १३/०१/२०२२ रोजी उपविभागस्तरीय समिती, कल्याण यांच्याकडून मुरबाड येथे बैठक आयोजित करून संबंधित दावेदारांना पुरावे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व काही दावे जी.पी.एस. मोजणी व गुगल इमेजसाठी वनक्षेत्रपाल यांच्याकडे पाठविले आहेत. तसेच ३०३ अपिलांबाबत मुरबाड तहसिल कार्यालय, मुरबाड येथे दिनांक ०६/०१/२०२२ रोजीच्या शिबिरामध्ये संघटनेच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत अमान्य अपिलांची तपासणी करण्यात आली असून उर्वरीत अपिलांबाबत दिनांक १३/०१/२०२२ च्या शिबिरामध्ये पुरावे सादर करण्यात आले असून सदरची अपिले उपविभागस्तरीय समितीकडे प्रलंबित आहेत.

शहापूर तालुक्यातील २०३ प्रलंबित वनहक्क दाव्यापैकी ६३ दावे मान्य करण्यात आले असून १६ दावे पुरावे नसल्याने अमान्य करण्यात आले आहेत. ३३ दाव्यामध्ये त्रुटी असल्याने त्रुटीपुर्तता करणेबाबत दावेदार यांना कळविले आहे. ११ दावे जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयास्तव प्रलंबित आहेत. ०३ दावे दुबार आहेत. तसेच ७७ दावे उपविभागीय समितीकडे प्रलंबित आहेत. श्रमिक मुक्ती संघटना यांना दावे पडताळणी करणेकरिता वेळ दिला असता, दिनांक १६/०२/२०२२ रोजी श्रमिक मुक्ती संघटनेच्या शिष्टमंडळाने प्रकरणांची पडताळणी केली आहे. जिल्हास्तरीय समितीव्दारे ६८ अपिल दाव्यांबाबत सुनावणी घेण्यात आली असून दावेदारास उपलब्ध पुरावे सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

अंबरनाथ तालुक्यातील २१ दाव्यांपैकी १३ दावे जी.पी.एस. मोजणीकरिता पाठविले असून ०८ दावे दुबार आढळून आले आहेत. दुबार दाव्यांची तपासणी करून त्याबाबत जिल्हास्तरीय वनहक्क समितीव्दारे निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच ५६ प्रलंबित अपिलांबाबत दिनांक २३/१२/२०२१ रोजी आयोजित शिबिरामध्ये श्रमिक मुक्ती संघटनेच्या प्रतिनिधींनी दाव्यांची तपासणी केली आहे. यामध्ये ११ दावेदारांनी पुरावे सादर केले असून ४५ दाव्यामध्ये कोणतेही पुरावे नसल्याने त्याची पडताळणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२४३४ ...

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदय, कल्याण तालुक्यातील ३ वनहक्क दाव्यापैकी एक दावा जीपीएस मोजणीकरिता वनक्षेत्रपाल कल्याण यांचेकडे प्रलंबित असून सदर प्रकरणी किती कालावधीत जीपीएस मोजणी केली जाईल ? तसेच शहापूर तालुक्यातील ११ दावे जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयाकरिता प्रलंबित आहेत. त्याबाबत जिल्हास्तरीय समितीकडून किती कालावधीत निर्णय घेतला जाईल ?

ॲड.के.सी. पाडवी : सभापती महोदय, या संदर्भात दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी बैठका आयोजित केलेल्या आहेत. त्यामध्ये याबाबतचे सर्व प्रश्न सुटतील. तसेच जी प्रकरणे आहेत त्यासंबंधी पुरावे सादर झालेले आहेत. त्यामुळे सर्व प्रकरणे निकाली लागू शकतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ठाणे नव्हेतर नंदुरबार व नाशिक येथील आदिवासी हजारोंच्या संख्येने आझाद मैदानावर आले होते. मंत्री महोदय, आपण देखील त्यावेळी आमच्यासमवेत होता. आदिवासी लोकांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासंबंधी शासनाकडून कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे. परंतु राज्य शासनाने अद्याप त्यासंबंधी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आदिवासी लोक जवळपास १०० वर्षांपासून जमिनी कसत आहेत. त्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यास काय अडचण आहे ? मंत्री महोदय, आपण मंत्री होण्यापूर्वी आपली वेगळी भूमिका होती. परंतु आता आपण मंत्री झाल्यानंतर वेगळी भूमिका घेत आहात. मंत्री महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आझाद मैदानावर हजारोंच्या संख्येने आदिवासी आले होते. त्यांची मागणी शासनाकडून पूर्ण केली जाणार आहे का ?

ॲड.के.सी. पाडवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आमचे सहकारी होते. तसेच हा प्रश्न बऱ्यापैकी निकाली लागला आहे. परंतु राज्यातील या बाबतची काही प्रकरणे शिल्लक असल्यामुळे त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सर्व प्रश्न निश्चितपणे सुटतील.

ता.प्र.क्र. १२४३४ ...

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, हा धोरणात्मक विषय आहे. ठाणे जिल्ह्यात शेकडो वनहक्क दावे प्रलंबित असून मुरबाड-२९, शहापूर-२०३ अशा प्रकारे वनहक्क दावे प्रलंबित आहेत. हे दावे कधी पासून प्रलंबित आहेत ? अशा प्रकारे प्रलंबित दावे आहेत. त्यामुळे आपल्याकडे अशा प्रकारचे दावे आल्यानंतर त्यासंबंधी किती दिवसांमध्ये निकाल लागला पाहिजे ? याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे का ?

ॲड.के.सी. पाडवी : सभापती महोदय, या संदर्भात निश्चितपणे नोंद घेतली जाईल.

श्री.रवींद्र फाटक : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी यासंबंधी उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, आपल्या दालनात याविषयी एक बैठक आयोजित करुन हा प्रश्न मार्गी लावला पाहिजे.

**सभापती :** ठीक आहे. सदर विषयासंबंधी माझ्या दालनात बैठक घेण्यात येईल.

------------

असुधारित प्रत

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक ११९५८...

श्री.सुनील शिंदे : सभापती महोदय, माननीय मंत्री सदनामध्ये उपस्थित नाहीत.

**सभापती** : सदर तारांकित प्रश्न नंतर चर्चेला घेऊ.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माननीय मंत्री सदनामध्ये उपस्थित नाहीत. ही बाब योग्य नाही.

**सभापती** : आपले म्हणणे बरोबर आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

असुधारित प्रत

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**सभापती** : यानंतरचा तारांकित प्रश्न क्रमांक १२०५८ संबंधी उर्जा मंत्री महोदय सध्या सभागृहात उपस्थित दिसत नाहीत. त्यामुळे मी पुढील प्रश्न पुकारतो.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, संबंधित मंत्री महोदय नसल्याने पाच मिनिटे स्थगित करावे.

**सभापती** : सर्व नियम मला मान्य आहेत. माझ्या दृष्टीने लक्षवेधी सूचना व तारांकित प्रश्नोत्तरे घ्यायला पाहिजे. प्रश्नोत्तराचा तास ३० वर्षात पहिल्यांदा चुकलेला मी पाहिला आहे. का चुकला आता यावर चर्चा नको. तुम्ही दुसऱ्याच्या अधिकारावर बोलू नका असे मी सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना सांगू इच्छितो. आता सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांना त्यांचा शेवटचा प्रश्न मांडू द्या.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांचा तारांकित प्रश्न प्राथम्य क्रमांक ६ घेण्यात यावा. पण तारांकित प्रश्न प्राथम्य क्रमांक ४ व ५ देखील महत्वाचे आहेत. तारांकित प्रश्न मागे ठेवयाची या सभागृहाची पध्दत नाही.

**सभापती** : मान्य आहे परंतु संबंधित मंत्री महोदय वेळेवर आले नाहीत तर मी त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांशी बोलणार आहे. थोडया वेळापूर्वी संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होते असे मला वाटते. नसता दुसरी बाब अशी की, सदरहू प्रश्न राखून ठेवता येतील.

----

## मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना औद्योगिक व वाणिज्य भूखंड मिळण्याबाबत

**(६) * ११७७५ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी इंडियाबुल्स या सेझ प्रकल्पात गेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना उक्त जमिनीऐवजी औद्योगिक व वाणिज्य भूखंड देण्याचे लेखी आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप कोणत्याही स्वरूपाचे औद्योगिक व वाणिज्य भूखंड मिळाले नसुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे याबाबत पाठपुरावा देखील केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना औद्योगिक व वाणिज्य भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. मौजे-गुळवंच व मौजे-मुसळगाव, ता.सिन्नर, जिल्हा-नाशिक येथील मे. इंडियाबुल्स यांच्या विशेष आर्थिक क्षेत्रात ८२९ प्रकल्पग्रस्त आहेत. त्यापैकी एकूण वाटप करावयाच्या अथवा देय भूखंडाची संख्या ४८२ आहे. त्यापैकी २०० प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित २८२ भूखंडाचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) उर्वरित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूखंड वाटप करण्यासाठी ११२.८८ हे. आर. इतक्या क्षेत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील कलम ३३(२) अन्वये १२७.४९ हे. आर. क्षेत्र भूसंपादन करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुरु आहे.

ता.प्र.क्र.११७७५ .....

श्री.सुभाष देसाई .....

तथापि, अद्यापपर्यंत सदर क्षेत्राचा ताबा अप्राप्त आहे.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, मे.इंडियाबुल्स या कंपनीकडून शेतकऱ्यांच्या जमिनी २००९ मध्ये संपादीत केल्या व शासनाकडून १२७.४९ हेक्टर आर क्षेत्र भूसंपादन करण्याची कार्यवाही कधीपासून सुरु होणार आहे व ती कधी पूर्ण होणार आहे. जमिनी आरक्षीत होत नसतील तर इंडियाबुल्ससाठी संपादीत केलेल्या जमिनीतूनच शेतकऱ्यांना भूखंड वाटप करता येऊ शकते का, किंवा भूखंडाचे वाटप आपण करणार का. भूखंड वाटपात अडचणी येत असल्यास भूखंडाच्या मोबदल्यात चालू बाजारभावाप्रमाणे भूखंडाची रक्कम संबंधित शेतकऱ्यांना शासन देणार आहे का. त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे.

सभापती महोदय, छापील उत्तरात म्हटले आहे की, याबाबत आमच्याकडे निवेदन प्राप्त झाले नाही, शेतकऱ्यांनी मागणी केली नाही, याबाबत ॲड शिवराज नवले यांनी स्वत: शेतकऱ्यांच्या संदर्भात निवेदन दिलेले आहे. सही शिक्कानिशी आपल्या विभागाला निवेदन दिल्याची पोच त्यांच्याकडे आहे. परंतु २००९ साली जमिनी संपादीत करण्यात आल्या, पण त्यांना आपण नेमक्या कधी जमिनी देणार आहात. ती कंपनी आता चालू आहे का. चालू नसेल तर त्या कंपनीने संपादीत केलेल्या जागा शेतकऱ्यांच्या नावावर करुन देणार का ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सिन्नर जि.नाशिक येथे मुळ अधिसूचित जमीन १५०७ हेक्टर होती. त्यापैकी ११८५ हेक्टर ताब्यात आली. मे.इंडियाबुल्स प्रकल्पास ४३३ हेक्टर जमीन वीज प्रकल्पासाठी दिली. त्यावर त्यांनी वीज प्रकल्प उभा केला पण सध्या तो सुरु नाही. इतर जमीन त्यांना दुसऱ्या काही उद्योगाकरीता पाहिजे होती. दरम्यानच्या काळात त्यांच्या या भागीदारीमध्ये फूट पडली. ते त्यांच्या अंतर्गत अडचणीमध्ये आहेत. ते आता यापुढे विकास करु शकतील किंवा नाही याबाबत वाटाघाटी चालू आहेत. याबाबत शेतकऱ्यांना १२० हेक्टर परताव्याची जमीन देण्यात आली. अजून ११२ हेक्टर जमीन देण्याचे प्रकरणे बाकी आहेत. त्या लोकांना ती दिली पाहिजे. पण ज्या जमिनी देण्यासाठी शेतकऱ्यांचा विरोध आहे, त्या आम्ही ताब्यात न घेण्याचे ठरविले आहे. ती विनाअधिसूचित प्रक्रिया राबवून केल्या जातील. ज्या शेतकऱ्यांचा विरोध आहे त्या जमिनी सोडल्या जातील. परंतु तरीसुध्दा

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७७५ .....

श्री.सुभाष देसाई .....

४३३ हेक्टर वीज प्रकल्पाची जागा सोडल्यानंतर इतर जमीन ताब्यात घेऊन त्यांना उपलब्ध जमिनीतून दिल्या जातील. त्यामुळे त्यांचा तो प्रश्न मिटेल. आणि बाकीच्या ज्या जमिनींना विरोध आहे त्या संपादीत केल्या जाणार नाहीत.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, ही प्रक्रिया व आंदोलन मागील १२-१३ वर्षापासून चालू आहे, सरकार त्याची दखलच घेत नाही. आपण किती कालावधीत शेतकऱ्यांना जमीन देणार हे सांगावे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी स्पष्ट शब्दात सांगितले आहे त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी होईल. जमीन विनाअधिसूचित केल्या जातात किंवा परतावा दिला जातो, त्याची एक प्रक्रिया आहे, त्याची समिती आहे, त्यामार्फत होईल. पण पुढील अधिवेशनापूर्वी ही सर्व प्रक्रिया पूर्ण होईल.

------

असुधारित प्रत

**सभापती** : उर्जा मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत, त्यामुळे त्यांचेशी संबंधित प्रश्न आता पुकारतो.

महावितरण कंपनीवरील आर्थिक भार कमी करण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(५) * १२०५८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणच्या कामाचे विकेंद्रीकरण करून ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यासाठी कोकण, पुणे, औरंगाबाद, नागपूर अशी चार प्रादेशिक संचालक कार्यालये स्थापन करण्यात आली असून, थकबाकी वसूलीसह विविध कामामध्ये गती येवून पायाभुत सुविधा उभारणेबाबत तथा इतरही कार्ये करण्याबाबत ही कार्यालये सक्षम असल्याचे महावितरणच्या प्रसिध्दी विभागाने कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्राहकांकडे वीज देयकापोटी थकीत असलेले रुपये ७५ हजार कोटी, कंपनीवरील रुपये ६० हजार कोटींचे कर्ज अशा एकूण रुपये १ लाख ३५ हजार कोटींच्या भारामुळे महावितरण अडचणीत आलेले असून ग्राहक सेवा, देयक वसुली, उत्पादनाशी या कार्यालयाचा संबंध नसल्याने महावितरणला रुपये ३२ कोटींचा आर्थिक भार येत असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली असून याबाबत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी वर्क्स फेडरेशनने प्रादेशिक संचालकाला योग्य अधिकार नसल्याबाबत ही कार्यालये बंद करावी अशी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणच्या कामाचे विकेंद्रीकरण करून ग्राहकांना चांगल्या सेवा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कोकण, पुणे, औरंगाबाद, नागपूर अशा चार प्रादेशिक संचालक कार्यालयांना कोणतेही महत्त्वाचे अधिकार देण्यात आले नसून या कार्यालयाचे महत्व लक्षात घेता तथा कामाचे नियोजन व विकेंन्द्रीकरणामुळे व उपलब्धतेमुळे अधिकार क्षेत्रात वाढ करून शासन मान्यता देणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने महावितरणाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी ही कार्यालये बंद करण्याच्या केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

असुधारित प्रत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ता.प्र.क्र. १२०५८.....

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

सदर बातमी महावितरणच्या प्रसिध्दी विभागातर्फे दै. लोकसत्ता, नागपूर दिनांक ०२/०१/२०२२ रोजीच्या अंकात प्रसिध्द झाली आहे.

(२) हे खरे नाही.

महावितरणने जरी या चार प्रादेशिक संचालक कार्यालयांकरिता २०५ पदे मंजूर केली असली तरी तेथे असलेल्या कर्मचाऱ्यांपैकीच आवश्यक ती नेमणूक करण्यात आली आहे.

(३) महावितरण मंडळ ठराव क्र.६६८, दिनांक ३०/०४/२०१६ अन्वये चार प्रादेशिक कार्यालये निर्माण करण्यात आली. तेव्हापासून प्रादेशिक संचालक कार्यालयांना आवश्यक ते महत्वाचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच ठराव क्र.१८६८, दिनांक ०३/०८/२०१९ अन्वये पुढील आदेश किंवा तीन वर्षापर्यंत या प्रादेशिक कार्यालयांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विलास पोतनीस : सभापती महोदय, मी दोन उपप्रश्न विचारु इच्छितो. माझा पहिला प्रश्न आहे की, राज्यातील ग्राहकांकडे वीज देयकापोटी किती रुपयांची थकबाकी आहे. चार प्रादेशिक कार्यालयाकडून किती रुपयाची थकबाकी वसूल करण्यात आली आहे. माझा दुसरा प्रश्न आहे की, दिनांक ३०.४.२०१६ रोजी चार प्रादेशिक कार्यालये निर्माण करण्यात आली आहेत, तेव्हापासून आजतागायत या चार प्रादेशिक कार्यालयापोटीकिती रुपयांचा खर्च शासनास सहन करावा लागला आहे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, महावितरण अंतर्गत १६ परिमंडळ करण्यात आले आहेत, त्यात ८० हजार कर्मचाऱ्यांची संख्या आहे. २ कोटी ८९ लाख वीज ग्राहकांची संख्या आहे. येथे चार क्षेत्रीय कार्यालये करण्यात आली होती. सुरुवातीस २००३ चा केंद्रीय वीज कायदा आला. त्यानंतर २०१० मध्ये

असुधारित प्रत

त्याचे रेग्युलेशन तयार झाले. त्यानंतर २०१६ मध्ये महावितरणने महावितरणने ठराव केला की, प्रादेशिक कार्यालये निर्माण करण्यात यावीत. त्यावेळी माननीय

ता.प्र.क्र. १२०५८.....
डॉ.नितीन राऊत.....
श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे उर्जा मंत्री होते. तत्पूर्वी २००३ च्या कायद्यानुसार एमएसईबीच्या महानिर्मिती, महापारेषण व महावितरण अशा तीन कंपन्या करण्यात आल्या. त्याची चार प्रादेशिक कार्यालये २०१६ मध्ये करण्यात आली. कोकण विभागात कल्याणअंतर्गत कल्याण, भांडूप, नाशिक व रत्नागिरी येते. पुणे अंतर्गत पुणे, बारामती, कोल्हापूर येते. औरंगाबाद अंतर्गत औरंगाबाद लातूर, नांदेड व जळगाव येते. नागपूरअंतर्गत नागपूर, चंद्रपूर, गोंदयिा, अकोला व अमरावती येते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विलास पोतनीस यांच्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, जानेवारी २०२२ अखेरची थकबाकी उच्च दाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, सार्वजनिक पाणीपुरवठा, सार्वजनिक सेवा अशी ४२२६९ कोटी रुपये थकबाकी आहे. रस्ते दिवाबत्ती, पाणीपुरवठा, सार्वजनिक सेवा इतर लघुदाबाच्या सेवांची एकूण थकबाकी ६६८१७ कोटीची थकबाकी जानेवारी २०२२ अखेर निर्माण झालेली आहे.

श्री.सुनिल शिंदे : सभापती महोदय, थकबाकी वसूलीसाठी विशेष मोहिम विशेष यंत्रणा आपण राबविणार का असे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो. तसेच आपल्याकडे एकूण ८० हजार कर्मचारी आहेत.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०५८............

श्री.सुनील शिंदे......

आपण अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, बदली, निलंबन रद्द करणे इत्यादि कामे महावितरणच्या प्रकाशगड या मुख्यालयाकडे आहे. शासन याबाबतचे अधिकार प्रादेशिक संचलनालयाकडे देणार का ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, थकबाकी वसुलीच्या संदर्भात पहिल्यांदा तर आमच्या राज्य सरकारने कृषी वीज जोडणी धोरण हे शेतकऱ्यांसाठी आणलेले आहे. या धोरणांतर्गत जे शेतकरी या वर्गवारीमध्ये थकबाकीदार आहेत, त्यांच्यासाठी ५० टक्के त्यांचे जे वीज शुल्क होते, ते निर्लेखित करण्यात आले. नंतर त्यांनी ज्यावेळी वीज भरण्याची मानसिकता केली. त्यानंतर ते ज्यावेळी बिल भरायला गेले असता विलंब आकार आणि व्याज माफ करण्यात आले. अशा रितीने पुन्हा ५० टक्के त्यांना माफ करण्यात आले. त्यानंतर ते आता थकबाकी मुक्त झाले, असे प्रमाणपत्र देखील त्यांना दिलेले आहे. यासंदर्भात अतिशय चांगली योजना सरकारने आणलेली आहे. परंतु या योजनेमध्ये पाहिजे तितका प्रतिसाद यावेळी मिळालेला नाही. आता दिनांक ३१ मार्च याकरिता असलेली शेवटची तारीख आहे. ५० टक्के वीज बिल माफी ज्यांना मिळणार आहे, त्यांच्याकरिता ३१ मार्च रोजी शेवटची तारीख आहे.

सभापती महोदय, जे बारमाही, आठमाही,चारमाही पीक धारक आहेत, त्यांच्या पिकाच्या रेशिओप्रमाणे त्यांची माफी, व्याज, विलंब आकार आहे, त्यामध्ये तफावत करुन ही योजना पुन्हा नव्याने लागू केली जाणार आहे. लिफ्ट इरिगेशन जे असते, त्याच्या पाणी संस्था असतात. त्या मोठया प्रमाणात असतात. काही लोक विहिरीवरुन पाणी लिफ्ट करतात, त्यांना एकदाच करावे लागते. काही लोक नदीवरुन पाणी लिफ्ट करतात, त्यावेळी त्यांना तीन-तीन ठिकाणी मोटारी लावून शेतात आणले जाते. यामुळे त्यांच्यावर विजेचा भार अधिक पडतो. अशा लोकांसाठी सौर ऊर्जेअंतर्गत योजना आणण्याचा विचार केलेला आहे. त्या संदर्भातील धोरण शासन लवकरच आणणार आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२०५८............

डॉ.नितीन राऊत.....

सभापती महोदय, जे पीडी ग्राहक आहेत, परमनंट डिस्कनेक्शन ज्यांचे झालेले आहे. त्यांच्याकरिता स्व.विलासराव देशमुख अभय योजना आम्ही त्यांच्याकरिता आणलेली आहे. याकरिता आम्ही आपल्या ग्राहकांना त्यांच्या थकबाकीतून मुक्त व्हावे, अशी सेवा सरकार त्यांना उपलब्ध करुन देणार आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी समर्पक उत्तर दिलेले आहे. पण हे प्रादेशिक कार्यालय अधिक मजबुत केले पाहिजे. खरे तर काही राज्यांमध्ये वेगवेगळया कंपन्या करण्यात आलेल्या आहेत. त्याचा अभ्यास करुनच हे कार्यालय स्थापन करण्यात आले होते. वेगवेगळया कंपन्या करुन फार काही हातात येत नव्हते. या कार्यालयाला अधिक मजबूत करण्याची गरज आहे. नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, रस्त्यावरील स्ट्रीट लाईट्सचे बिल ग्रामविकास विभागाने भरले पाहिजे, असा निर्णय झालेला आहे. ते आता ग्रामपंचायतीकडून वसूल केले जात आहेत. शासनाकडे आपले किती पैसे शिल्लक किती आहेत ? नगरविकास, ग्रामविकास विभागाकडे आपले किती पैसे शिल्लक आहेत, शासकीय कार्यालयांकडे आपले किती पैसे शिल्लक आहे ? याच्या वसूलीसंदर्भात शासन कोणता निर्णय घेणार आहे ? तिसरा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, शासनाने ॲग्रीकल्चरबद्दल काही योजना आणलेल्या आहेत. शासनाने कितीही योजना आणल्या तरीही ॲग्रीकल्चरच्या बिलाची किती वसूली होईल, याबद्दल मला शंका आहे. माझी विनंती आहे की, ॲग्रीकल्चर या विषयाकरिता ज्याप्रमाणे तीन शासनाच्या कंपन्या होत्या, त्याचप्रमाणे चौथी कंपनी नव्याने तयार करणे आवश्यक आहे, त्यामध्ये पूर्णत: ॲग्रीकल्चरचे नियोजन करुन पुढील काळात ते मुख्यमंत्री सौर-वाहिनी योजना, पूर्ण कंपनीचे सर्वच ग्राहक, सौर ऊर्जेवर अन्याय यावर ठोस उपाययोजना करुन यासंदर्भात अंतिम मार्ग काढणे आवश्यक आहे. याबाबतचा एक सखोल अभ्यास करुन एक वेगळी ॲग्रीकल्चर कंपनी तयार करुन महापारेषण, महावितरण, महानिर्मिती यावर भार येत आहे, आणि

ता.प्र.क्र.१२०५८...........

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

थकबाकी वाढत आहे. ॲग्रीकल्चरकरिता चौथी कंपनी सुरु केली तर उपरोक्त तीन कंपन्यांवरील भार कमी होईल. ही चौथी कंपनी सुरु केली तर काही तरी चांगले काम राज्यात होईल, याकरिता शासन काही नियोजन करणार आहे का ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांचा जो दुसरा प्रश्न होता की, क्षेत्रीय कार्यालयांवर खर्च किती होत आहे ? त्यासंदर्भात मी शासन म्हणून सांगतो की, चारही प्रादेशिक कार्यालयांची निर्मिती केल्यानंतर त्याचा आर्थिक भार अंदाजे २०.४० कोटी रुपये इतका आहे. महावितरणाचा याकरिता जो खर्च होत आहे, तो ३२ कोटी रुपये इतका आहे. त्यांनी काही अधिकारक्षेत्राबद्दल देखील काही सांगितलेले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, प्रादेशिक कार्यालयाच्या अखत्यारित दक्षता विभाग, टेस्टींग सर्कल, प्रशिक्षण केंद्र, सिव्हील सर्कल, ओ ॲण्ड एम सर्कल, पायाभूत सुविधा सर्कल, वित्त व लेखा विभाग, मानव संसाधन विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, औद्योगिक संबंध विभाग हे सर्व जे विभाग आहेत. तद्वतच त्यांना जे अधिकार दिलेले आहेत, त्यामध्ये क्रॉप कम्पेन्सेशनचे पूर्ण अधिकार, प्रॉपर्टी कम्पनेन्सेशनचे अधिकार देखील त्यांना प्राप्त आहेत. ५-८ कोटी रुपयापर्यंतचे निविदा स्वीकृतीचे अधिकारी, प्रशासकीय मान्यतेचे अधिकार, मानव संसाधनाचे पूर्ण अधिकार, त्यामध्ये बदल्या वगैरे सर्व बाबी येतात. अंतर्गत लेखापरीक्षणाचे अधिकार त्यांना आहेत.

सभापती महोदय, माजी ऊर्जामंत्री, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी विचारले की, कोणकोणत्या क्षेत्रातून कोणकोणत्या बजेटमधून निधी घेणे अपेक्षित आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, जवळपास ए.जी.(जनरल ) मध्ये आम्हाला यावेळी जे घ्यायचे आहे, ते क्रॉस सबसिडीने जाणार आहे. परंतु एजीएससीपीमध्ये ३४.९७ कोटी रुपये एजीटीएसपीमध्ये ४२.७९ कोटी रुपये, पॉवरलूममध्ये ८७१.७२ कोटी रुपये इंडस्ट्रीयलमध्ये ज्यामध्ये २०१८७.९६ कोटी

ता.प्र.क्र.१२०५८............

डॉ.नितीन राऊत.....

रुपयांची विदर्भ-मराठवाडा सबसिडी आहे. टेक्स्टाईलमध्ये २९७.१७ कोटी रुपये इतके घेणे आहे.

सभापती महोदय, आपण पाहिले असेल की, जेव्हापासून महाविकास आघाडीचे सरकार आले, ते सरकार आल्यानंतर कोरोनाचा प्रादुर्भाव देशभरात व राज्यभरात सुरु झाला. कोरोनामुळे केलेल्या लॉकडाऊनमध्ये देखील २४x७ सेवा पुरविण्याचे काम आम्ही केलेले आहे. कोणाकडेही लोड-शेडींग करण्यात आलेले नाही. ग्रामविकास विभागाचे जवळपास ८६०० कोटी रुपये घेणे बाकी आहे. सार्वजनिक दिवे वगैरे सर्व बाबी त्यामध्ये आलेल्या आहेत. त्यामुळे हे सर्व घेणे जे आहे, ते एकंदरीत १८००० कोटी रुपयांच्या जवळपास होते. आज सकाळीच याबाबत माननीय उप मुख्यमंत्री महोदय यांच्या दालनात बैठक झाली. त्या बैठकीमध्ये चर्चा झाली. याबाबतचा निर्णय देखील लवकरच होणार आहे. हे सर्व सांगत असताना आम्ही मागणी केलेली आहे की, महावितरणला या ज्या सबसिडीज असतात, यामधील एक रुपयाही आम्हाला मिळत नाही. उलटपक्षी ही सबसिडी आम्हाला ग्राहकांना द्यावा लागतो. यामुळे आमच्यावर लायेबिलिटी येते. आम्ही ही सबसिडी ग्राहकांना जवळच्या निधीतून देत असतो. आम्ही हे कॅशमध्ये द्यावे, अशी मागणी केलेली आहे. एचपीडीएसमध्ये ११००कोटी रुपये जे होते, त्यातील ४२० कोटी रुपये आम्हाला मिळाले होते. ६८० रुपये त्यातील उरलेले होते, ते आम्ही कॅशमध्ये मागितलेले होते. एकंदरीत जे ३४२८.६१ रुपये इतका बजेटमधील जो बॅलन्स उरलेला आहे, त्यातील २००० कोटी रुपये कॉन्टिजन्सी फंडामधून देण्यात यावे, असे आम्ही सांगितलेले आहे. ए.जी.कनेक्शनचे ५०० कोटी रुपये देखील आम्ही कॅशमध्ये मागितलेले आहे. सन २०२१-२०२२ या बजेटच्या धोरणानुसार आम्ही हे सर्व घेऊन चुकलेलो आहोत.

यानंतर श्री.सोनावणे.......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२०५८.....

डॉ. नितीन राऊत.....

हे सर्व ग्राहकांना दिलेले आहे. त्यामुळे विभागाकडे आता शिल्लक नसल्यामुळे त्यासाठी वित्त विभागाकडे मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, कोरोना महामारीचा काळ, त्यानंतर आलेली अतिवृष्टी आणि चक्रीवादळामध्ये महाविकास आघाडी सरकारने प्रामाणिकपणे कामे केलेली आहेत. मध्यंतरी जगात आणि आपल्या देशात कोळशाचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यावेळी देशातील अनेक राज्यांमध्ये अंधार झाला होता. परंतु, त्यावेळी आमच्या ऊर्जा विभागाने राज्याला अंधारात जाऊ दिले नाही हे देखील विशेष उल्लेखनीय असे कार्य आमच्या ऊर्जा विभागाने केलेले आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, महावितरण कंपनीला मागील ५ वर्षात आमचे शासन असताना सरप्लस निधी दिलेला आहे. ऊर्जा विभागाकडे १८ हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. असे असल्यास कंपन्या कशा सुरु राहणार असा माझा प्रश्न आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. त्या कंपन्या उद्ध्वस्त होतील. शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील ५०० रुपयांचे विद्युत देयक भरले नाही म्हणून कनेक्शन कापली जात आहेत. महाविकास आघाडी सरकारकडे १ टक्का कर्ज घेण्याची हमी आहे. आजच्या आज महाविकास आघाडी सरकार १ टक्का कर्ज घेईल काय ? महावितरण कंपनीला जोपर्यंत निधी मिळणार नाही, तोपर्यंत... यावर माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, मी ऑलरेडी उत्तर दिलेले आहे. आज सकाळी माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडे या विषयाच्या अनुषंगाने बैठक झालेली आहे. त्यावेळी सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होता. त्यामुळे निधी मिळण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदय, प्रादेशिक कार्यालये आहेत. शेतकऱ्यांसाठी नवीन कंपन्या सुरु केल्या जातील किंवा कसे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. सन २०२० मध्ये केंद्र शासनाने एक अमेंडमेंट केली होती. त्यामध्ये रिव्हँम्पिंगची

ता.प्र.क्र. १२०५८.....

डॉ. नितीन राऊत.....

योजना आणली होती. त्या अंतर्गत पीडब्ल्यूसी नावाची सल्लागारांची कंपनी केलेली आहे. त्या कंपनीला काम दिले आहे. त्या कंपनीकडून अहवाल आल्यानंतर नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

**सभापती** : ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

## रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक मालमत्ता व वास्तुंची तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

(४) * ११९५८ श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १०८३७ ला दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय आपत्ती व्यवस्थापन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यांमध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये रुपये ३०४८.२० लक्ष इतक्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, रायगड यांना नुकसान भरपाईपोटी शासनाने किती रुपयांचा निधी वितरित केला आहे आणि उर्वरित निधी केव्हा वितरीत करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, ग्रामपंचायत इमारती, समाजमंदिरे, जिल्ह्यातील गोदामे, स्मशानभूमी, पिण्याच्या पाण्याच्या योजना या सर्व कामांसाठी रुपये ३५ कोटी एवढा निधी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, उक्त निधी संबंधित विभागाकडे सोपविण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या वास्तुंच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच अद्यापपर्यंत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली नसल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार** : (१) खरे आहे.

असुधारित प्रत

(२) सदरहू मागणीच्या अनुषंगाने संबंधित विभागीय आयुक्त यांच्यामार्फत रायगड जिल्ह्यातील ४९२ जिल्हा परिषद शाळांच्या इमारत दुरूस्तीसाठी रुपये ७३८.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक ०७/०३/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिला आहे.

ता.प्र.क्र. ११९५८.........

श्री. विजय वडेट्टीवार......

(३) व (४) खरे नाही.

तौक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या सर्व जिल्हयांमधील अनुज्ञेय असलेल्या सार्वजनिक मालमत्तांच्या दुरूस्तीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रुपये ६६४.९९ लाख इतका निधी राज्य कार्यकारी समितीने मंजूर केला आहे. तथापि, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी संपुष्टात आल्याने मदत देणे शक्य झाले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुनील शिंदे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, तौक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या सर्व जिल्हयांमधील अनुज्ञेय असलेल्या सार्वजनिक मालमत्तांच्या दुरूस्तीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रुपये ६६४.९९ लाख इतका निधी राज्य कार्यकारी समितीने मंजूर केला आहे. तथापि, राज्य आपत्ती प्रतिसाद निधी संपुष्टात आल्याने मदत देणे शक्य झाले नाही.

सभापती महोदय, तौक्ते चक्रीवादळामुळे गुजरात राज्याला केंद्र शासनाने १ हजार कोटी रुपयांची मदत केली होती. राज्य शासनाने केंद्र शासनाकडे या अनुषंगाने किती मदतीची मागणी केलेली आहे आणि त्यापैकी किती रुपयांची मदत दिली मिळणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोकणाला निसर्ग आणि तौक्ते चक्रीवादळामुळे अतोनात नुकसान सोसावे लागले आहे. सन्माननीय सदस्य

अप्रकाशित प्रत

श्री. सुनील शिंदे यांनी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, ज्या शासकीय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे, त्यासंदर्भात शासनाने मदत केली पाहिजे. शाळांसाठी आवश्यक ती मदत शासनाने दिलेली आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीसाठी.... मी उत्तरातच त्याची माहिती दिलेली आहे. शासनाकडून मदत दिली जाते आणि ती पूर्णत: दिली जात नाही. यापूर्वीच्या अधिवेशनात सदरहू प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केला होता.

ता.प्र.क्र. ११९५८.........

श्री. विजय वडेट्टीवार......

एसडीआरएफच्या निकषात शाळा येत नाही. या शाळा निकषात बसत नसल्या तरीही राज्य शासनाने त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. ऊर्जा क्षेत्रात चक्रीवादळामुळे जे पोल वाकलेले आहेत आणि ज्या तारा तुटलेल्या आहेत त्यासाठी झालेल्या नुकसानामुळे ९.८९ कोटी रुपयांची मदत दिलेली आहे. ते राज्य समितीने मान्य केलेले असून, त्यासाठी मदत उपलब्ध करुन दिली जाणार आहे. ६ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी शाळा आणि इतर नुकसानभरपाईसाठी दिलेला आहे. चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीत रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी १.२८ कोटी रुपयांची मदत दिलेला आहे. मार्च, २०२२ नंतर उर्वरित निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे अतोनात नुकसान झालेले असून, त्यासाठी केंद्र शासनाकडे मागणी केली होती. पण केंद्र शासनाने आमच्या मागणीला अजिबात प्रतिसाद दिला नाही आणि एकही रुपयांचा निधी केंद्र शासनाने दिलेला नाही.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, तौक्ते चक्रीवादळामुळे जिल्हापरिषदेतील शाळांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांनी दुरुस्तीसाठी २ लाख रुपयांची मर्यादा घातलेली आहे. पहिली ते चौथीचे वर्ग त्या ठिकाणी सुरु होते. आवाजी शाळा सुरु होत्या. अपूर्ण शाळांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय असा माझा प्रश्न आहे.

असुधारित प्रत

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, महाडमधील जागा एनडीआरएफसाठी वर्ग करण्यात आली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते की, एनडीआरएफ आले नाही तर एसडीआरएफचे बेस कॅम्प मंजूर केले जातील. ४ महिन्याहून अधिकचा कालावधी उलटून गेलेला आहे. एनडीआरएफचा कॅम्प येईपर्यंत एसडीआरएफच्या कॅम्पसाठी रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात कधीपर्यंत मंजुरी देणार असा माझा प्रश्न आहे. या संदर्भात हे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदय घोषणा करतील काय ?

ता.प्र.क्र. ११९५८.........

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोकणात सातत्याने पावसाळ्यात संकटे येतात. उन्हाळ्यात फार काही तडाखा बसत नाही. पावसाळ्यापूर्वी कोकणासाठी एनडीआरएफसाठी मागणी केलेली आहे. ती मागणी पूर्ण झाली तर धुळे आणि नागपूर येथील एसडीआरएफची एक टीम कायमची ठेवण्याचे आश्वासन दिलेले आहे. ते ठेऊ. वेळ आहे. अजून काळजी करु नये. सन्माननीय सदस्यांना जो शब्द दिलेला आहे, तो पूर्ण केला जाईल.

सभापती महोदय, कोकणातील जिल्हापरिषदेंच्या शाळांच्या नुकसानीसाठी १२ कोटी ९३ लक्ष रुपयांचा निधी दिलेला आहे. यापैकी कोकणातील रायगड तालुक्यातील जिल्हापरिषदेंच्या शाळांच्या नुकसानीसाठी ६ कोटी ३८ लक्ष रुपयांचा निधी दिलेला आहे. उर्वरित ६ कोटी ६४ लाख रुपयांचा निधी दिनांक ३१ मार्च, २०२२ पूर्वी दिला देणार असल्यामुळे सर्व शाळांची दुरुस्ती होणार आहे. त्यामुळे आता विषय राहिलेला नसल्यामुळे जर सन्माननीय सदस्यांकडून पुन्हा काही नवीन मागणी येत असेल किंवा केली जात असेल तर त्याला काहीच अर्थ नाही. विषय एवढ्या पुरताच मर्यादित आहे की, सर्व पूर्तता केली जाईल.

असुधारित प्रत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी गेल्या अधिवेशनात चौर रेवदंडा, नागावणे आणि आक्सी या भागात नारळाची आणि सुपारीची पडलेली झाडे उचलली जातील असे आश्वासन दिले होते. त्यासाठी जास्तीचा खर्च येणार नाही. त्यामुळे त्या ठिकाणी नवीन झाडे लावता येत नाही. तेथील बागायतदार शेतकऱ्यांची क्षमता राहिली नाही. त्यामुळे तेथील झाडे उचलून बाहेर न्याव्ही लागणार आहे. त्यासाठी तेथील कामे बचत गटामार्फत कामे केली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जाईल काय असा माझा प्रश्न आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आता थोड्याय वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. अनिकेत तटकरे यांनी प्रश्न विचारला होता. एसडीआरएफ आणि एनडीआरएफसाठी जागा घेण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. जागा ताब्यात मिळाल्यानंतर ते काम सुरु केले जाईल.

ता.प्र.क्र. ११९५८.........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना उत्तर देणार आहे. दुसरा विषय संबंधित नाही. पण मी मागील वेळेस बोललो होतो. शब्द मला माहिती आहे. त्याची पूर्तता केली जाईल.

श्री. रमेशदादा पाटील : सभापती महोदय, अतिवृष्टी आणि क्यार वादळ आलेले आहे. रायगड जिल्ह्यातील मुरुड आणि जंजीरा तालुक्यात अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांचे पंतचाने केलेले असून, आजतागायत त्यांना मदत मिळालेली नाही. क्यार वादळ आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात कधीपर्यंत मदत दिली जाणार असा माझा प्रश्न आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, एसडीआरएफच्या निकषात बसणारी सर्व मदत दिलेली आहे. शासनाने एसडीआरएफच्या पलीकडे जाऊन कोकणाला मदत दिलेली आहे. क्यारच्या संदर्भात विशेष बाब म्हणून प्रस्ताव आला

असुधारित प्रत

तर.... मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ते त्यामध्ये मोडत नाही. एसडीआरएफच्या निकषात बसत असेल तर १०० टक्के मदत दिली जाईल.

**सभापती** : ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

# राज्यातील साखर कारखान्यांनी ऊसाचे विनापरवाना गाळप केल्याबाबत

(७) * १२७२८ श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२०-२०२१ च्या गळीत हंगामात राज्यातील १८ साखर कारखान्यांनी गाळप परवाना नसताना गाळप केलेले असून महाराष्ट्र राज्य साखर कारखाने क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन आदेश, १९८४ व शासन अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदीनुसार सदर १८ साखर कारखान्यांवर दंड आकारणी आदेश बजावण्यात आले असून त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, ऊस नियंत्रण आदेश १९६६ चे अनुषंगाने साखर कारखान्यांनी शिस्त पाळण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या कायद्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, गाळप परवानारहित असलेल्या १८ साखर कारखान्यांना परवाना अधिकाऱ्यांनी दंड ठोठावला असून उक्त कारखान्यांनी परवाना अधिकारी यांचे दंड आदेशाच्या विरोधात शासनाकडे सुनावणीकरिता अपील अर्ज दाखल केलेले असून यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय देऊन सदर कारखान्यांवर वसुलीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील** : (१) २०२०-२०२१ गाळप हंगामात १९ कारखान्यांनी गाळप परवाना अटी व शर्तीची पुर्तता केली नव्हती म्हणून गाळप परवाना दिलेला नव्हता. सदर कारखान्यांनी गाळप परवाना अटी व शर्ती पूर्ण केल्यानंतर गाळप परवाना दिलेला आहे. तथापी गाळप परवाना देणेपुर्वी या १९ कारखान्यांनी ऊस गाळप सुरू केले होते. विनापरवाना केलेल्या गाळपावर महाराष्ट्र

राज्य साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश, १९८४ व शासन अधिसूचना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ मधील तरतुदीनुसार

ता.प्र.क्र. १२७२८ .....

श्री. बाळासाहेब पाटील......

दंड आकारण्यात आलेला आहे. या कारखान्यांनी शासनाकडे अपील केले असल्यामुळे सदर प्रकरणी अपिलावर निर्णय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२) ऊस नियंत्रण आदेश, १९६६ अन्वये राज्य शासनाला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार साखर कारखान्यांनी शिस्त पाळण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य साखर कारखाने (क्षेत्र आरक्षण व गाळप आणि ऊस वितरण नियमन) आदेश, १९८४ मध्ये शासन अधिसूचना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ नुसार कारखान्यांनी विनापरवाना गाळप केल्यास रुपये ५००/- प्रति टन दंड आकारण्याची तरतूद आहे.

(३) सदर कारखान्यांनी परवाना अधिकारी तथा साखर आयुक्त यांचे दंडाचे आदेशाविरूध्द शासनाकडे अपील केले आहे. १९ पैकी ११ कारखान्यांच्या अपिलावर शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली आहे. उर्वरीत कारखान्यांच्या अपिलावर शासन स्तरावर सुनावणीची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत. )

**सभापती** : आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

## राज्यातील दिव्यांग शाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन अदा करण्याबाबत

**(८)** * **१२९३१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकल्याण विभागांतर्गत चालवल्या जाणाऱ्या दिव्यांग अनुदानित शाळांचे वेतन शासनाकडून अदा करण्यात येत असून यातील काही शाळा निवासी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दिव्यांग शाळांमधील एक हजारांहून अधिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना माहे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मासिक वेतन न मिळाल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असून शिक्षक भारती संघटनेच्या दिव्यांग विभागाने मा मुख्यमंत्री, मा सामाजिक न्यायमंत्री, संचालक, समाज कल्याण संचालनालय, सचिव, सामाजिक न्याय विभाग आदींकडे पत्र पाठवून सदरहू कर्मचाऱ्याचे मासिक वेतन तातडीने अदा करण्यासंदर्भात माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांग शाळांमधील सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मासिक वेतन वेळेवर अदा न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील दिव्यांग अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोबर, २०२१ पासूनचे मासिक वेतन नियमितपणे न मिळाल्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कर्मचाऱ्यांना थकबाकीसह नियमितपणे वेतन विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

अप्रकाशित

ता.प्र.क्र.१२९३१....

**डॉ.विश्वजीत कदम, श्री.धनंजय मुंडे यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासनाकडुन टप्प्याटप्प्याने दरमहा वेतनाची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, समाजकल्याण विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या दिव्यांग अनुदानित शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा हा प्रश्न आहे. या शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनास विलंब का होतो, असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला असे लेखी उत्तर देण्यात आले आहे की, शासनाकडून टप्प्याटप्प्याने दरमहा वेतनाची तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वास्तविक पाहता वेतनाची तरतूद दरमहा टप्प्याटप्प्यानेच उपलब्ध होत असते. या ठिकाणी मूळ प्रश्न असा आहे की, तरतूद उपलब्ध झाल्यानंतर सुद्धा शिक्षकांच्या खात्यामध्ये वेतन जमा होत नाही. याचे मूळ कारण समाजकल्याण विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार होय. त्या ठिकाणी वेतनाची देयके मंजूर करण्यासाठी दरमहा काही रक्कम द्यावी लागते. नागपूर येथील प्रभारी समाज कल्याण अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडले होते. परंतु तरी सुद्धा तेथील अधिकाऱ्यांमध्ये सुधारणा झाली नाही. त्या ठिकाणी लांडे नावाचे अधिकारी चार वर्षांपासून कार्यरत आहेत. सातत्याने त्यांच्या बाबतीत तक्रार करीत आहे. प्रत्येक महिन्याचे देयक मंजूर करण्यासाठी त्यांच्याकडून पैशाची मागणी केली जाते. शाळांनी पैसे दिले नाही तर त्यांचे देयक मंजूर होण्यास विलंब होतो. मी स्पेसिफिक विचारतो की, वेतनाची तरतूद उपलब्ध झाल्यानंतर देखील वेतनाचे देयक मंजूर करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर स्वरुपाची दंडात्मक कारवाई करण्यात येईल काय ?

ता.प्र.क्र.१२९३१....

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, महाराष्ट्रात एकूण ८५२ शाळा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जात आहेत. त्या ठिकाणी एकूण १२,७१८ कर्मचारी आहेत. नोव्हेंबर, डिसेंबर हे दोन महिने सोडले तर इतर सर्व महिन्यांचे पगार त्यांना नियमितपणे अदा करण्यात आलेले आहेत. नोव्हेंबर, डिसेंबर महिन्याचे पगार शासन काही अडचणीमुळे देऊ शकले नव्हते. परंतु जानेवारी महिन्यात या दोन्ही महिन्यांचे पगार दिलेले आहेत. जानेवारी महिन्यानंतर राज्यभर त्यांचे पगार नियमितपणे देण्यात येत आहेत.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.नागोराव गाणार यांना सांगू इच्छितो की, त्यांनी जे सांगितले तसे होत नाही. परंतु जर तसा प्रकार कुठे होत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागोराव गाणार यांनी विचारलेला प्रश्न वाजवी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या राज्यात कोणत्याही शासकीय, निमशासकी अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पगार थांबत नाहीत. त्यांना नियमितपणे पगार अदा करण्यात येतात. परंतु केवळ आणि केवळ प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक आणि थोड्याफार प्रमाणात उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शिक्षकांचे पगार विलंबाने होतात. मुळात शिक्षकांना नियमाने पगार देण्याचे ठरले असेल तर रडतरडत पगार का दिला जातो ? वर्धा जिल्ह्यात लेखाशीर्ष ५११ अंतर्गत २० टक्के अनुदान तत्त्वावर आलेल्या शिक्षकांचे पगार चार महिन्यांपासून झालेले नाहीत. मंत्रालयीन सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पगार थांबवावे व मग कसे वाटते ते सांगावे. प्रत्येक वेळी शिक्षण विभागाला धारेवर धरले जाते. हा प्रकार कुठे तरी थांबला पाहिजे. अन्यथा सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनाही काही तरी भूमिका घ्यावी लागेल. आम्हीही लोकांमधून निवडून आलो आहोत, आम्हालाही लोकांनी मतदान केलेले आहे. पगार मिळणे हा त्यांचा संविधानिक अधिकार आहे, त्यामुळे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२९३१....

**सभापती** : सन्माननीय सदस्य, आपण कसे निवडून आलात हा या सभागृहाचा विषय होऊ शकत नाही. आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, शासकीय, निमशासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना सुद्धा वेळेवर पगार मिळाला पाहिजे, किंबहुना तो त्यांचा संविधानिक अधिकार आहे. त्यामुळे या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल काय ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मी पुन्हा सांगू इच्छितो की, या शाळांतील सर्व कर्मचाऱ्यांचे पगार आता नियमितपणे सुरु आहेत. कोविडच्या पार्श्वभूमीवर नोव्हेंबर, डिसेंबर महिन्याचे पगार वित्त विभागाच्या शासन निर्णयामुळे अडले होते. परंतु तद्नंतर वेळेवर पगार अदा करण्यात येत आहेत.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागासाठी २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केलेली असताना त्यांच्या निधीला ३४ टक्के कट लावण्यात आला. एकीकडे मोठ्या प्रमाणात तरतूद केल्याचे दाखवायचे आणि दुसऱ्या बाजूला कट लावायचा हे योग्य नाही. माझी विनंती आहे की, शिक्षकांचे पगार वेळेवर होण्याकडे मंत्री महोदयांनी लक्ष दिले पाहिजे. तसेच पुढील काळात सामाजिक न्याय विभागाच्या निधीला मागच्या वर्षीसारखा कट लावता कामा नये. मी स्पेसिफिक विचारतो की, शिक्षकांचे पगार वेळेवर होण्यासाठी शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे ?

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, कोविडच्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने काढलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने नोव्हेंबर, डिसेंबर या दोन महिन्यात वेळेवर पगार देण्यात आला नव्हता. परंतु जानेवारी महिन्यात या दोन्ही महिन्यांचे पगार देण्यात आले. जानेवारी महिन्यापासून

ता.प्र.क्र.१२९३१....

डॉ.विश्वजीत कदम....

त्यांना नियमित पगार देण्यात येत आहे. तरी सुद्धा पगार अदा करण्याच्या बाबतीत कुठे काही अडचण आली तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

-----------

असुधारित प्रत

**वालसावंगी (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतकऱ्यांच्या कृषीपंपाचा वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत**

**(९) * १३४१२ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीज बिल वसुलीसाठी खंडीत केलेला वीज पुरवठा पुर्ववत सुरू करण्याच्या मागणीसाठी वालसावंगी (ता.भोकरदन, जि.जालना) येथील शेतकऱ्यांनी अजिंठा-बुलढाणा महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांकडून थकीत वीज बिल वसूल करण्यासाठी वीज वितरण कंपनीने सुरू केलेली कारवाई अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन करणारी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाण्याची गरज असताना वीज पुरवठा खंडीत करून, पिकांचे नुकसान केले जात आहे तसेच दुग्ध व्यवसायासाठी पाळलेल्या जनावरांना पाणी मिळत नसल्यामुळे जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा कायदा २०१३ नुसार शेती व दूध उत्पादनात वाढ करण्यासाठी या परिशिष्ट ३ मधील कलम ३१ नुसार शासन अन्न सुरक्षेसाठी कोणते प्रयत्न करीत आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१३४१२....
डॉ.नितीन राऊत....
(४) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम ३१ नुसार अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेली उद्दिष्टामध्ये इतर बाबी सोबत वीज क्षेत्रात गुंतवणुक होण्याच्या दृष्टीने कृषी फीडर विलगीकरण, सौर कृषी पंप उपलब्धता, उच्च दाब वितरण प्रणाली योजना, उपकेंद्र निर्मिती/ क्षमतावृध्दी, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० इ. पायाभूत सुविधा योजना राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.नागोराव गाणार : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कलम ३१ नुसार अनुसूची तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उद्दिष्टामध्ये इतर बाबी सोबत वीज क्षेत्रात गुंतवणूक होण्याच्या दृष्टीने कृषी फीडर विलगीकरण, सौर कृषी पंप उपलब्धता, उच्च दाब वितरण प्रणाली योजना, उपकेंद्र निर्मिती/क्षमतावृद्धी, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी पंप वीज जोडणी धोरण-२०२० इत्यादी पायाभूत सुविधा योजना राबविण्यात येत आहेत. मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, या सर्व योजनांची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नागोराव गाणार यांनी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत कोणकोणती कामे घेण्यात आली आहेत या बाबत विचारणा केली आहे. मी सांगू इच्छितो की, नुकतीच एचबीडीएच योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्या योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर कृषी फीडर विलगीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत सौर कृषी पंपाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात करुन देण्यात येत आहे. नुकतीच आरडीएसएचची योजना सुरु केली असून त्या अंतर्गत उपकेंद्र निर्मिती व क्षमतावृद्धी करण्यात येत आहे. कृषी पंप वीज जोडणीचे धोरण सुद्धा आम्ही आणलेले आहे. हे सर्व करीत असताना राज्य सरकारने पूर्वी कुसुम योजना आणली होती. त्या योजनेच्या ए, बी, सी चे धोरण हाती घेतले असून त्यांची सर्व

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१३४१२....
डॉ.नितीन राऊत....
कामे प्रगती पथावर आहेत.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, जोपर्यंत सरकार तुम्हाला मदत करीत नाही तोपर्यंत तुम्ही काही करु शकत नाही. तुमच्या इफीशियन्सीबाबत शंका नाही. ग्रीन सेसचा ५० हजार कोटी रुपये पेक्षा जास्त पैसा महाराष्ट्र सरकारकडे प्रलंबित आहे. तो ग्रीन सेस मागच्या सरकारच्या काळात काढण्याचा प्रयत्न केला होता. जोपर्यंत सरकार कृषी पंपांच्या नवीन जोडणीसाठी १० हजार कोटी रुपये आणि थकीत १८ हजार कोटी देत नाही तोपर्यंत काही होणार नाही. आपण अर्थसंकल्पात नमूद केले की, सरकारकडे १ टक्के कर्ज काढण्याची क्षमता आहे.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१३४१२....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे ....

तुम्ही कृषी क्षेत्र मजबूत करणार नाही तोपर्यंत काहीही होणार नाही. आपण यामध्ये आपले आयुष्य घातले आहे. राज्याचा जीडीपी वाढवायचा असेल तर शेतकऱ्यांना मजबूत करावे लागेल आणि शेतकऱ्यांना मजबूत करायचे असेल तर त्यांना वीज द्यावी लागेल. १८ हजार कोटी रुपये तातडीने मागितले पाहिजेत. आपल्याकडे ग्रीन सेसचा जमा होतो. तो सर्वात मोठा कृषी क्षेत्राचा अधिकार आहे. मुख्यमंत्री सौर वाहिनी योजना जे काही करीत असाल ते करावे. सौर ऊर्जेचे २-५ लाख पंप घेतले पाहिजेत. जोपर्यंत शासन हे करीत नाही तोपर्यंत काही नाही. काँग्रेसकडे हे खाते आहे आणि तुमच्याकडे हे खाते आहे म्हणून तुमच्यावर अन्याय होत आहे का अशी मला भीती वाटते. आता माननीय राज्यमंत्री श्री. शंभूराज देसाई सभागृहातून बाहेर गेले आहेत. मी राजकारण करु इच्छित नाही. सदर बाबतीत न्याय मिळाला पाहिजे. महत्त्वाचा प्रश्न आहे. १८ हजार कोटी रुपये तातडीने केव्हा मागणार आहात ? बाकीच्या कार्यक्रमाकरिता १० हजार कोटी रुपये ग्रीन सेसमधून द्यावेत आणि सर्व सौर ऊर्जेवर खर्च करावेत अशी माझी माननीय मंत्र्यांना विनंती आहे.

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, मी ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर दिले आहे की, सकाळीच बैठक पार पडली आहे. अधिकारी आहेत. त्याचे रिकन्सिलिएशन व अकाऊंट वर्क सुरु आहे. कदाचित आजच तो प्रश्न निकाली निघू शकेल. परंतु हा प्रश्न निश्चितपणे निकाली काढण्यात येईल. यावेळी एक लाख कृषी पंप देण्याचे उद्दिष्ट स्वीकारलेले आहे. त्यामुळे आम्हाला निधी कमी पडणार नाही. निधीची कमतरता भासणार नाही. निधी उपलब्ध होईल.

----

**सभापती** : आता राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक १२७३३ घेण्यात येईल.

(**प्रेस** : येथे राखून ठेवलेला तारांकित प्रश्न छापावा.)

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.१२७३३....

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. मी स्पेसिफिक २-३ प्रश्न विचारणार आहे. निरगुडे आयोगाला निधी दिला नाही, मनुष्यबळ देखील दिले नाही, कामकाजात हस्तक्षेप झाला, इम्पिरिकल डेटाऐवजी शासकीय माहितीवर आधारित अहवाल देण्यास भाग पाडले अशा अनेक गोष्टी सरकारने केल्या आहेत. निरगुडे आयोगाची सरकारकडून कोंडी केली गेल्यामुळे ते योग्य अहवाल तयार करु शकले नाहीत म्हणून न्यायालयाने आयोगाचा अहवाल फेटाळला. या सर्व गोष्टीकरिता २ वर्षे गेले. आता सरकारने नवीन आयोग केलेला आहे. सरकार आयोगाच्या कामात हस्तक्षेप करणार नाही, तातडीने जेवढा निधी लागेल तेवढा देईन, असे आश्वासन दिले. पण तुम्ही फक्त ५ कोटी रुपये दिले आहेत. त्यांची साडे चारशे कोटी रुपयांची मागणी आहे. आपण त्यांच्या पैशाची व्यवस्था पूर्णपणे करणार का ? न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे तंतोतंत अहवाल येण्याची आवश्यकता आहे, नाही तर, पुन्हा अहवाल, अहवालावर अहवाल, तुम्ही चुका करणार, परिपूर्ण, तंतोतंत अहवाल नाही आणि ओबीसी समाज पाहत राहणार. आयोगाकडून तंतोतंत पूर्ण अहवाल किती काळात होईल ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हा खरोखर अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. ओबीसीच्या राजकीय आरक्षणासंदर्भात गेली २ वर्षे हा मुद्दा सातत्याने चर्चेला आणला जात आहे. आम्ही न्यायालयीन लढाईमध्ये सुध्दा अनेक वेळा पूर्ण ताकदीनिशी उतरलो. आपण वकिलांची यादी पाहिली तर असे दिसेल की, यापेक्षा अजून कोणते वकील नेमावेत हा खरा प्रश्न आहे. आम्ही स्पेशल लिव्ह पिटिशन केल्या, त्यामध्ये शेखर नाफडेंपासून तुषार मेहंतापर्यंत, कपिल सिब्बल, राहुल चिटणीस, सचिन पाटील असे अनेक वकील आहेत. तसेच यामध्ये परमजीत पटवालिया असे सर्व वकील त्या-त्यावेळी नेमले. पण दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आमच्या विरोधात आला आणि आपल्याला येथे तोंडघशी पडावे लागले.

असुधारित प्रत

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला मुद्दा हा होता की, मागासवर्ग आयोग नेमत असताना निरगुडे आयोगाला आपण मदत का केली नाही. आम्ही जो

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.१२७३३....

श्री. विजय वडेट्टीवार ....

टीओआर दिला होता, त्याच्या बाहेर जाऊन त्यांनी मागणी केली होती. टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये ट्रिपल टेस्टनुसार त्या आयोगाने काम करावे अशाप्रकारे होते आणि हा आयोग डेडिकेटेड आयोग असेल हे स्पष्टपणे नमूद केले होते. पण त्यांनी तो अहवाल आमच्याकडे देत असताना ४५० कोटी रुपयांची, ४३५ कोटी रुपयांची मागणी केली आणि मागणी करीत असताना महाराष्ट्राचा पूर्णत: १०० टक्के जातनिहाय जनगणनेचा त्यामध्ये उल्लेख केला. पाहणी व जनगणना दोन्हींही त्यामध्ये होते. त्याला वेळ लागणार आहे. ....(अडथळा).... मी जे आहे ते सांगत आहे. वेगळे काही सांगत नाही. मी वस्तुस्थिती सांगत आहे. त्यांनी त्या पध्दतीने मागणी केली. त्यावेळी कोरोना होता. आयोगाची स्थापना दिनांक ३ मार्च,२०२१ ला झाली. त्यावेळी कोरोनाची स्थिती उद्भवली, आपण त्या सगळया स्थितीतून गेलो आहोत. शासनाची अधिसूचना १५ जूनला काढली, पुन्हा समर्पित आयोगाचा पहिला टीओआर दिनांक २९ जून, २०२१ ला दिला, त्यानंतर शासन अधिसूचना दिनांक २७ डिसेंबर, २०२१ ला काढली. आता आम्ही समर्पित आयोग रद्द करुन टाकला आहे. तो वेगळा विषय आहे. आम्ही त्यांना ८४ कोटी रुपये दिले. पहिल्यांदा त्यांच्या ऑफिशिअल व्यवस्थेसाठी ५ कोटी रुपये दिले, त्यांची मागणी होती तेवढे पैसे दिले आणि त्यानंतर ८४ कोटी रुपये देखील दिले. सर्व शासकीय यंत्रणांना बोलावू शकतो, वापर करु शकता, पण आम्हाला ट्रिपल टेस्टनुसार आयोगाने मदत करावी असे होते. मला माहीत झाले की, त्यांच्यामध्ये अनेक मतमतांतरे होती. सर्वोच्च न्यायालयाच्या शेवटच्या याचिकेमध्ये ज्या गोष्टी सुचविल्या होत्या त्या पध्दतीने आम्ही त्यांना ७ संस्थांचा अहवाल दिला. त्या ७ संस्थांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाच्या पुढे

असुधारित प्रत

आले की, ओबीसी २७ टक्क्यांच्या वर आहेत. आम्ही तसे दाखविले. मग त्यांनी सांगितले की, तुम्ही हे आयोगाकडून तपासून आयोगाच्या माध्यमातून आयोगाकडून सर्टिफाय करुन प्रस्ताव द्यावा. आम्ही आयोगाकडे पाठविले. हे खरे आहे की, सर्वोच्च न्यायालयाने वेळेचे बंधन घातले हाते. आपल्या सर्वांना हे माहीत आहे की,

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.१२७३३....

श्री. विजय वडेट्टीवार ....

तेवढ्या कमी काळात हे सर्व करणे मोठी गोष्ट होती. आयोगाने त्यामध्ये घाईमध्ये तो अहवाल दिला होता आणि तो सुध्दा दुर्दैवाने आपल्या विरोधात गेला होता. आम्ही मागासवर्ग आयोगाकडून समर्पित आयोगाचे ते संपूर्ण काम रद्द करुन घेतले.

सभापती महोदय, आम्ही आज जयंत बांठिया समिती स्थापन केली. आम्ही त्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख केला आहे. आम्ही यामध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच नाही. उलट हे आरक्षण टिकावे ही भूमिका तुमची, आमची सर्वांची आहे. आपण हा निर्णय घेताना, शासन निर्णय काढताना एकमताने निर्णय घेतला. माननीय राज्यपालांनी सही केली. आपण दोन्ही गोष्टी करताना म्हणजे डिलिमिटेशन करताना आणि समर्पित आयोग नेमतानाही काम केले. चांगली माणसे आहेत, यामध्ये कोणीही राजकारणी माणूस नाही.

सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, जयंतकुमार बांठिया हे माजी मुख्य सचिव होते. संचालक, आंतरराष्ट्रीय जनसंख्या विज्ञान अथवा संस्था यांचा प्रतिनिधी एक सदस्य असणार आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे प्रतिनिधी असणार आहेत. एच.बी.पटेल, सेवानिवृत्त प्रधान सचिव, विधी विभाग हे सुध्दा सदस्य असणार आहेत. सेवानिवृत्त आयएएस अधिकारी महेश झगडे आणि सेवानिवृत्त आयएएस अधिकारी नरेश गिते अशा ६ जणांची समिती आहे. आम्ही शासनाच्या परिपत्रक, शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, किमान ३ महिन्यांमध्ये हे पूर्ण करावे अशी आमची अपेक्षा आहे. ३ महिन्यांनंतर आवश्यकता

असल्यास १ महिन्याची मुदतवाढ देऊ. कागदपत्रांमध्ये असे नमूद आहे. आपल्याला हवे असेल्यास वाचून दाखवितो. आम्ही त्याच्या कार्यकक्षा ठरवून दिल्या आहेत. त्या स्कोपच्या बाहेर जाऊन काही नाही. स्कोपमध्ये सर्व होईल. काम करीत असताना टर्म्स ऑफ रेफरन्स द्यावे लागतात, ते दिले आहेत. त्यांनी प्रत्यक्ष काम सुरु केले आहे. बांठिया साहेबांनी आता काम सुरु केले आहे. आपण त्यांना जागा उपलब्ध करुन

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.१२७३३....

श्री. विजय वडेट्टीवार ....

दिली आहे. मात्र ती जागा मंत्रालयात दिली नसून बाहेर दिली आहे. आता हे सर्व काम व्यवस्थित सुरु आहे. मागच्या आयोगाकडून ते काम काढून, आता समर्पित स्वतंत्र आयोग आहे. खरे म्हणजे त्याचवेळी ही आवश्यकता होती. पण मागासवर्ग आयोगाचे ओबीसीशी संबंधित काम असल्यामुळे बाकी काम थांबवून निरगुडे आयोगला स्वतंत्र काम दिले गेले होते. मागच्या गायकवाड आयोगाच्या वेळी त्यांनी गेस्ट हाऊसमध्ये बसून काम केले. तेथे त्याच व्यवस्था होत्या. यामध्ये हस्तक्षेप करणार नाही.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.१२७३३....

श्री.वियज वडेट्टीवार....

श्री.जयंत बाठीया यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नियुक्त केला आहे, त्यांना जेवढा निधी आवश्यक आहे तेवढा निधी त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही. ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या निश्चित कालावधीत पूर्ण होतील, असा मला विश्वास आहे. या आयोगाचे काम संपून अहवाल शासनाकडे प्राप्त झाल्यावर सर्वोच्च न्यायालयात जाऊन ओबीसी आरक्षण टीकविण्यासाठी राजकीय अभिनिवेष बाजूला ठेऊन काम करण्यात येईल. एकमेकांवर आरोप प्रत्यारोप न करता सगळयांची भावना लक्षात घेऊन हे आरक्षण टीकविण्यासाठी जे सहकार्य विरोधी पक्षाचे लागेल ते घेण्यात येईल. विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या बाबी सांगितल्या त्याची दखल घेण्यात आली आहे. आपण सर्व मिळून हे आरक्षण टीकविण्याचा प्रयत्न करु या. हे आरक्षण टीकेल असा मला विश्वास आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी समर्पक उत्तर दिले. परंतु मंत्री महोदयांनी वारंवार सर्वोच्च कोर्टाचा उल्लेख केला. सर्वोच्य न्यायालयात ही केस ग्रामविकास विभाग हाताळीत होते, आपला विभाग हाताळीत नव्हता. सर्वोच्च न्यायालयाने वेळ दिला नाही असे आपण म्हणून नका. ते रेकॉर्डवर चुकीचे जाईल. दिनांक १३/१२/२०१९ रोजी पहिला आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला की, आयोग स्थापन करुन काम सुरु करा. तरी काम सुरु करण्यात आले नाही. दिनांक ४ मार्च २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दुसरा आदेश दिला तरी आयोगाचे काम सुरु केले नाही. चुकीचे रेकॉर्डवर ठेऊ नये. सर्वोच्च न्यायालयाने भरपूर वेळ दिलेला आहे.

सभापती : मी तपासून घेऊन चुकीचे असेल तर काढून टाकीन.

राखून ठेवलेला ता.प्र.क्र.१२७३३....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, एक मागासवर्गीय आयोग आहे, दुसरा समर्पित बांठिया आयोग नेमला आहे. संविधानाच्या कलम ३४० कलमानुसार मागासवर्गीय आयोग नेमता येतो. आपण ही काळजी घेतली आहे काय, कारण आता एक वर्षे होऊन गेले. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सन २०१० मध्ये आलेला आहे. त्यामुळे सन २०१० पासून सर्वच सरकार यासाठी जबाबदार आहेत. केवळ ते एकटे जबाबदार आहे असे मानण्याचे कारण नाही. आता जे करण्यात आले त्याबाबत काळजी घेण्यात आली आहे काय ? मागासवर्गीय आयोगाला ओबीसींच्या जातीनिहाय आर्थिक सामाजिक पाहणीसाठी आवश्यक निधी न देण्याची शासनाची भूमिका आहे ती भूमिका बदलून ओबीसीसाठी निधी देण्यात येईल काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आयोग नेमताना तो फूलप्रूफ असावा याची दक्षता घेण्यात आली आहे. विधी व न्याय विभाग आणि सर्व तज्ज्ञांचा सल्ला घेऊन कार्यवाही करण्यात आली आहे. जनगणनेच्या संदर्भातील विषय आमच्या विभागाचा नाही. हा विषय ग्रामविकास विभागाचा आहे, मंत्री म्हणून मी उत्तर दिले आहे. सर्वोच्च न्यायालयात ग्रामविकास विभागाकडून बाजू मांडण्यात येत होती. निधीची आवश्यकता असेल तर मंत्रिमंडळासमोर जाता येईल व त्यानुसार निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, १० महिने या सरकारने वेळ घालविला आहे, पुढे जास्त वेळ न जाता ओबीसीवर अन्याय होऊ नये या करिता मी टेक्नीकल प्रश्न विचारतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

------

**पृ.शी. :** लेखी उत्तरे

**मु.शी. :** तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

**उप सचिव** (श्री.तारवी) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गुरुवार, दिनांक १७ मार्च २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : गुरुवार, दिनांक १७ मार्च २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.मु.शी.:** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.शंभूराज देसाई (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.मु.शी.:** समितीचा अहवाल सादर करणे.

डॉ.मनिषा कायंदे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करते.

**सभापती** : महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर झाला.

------

असुधारित प्रत

**पृ.शी.मु.शी.:** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे.

श्री.अभिजीत वंजारी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता बुधवार, दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण १५० मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. १. अशासकीय विधेयक पुर:स्थापनेसाठी दर्शविण्यात येणार असून मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी बॅलटमधील प्राथम्यक्रमानुसार आलेल्या ३ अशासकीय विधेयकांना चर्चेसाठी खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>पुर:स्थापनार्थ</u>

| | | |
|---|---|---|
| १. | सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२२ - श्री.प्रविण दरेकर, वि.प.स. यांचे | - ५ मिनीटांपेक्षा जास्त नाही. |

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | सन २०२० चे वि.प.वि. क्रमांक २ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांचे | - ४५मिनीटांपेक्षा जास्त नाही. |
| २. | सन २०१९ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) (सुधारणा) विधेयक, २०१९ - श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांचे | - ५० मिनीटांपेक्षा जास्त नाही. |

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी.........

३. सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास विधेयक, २०२१ - श्री.कपिल पाटील, वि.प.स. - ५० मिनीटांपेक्षा जास्त नाही.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

**पृ.शी.** : डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे विधेयक

**L. C. BILL No.III OF 2022**

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF DR. P. A. INAMDAR UNIVERSITY, PUNE FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३-महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता, डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३-महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता, डॉ.पी.ए.इनामदार विद्यापीठ, पुणे याची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, ही पुणे येथील सेल्फ फायनान्स युनिव्हर्सिटी आहे. महाराष्ट्र कॉस्मापॉलिटीन एज्युकेशन सोसायटी पुणे यांचे डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ आहे.

अग्रिम प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे.........

यामुळे शासनावर कोणताही वित्तीय भार येणार नाही. खाजगी संस्थांमध्ये शिक्षणासाठी चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत हे शासनाचे जुने धोरण आहे. सन २०१३ व २०१९ मधील गाईड लाईन्स आहेत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

( सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे.  आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ५२ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.प.वि. क्रमांक ३ संमत झाले आहे.

---------

असुधारित प्रत

## वि.स.वि.क्रमांक ३ बाबत

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, आम्ही वि.प.वि. क्रमांक ३ डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ, पुणे विधेयक एकमताने संमत केले आहे. मंत्री महोदयांनी डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाच्या मॅनेजमेंटसमवेत चर्चा करुन त्यांना मराठवाड्यातील एखाद्या जिल्ह्यात व विदर्भातील एखाद्या जिल्ह्यात युनिव्हर्सिटी सुरु करण्याबाबत सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. X OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.)

श्री.प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १०-महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १०-महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे खूप छोटे विधेयक आहे. तांत्रिक बाब आहे. कोरोनामुळे तारखा मागे पुढे झालेल्या आहेत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

( सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत

**सभापती........**

खंड २ ते ८ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १० संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १० संमत झाले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ विधेयक.

**L. A. BILL NO. XV OF 2022**

(A BILL TO ESTABLISH AND INCORPORATE THE *COEP* TECHNOLOGICAL UNIVERSITY AS A SPECIALISED TECHNOLOGICAL UNITARY PUBLIC UNIVERSITY, TO COLLABORATE WITH RESEARCH INDUSTRIES AND CORPORATE INDUSTRIAL ASSOCIATES, TO PROVIDE VERTICAL MOBILITY TO STUDENTS UNDERGOING TECHNICAL EDUCATION IN HIGH GROWTH SECTORS AND TO PREPARE STUDENTS TOWARDS GAINFUL EMPLOYMENT, TO PROVIDE SCIENTIFIC AND TECHNOLOGY MANAGEMENT AND DEVLOP ORGANISATION OF TEACHING, LEARNING, TRAINING, RESEARCH, CONSULTANCY, TESTING AND EXTENSION, TO ESTABLISH CENTRE OF EXCELLENCE, RESEARCH PARK WITH INDUSTRIES AND TO GIVE EFFECT TO THE OBJECT ENVISAGED IN THE NEW EDUCATION POLICY AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.प्राजक्त तनपुरे (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५-संशोधन उद्योग समूह व निगम औद्योगिक संघ यांच्याशी सहयोग करण्याकरिता, उच्च वृद्धी असलेल्या क्षेत्रांमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ऊर्ध्व

अप्रकाशित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे........

गतिशीलतेची तरतूद करण्याकरिता आणि लाभदायक रोजगार मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी, अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण, संशोधन, सल्ला, चाचणी व विस्तार यांच्या वैज्ञानिक व तंत्रज्ञान व्यवस्थापन व विकास संघटनेची तरतूद करण्याकरिता, उद्योगांच्या सहयोगाने उत्कृष्टता केंद्र, संशोधन पार्क स्थापन करण्यासाठी आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये योजिलेली उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता एक विशेषीकृत तंत्रज्ञानात्मक एकात्म सार्वजनिक विद्यापीठ म्हणून सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यासाठी व विधिसंस्थापित करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५-संशोधन उद्योग समूह व निगम औद्योगिक संघ यांच्याशी सहयोग करण्याकरिता, उच्च वृद्धी असलेल्या क्षेत्रांमध्ये तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ऊर्ध्व गतिशीलतेची तरतूद करण्याकरिता आणि लाभदायक रोजगार मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी, अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण, संशोधन, सल्ला, चाचणी व विसतार यांच्या वैज्ञानिक व तंत्रज्ञान व्यवस्थापन व विकास संघटनेची तरतूद करण्याकरिता, उद्योगांच्या सहयोगाने उत्कृष्टता केंद्र, संशोधन पार्क स्थापन करण्यासाठी आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये योजिलेली उद्दिष्टे अंमलात आणण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिताएक विशेषीकृत तंत्रज्ञानात्मक एकात्म सार्वजनिक विद्यापीठ म्हणून सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यासाठी व विधिसंस्थापित करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत

**सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

( सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ ते ८८ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १५ संमत झाले आहे.

--------

असुधारित प्रत

**सभापती :** सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी ३.०७ ते ३.३० वाजेपर्यंत मध्यंतर )

--------

यानंतर श्री.सांगळे........

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पाच मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक ३.३२ ते ३.३७ वाजेपर्यत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.मनिषा कायंदे)**

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदया, मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत कालभैरव मंदिराशेजारी कोळी समाजाची होळी वर्षानुवर्षे साजरी होते. सदरहू जागेशेजारी मुरुड नगरपरिषदेच्या माध्यमातून गटाराचे काम चालू असताना भंडारी समाजाने अनधिकृतपणे गटाराच्या मुळ बांधकामात लोखंडी खांब उभे करुन होळीचे मैदान सिमांकीत केल्याची बाब निदर्शनास आली आहे. याबाबत मुरुड नगर परिषदेच्या प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. संपूर्ण प्रशासन चिडीचूप आहे. तथापि ठेकेदाराचे देयक मात्र चुकते केलेले आहे. ठेकेदाराचे खांब काढावेत म्हणून नगर परिषद प्रशासनाने लेखी बजावले असता ठेकेदाराकडून उचित कार्यवाही झालेली नाही. परिणामी दोन समाजात नाहक तेढ निर्माण झालेली आहे. याबाबत शासनाने लक्ष घालून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी व सर्वच कोळीवाडयांचे सिमांकन करुन त्यांना प्रॉपर्टी कार्ड देण्यात यावे, या दृष्टीने शासनाने तत्काळ निर्णय घ्यावा अशी माझी राज्य शासनाला विनंती आहे.

-----

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सभागृहात अनेक वेळा मी उरण तालुक्यातील औरे गावच्या शेतकऱ्यांची जमीन बेकायदेशीररित्या एका मुस्लीम इसमाच्या नावावर करण्यात आली. ही ४०० जमीन त्यांच्या नावावर करण्यात आली याबाबत मी अनेक वेळा येथे प्रश्न उपस्थित केला आहे. आपल्या दालनामध्येही तीन चार बैठका झाल्या आहेत.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील.....

परंतु त्याच्यावर कोणताही निर्णय होत नाही. ती जमीन रिलायन्सने विकत घेतली होती. त्या जमिनीची किंमत जवळ जवळ ३००० कोटी रुपयांच्या वर होत आहे. सिलींग ॲक्टप्रमाणे एका व्यक्तीच्या नावावर ५०-५२ एकरच्या वर जमीन ठेवता येत नाही. ती जमीन सरकारजमा होते. एकाच वेळी शासनाने ती जमीन एकाच व्यक्तीच्या नावावर केली होती. सदर प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. या सदनाचे माजी सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी हा प्रश्न उपस्थित कला होता. गेली तीन वर्षे मी याचा पाठपुरावा करत आहे. गेल्या महिन्यात सचिव आणि संबंधित मंत्री महोदय यांच्या समवेत बैठक झाली, यावर कोणताही निर्णय होत नाही. याबाबत मी माननीय सभापती महोदयांना विनंती केली, त्यांनी म्हटले की, सभागृहात हा मुद्दा उपस्थित करावा, त्याप्रमाणे मी आता हा मुद्दा मांडत आहे. पुढील महिन्याच्या अखेरीस पर्यंत या प्रश्नाची तड लावून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा, ही माझी विनंती आहे.

**तालिका सभापती ( डॉ.मनिषा कायंदे ) :**सन्माननीय सदस्यांच्या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनची नोंद झालेली आहे. त्याप्रमाणे माननीय सभापती महोदयांना कळविण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येणार आहेत, त्याप्रमाणे संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. यामुळे लक्षवेधी सूचना पुढे ढकलूनही काही उपयोग होत नाही, असे दिसत आहे.

**तालिका सभापती :** संबंधित मंत्रीमहोदयांना निरोप देण्यात येईल.

--------

अप्रकाशित

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर सदस्य नेमणुकीबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

ॲड निरंजन डावखरे: सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्य २ पदाकरिता जाहिरात ऑगस्ट २०२१ मध्ये प्रसिध्द झाली. सामान्य प्रशासन विभागाकडे अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट,२०२१ही होती. या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त अर्जांची छाननी होऊन याबाबत सदस्यांची नावे रेकमेंड करण्याबाबत माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सिलेक्शन कमिटीची नोव्हेंबर,२०२१ च्या पहिल्या आठवडयात बैठक झाली होती. सदर बैठकीत समितीचे इतर सदस्य म्हणजेच प्रधान सचिव, गृह विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली होती. सदर बैठकीत सदस्य रेकमेंड करण्याबाबतचा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला होता. सदर बैठकीचे इतिवृत्त सामान्य प्रशासन विभागाकडे उपस्थित सदस्यांची मान्यता घेऊन अद्यापहि निर्गमित करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य नेमण्याची प्रक्रिया ही मागील आठ महिन्यांपासून प्रलंबित आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी पावसाळी अधिवेशनामध्ये रिक्त सदस्यांची पदे ही १५ दिवसात भरण्याबाबत विधिमंडळामध्ये जाहीर केले होते. लोकसेवा आयोगाचे रिक्त सदस्य पदे भरण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी,अशी माझी मागणी आहे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य ॲड निरंजन डावखरे आपल्या मुद्दयाची नोंद झालेली आहे.

----------------

## माणगाव तालुक्यातील विला-भाकार्डे एमआयडीसीमध्ये सतरा कामगार उपोषणाला बसणेबाबत

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माणगाव तालुक्यातील विला-भाकार्डे एमआयडीसीमधील पॉस्को कंपनीअंतर्गत "इजीटेक" म्हणून एक कंत्राटदार आहे. ती कंपनी मूळ कोरियन आहे. गेल्या दहा दिवसांपासून तेथे सतरा कामगार हे उपोषणाला बसलेले आहेत. कोणतेही कारण न देता तेथील इजीटेक कंपनीने त्यांना कामावरुन कमी केलेले आहे. तेथील प्रांत अधिकारी, तहसीलदार, पोलीस यांनी वारंवार त्या कंपनीला विनंती करुनही आज सतरा कामगारांना कामावर रुजू करुन घेतलेले नाही. त्यापैकी सहा कामगार आज रुग्णालयात उपचाराकरिता भरती करण्यात आलेले आहे. मी शासनाला विनंती करीन की, या इजीटेक कंपनीतील या सतरा कामगारांना तत्काळ कामावर घेण्यासंदर्भात शासनाने निर्देश द्यावेत.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे आपल्या पॉईंट ऑफ इन्फर्मेशनची नोंद घेण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**तालिका सभापती ( डॉ.मनिषा कायंदे ) :** आज गुरुवार,दिनांक २४ मार्च,२०२२ रोजी म.वि.प.नियम १०१ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित करते.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी**. : मकरणपूर,कन्नड,जि.औरंगाबाद येथील वसतिगृह अधीक्षक व इतर इसमांवर प्राणघातक हल्ला करण्याबाबत

**मु.शी**.:मकरणपूर,कन्नड,जि.औरंगाबाद येथील वसतिगृह अधीक्षक व इतर इसमांवर प्राणघातक हल्ला करणे यासंबंधी श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कन्नड शहरातील मकरणपूर परिसरात (जि.औरंगाबाद) कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय अनेक वर्षापासून चालविले जात असून तेथे इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे वर्ग भरविण्यात येत असणे, काही दिवसांपासून विद्यालयातील मुलींची छेड काढून मुलींशी गैरवर्तन करण्यात येत असल्याच्या तक्रारी सदर विद्यालयातील मुलींद्वारे विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचेकडे करण्यात येणे, सदर तक्रारीसंदर्भात मुलींशी छेडछाड करणाऱ्या तरुणाला विद्यालयाचे मुख्याध्यापकांद्वारे जाब विचारण्यात येऊन त्याची समजूत काढण्याचे प्रयत्न करण्यात येणे, तथापि त्याचा राग मनात धरुन दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी सदर तरुणाने तलवारी व धारदार शस्त्रानिशी मुख्याध्यापक, वसतिगृह अधिक्षक व अन्य इसमांवर प्राणघातक हल्ला केल्याची दुर्देवी घटना घडणे, या प्राणघातक हल्ल्यात विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक गंभीर जखमी होणे, त्यामुळे त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात येणे, मुख्याध्यापक, वसतिगृह अधिक्षक व शिपाई यांचेवर हल्ला करणाऱ्या गुन्हेगार तरुणाला पोलिसांना पकडण्यात आलेले अपयश, परिणामी शहरातील जनता व त्या परिसरातील विद्यार्थी व पालक यांचेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना व आलेले नैराश्य, त्यामुळे हल्लेखोर तरुणांना तातडीने पकडून

श्री.विक्रम काळे.....

त्यांचेवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी व त्याप्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता तसेच शाळा सुरक्षा कायदा करण्याची गरज, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. शंभुराज देसाई ( गृह (ग्रामीण ) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझ्या मतदारसंघातील कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथील मकरणपूर नावाच्या गावातील परिसरात म्हणजे कन्नड शहरालगत असलेला हा भाग आहे. दिनांक ०४ फेब्रुवारी,२०२२ रोजी ही घटना घडलेली आहे. कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय अशी नावाजलेली मराठी माध्यमाची शाळा आहे. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचे वर्ग येथे आहेत.

सभापती महोदय, गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचे काम या शाळेच्या माध्यमातून होते. शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळविलेली ही संस्था तेथे कार्यरत आहे. आज कोणत्याही शाळेत विद्यार्थ्यांचे रक्षण करणे, विद्यार्थ्यांचे हित जोपासणे इतकेच नव्हे तर त्यांच्या पालकांची देखील भूमिका शिक्षक बजावत असतात. आई-वडिल जसे पालक असतात, तसेच शिक्षक हे विद्यार्थ्यांचे पालक असतात. त्या ठिकाणी एका विद्यार्थिनीची छेड काढण्याकरिता गुंड प्रवृत्तीचे युवक तेथे फिरत होते. २-३ वेळा त्यांनी मोटारसायकलवर फेऱ्या मारल्या. त्यानंतर ते पुन्हा तेथे आल्यामुळे त्या शाळेचे मुख्याध्यापक या नात्याने त्यांनी त्या मुलांना जाब विचारला. या प्रश्नाची एवढी दाहकता आहे, ती मंत्रीमहोदयांच्या लक्षात आलेली आहे, तरीही मी विषय विस्तृतपणे मांडत आहे. "तुम्ही अशा फेऱ्या का मारता, तुम्ही त्या मुलीची छेड का काढता, " एवढाच प्रश्न त्यांनी त्या मुलांना विचारलेला आहे. त्यात त्या मुख्याध्यापकांचे काय चुकले ? कोणताही शिक्षक, कोणताही मुख्याध्यापक हा आपल्या विद्यार्थ्यांच्या बाबत काही चुकीचे घडत असेल तर त्या विरोधात संबंधितांना जाब विचारण्याचे काम करत असतो. हे त्या मुख्याध्यापकाचे कर्तव्य होते. या घटनेच्या दोन तासानंतर त्या गुंड प्रवृत्तीच्या युवकाने इतर युवकांना सोबत घेऊन मुख्याध्यापकांवर तलवारीने वार केले. एवढेच नव्हे तर त्यांच्यासमवेत त्यांचे जे लिपिक होते त्यांच्यावरही तलवारीने वार केले. थोडक्यात सोबत असलेल्या लिपिकाने मुख्याध्यापकांना बाजूला लोटल्यामुळे डोक्यात तलवार बसली नाही, बाजूला वार झाल्यामुळे मुख्याध्यापक गंभीर जखमी झालेले आहेत. राज्यभरात आज अशा अनेक घटना घडत आहेत. विद्यार्थिनींच्या बाबत जाब विचारला असता अशाच प्रकारे घटना घडत असतात. या प्रश्नांच्या अनुषंगाने मला विचारायचे आहे

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे......

की, या गुंड प्रवृत्तीच्या युवकावर अन्य काही गुन्हे दाखल आहेत का ? ज्यांना आपण अटक केली होती. शेवटी कायदा आहे, त्या युवकाला लगेच अटक झाली. कलम ३०२ चा गुन्हा असताना ते बाहेर सुटले. परंतु यांच्यावर जर दोनपेक्षा जास्त गुन्हे असले तर त्यांच्यावर कठोर शिक्षा ठोठावून तडीपारसारखे कलम लावण्याचे काम सरकार करणार आहे का ? सरकार त्या मुलांविरुध्द कठोर कारवाई करणार आहे का ? अशा घटना रोखण्याकरिता आणि शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य जपण्यासाठी शाळा शिक्षण सुरक्षा कायदा आणणे गरजेचे आहे. शाळा शिक्षण सुरक्षा कायदा आणण्याचे काम शासन तातडीने करणार का ? याअनुषंगाने जसे आता जर कोणी कार्यालयीन कामकाजात अडथळा आणला किंवा शासकीय कार्यालयांमध्ये जे काही अधिकारी-कर्मचारी असतात, त्यांच्यावर हात उगारला तर ३५३ सारखा गुन्हा लावला जातो.

यानंतर श्री.सोनावणे......

असुधारित प्रत

श्री.विक्रम काळे....
हे सुद्धा अनुदानित शाळेतील शिक्षक आणि कर्मचारी आहेत. ते सरकारचे अनुदान घेत असल्यामुळे त्यांना कलम ३५३ लागू होऊ शकते काय, असल्यास, गृह विभागाच्या माध्यमातून संबंधितांवर सदरहू कलम लावण्याचे काम तातडीने करण्यात येईल काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, या घटनेतील आरोपीला गुन्हा दाखल झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अटक करण्यात आली होती. त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी मिळाली होती. त्या चार दिवसात सर्व तपास करुन तो आरोपी आता न्यायालयीन कोठडीत आहे. तो आरोपी अद्याप जामिनावर सुटलेला नाही. माजीद जमालुद्दीन ऊर्फ जमील शेख या आरोपीवर या घटनेपूर्वी दोन गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यातील पहिला गुन्हा दि.२१/०५/२०२० रोजी गु.र.नं.२४४/२०२० आणि दुसरा गुन्हा दि.२५/०५/२०२१ रोजी गु.र.नं. २९८/२०२१ नोंद झाला आहे आणि आता तिसरा गुन्हा दाखल झालेला आहे. शाळेच्या परिसरात मुलींची छेडछाड करण्यासाठी तो आरोपी मोटार सायकलवरुन सतत येरझाऱ्या मारत असल्यामुळे त्याला त्या बाबतचा जाब विचारल्याने त्याने मुख्याध्यापक व संबंधित कर्मचाऱ्यांवर तलवारीने हल्ला केला. या प्रकरणी त्याच्यावर कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे त्याला अद्याप जामीन मिळालेला नाही. या गुन्ह्याचा सखोल तपास करण्याच्या सूचना संबंधित विभागाच्या एसडीपीओ यांना देण्यात येतील. या आरोपीवर दाखल करण्यात आलेले पूर्वीचे दोन आणि आताचा एक, असे तिन्ही गुन्हे विचारात घेऊन त्याची पार्श्वभूमी तडीपारीची असेल तर ती बाब तपासून त्याला तडीपार करता येत असेल तर त्या बाबतची कार्यवाही निश्चितपणे सुरु केली जाईल.

**तालिका सभापती** : मी निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, सभागृहात मोठ्या प्रमाणावर आपापसातील चर्चेचा आवाज येत आहे. माझी विनंती आहे की, ज्यांना चर्चा करावयाची असेल त्यांनी सभागृहाच्या लॉबीमध्ये जाऊन चर्चा करावी किंवा अतिशय हळू आवाजात चर्चा करावी.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, सरकारी कामात अडथळा आणणे किंवा सरकारी कर्मचाऱ्यांना मारहाण करणे या बाबत कलम ३५३ आहे. सरकारी अनुदान घेणाऱ्या शाळांतील लोकांना हे कलम लागू होते काय, या बाबत विधी व

असुधारित प्रत

न्याय विभागाचा अभिप्राय मागविला जाईल. त्यांचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर या
श्री.शंभुराज देसाई....
प्रकरणी उचित निर्णय करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी शाळा सुरक्षा कायदा लागू करण्याबाबत चांगली सूचना केली आहे. विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सन्माननीय सदस्यांची एक बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीमध्ये या विषयी सविस्तर चर्चा करुन माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी त्या बैठकीचे प्रारुप ठेवण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन या विषयी सुद्धा उचित निर्णय घेतला जाईल.

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदया, ही घटना एका दिवसापुरती मर्यादित नाही. कारण या घटनेतील आरोपी वारंवार शाळा परिसरात येत होता. मुख्याध्यापक असलेल्या श्री.चव्हाण यांनी त्या व्यक्तीला वारंवार येण्याबाबतचा जाब विचारल्यावरुन त्याने त्यांच्यावर हल्ला केला. मी स्पेसिफिक विचारतो की, यापूर्वी मुख्याध्यापक किंवा पालकांनी त्या तरुणाच्या बाबतीत पोलिसांकडे तक्रार केली होती काय, असल्यास, ही घटना घडण्यापूर्वी पोलिसांनी त्या तक्रारीची दखल घेतली होती काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, पालकांची अथवा विद्यार्थ्यांची त्या तरुणाच्या बाबतीत पोलिसांकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही. त्यांनी शाळा व्यवस्थापनाकडे तक्रार केली असेल तर ती पोलिसांपर्यंत आलेली नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.अंबादास दानवे यांना सांगू इच्छितो की, या वर्षीच्या अर्थसंकल्पात सातारा जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आलेला महिला सुरक्षा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थसंकल्पीय भाषणात त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. शाळा, कॉलेज, खाजगी संस्था, खाजगी शिकवणी वर्ग अशा गर्दीच्या ठिकाणी साध्या वेशातील पुरुष व महिला पोलीस, बीट मार्शल वावरत असतात. हा चांगला प्रकल्प असून तो सातारा जिल्ह्यात यशस्वी झाला असून, १ लाख ३० विद्यार्थीनींपर्यंत साताऱ्याचे पोलीस पोहचले आहेत. तो प्रकल्प राज्यभर राबविणार आहोत. अधिवेशन संपल्यानंतर मी लवकरच त्या विषयी उच्चस्तरीय बैठक आयोजित करणार आहे. महिलांच्या व विद्यार्थीनींच्या सुरुक्षेला महाविकास आघाडी सरकारने प्राधान्य दिलेले आहे आणि या बाबतीत

असुधारित प्रत

त्याची पूर्णत: दक्षता घेतली जाईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्हा सर्व शिक्षक आमदारांची मागणी आहे की, शाळा सुरक्षा कायदा करण्यासाठी राज्य सरकार समिती घटित करेल काय ? तसेच या बाबतचा निर्णय जलद गतीने होण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येतील काय ? माननीय मंत्र्यांनी दामिनी पथकाचे सूतोवाच केले आहे. ही पथके तालुका आणि जिल्हा स्तरावर आहेत. परंतु ही पथके कार्यरत नसतात. त्यामुळे विभागाच्या माध्यमातून या बाबतीत पुन्हा परिपत्रक काढून शाळा, महाविद्यालयात त्या पथकाने दिवसातून किमान एक राऊंड घेण्याबाबत सक्तीची सूचना निर्गमित करण्यात येईल काय ?

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, मी अगोदरच सांगितले आहे की, दोन्ही सभागृहात शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व लोकप्रतिनिधींची एक बैठक आयोजित करण्यात येईल. त्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात येईल. त्या बैठकीमध्ये समिती घटित करण्याबाबत एकमताने ठरले तर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने त्यावर निर्णय घेण्यात येईल. तसेच दामिनी पथकाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, दामिनी पथक पूर्वीपासूनच स्थापन केलेले आहे. परंतु सातारा जिल्ह्यात आम्ही पथदर्शी प्रकल्प राबविला आहे. त्यामध्ये विशेष पद्धतीच्या योजना केल्या आहेत. त्या सर्व योजना सांगून मी सभागृहाचा वेळ घेत नाही. परंतु अधिवेशन संपल्यानंतर सातारा जिल्ह्यातील पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यात राबविण्यात येईल. सातारा जिल्ह्याच्या सहायक पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांना या पथदर्शी प्रकल्पाचे को-आर्डीनेटर म्हणून नेमले होते. त्यांनी यामध्ये खूप चांगले काम केलेले आहे. मी अगोदर सांगितल्यानुसार १ लाख ३० हजार विद्यार्थीनींपर्यंत त्या पोहचल्या. या प्रकल्पामुळे मुलींमध्ये खूप चांगला आत्मविश्वास निर्माण झाला आहे. मी स्वत: एकटाच साध्या कपड्यात दुचाकीवर तीन महाविद्यालय परिसरात गेलो होतो. मी त्या महाविद्यालयांतील विद्यार्थीनींशी संवाद साधला. त्यावेळी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास आल्याचे जाणवले. हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात केल्यानंतर एकाच महिन्यात टवाळखोरी करणाऱ्या तरुणांमध्ये

असुधारित प्रत

साध्या वेशातील पोलीस आसपास असल्याचे मेसेज गेला. हा अतिशय परिणामकारक असा प्रकल्प आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे आम्ही या प्रकल्पाचे सादरीकरण केले आहे. हा प्रकल्प संपूर्ण राज्यभर राबविण्यात आला तर असे प्रकार निश्चितपणे कमी होण्यास मदत होईल.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय हे सातारा येथील पथदर्शी प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती देणार आहेत. मलाही त्यांनी या प्रकल्पाबाबत अनौपचारिकपणे माहिती दिली आहे. त्यांनी सांगितल्यानुसार समिती सुद्धा घटित होईल. परंतु सातारा पथदर्शी प्रकल्पाबाबत आम्हा सर्वांनाच जाणून घेण्यात रस आहे. मला वाटते आपण या प्रकल्पाबाबत एखादे माहिती पत्रक दिले तर आम्हाला त्याची माहिती होऊ शकेल.

श्री.शंभुराज देसाई : सभापती महोदया, निश्चितपणे या प्रकल्पाची सर्व माहिती अवगत करण्यात येईल.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

-----------

असुधारित प्रत

**लक्षवेधी सूचना क्रमांक-२ बाबत.**

**तालिका सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, माननीय मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी पत्र दिले आहे की, काही कारणास्तव ते या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. उद्याचे कामकाज सुद्धा कदाचित आजच्या कामकाजापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. आपण सर्व मिळून ठरवू त्यानुसार कामकाज होईल. आज ज्या लक्षवेधी सूचना दर्शविण्यात आलेल्या आहेत त्या उद्या घेतल्यास न्याय मिळू शकणार नाही. माझी विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना आता न घेता आज शेवटी घ्यावी. मंत्री महोदय, विधानसभेत व्यस्त असतील तर या लक्षवेधी सूचनेला माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी चालू शकेल. सरकारच्या वतीने या बाबत फ्लोअर मॅनेजमेंट करावयास पाहिजे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आपल्या विनंतीची नोंद घेण्यात आली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-३ चर्चेला घेण्यात येईल.

------------

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

**पृ.शी.:** मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्ट्यांतील शाळांच्या विकासासाठी कायद्यात सुधारणा केलेली असताना सुध्दा एसआरएने शाळांच्या पुनर्विकासासाठी वाढीव एफएसआय देण्यास नकार देणे.

**मु.शी.:** मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्ट्यांतील शाळांच्या विकासासाठी कायद्यात सुधारणा केलेली असताना सुध्दा एसआरएने शाळांच्या पुनर्विकासासाठी वाढीव एफएसआय देण्यास नकार देणे यासंबंधी श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदया, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नगरविकास विभागाने मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्ट्यांतील शाळांच्या विकासासाठी दिनांक २८ जून, २०१३ रोजी Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Modification to Regulation No.33 (10) of Development control Regulation for Gr. Mumbai under section 37(2) of the Act या अधिसूचनेद्वारे आवश्यक सुधारणा झाली असणे, या सुधारणांन्वये प्रत्यक्ष ताब्यातील जागा यापेक्षा शाळांच्या वर्गखोल्यांसाठी आवश्यक असलेली प्रतिखोली ४१० चौ. फूट जागा प्रति मंजूर वर्गतुकडयांनुसार वाढीव FSI उपलब्ध झाल्याने SRA अंतर्गत या शाळांचा मुंबईच्या मूळ DC रूलनुसार विकास शक्य होणे, तथापि, नव्या DP रूलमध्ये या सुधारणांचा उल्लेख नसल्याचे कारण सांगून SRA प्राधिकरणाने पुनर्विकासामध्ये वाढीव FSI ला नकार देणे, या संदर्भात दिनांक २८ जून, २०१३ ची अधिसूचना अंमलात येण्याची आवश्यकता असणे, मुंबई महानगरपालिकेतील माध्यमिक शाळेत सेवानिवृत्त

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील ....

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार निवृत्ती वेतन मिळत नसणे, सदर शिक्षकांची पी.एफची रक्कम महानगरपालिकेकडे ठेवण्यात येणे, शासनाच्या नियमाप्रमाणे पेन्शनची रक्कम ज्या संस्थेकडे पी.एफची रक्कम ठेवण्यात येते, त्या संस्थेला पेन्शनची रक्कम देणे बंधनकारक असणे, राज्य शासनाच्या हिश्याचा विचार न करता मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १०४ खाजगी विनाअनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन देण्याची आवश्यकता असणे, गरीब व गरजू विद्यार्थी यांचा विचार करुन रात्रशाळा आणि खाजगी दिवस शाळा कार्यरत राहण्यासाठी महानगरपालिकेच्या शालेय इमारतीत भाडेतत्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांसाठी सन २०२०-२०२१ चे कोरोना कालावधीमधील अग्रीम स्वरूपात आकारलेले वार्षिक भाडे संपूर्ण माफ करण्याची आवश्यकता असणे, सदर वर्गखोल्यांकरीता दरवर्षी होणारी १० टक्के वार्षिक भाडेवाढ आकारणी रद्द करण्याची मागणी होत असणे, केवळ नाममात्र दरात रात्रशाळांना वर्गखोल्या उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

श्री. प्राजक्त तनपुरे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, मी ज्या कारणासाठी लक्षवेधी सूचना मांडली होती, त्याचे पूर्ण समाधान या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनातून झालेले नाही. मुंबईतील बहुतांश शाळा झोपडपट्ट्यांमध्ये आहेत. येथे मुंबईचे माननीय पालकमंत्री श्री. अस्लम शेख उपस्थित आहेत. त्यांच्या मतदारसंघात एकही शाळा आरक्षित प्लॉटवर नाही, सर्व झोपडपट्ट्यांमध्ये आहेत. त्या शाळांना संरक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्विकासासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात सुरुवात झाली आणि माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री होते, त्यावेळी दिनांक २८ जून २०१३ रोजी एक अधिसूचना निर्गमित करण्यात आली. या अधिसूचनेनुसार या शाळांच्या ताब्यात असलेले क्षेत्र, तेवढीच जागा न देता, डीसी रुलमध्ये शाळांना आवश्यक असलेले क्षेत्र हा फरक आहे. एसआरएमध्ये तुमच्या ताब्यात कितीही क्षेत्र असले तरी खोली २५०-३०० चौ. फु.ची मिळते. कारण त्याचा निर्णय तुम्ही घेतला आहे. मुंबईच्या डीसी रुलमध्ये असा भाग होता की, प्रति वर्ग खोली ४१० चौ.फु. कारपेट क्षेत्र असले पाहिजे. पण २५०-३०० चौ.फु. मिळायचे.

सभापती महोदया, या अधिसूचनेने त्याची सोडवणूक केली होती की, मुंबईच्या डीसी रुलप्रमाणे त्यांच्या त्याब्यात कितीही क्षेत्र असले तरी पुनर्विकास करताना इयत्तेप्रमाणे, आवश्यकतेप्रमाणे प्रति खोली ४१० चौ.फु.दिले पाहिजे. नवीन डीसी रुल आला. तो सन २०३४ पर्यंत लागू राहणार आहे. त्यामध्ये नियम ३३(१०) च्या संदर्भातील तरतूद होती, जी एका अधिसूचनेने केली होती. मात्र तिची दखल घेतली नाही त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. तिसऱ्या परिच्छेदामध्ये असे सांगितले आहे, त्यातून कदाचित परवानगी मिळू शकेल. पण स्पष्टीकरण होत नाही. त्यामध्ये असे म्हटले आहे की, अनारक्षित भूखंडावर नियमानुसार परवानगी घेऊन बांधण्यात आलेल्या शाळांचा विद्यमान भूवापर विचारात घेऊन विकास योजना-२०३४ मध्ये विद्यमान शाळा दर्शविण्यात आलेल्या शाळांचा सदर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १३ उप खंड २ ए मधील तरतुदीनुसार सदर नियमावलीतील अटी व शर्ती तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या धोरणांची पूर्तता करण्याचे अटीसापेक्ष अतिरिक्त चटई क्षेत्राचा वापर करुन पुनर्विकास करण्याची तरतूद आहे.

असुधारित प्रत

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदया, ही जर तरतूद असेल तर मूळ डीसी रुलनुसार, ज्याच्यात ४१० चौ.फु. प्रमाणे अशी आजही तरतूद आहे. मात्र एसआरएमध्ये गेल्यानंतर त्यांना या डीसी रुलचा फायदा मिळेल की नाही ते अनुलिख्वित आहे. तुमच्या उत्तरामध्ये त्यातून मार्ग निघेल का हा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदया, जोगेश्वरीला त्रिपाठी सरांची शाळा आहे. माननीय पालकमंत्री श्री. अस्लम शेख यांच्या मतदारसंघातील शाळा आहेत. त्रिपाठी सरांच्या शाळेचे नाव सनफ्लॉवर सेकंडरी स्कूल आहे. बेहरामबाग येथे ती आहे. नवीन विकास नियमावली येण्याच्या आधी त्यांना ४१० चौ.फु.प्रमाणे चटईक्षेत्र मंजूर झाले. आता सन २०३४ ची नवीन नियमावली आल्यानंतर तेच अधिकारी म्हणतात की, याचा उल्लेख नाही. ती आधीची अधिसूचना आहे. नवीन नियमावलीत त्याचा उल्लेख नसल्यामुळे दखल घेतल गेली नसल्यामुळे तुम्हाला मात्र आता २५० चौ.फु. मिळेल. त्यामुळे हा प्रश्न आहे. हा एकट्या सनफ्लॉवर शाळेचा प्रश्न नाही. सर्वच शाळांचा प्रश्न आहे. त्यामुळे या संदर्भातील आवश्यक अधिसूचना पुन्हा काढण्यात येईल का ? जर ही तरतूद पुरेशी असेल तर नगरविकास विभागाच्या सचिवांच्या समवेत बैठक घेऊन हे करणार का ?

सभापती महोदया, माझ्या फक्त २ प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली आहेत. रात्र शाळा आणि दिवसाच्या शाळा महानगरपालिकेच्या इमारतीत भरतात. त्यांना भाडे घेऊच नका असे आदेश तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिले होते, त्यानुसार पुढील १० वर्षांत तसे घेतले गेले नाही, पण नंतर पुन्हा भाडे वाढ सुरु झाली. मराठी, हिंदी, ऊर्दू शाळा आहेत, तेथे गरीब मुले आहेत. रात्र शाळेत तर वेटर शिक्षण घेतात. दिवसभर काम करणारी मुले तेथे शिकतात. ते फी देऊ शकत नाहीत. त्या शाळांकडून भाडे घेणेच चुकीचे आहे असे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आदेशात म्हटले होते. त्यामुळे ती माफी तुम्ही देणार का ? त्यांनी बाजारभावाशी तुलना केली आहे. बाजारभावाच्या तुलनेत हे विचार करीत आहेत हे बरोबर नाही. आपल्याला हे बाजारभावानुसार कसे

श्री. कपिल पाटील ....

करता येईल, हे काय इंजिनिअर कॉलेज आहे का ? तुम्ही खाजगी विद्यापीठाचे विधेयक संमत केले. हे काय खाजगी विद्यापीठे आहेत का ? तुम्ही त्यांच्याकडून बाजारभावाप्रमाणे घ्यावे. तुम्ही त्यांना ती फी माफ करणार का ?

सभापती महोदया, माझा तिसरा प्रश्न महत्त्वाचा आहे. तो आपल्याशी देखील निगडीत आहे. १०४ शाळा सापेक्ष मंजुरीची वाट पाहत आहेत. शासनाच्या सापेक्ष मंजुरीनंतर काम होणार आहे. महानगरपालिका श्रीमंत आहे, त्यांना पगार देण्यास काही अडचण नाही. पगार द्यायलाही तयार आहेत. पण शासनाची सापेक्ष मंजुरी मिळत नाही. त्यामुळे महानगरपालिकेतील शाळांचा प्रश्न आहे, मग तो पीएफ, पेन्शन, पगार, अनुदान यांचा असेल. माननीय नगरविकास मंत्री, माननीय पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे, हे मुंबई महानगरपालिकेचे एका अर्थाने पालकमंत्री आहेत, उपनगराचे पालकमंत्री आहेत, पण मुंबईचा सर्व भाग त्यांच्याकडे आहे आणि मुंबईचे माननीय पालकमंत्री यांच्या उपस्थितीत बैठक घेतल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. दोन्ही माननीय पालकमंत्र्यांना बोलवावे लागेल. कारण मुंबई मोठी आहे. आपण ती बैठक बोलाविणार आहात का ? आपण त्यांचे काम सोपे केले पाहिजे.

श्री. प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, मुंबईत झोपडपट्टी परिसरामध्ये शाळा आहेत. जेव्हा झोपडपट्टीचा पुनर्विकास होतो तेव्हा त्या अनुषंगाने त्या शाळांचे नंतर काय होते या संदर्भातील अत्यंत संवेदनशील प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. मी सन २०१३ च्या आधीचे सांगत आहे. सन २०१३ च्या आधी एखाद्या झोपडपट्टीचा एसआरएमध्ये पुनर्विकास झाला तर त्यावेळी जे काही शाळेचे क्षेत्रफळ असेल तेवढेच त्या एसआरएचा डेव्हलपर करायचा आणि तेवढेच द्यायचा. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार एमआरटीपी ॲक्ट ३७ ला दुरुस्ती करुन डीसीआरमध्ये सन २०१३ मध्ये बदल केले. नियम ३३(१०) मध्ये बदल केले, त्यानंतर असे सांगितले की, जरी ती शाळा १०० चौ.फु.ची असेल तरी त्या भागातील एसआरए प्रकल्प होईल तेव्हा, डीसीआरमध्ये किमान सांगितले आहे की, ४१० चौ.फु. तेथे मिळावे, रिहॅब कम्पोनन्ट ४१० चा आणि त्याच्या करस्पॉन्डिंग त्याला

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे ....

सेलेबल पोर्शन मिळेल, अशी तरतूद सन २०१३ ला केली. सन २०१८ मध्ये सन २०३४ चा डीसीआर आला, त्यामध्ये मात्र ही तरतूद नाही हे जे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते बरोबर आहे. तशी तरतूद नाही. मी स्वत: संपूर्ण डीसीआर पाहिला, त्यामध्ये तरतूद नाही. जे आहे तेच करावे असे आहे. दुर्दैवाने हे काही योग्य नाही. कारण शिक्षण क्षेत्राबाबत एवढे बोलले जात असताना झोपडपट्टी परिसरातील शाळा आहेत, एसआरएचा प्रकल्प राबवितो, अगदीच कंजस्टेड शाळा आहे, तेथे सर्व पुनर्विकास होत असेल आणि परत तेवढीच छोटी-मोठी शाळा करणे हे उचित वाटत नाही. त्यामुळे या संदर्भात निश्चितपणे मुंबई महानगरपालिकेला नियम ३७(२) राबविण्याच्या सूचना निर्गमित करण्यात येतील. कारण हा योग्य प्रश्न आहे.

सभापती महोदया, रात्र शाळेच्या भाड्याच्या बाबतीत प्रश्न मांडला. निश्चितपणे मी माहिती देतो. तिसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत आधी सांगतो. आता येथे माननीय पालकमंत्री उपस्थित आहेत. मला असे वाटते की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनाच विनंती केली पाहिजे. कारण मुंबई महानगरपालिकेचे म्हणणे आहे की, राज्य शासनाकडे अनुदानापोटी जवळपास सुमारे पाच हजार कोटी रुपये त्यांचे थकलेले आहेत. त्यामुळे सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन देऊ शकत नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. मी याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे देखील विनंती करुन, दोन्ही माननीय पालकमंत्री अशी एक बैठक घेऊ आणि त्याच बैठकीत दुसरा मुद्दा देखील चर्चेला घेऊ. रात्रशाळेच्या भाड्याच्या बाबतीत तुमची संवेदना अत्यंत योग्य आहे. आपण त्याबाबतीत विचार करु.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदया, एक अत्यंत महत्त्वाची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांनी आणली आहे. मुंबईत अनधिकृत बांधकाम मोठ्या प्रमाणात होत असताना शाळांना जागा मिळत नाही. आज त्या शाळा मेहनतीने चालविल्या जात आहेत. मात्र त्या अनधिकृत शाळा म्हणून त्यांना अडचणीत आणले जात आहे. झोपडपट्टीत शाळा चालवित आहेत, ती अनधिकृत असल्यामुळे बंद करा असे म्हणून

श्री. प्रवीण दरेकर ....

त्यांच्या मागे लागण्यात येते. आता त्या शाळा नियमित करुन घेण्याची जबाबदारी आपली आहे. आपण अनधिकृत झोपड्या असल्या तरी एसआरए प्रकल्प करतो.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

शाळांच्या सुरक्षेची जबाबदारी आपण घेतली पाहिजे. मुंबईत शाळांसाठी व शैक्षणिक परपजसाठी किती भूखंड आरक्षित आहेत. ते आरक्षण उठवून इतर वापरासाठी किती भूखंड दिले ही माहिती आता आपणाकडे नसेल तर ती पटलावर ठेवण्यात येईल काय ? एसआरए होत असताना किंवा इतर डेव्हलपमेंट करीत असताना शैक्षणिक कामासाठी काही जागा द्यायच्या असतात. बरेच प्रकल्प मंजूर होत असताना जागा देण्याचे कबूल केले जाते. परंतु प्रकल्प पूर्ण झाल्यावर ती जागा देण्यात येत नाही व ती इतर कारणांसाठी वापरण्यात येते असे असेल तर त्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, विरोधी पक्ष नेत्यांनी दोन तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. अनधिकृत शाळांचा विषय विचारला आहे. नगरविकास विभागाकडे अधिकृत शाळा असेल तर तिचा पुनर्विकास व्यवस्थित व्हावा हा लक्षवेधी सूचनेचा विषय आहे. शाळा अधिकृत व अनधिकृत असणे हा विषय शालेय शिक्षण विभागाचा आहे, शाळांनी योग्य शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे. शाळेला अधिकृरित्या मान्यता घेऊन विद्यार्थ्यांचे संरक्षण होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी शासनाची आहे. या प्रश्नाबाबत शालेय शिक्षण मंत्री महोदयांशी चर्चा करण्यात येईल. किती भूखंड आरक्षित आहे हा लक्षवेधी सूचनेचा विषय नसला तरी आपण मागितलेली माहिती आपणाला देण्याची व्यवस्था करतो.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदया, ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे, ठाणे महानगरपालिकेत अशीच परिस्थिती आहे. शहरीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे, मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीची वाढ झाली आहे. तेथे छोट्या प्लॉटवर काही शाळा आहेत तेथे गरीबांची मुले शिक्षण घेतात. त्या शाळांच्या विकासासाठी डीसी रुल्सनुसार विकास करण्यात येईल काय ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मुंबईत समानता आणली जाईल असे नमूद केले आहे ती बाब ठाणे शहरासाठी व एमएमआरसाठी लागू करण्यात येईल काय ?

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, बाकी ठिकाणी युनिफाईड डीसीआर लागू आहे, मुंबईचा डीसीआर वेगळा आहे, ही लक्षवेधी सूचना मुंबईपुरती मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांनी जी भावना मांडली त्याची दखल घेण्यात येईल. हा विषय या लक्षवेधी सूचनेच्या स्कोपच्या बाहेरचा आहे त्याबाबत काय तरतूद आहे ती पाहून ठरविण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्ताला कोणताही मोबदला मिळालेला नसणे

**मु.शी.** : स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्ताला कोणताही मोबदला मिळालेला नसणे यासंबंधी श्री. अभिजीत वंजारी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अभिजीत वंजारी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्रातील मौजा पुनापूर, मौजा पारडी, मौजा भांडेवाडी येथे महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियमानुसार स्मार्ट सिटी प्रकल्प योजिला असणे,राज्यामध्ये समृध्दी महामार्ग, नागपूर शहरातील मेट्रो रेल्वे प्रकल्प, पुणे येथील मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि इतर अन्य राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रकल्पग्रस्त प्लॉट, जमीन अथवा शेती धारकांना रेडीरेकनरप्रमाणे चारपट मोबदला देण्यात आलेला असणे, परंतु स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्ताला कुठलाही मोबदला न मिळता त्याची ४० टक्के जमीन, शेती अथवा प्लॉट या प्रकल्पांतर्गत हस्तगत केल्या जात असून शिल्लक ६० टक्के जागेला नियमानुकूल करण्यासाठी प्रती चौरस फूटाप्रमाणे रक्कम भरावी लागत असणे, ही बाब अन्यायकारक असल्याने बाधीत प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना याबाबत राज्य शासनाने पुर्नविचार करुन राज्यातील आणि देशातील इतर योजनांप्रमाणे प्लॉट, शेती, जमीनधारकाला मोबदला देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

श्री.प्राजक्त तनपुरे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदया, अत्यंत महत्वाच्या विषयावर मला लक्षवेधी सूचना मांडायची आहे. सभागृहातील सन्माननीय सदस्य व मंत्री महोदयांचे मला याकडे लक्ष वेधायचे आहे. राज्यात डेव्हलपमेंट प्रोजेक्ट होत असताना काही प्रोजेक्टमध्ये ज्यांचे अफेक्टेट प्लॉट, जमीन किंवा शेतीची जमीन जाते त्यांना चांगला मोबदला मिळालेला आहे. काही ठिकाणी प्रोजेक्ट होत असताना काहीच मोबदला मिळत नाही.अशा प्रकारची तफावत काही प्रोजेक्टमध्ये आहे. स्मार्ट सिटीचा प्रोजेक्ट नागपूर पूर्व विधानसभा क्षेत्रात सुरु आहे. या विधानसभा क्षेत्रातून मी निवडणूक लढलो म्हणून माझा प्रत्यक्ष संबंध आलेला आहे. यासाठी मी अनेक वेळा आंदोलने केली आहेत. सन २०१४ मध्ये केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर वित्त मंत्री स्व. अरुण जेटली होते. त्यांनी बजेट मांडतांना देशात १०० स्मार्टसिटी करण्याचा निर्धार केला होता. त्यासाठी त्यांनी काही निधीची तरतूद केली होती. त्याबाबत कोठे काय झाले याबाबत मला काही विचारायचे नाही. नागपूर मध्ये टाऊन प्लॅनिंग एमआरटीपी ॲक्ट १९६६ नुसार, नागपूर शहरात राज्य शासन व एनआयटी यांना सोबत घेऊन स्मार्ट सिटी प्रकल्प सुरु केला. समृध्दी महामार्ग हा माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. तो आता पूर्णत्वास येत आहे. तो प्रोजेक्ट टाऊन प्लॅनिंगच्या अखत्यारित येत नाही. तो गावात नसून हायवेलगतच्या तेथे जमिनी होत्या. नॅशनल हायवे ॲक्ट व लॅन्ड पुलिंगची पॉलिसी ॲडॉप्ट केली. सामान्य शेतकरी, कामगार यांच्या जमिनी होत्या त्यावर त्यांचा उदरनिर्वाह होता. तेथील शेतकऱ्यांना फायदा व्हावा यासाठी लॅन्ड पुलिंग पॉलिसी ॲडॉप्ट केली जाते. त्यामध्ये ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांना चारपट मोबदला देण्यात आला. नागपूर शहरात मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून मेट्रोचे काम सुरु आहे. पुणे शहरात मेट्रोची कामे सुरु आहेत.तेथील प्रकल्प बाधितांना अत्यंत चांगला मोबदला मिळाला आहे. फक्त स्मार्ट सिटी प्रकल्पातील लोकांना चांगला मोबदला मिळाला नाही. उलट ज्यांचे प्लॉट, घरे व जमीन जात आहेत त्यांच्याकडील ४० टक्के जमीन शासन अधिग्रहित करीत आहे. उरलेली ६० टक्के जमीन रेग्युलाईज करण्यासाठी डेव्हलपमेंट शुल्क भरायचे आहे. तेथे हे शुल्क जास्त आहे. नागपूर सुधार प्रन्यास किंवा महानगरपालिका ही एजन्सी असती तर त्यांचे डेव्हलपमेंट शुल्क ठरलेले आहे. तेथे आता अव्वाच्या

श्री.अभिजीत वंजारी.....

सव्वा डेव्हलपमेंट शुल्क लावण्यात आले आहे. करोडो रुपये त्यांना भरायचे आहे त्यासंदर्भातील नोटीसा माझ्याकडे आहेत. एमआरटीपी ॲक्ट १९७४ नुसार त्यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यातील सेक्शन १०० प्रमाणे अफेक्टेड व्यक्तींना शासनातर्फे द्यायची रक्कम शून्य आहे. सेक्शन ९८ नुसार लोकांनी भरावयाची रक्कम करोडो रुपये आहे. प्रति स्क्वेअर मीटर प्रमाणे १३,८९९ रुपये भरायचे आहेत. प्रति स्क्वेअर फूट प्रमाणे १२९१ रुपये, प्रति एकराचा विचार केला तर ५ कोटी ७९ लाख ९० हजार २९ रुपये, प्रति हेक्टरचा विचार केला तर १४ कोटी ९१ लाख ३५२ रुपये भरायचे आहेत. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, या ठिकाणी असा भेदभाव का केला जात आहे. तेथे राहणारे कामगार,शेतकरी आहेत. कळमना मार्केटमध्ये काम करणारे मजूर आहेत. त्यांची घरे किंवा जुनी शेती आहेत. ही पार्श्वभूमी सांगण्याची गरज आहे. त्या शिवाय हा विषय कोणाला समजणार नाही.काही प्रोजेक्टमध्ये लॅन्ड पुलिंगचा आधार घेतला जात आहे. ४० टक्के जमीन अधिग्रहित केल्यानंतर त्यांना किती मोबदला देण्यात येणार आहे. उर्वरित ६० टक्केसाठी जे शुल्क आकारण्यात येणार आहे ते झिरो करण्यात येईल काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत सविस्तरपणे प्रश्न विचारला आहे. त्यांची यामध्ये थोडी गफलत होत आहे. समृध्दी महामार्गासाठी जमीन घेतली त्यासाठी इतका मोबदला दिला. सन २०१३ मध्ये युपीए सरकारच्या काळात भूसंपादनाचा कायदा माजी पंतप्रधान श्री.मनमोहन सिंह असताना झाला. जमीन संपादित करतो त्यावेळी चारपट मोबदला देण्याची तरतूद त्या कायद्यात आहे. एखाद्या प्रकल्पासाठी जमीन संपादित करतो त्यासाठी त्या तरतूदी लागू आहेत. नागपूर शहरात टाऊन प्लॅनिंग योजना सुरु आहे. यामध्ये कोणाची जागा घेतो असा विषय नाही. लॅन्ड पुलिंग करुन लॅन्ड डेव्हलप करतो. अन् डेव्हलप जागा घेऊन त्या डेव्हलप करुन त्या लोकांना परत देण्यात येतात. ओरिजनल प्लॉट १०० युनिटचा असेल तर डेव्हलप प्लॉट ६० युनिटचा व ४० युनिटचा प्लॉट इतर कामासाठी वापरणे ही टाऊन प्लॅनिंगच्या एमआरटीपी ॲक्टमध्ये तरतूद आहेत. त्या ॲक्टप्रमाणे ही

असुधारित प्रत

श्री.प्राजक्त तनपुरे...

कार्यवाही करण्यात आली आहे. याची व भूसंपादनाची गफलत होऊ नये अशी माझी विनंती आहे. त्यामध्ये बेटरमेंट चार्जेस नियमाप्रमाणे आहेत. मूळात येथे भूसंपादन करण्यात आले नाही. ज्या भावनेने सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न विचारला तेथील लोकभावना वेगळी असू शकते. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत त्यामध्ये तेथे रस्ते व इतर सोई सुविधा करण्यासाठी ६५० कोटी रुपये मिळणार आहेत. त्यातून रस्ते व तेथील पूलांची कामे करण्यात येणार आहे. टाऊन प्लॅनिंग योजनेच्या नकाशाप्रमाणे एखादा रस्त्यात कोणाचे घर येत असेल तर ती जागा संपादित करुन त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार त्या घराची किंमत काढताना घसारा न धरता रक्कम देण्यात येते. त्या कामांसाठी ८० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मूळ प्रश्नामध्ये भूसंपादन नसून लॅन्ड पुलिंग करुन डेव्हलप प्लॉट देण्याचा विषय आहे. तेथील लोकांची भावना काय आहे व त्यांचा विरोध असेल आणि सदर चार्जेस लोकांना जास्त वाटत असतील किंवा ४० टक्के ॲक्वीझिशन लोकांना नको असेल तर याबाबत बैठक आयोजित करुन लोकभावनेचा विचार केला जाईल.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया, नगर परियोजन जमीन विकास नावाची स्कीम आहे. नागपूर येथे एनएमसी आणि एनआयटी अशा दोन संस्था आहेत. या योजनेचा कन्ट्रोल एनआयटीकडे होता. एनआयटीमध्ये केवळ ५ ट्रस्टी असतात. एनआयटीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश नसतो. (...अडथळा...) ज्यावेळी हे झाले त्यावेळी दोन प्रतिनिधी नव्हते. श्री.सोनावणे नावाच्या अधिकाऱ्यांनी एनआयटीकडून नगर रचना परियोजना मंजूर करुन घेतली. त्यानंतर एनआयटी बरखास्त झाली. एनआयटी बरखास्त झाल्यानंतर हा विषय महानगरपालिकेकडे आला. महानगरपालिकेने सभागृहात एकमताने ठराव पारीत केला. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व अपक्ष नगरसेवकांनी एकमताने ठराव पारीत केला की, नगर रचना परियोजना रद्द करण्यात यावी. आम्हाला ही स्कीम मंजूर नाही. तेथे ३ लाख नागरिक राहतात. तेथे ३ लाख प्लॉट आहेत. माझा प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेच्या सभागृहाने एकमताने ठराव पारीत करुन शासनाकडे पाठविलेला आहे. शासन त्या ठरावाला मंजुरी देणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पासाठी आलेला १ हजार कोटी रुपये निधी पडून आहे. अद्याप ९ टक्के सुद्धा काम झालेले नाही. त्याचे कारण असे आहे की, नागरिक या योजनेसाठी तयार नाहीत. माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी साहेबांनी १० बैठका घेतल्या आणि माननीय पालकमंत्री श्री.नितीन राऊत साहेबांनी देखील २ बैठका घेतलेल्या आहेत. सर्वांनी सांगितले की, येथे स्कीम होऊ शकत नाही. शासन नगर रचना परियोजना रद्द करणार आहे काय ? महानगरपालिकेने पाठविलेल्या ठरावाला मंजुरी देण्यात येणार आहे काय ? ज्या नागरिकांचा ४० टक्के प्लॉट जाणार आहे त्यांना नवीन योजनेनुसार मोबदला मिळणार आहे काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, महानगरपालिकेत ठरावाला एकमताने विरोध करण्यात आलेला आहे. टाऊन प्लॅनिंग स्कीम करु नये असे त्यांचे म्हणणे आहे. यामध्ये विरोधाभास दिसून येतो. कारण स्मार्ट सिटीच्या बोर्डावर महानगरपालिकेचे महापौर....

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया,......

अप्रकाशित प्रत

**तालिका सभापती (डॉ.मनिषा कायंदे) :** आपण कृपया मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदया, महानगरपालिकेचे महापौर स्मार्ट सिटीच्या बोर्डावर आहेत. स्थायी समितीचे चेअरमन व अशासकीय सदस्य देखील त्या बोर्डावर आहेत. तत्कालीन शासनाने अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली होती. महापौर, स्थायी समितीचे सदस्य, अशासकीय सदस्यांकडून हा विषय पुढे गेलेला आहे. त्यांनी या संदर्भात कोणती भूमिका घेतली हे मला माहिती नाही. परंतु स्मार्ट सिटीच्या बोर्डाने हा विषय मंजूर केलेला आहे. मी मघाशी सांगितले की, त्यांनी मंजूर केले असेले तरी बैठक घेऊन लोक भावनेचा विचार केला जाईल.

श्री.प्रवीण दटके : सभापती महोदया, मी स्वत: महापौर म्हणून स्मार्ट सिटीच्या बोर्डावर डायरेक्टर होतो. माझ्या नंतर श्री.संदिप जोशी, श्री.दयाशंकर तिवारी, श्रीमती जिचकार मॅडम डायरेक्टर होत्या. आम्हाला ही स्कीम करावयाची नाही असा ठराव तेथे बहुमताने मंजूर झालेला आहे. श्री.सोनावणे नावाचे अधिकारी डोंबिवली येथून नागपूर येथे आले आणि त्यांनी घाट घातल्यामुळे हे काम थांबले, हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदया, मी खेदाने सांगू इच्छितो की, सन २०१४ मध्ये केंद्रात भारतीय जनता पक्षाची सत्ता होती. राज्यात देखील त्यांच्याच पक्षाची सत्ता होती. त्यावेळी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेब मुख्यमंत्री होते. नागपूर महानगरपालिकेचे महापौर देखील त्यांच्याच पक्षाची सत्ता होती. सन २००७ पासून ते दिनांक ३ मार्च २०२२ पर्यंत एकूण १५ वर्षे त्यांच्या पक्षाची सत्ता होती. स्थायी समितीचे चेअरमन त्यांच्या पक्षाचे होते. स्थायी समितीमध्ये १६ सदस्य त्यांच्या पक्षाचे होते. एनआयटीमध्ये दोन ट्रस्टी देखील त्यांचेच होते तरी देखील हे म्हणतात की, आम्हाला स्मार्ट सिटी प्रकल्प नको होता. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती असत्य आहे. मागील १५ वर्षांपासून श्री.कृष्णा खोपडे भारतीय जनता पक्षाचे पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार आहेत तरी देखील सन्माननीय सदस्य

श्री.अभिजीत वंजारी.........

सांगतात की, आम्हाला माहिती नाही. लांडगा आला रे, कोल्हा आला रे असे सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी लँड ॲक्विझिशनचा उल्लेख केला. तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या काळात सन २०१३ मध्ये लँड ॲक्विझिशन ॲक्ट मंजूर झाला. मी त्याचे ओरिजनल टायटल सभागृहाला सांगू इच्छितो. कारण बॅकग्राऊंडच तसे आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Right to fare Compensation and Transparency in land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013" याचे कारण असे की, देशात ज्या ठिकाणी अशा प्रकारचे प्रोजेक्ट होतात, ज्या प्रोजेक्टमध्ये लोकांची जमीन, प्लॉट जातात त्यांना फेर कॉम्पेन्सेशन मिळाले पाहिजे यासाठी तो ॲक्ट अस्तित्वात आलेला आहे. समृद्धी महामार्गात लँड पुलिंगच्या माध्यमातून यांनी लोकांना नुकसान भरपाई दिली. त्या विधानसभा क्षेत्रात गरीब लोक राहतात. तेथे ४० टक्के जमीन घ्यायची आणि ६० टक्क्यासाठी त्यांना शुल्काच्या माध्यमातून करोडो रुपये भरण्यासाठी सांगायचे म्हणजे श्रीमंतांना प्लॉट घेण्यासाठी उद्युक्त करायचे आणि गरीबांच्या जमिनी हडप करावयाचा असा प्लॅन आहे. म्हणून ते काम थांबले पाहिजे. मंत्री महोदयांनी बाधित लोकांसमवेत बैठक घेतली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती :** आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी प्रश्न विचारावा. ते ज्येष्ठ सदस्य आहेत, ते ४ टर्म आमदार आहेत. त्यांनी मंत्री म्हणून काम केलेले आहे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री अभिजीत वंजारी व प्रवीण दटके यांच्या भावना योग्य आहेत. मी नागपूर जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून काम केलेले आहे. ज्यावेळी स्कीम तयार केली त्यावेळी एवढी घरे बाधित होतील असे वाटले नव्हते. सदर योजनेमुळे एवढ्या लोकांचे नुकसान होईल, मोठ्या प्रमाणावर ॲक्विझिशन करावे लागेल असे वाटले नव्हते. आता पर्यंत केवळ १० टक्केच काम झालेले आहे, ९० टक्के काम बाकी आहे. मंत्री महोदयांनी बैठक

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यांनी तातडीने बैठक घेऊन जनभावना ऐकून घ्याव्यात. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, जनभावना विरोधात असतील तर जेवढे ॲक्विझिशन झालेले आहे त्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी यांच्या म्हणण्याप्रमाणे न्याय करावा. आपल्याला स्मार्ट सिटीचा प्रकल्प परत जाऊ द्यावयाचा नाही. जेथे बॅरन लँड आहे तेथे स्मार्ट सिटी निर्माण केली पाहिजे. खरे म्हणजे स्मार्ट सिटीचे सिलेक्शन चुकले होते. ज्या ठिकाणी खूप घरे आहेत ती घरे तोडून आपण स्मार्ट सिटी निर्माण करीत होतो. महानगरपालिका जेथे बॅरन लँड उपलब्ध करुन देईल तेथे उर्वरित ९० टक्के प्रकल्प राबविण्यात यावा. जेथे १० टक्के काम झालेले आहे तेथील काम थांबवून जे १० टक्के लोक बाधित झालेले आहेत त्यांना त्यांचा पूर्ण हक्क देण्यात यावा. मंत्री महोदयांना त्यासाठी दौरा करावा लागेल. मंत्री महोदय त्या भागाचा दौरा करुन बैठक घेणार आहेत काय ?

श्री.प्राजक्त तनपुरे : सभापती महोदय, या संदर्भात सभागृहाच्या भावना तीव्र आहेत. मी मघाशीच सांगितले की, लोक भावना निश्चितपणे विचारात घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांचा आग्रह असल्यामुळे त्या भागाचा दौरा करण्यात येईल.

---------

असुधारित

**पृ.शी.** : राज्यात सर्वत्र अवकाळी पावसासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान

**मु.शी.** : राज्यात सर्वत्र अवकाळी पावसासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान यासंबंधी डॉ.परिणय फुके, श्री प्रवीण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री सुरेश धस, प्रसाद लाड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.परिणय फुके (भंडारा तथा गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अलिकडेच राज्यात सर्वत्र अवकाळी पावसासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, हजारो हेक्टर क्षेत्रावरील गहू, हरभरा, कांदा, तूर, संत्रा, केळी, आंबा या पिकांचे तसेच भाजीपाला पिकांचे सुध्दा राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असणे, याशिवाय या नैसर्गिक आपत्तीत जिवीतहानी होऊन जनावरांचाही मृत्यू झाला असणे, अचानक आलेल्या अवकाळी पावसाने विदर्भ, मराठवाडा यासह राज्यात सर्वत्र रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झालेले असणे, यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन, कापूस व तूर या पिकांनी आधीच दगा दिल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होऊन त्यांचा उत्पादनखर्चही निघू शकला नसणे, तर आता अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे रब्बी हंगामही नैसर्गिक संकटाच्या सावटाखाली आल्याने हंगामाच्या आरंभीच शेतकऱ्यांना फटका बसणे, राज्यात सर्वत्र ढगाळ व थंडीचे वातावरण कायम असल्याने रब्बीतील हरभरा व गहू सारखी प्रमुख पिकेही धोक्यात आलेली असणे, राज्यात अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे झालेले नुकसान याचे पंचनामे पूर्ण झालेले नसणे, शासनाने मदतीची घोषणा करून देखील शेतकऱ्या ंकडे आर्थिक मदत पोहचलेली नसणे, करोनाची टाळेबंदी

व

डॉ.परिणय फुके.........

विविध प्रकारच्या निर्बंधांमुळे उपलब्ध आहे तोही शेतीमाल बाजारपेठेत नेता येत नसल्याने शेतातच सडून जाण्याची, रस्त्यावर फेकून देण्याची वेळ अनेक शेतकऱ्यांवर आलेली असणे, नैसर्गिक आपत्तीची भरपाई नाही आणि बाजारपेठही उपलब्ध नाही, असा दुहेरी फटका शेतकऱ्यांना बसलेला असणे, शासनाने वाढीव दराने नुकसानभरपाई देण्याचे केवळ आश्वासन दिलेले असणे, वाढीव दराने नुकसान भरपाई अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, राज्यातील या आपदग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

श्री.विजय वडेट्टीवार (मदत व पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो/ठेवते.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, ज्यावेळी महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आले त्यावेळी काही मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कोरडवाहू पिकांच्या नुकसान भरपाईसाठी हेक्टरी २५ हजार रुपये, बागायती पिकांच्या नुकसान भरपाईसाठी हेक्टरी ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली. महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून सन २०२० व २०२१ मध्ये चक्रीवादळ, अतिवृष्टी, पूर, गारपीट, अवकाळी पाऊसामुळे जे नुकसान झाले त्यासाठी तुटपुंजी मदत करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांचा भ्रमनिरास झालेला आहे. सन २०२० व २०२१ मध्ये शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अवकाळी पावसाचा फटका बसलेला आहे. आम्ही तत्काळ मदत करु असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले होते. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना तातडीने मदत दिली तर त्याचा त्यांना फायदा होतो.

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके ....

शेतकऱ्यांना ६ ते ८ महिन्यानंतर मदत मिळाल्यास त्यांना कोणताही फायदा होत नाही. डिसेंबर, २०१९ मध्ये अवकाळी पाऊस पडल्यानंतर ऑगस्ट, २०२० मध्ये शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळाली. मार्च व एप्रिल, २०२० मध्ये अवकाळी पाऊस पडल्यानंतर फेब्रुवारी, २०२१ मध्ये ११ महिन्यांनंतर शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळाली. जून, २०२० मध्ये अवकाळी पाऊस पडल्यानंतर नोव्हेंबर, २०२० मध्ये ५ महिन्यांनंतर शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळाली. मार्च व एप्रिल, २०२१ मध्ये अवकाळी पाऊस पडल्यानंतर ऑक्टोबर, २०२१ मध्ये ७ महिन्यांनंतर शासनाकडून शेतकऱ्यांना फक्त १० टक्के तुटपुंजी मदत मिळाली. ऑगस्ट व सप्टेंबर, २०२१ मध्ये अवकाळी पाऊस पडल्यानंतर डिसेंबर, २०२१ मध्ये ४ महिन्यांनंतर शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळाली. मे, २०२० मध्ये निसर्ग वादळ आल्यानंतर एप्रिल, २०२१ मध्ये ११ महिन्यांनंतर शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळाली. शासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वचन दिले होते की, आम्ही तुम्हाला २५ ते ५० हजार रुपये हेक्टरी मदत देऊ. ही बाब वचननाम्यात देखील नमूद करण्यात आली होती. त्यानुसार शासनाकडून कार्यवाही केली जाणार आहे का ? शासनाने मागील २ वर्षांच्या काळात आतापर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना विभागनिहाय किती मदत देण्यात आली आहे ? भविष्यात अवकाळी पाऊस किंवा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर त्यांना किती दिवसांमध्ये नुकसान भरपाई दिली जाणार आहे ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो विषय उपस्थित केला आहे, तोच विषय यापूर्वी ३-४ लक्षवेधी सूचनांच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आला होता.या संदर्भात यापूर्वी सविस्तर चर्चा झालेली आहे. या संदर्भात मागील ५ वर्षांच्या काळात व आमच्या काळात शेतकऱ्यांना केलेल्या मदतीची माहिती मी काढलेली आहे. सन २०१८ मध्ये राज्यात दुष्काळ पडल्यानंतर तेव्हा राज्यात कशी परिस्थिती होती याची सर्वांना माहिती आहे. सन २०१९ राज्यात अतिवृष्टी तसेच महापूर आला होता. आपल्या शासनाकडून ५ वर्षांमध्ये ११,२०० कोटी रुपये देण्यात आले होते. डिसेंबर,

श्री.विजय वडेट्टीवार ...

२०१९ मध्ये महाविकास आघाडी आल्यानंतर जानेवारी, २०२० मध्ये मंत्रिमंडळाचे गठन झाले. सन्माननीय सदस्यांनी डिसेंबर मध्ये झालेल्या नुकसानाच्या संदर्भात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासंबंधी मागणी केली आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता शासनाकडून विलंब का झाला ? याबाबत मी सदनाला माहिती देत आहे. मार्च, २०१८ मध्ये पिकावर बोंड अळी पडल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. तेव्हा तुम्ही केंद्र शासनाकडे ३०७३.११ कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु त्यावेळी केंद्र शासनाकडून एकही रुपया मिळाला नाही. नोव्हेंबर, २०१८ मध्ये राज्यात खरिप दुष्काळ पडल्यानंतर राज्य शासनाने ७९६२ कोटी रुपयांची केंद्र शासनाकडे मागणी केल्यानंतर त्यांनी ४५६२ कोटी रुपये दिले होते. नोव्हेंबर, २०१८ मध्ये राज्यातील अतिरिक्त असलेली २२६८ मंडळ दुष्काळामध्ये आल्यानंतर राज्य शासनाने २८५८ कोटी रुपयांची केंद्र शासनाकडे मागणी केल्यानंतर केंद्र शासनाकडून त्याकरिता एकही रुपया मिळाला नाही. ऑगस्ट, २०१८ मध्ये सांगली व कोल्हापूरमध्ये पूर आल्यानंतर राज्य शासनाने ७२८८ कोटी रुपयांची केंद्र शासनाकडे मागणी केल्यानंतर त्याकरता केंद्र शासनाकडून ९५६ कोटी रुपये देण्यात आले होते. या संदर्भात आपल्या शासनाकडून प्रस्ताव पाठविल्यानंतर दिल्लीत देखील आपल्याच पक्षाचे सरकार सत्तेवर होते. तरी सुध्दा केंद्र शासनाने आपल्याला दाद दिली नाही. तसेच आमच्या काळात केंद्र शासनाकडून मदत मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविले आहेत. त्याबाबतची माहिती देखील सदनाला दिली जाईल. एसडीआरएफच्या निकषानुसार राज्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात असते. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात एनडीआरएफच्या निकषाबाहेर मदत करण्यात आली नव्हती. त्यानंतर या बाबतीत तत्कालीन शासनाने निर्णय घेतला होता. अशा प्रकारे आपण घोषणाकरुन मोकळे झाला. त्यानंतर आमचे शासन सत्तेवर आल्यानंतर सदर निर्णयानुसार राज्यातील जनतेला मदतीचे वाटप करण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये दिनांक ३

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार ...

जून रोजी राज्यात निसर्ग चक्रीवादळ आल्यानंतर राज्य शासनाने १४० कोटी रुपयांचा निधी शेतकऱ्यांना दिला होता. नागपूर विभागामध्ये पूर आल्यानंतर शासनाने सर्व मिळून १७१ कोटी रुपयांचा निधी वितरित केला होता. जून ते ऑक्टोबर, २०२० या काळात राज्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शासनाकडून ४३७४.४३ कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. फेब्रुवारी ते मे, २०२० पर्यंत राज्यात गारपीट व अवेळी पाऊस पडल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना एकूण २४७ कोटी रुपये देण्यात आले. अशाप्रकारे सन २०२०-२०२१ मध्ये निकषामध्ये बदल करुन शासनाकडून शेतकऱ्यांना ४८८४ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. सन २०२१-२०२२ मध्ये दिनांक १६ व १७ मे रोजी राज्यात तौक्ते चक्रीवादळ आले होते. राज्य शासनाने त्याकरिता ७२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता. फेब्रुवारी ते मे, २०२१ मध्ये गारपीट व अवकाळी पावसामुळे राज्यात २ लाख १६ हजार हेक्टरचे नुकसान झाले होते. त्याकरिता शासनाने १७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला होता. जुलै, २०२१ मध्ये राज्यात अतिवृष्टी झाल्यामुळे ४०३८ हेक्टरचे नुकसान झाले होते. शासनाने त्याकरिता शेतकऱ्यांना ४९०.७४ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात राज्यात ५२ लाख १८ हजार हेक्टरचे नुकसान झाले होते. शासनाने त्याकरिता ४८०२ कोटी रुपयांचा निधी दिला होता. अशाप्रकारे सन २०२०-२०२१ ते २०२१-२२ या २ वर्षांच्या काळात शासनाकडून शेतकऱ्यांना ५४९६.२५ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. दोन वर्षांच्या काळात संपूर्ण देशात करोनाचे संकट असताना राज्य शासनाने ५४९६.२५ कोटी रुपयांचा निधी दिला होता. त्या काळात राज्याची आर्थिक स्थिती अतिशय बिकट होती. महसुलात मोठया प्रमाणात घट झाली होती. अशा भयानक व संकटाच्या परिस्थितीतही राज्यातील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडायचे नाही अशी भूमिका महाविकास आघाडीने घेतली व संकटाच्या काळात शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांना १०,३८१ कोटी रुपये देण्यात आले होते. आपल्या काळात शेतकऱ्यांना दिलेला निधी वगळता आमच्या

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार ...

काळात शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या निधीची मी सदनाला माहिती दिली आहे. आपल्या काळात शेतकऱ्यांना मदत करण्यात आली नव्हती. जिरायती शेतीकरिता एसडीआरएफचे ६८०० रुपयांचे निकष होते. आमच्या शासनाने जिरायतीकरिता १० हजार रुपये दिले. तसेच बागायती शेतीकरिता एसडीआरएफचे दहा हजार रुपयांचे निकष होते. आमच्या शासनाने बागायती शेतीकरिता १५ हजार रुपये दिले. मी या संदर्भात आपल्याला जिल्हानिहाय माहिती देतो. शेतकऱ्यांना दिलेल्या निधीचे वाटप पूर्णपणे झाले की नाही, याबाबत आम्ही सातत्याने आढावा घेत असतो. तसेच बँका तो निधी आपल्याकडे ठेवून त्यावरील व्याज खात नाही ना, याबाबत आम्ही राज्यातील अनेक बँका कृषी विभाग व जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेत असतो. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या खात्यात ९४ टक्क्यांपर्यंत निधी पोहोचलेला आहे. मी ही बाब रेकॉर्डवर सांगत आहे. तसेच उर्वरित ६ टक्के निधी देत असताना थोडा विलंब होत असतो. आपल्या सर्वांच्या काळात त्याकरिता विलंब होत असतो. परंतु शेतकऱ्यांना आम्ही मदतच केली नाही असे आपण म्हणता कामा नये. आपल्या काळात तसेच काही प्रमाणात महाविकास आघाडी शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. परंतु केंद्र शासनाने तुमच्या वेळेस आणि आमच्या वेळेसही निधी देण्यासंबंधी अन्याय केला. राज्यातील शेतकऱ्यांना जेव्हा अडचणी येतात तेव्हा आम्ही निश्चितपणे शेतकऱ्यांच्या मागे उभे राहिलो आहोत. तसेच त्यांना निकष बदलून मदत केली आहे. एसडीआरएफचे निकष बदलण्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी  केंद्र शासनाकडे पत्र पाठविले आहे. वाढलेली महागाई, शेतकऱ्यांचा एकरी होणारा खर्च, त्यातून निघणारे उत्पन्न या सर्व गोष्टी विचारात घेता ६८०० रुपयांमध्ये काही होऊ शकत नाही. ही रक्कम अतिशय कमी आहे. कोणाचेही सरकार असो, कोणतेही सरकार १००टक्के नुकसान भरपाई देऊ शकत नाही. परंतु शेतकऱ्यांना काही तरी आधार मिळाला पाहिजे, त्यांनी बी-बियाण्यांवर केलेला खर्च निघाला पाहिजे. अशी भूमिका समोर ठेवून शासन काम करीत आहे. केंद्र शासनाकडे

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार ...

सदर निकष बदलण्यासंबंधी राज्य शासनाने विनंती केली आहे. सदर निकषामध्ये बदल झाल्यास शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात मदत करता येऊ शकेल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विचारलेल्या मूळ प्रश्नाला बगल देऊन केंद्र शासनाने काही केले नाही असे सांगून मंत्री महोदयांनी राजकीय भाषण केलेले आहे. सभापती महोदया, कोल्हापूर, सांगली सातारा येथे पूर आल्यानंतर माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात शासनाने अतिशय उपयुक्त शासन निर्णय काढला होता. शासनाने त्यानुसार सर्वांना मदत केल्यास सर्वांचे काम होऊन जाईल.

यानंतर श्री.गागरे ...

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर .....

९५ टक्के मदत दिल्याचे म्हणतात. तौक्ते, निसर्ग आदी चक्रीवादळ व अवकाळी पाऊस याकरीता ६० टक्के मदतसुध्दा अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेली नाही, सन्माननीय सदस्यांनी आता मांडलेल्या या दाव्याचे मी समर्थन करतो.

सभापती महोदय, विभागाला किती निधी दिला याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले नाही. त्यांचा मुळ प्रश्न आहे की, शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन २५ हजार रुपये हेक्टरी देऊ असे बोलले गेले होते. आपणच सांगितले की, ५० हजार रुपये बागायतीला दिले आहेत, त्याबाबत उत्तर आले नाही. नाही तर ते केवळ बोलण्यासाठीच होते असे सांगा, आम्हाला पैसे द्यायचे नव्हते असे सांगून टाका. त्या संदर्भात मंत्री महोदयांनी भूमिका स्पष्ट करावी.

श्री.विजय वड्डेटीवार : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना सांगू इच्छितो की, जाहिरनाम्यात छापून आलेल्या १०० टक्के गोष्टी पूर्ण करतो का. आपण बोलत नाही पण सरकारमध्ये असलेले अनेकजण ते सांगतात. आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नाला त्या दिशेने घेऊन जाऊ नये, राजकारण करु नये अशी विनंती आहे. राजकारणाला प्रेरीत अशी उत्तराची अपेक्षा असेल तर मला तसे उत्तर देता येईल पण त्यातून साध्य काय होईल, हा विषय आहे. कृपया त्या दिशेने जाऊ नका. निधी वाढवून देण्याची भूमिका होती व वाढवून दिलेले आहे. हा मुख्यमंत्री महोदयांनी घेतलेला निर्णय आहे, दिलेले ६८०० रुपये कमी पडतात त्यामुळे १० हजार रुपये दिले पाहिजेत अशी आम्ही भूमिका घेतली. आपण म्हणता त्याप्रमाणे सातारा, सांगली व कोल्हापूरला विशेष जी.आर. काढून मदत केली कारण तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. दोन वर्ष आपण तोंडाला मास्क घालून फिरत आहोत. कोरोनामुळे सर्व जग थांबले होते, या सर्व परिस्थतीमध्ये महसूल तूट मोठी होती. कोलमडलेल्या व्यवस्थेमध्ये शेतकऱ्याला मदत करण्यास उशीर झाला असेल हे मी मान्य करतो. पण दिले की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. तौक्ते, निसर्ग चक्रीवादळाची मदत आता दिली, शासकीय मदत मिळते हे कोकणातील लोकांना पहिल्यांदा माहिती झाले. ती मंडळी शासकीय मदतीच्या भरवशावरच नव्हती. बऱ्याच जणांचे अकाऊंट नंबर

श्री.प्रवीण दरेकर .....

नव्हते, ते घेण्यात आले. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी वस्तुस्थिती सांगावी. जिल्हाधिकाऱ्यामार्फत ती मदत उपलब्ध करुन देण्यात आली, त्यातील निधी अजून शिल्लक आहे. प्रॅक्टीकली काम करण्यामधील अडचणी लक्षात घेऊन आपण बोलले पाहिजे. माझी माननीय विरोधी पक्ष नेते यांना विनंती आहे की, मदत कुठे कमी पडली असेल तर आपण सांगावे ती उपलब्ध करुन देण्यात येईल. आपण दोघे मिळून कोकणात आढावा घेण्यास जाऊ, तुमच्या उपस्थितीत आढावा घेऊ, अडचणी असल्यास लक्षात घेऊ. तिकडे जाऊन त्या लोकांना मदत केली पाहिजे. आवश्यकता पडली तर दिल्लीला देखील आपण जाऊ. तसेच सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांना सांगू इच्छितो की, भंडारा गोंदिया येथेही जाऊ, तेथे मी नेहमीच जात असतो, आपण दोघेच जाऊ, तिसरे कोणी नको.

सभापती महोदया, शेतकऱ्यांना मदत देत असताना आपण कोठेही हात आखडता घेतला नाही. आवश्यकता असेल तर मी विभागवार माहिती वाचून दाखवितो, ती आता माझ्याकडे उपलब्ध आहे. वेळेअभावी ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. ५० हजार रुपये प्रती हेक्टरी कमी पडतात असे म्हटल्यावर आपण एकरावर आलो, गुंठयावर आलो. फळबागांसाठी प्रतिहेक्टरी मदत दिली. कोकण व मुंबईत पहिल्यांदा अशी मदत मिळाली. कोकणावर कोणतेही संकट येत नाही पण या दोन वर्षात पहिल्यांदा व सातत्याने ते आले. मोठया प्रमाणावर मदत मिळते ही भावना त्यांच्या मनामध्ये आता आली. त्यामुळे मला असे वाटते की, उर्वरित रकमेबाबत मागणी आल्यास त्याबाबत शासन कमी पडणार नाही व आवश्यक ती मदत दिली जाईल.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, केंद्र सरकारकडे किती मागणी केली, पण वचननाम्यात किती मदत करणार हे कोठे सांगितले नव्हते. आपणच वचननाम्यात व शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सांगितले. तेव्हाचे विधानसभा अध्यक्ष भंडारा व गोंदियामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर गेले व तेथे सांगितले की, ५० हजार रुपये एकरी देऊ. म्हणून हा प्रश्न विचारला आहे. हे सरकार

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके.....

येण्यापूर्वी ते बोलले असतील तर सरकार आल्यावर ते पलटले. ते पलटले आहेत हेच बोलणे तुमच्याकडून अपेक्षीत होते. निसर्ग चक्रीवादळात जास्त मदत केल्याचे तुम्ही सांगितले. तुम्ही १५०० कोटीची घोषणा केली पण ७२७ कोटी रुपये दिले आहेत, म्हणजे ७७३ कोटी दिलेले नाहीत. २०२० च्या अतिवृष्टीमध्ये तुम्ही ११ हजार कोटीची घोषणा केली, प्रत्यक्षात ४६४८ कोटी ८२ लाख दिले आहेत, ६३१५ कोटी दिले नाहीत. तसेच तुम्ही १० हजार कोटीच्या पॅकेजची घोषणा केली, ५७६९ कोटी ८७ लाख रुपये तुम्ही दिले, ४२३० कोटी दिलेच नाही. त्यानंतर चक्रीवादळात १००० कोटी रुपयांची घोषणा केली व १७३ कोटी रुपये दिले आहेत. ही घोषणा राज्य सरकारने स्वत:च्या भरवशावर केली होती, केंद्र सरकारच्या भरवशावर केली नव्हती. हा १०० टक्के निधी आपण कधी देणार हे मी विचारु इच्छितो.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, बीड जिल्हयात ४ लाख ३२ हजार शेतकऱ्यांना २०२० मध्ये राज्य सरकारकडून मदत मिळाली. पण त्याच वेळी या शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता व तो ६२६ कोटीचा पीक विमा मिळाला नाही. मदत व पुनर्वसन तसेच कृषी मंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. त्यांनी सांगितले की, पीक विमा कंपनीचे उत्तर असे आहे की, एसडीआरएफचे निकष आम्हाला लागू होत नाहीत. तसेच ७२ तासाच्या आत शेतकऱ्यांनी ऑनलाईन दाखल केलेले नाही. परंतु शेतकरी एवढा हुशार नाही की, ७२ तासाच्या आत ऑनलाईन दाखल करु शकेल, गावात तेवढया सुविधा व रेंज नाही, या अडचणी आहेत. २०२० पासून ४ लाख ३२ हजार शेतकऱ्यांचा हा प्रश्न आहे. मदत व पुनर्वसन तसेच कृषी मंत्री महोदयांनी लक्ष घालावे, बैठक घ्यावी. शेतकऱ्यांनी भरलेल्या पीक विम्याची देय रक्कम ६२६ कोटी रुपये आहे. २०२१ चे ४९६५ शेतकरी आहेत, त्यांना २५ टक्के रक्कम दिली आहे पण ७५ टक्के रक्कम त्यांना दिलेली नाही. चालू वर्षातील आकडा छोटा आहे परंतु परंतु ४ लाख ३२ शेतकऱ्यांच्याबाबत बैठक घेऊन हे शासन पीक विमा कंपनीला पैसे देणार भाग पाडणार आहेत का?

अ सु धा रि त

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, कोरोना काळात दोन चक्री वादळे कोकणात झाली व पश्चिम महाराष्ट्रात महापूर झाला. पूर्वीच्या श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात कर्जमाफी मिळाली. विजेचे पोल, मोटरी वाहून गेल्या त्यांना देखील नुकसान भरपाई मिळाली आहे. परंतु या वेळचा महापूर कोकण व पश्चिम महाराष्ट्रातही आला. गुठयांला १३५ रुपये नुकसान भरपाई मिळाली. ज्यांच्या जमिनी खचून गेल्या त्याकरीता नुकसान भरपाई मिळणे गरजेचे होते ती मिळाली नाही. शेतकऱ्यांमध्ये आक्रोश होता. शेतकऱ्यांनी कोल्हापूर व सांगली परिसरात मोर्चे काढले होते. ज्यांच्या जमिनी खचल्या आहेत त्यांचा अहवाल मागवून घ्यावा व नुकसान भरपाई द्यावी. कोकणातील फळबागांच्या झालेल्या नुकसानीस अधिक मदत करावी लागेल. एक झाड उभे राहण्यास १०-१२ वर्ष लागतात. नव्याने वृक्षलागवड करायची असेल तर कृषी मंत्री महोदय उपस्थित आहेत.

यानंतर श्रीमती नाफडे.....

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत......

त्यांच्याकरिता एक विशेष योजना आणून किंवा त्यांनी जर लागवड केली असेल तर त्यांना शासनाला मदत कशी करता येईल, या दृष्टीने देखील विचार करणे गरजेचे आहे. सोलापूर जिल्हयामध्ये डाळिंबसवर "पिनहोलगोर" नावाचा मोठा रोग आलेला आहे. या वर्षी सोलापूर जिल्हयातील डाळिंबाचे उत्पादन ८००० कोटीवरुन ३००० कोटीपर्यंत खाली आलेले आहे. सोलापूर जिल्हयातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्याला शासन पंचनामे करुन संबंधित कृषी व पणन मंत्रीमहोदय आपल्याला कशी मदत कता येईल, याचा विचार करावा.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी शेतकऱ्यांना दिलेला आकडा सांगितलेला आहे. घरांचे नुकसान, रस्त्यांचे नुकसान याकरिता देखील शासनाने पैसे दिलेले आहेत. ते पॅकेज ही सर्व कामे व बाबी मिळून आहेत. सिंचन, रस्ते, घरे या सर्व बाबींकरिता ते पॅकेज होते. सन्माननीय सदस्यांनी केवळ शेतकऱ्यांना दिलेल्या पैशाबाबत सांगितलेले आहे. घोषणेप्रमाणेच अंमलबजावणी झालेली आहे, त्याबाबत काळजी करु नये.

सभापती महोदया, पीक विमा संदर्भात बोलायचे झाले तर पीक विमा कंपन्यांसमवेत मी आणि कृषीमंत्री मिळून बैठक लावून व संबंधितांना त्याकरिता बोलावू. पीक विमा योजना बंद करण्याबाबत घोषणा माननीय श्री.अजित पवार यांनी केलेली आहे. गुजराथ राज्यामध्ये देखील पीक विमा योजना बंद करण्याचा विचार केलेला आहे. एका पाठोपाठ एक राज्य आता पीक विमा योजना बंद करण्याचा विचार करत येत आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेमध्ये केंद्र आणि राज्य यांचा वाटा यामध्ये जो रेशिओ होता, तोही बदललेला आहे. यामध्ये मला आता खोलात जायची गरज नाही. आपल्याला ते सर्व माहिती आहे. आता सर्व काही राज्यावर ढकलून दिलेले आहे. या योजनेचे नाव केवळ पंतप्रधान पीक विमा योजना आहे. जी वस्तुस्थिती आहे, ती आपल्यापुढे मांडलेली आहे. या विषयात मी राजकीयदृष्ट्या जात नाही.

असुधारित प्रत

श्री.विजय वडेट्टीवार....

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी खरडून गेलेल्या जमिनीबाबतचा मुद्दा मांडलेला होता. खरडून गेलेल्या जमिनीबाबत बैठक लावली जाईल, त्या बैठकीला संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलाविण्यात येईल. खरडून गेलेल्या जमिनीकरिता असलेला प्रस्ताव वित्त विभागाकडे गेलेला आहे. दिनांक ३१ मार्च पर्यंत किंवा त्यानंतर शासन खरडून गेलेल्या जमिनीला १०० टक्के मदत देणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव आलेला आहे, त्यानुसार वित्त विभागाकडे मागणी केलेली आहे. पैसे मिळालेले आहेत. ते पैसे दिलेच पाहिजे. खरडून गेलेली जमीन म्हणजे शेतकऱ्याच्या आयुष्यभराचे नुकसान होय. संबंधित शेतकऱ्याला योग्य ती मदत दिली गेलीच पाहिजे, हीच भूमिका शासनाची आहे.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी**. : अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील हंगामी रोजंदार मजुरांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणेबाबत

**मु.शी**.अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील हंगामी रोजंदार मजुरांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करणेबाबत यासंबंधी सर्वश्री अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे,विक्रम काळे, सतीश चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमोल मिटकरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील हंगामी रोजंदार मजुरांना कार्यमुक्त करण्याचा निर्णय शासनाद्वारे घेण्यात येणे, सन २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या यादीमध्ये १ हजार ३७१ मजुर कार्यरत असणे, मात्र त्यापैकी ४५० ते ५०० मजुरच कामावर कार्यरत असून, यामध्ये निम्मे मजूर प्रकल्पग्रस्त असणे, अर्थात त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या सुपिक जमीनी प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या असणे, सद्यस्थितीत डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील ६५० ते ७०० पदे रिक्त असणे, तरी सदर रोजंदार मजूरांना कायम करुन त्यांना काम दिल्यानंतरही पदे रिक्त राहत असणे, तरी शासनाच्या रोजंदार मजूरांना कार्यमुक्त करण्याच्या धोरणामुळे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील गेल्या २५ वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या हजारो मजुरांच्या उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न उभा राहिलेला असणे, यासाठी महसूलात तूट, आस्थापनेवरील वाढता खर्च, राज्याच्या विकासकामावर याचा होत असलेला परिणाम तसेच कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याचे कारण दिलेले असणे, मात्र या रोजंदार मजुरांना पोटापाण्यासाठी कोणताही पर्याय नसल्याने शासनाचा धोरणांवर

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.......

सर्वच स्तरांवर संतप्त प्रतिक्रिया व असंतोषाचे वातावरण उमटत असून शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात रोजंदार मजूरांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक सकारात्मक फेरविचार करुन मजूरांना न्याय देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.दादाजी भुसे (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदया, सदर लक्षवेधी सूचना अतिशय महत्त्वाची सूचना आहे. सदर लक्षवेधी सूचनेकरिता मी गेल्या सहा-सात दिवसांपासून प्रयत्न करत आहे. या लक्षवेधी सूचनेवरील लेखी उत्तर मला कृषी विभागातर्फे जे प्राप्त झालेले आहे. त्या उत्तरामध्ये वित्त शासन, विभाग शासन निर्णय दिनांक १०.०९.२००१ तसेच, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश पाहता रोजंदारी मजूरांना सेवेत नियमित करणे योग्य होणार नाही,असे म्हटलेले आहे. त्यामुळे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील रोजंदारी मजुरांबाबत वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे. याबाबत शासनाने लेखी उत्तरात काय दिलेले आहे ? हे जर वाचले तर आपल्याला बऱ्याच गोष्टी लक्षात येतील. आम्हाला अभिमान आहे की, आज महाराष्ट्रात माननीय श्री.दादाजी भुसे साहेब कृषी खाते सांभाळत आहेत. कोरोना काळात त्यांनी शेतकऱ्यांना खूप मोठया चांगल्या पध्दतीने ताकदीने न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आमच्या अकोला जिल्हयात ते वारंवार येत होते. त्यांच्यामुळे तेथे धान खरेदी, कापूस खरेदी, मका खरेदी सुरु झाली. ते संवेदनशील नेते आहेत, ते स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे कडवे शिवसैनिक म्हणून देखील मी त्यांच्याकडे पाहतो. स्व.वसंतराव नाईक साहेबांनी त्यावेळी कृषी औद्योगिकरण व शेतकरी सक्षमीकरणाकरिता चार कृषी विद्यापीठे स्थापन केले, त्यापैकी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अत्यंत महत्त्वाचे विद्यापीठ आहे. ज्या विद्यापीठाकरिता नरेंद्रजी देशमुख, सुरेशजी भडके, भिरुमलजी रिझुमलजी, सुरेशजी कुरे, गजाननजी देवघरे, नेमचंदजी गोपाल, सुरेशजी वानखेडे, शेख रफीकजी व स्व. प्रफुलचंद कोठारी यांनी आत्मबलिदान दिलेले आहे. या विद्यापीठाकरिता लोकांनी आपली जमीन दिली. ज्यांना नोकरी नाही, अशांचे अर्ज त्यावेळी मागितले होते. परंतु नोकरीकरिता शासनाची मंजूरी मिळेपर्यंत सीडीएफओ, सीआरएस येथील फॉर्मर आदेशाद्वारे मजूरांना काम देण्यात आले होते. तेव्हापासून हे मजूर काम करत होते. आज या विद्यापीठामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठामध्ये १३७१ मजूर आहेत. त्यापैकी आज रोजी ४५०-५०० मजूर कामावर आहेत. यामध्ये निम्मे मजूर प्रकल्पग्रस्त अर्थात त्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत. आज मजुरांची ६५०-७०० पदे रिक्त आहेत.

श्री.अमोल मिटकरी......

याबाबत वारंवार आम्ही मंत्रीमहोदयांसमवेत पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र त्यांना माहितीच चुकीची येत आहे. यामध्ये कारण काय दाखविले ? की, जर हे लागू करण्यात आले तर म्हणजे यांना जर शासन निर्णय ३१ जानेवारी,२०२२ नुसार कामगार बंद करण्याचे पत्रक काढले होते. त्याला २००१ रोजीच्या वित्त विभागाच्या परिपत्रकाचा संदर्भ त्यांनी दिलेला आहे, तो योग्य नाही. कारण याच कृषी विभागाने सन २०१५ रोजी परभणी व अकोला विद्यापीठाच्या मजूरांच्या रिक्त जागा भरुन कायम करण्याचा आदेश २४ जुलै,२०१५ रोजी काढला होता. त्यामुळे सन २००१ चा संदर्भ देऊन मजूर कमी करणे आवश्यक आहे, हे उत्तर आम्हाला संयुक्तिक वाटत नाही. सद्य:स्थितीत अकोला कृषी विद्यापीठात मजूरांचे ६३० पदे रिक्त आहेत. ती पदे भरल्यास प्रकल्पग्रस्त हंगामी मजुरांचे प्रश्न निकाली लागणार आहे.

सभापती महोदय, डॉ.पंजाबराव देशमुख हे देशाचे पहिले केंद्रीय कृषीमंत्री होते. त्यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणल्या. तुमच्याच "योजना ठाकरे सरकारच्या व लाभ जनतेचा या पुस्तकामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, या योजनेचा प्रामुख्याने आपल्या पुस्तकामध्ये उल्लेख केलेला आहे. याचा मला अभिमान वाटत आहे की, डॉ.पंजाबराव देशमुखांनी जे कृषी धोरण या देशामध्ये पहिल्यांदा आणले, त्यानंतर ज्यावेळी आदरणीय श्री.पवार साहेबांना आम्ही भेटतो. त्यावेळी ते कृषी विद्यापीठाची माहिती विचारतात. आज मी त्यांच्याच आशिर्वादाने हा प्रश्न विचारत आहे. त्यांच्या आर्शिवादाने मी कृषी विद्यापीठाचा सदस्य आहे.

सभापती महोदय, याबाबत मी तीन प्रश्न विचारणार आहे. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील रोजंदार मजुर संबंधी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या या संदर्भातील निकाल हा अलिकडे आलेला आहे. तथापि सदर रोजंदारी मजूरांची २०-२५ वर्षे सेवा झालेली असून त्यांच्या प्रकरणी माणुसकीच्या दृष्टीकोनातून त्यांच्या सेवा कायमस्वरुपी करण्याबाबत शासन तसा निर्णय घेणार आहे का ? या

असुधारित प्रत

श्री.अमोल मिटकरी.....

कर्मचाऱ्यांना डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या सेवेतून कार्यमुक्त केल्याने त्यांच्या सेवा अंतर्गत कोणताही आर्थिक लाभ त्यांना देण्यात आलेला नाही. तथापि त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची पाळी आलेली आहे, हे लक्षात घेता शासन त्यांचे प्रकरणी सहानुभूतीपूर्वक निर्णय घेऊन त्यांना सेवेत पुन्हा कायम करण्याबाबत कोणती कारवाई करणार आहे ? कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यासंदर्भात वित्त विभागाचा निर्णय असला तरीही यापूर्वी वन विभागाने रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केलेले आहे, अशी माहिती आहे. तरी या धर्तीवर या सर्व कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदया, आपल्या महाराष्ट्रात एकूण चार कृषी विद्यापीठे आहेत. डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला, श्री.वसंतराव नाईक,मराठवाडा कृषी विद्यापीठ, राहुरी येथे महात्मा ज्योतिबा फुले कृषी विद्यापीठ आहे.

सभापती महोदया, राज्यामध्ये हंगामी आणि रोजंदारी कर्मचाऱ्यांना मजूर जे काही आहेत, त्यांना कर्मचारी म्हणून नेमण्यात येऊ नये, असा शासन निर्णय २००१ मध्ये घेण्यात आला होता. हा निर्णय दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी कळविण्यात आला. त्यानंतर ६.डिसेंबर,२०२१, ३१ जानेवारी,२०२२ रोजी देखील हा निर्णय कळविण्यात आला होता. हा निर्णय झाल्यानंतर महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठांपैकी केवळ तीन कृषी विद्यापीठांनी याची अंमलबजावणी केली. या निर्णयाचे पालन केलेले आहे. अकोला कृषी विद्यापीठाने याचे पालन केले नाही. अगदी कालपर्यंत म्हणजे गेल्या महिन्यापर्यंत हे जे रोजंदारी व हंगामी कर्मचारी आहेत, यांना त्यांनी कंटिन्यूशनमध्ये ठेवले. खरे म्हणजे हे आदेश निघाल्यानंतर त्याची तातडीने अंमलबजावणी होणे अपेक्षित होते. परंतु दुर्दैवाने अकोला कृषी विद्यापीठातील जे कोणी संबंधित अधिकारी असतील, त्यांनी या आदेशाचे पालन केले नाही.

यानंतर श्री.सोनावणे......

श्री. दादाजी भुसे.........

सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना वस्तुस्थिती काय आहे ते सांगणार आहे. सन २००१ मध्ये झाला निर्णय होता. दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी तत्कालीन मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. अकोला कृषी विद्यापीठाला सोडून दिले असे नाही. त्यावेळी रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी एक विशेष बाब म्हणून दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी तत्कालीन मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता. यामध्ये परभणी विद्यापीठातील ५५० रोजंदारी मजूरांना सामावून घेण्यात आले. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख विद्यापीठाचा नामोल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. तसेच त्यांच्याविषयी देशातील प्रत्येक नागरिकांना अभिमान आहे. विद्यापीठाने त्यांचा डाटा दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी तत्कालीन मंत्रिमंडळाला दिला होता. त्यानुसार २८४ मजूरांना कायम करण्यात आले. दापोली कृषी विद्यापीठाने ३२५ रोजंदारी मजुरांची माहिती दिली होती, त्यांनाही त्यावेळेस कायम करण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांनी एक हजार मजुरांची आकडेवारी दिलेली आहे. त्यांना कायम करण्यासाठी मागणी केलेली असून ती उचित नाही. आताच्या घडीला या मजूरांना प्रतीदीन १८० रुपये आणि १०० रुपये भत्ता दिला जातो. त्यांना कायम करु नये असे आदेश असताना त्याची कार्यपध्दतीचे आदेश हे शासन पातळीवरुन वेगळया पध्दतीने गेलेले आहेत. कायम असा शब्द त्या मजूरांना न लावत कॉन्ट्रॅक्ट बेसीसवरुन ही सर्व कामे त्यांच्याकडून करुन घेण्याची आवश्यकता आहे. अकोला विद्यापीठाने पाठीमागच्या काळात एक कार्यपध्दती अवलंबली होती. त्यामध्ये मजुरांना प्रतीदीन १८० रुपये आणि १०० रुपये राहणीमानभत्ता असे एकूण २८० रुपये दिले जात होते. परंतु, हेच काम कॉन्ट्रॅक्ट बेसीसवरुन केले तर मिनिमम वेजेसच्या कायद्यानुसार ३०० ते ३५० रुपये मजूरांना रोज मिळू शकतो. असे नाही की त्या मजुरांची उपासमार होणार आहे. कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर जे मजूर काम करतील अशा मजुरांना प्राधान्यक्रमाने संधी द्या अशा सूचना देऊ शकतो.

असुधारित प्रत

श्री. शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय उत्तर दिलेले आहे. माझे दोन ते तीन प्रश्न आहेत. कृषी विभागाकडे एकूण जमीन किती आहे ? त्या जमिनीवर किती मजुरांची आवश्यकता आहे ? सन २००१ मध्ये या मजुरांना शासनाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही केली नाही. परभणी आणि इतर जिल्ह्यातील मजुरांना कायम करण्यासाठीचा शासनाने निर्णय घेतला होता. याच धर्तीवर शासनाने त्या मजुरांसाठी निर्णय का घेतला नाही असा माझा प्रश्न आहे. गेल्या २० ते २५ वर्षापासून ते मजूर कामे करीत आहेत. शासन त्यांना कायम करण्यासाठी निर्णय घेऊ शकते किंवा कसे, असा निर्णय घेत असतील तर या मजुरांना कमी करण्याची कारणे काय ? आवश्यकता नव्हती म्हणून त्या मजूरांना कमी केले की, त्यांची आवश्यकता असताना त्यांना कामावरुन कमी करुन दुसऱ्या मजुरांची भरती केली याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा. त्या मजुरांना कायम करता येते किंवा कसे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करण्याची आवश्यकता आहे. जर त्या मजुरांना कायम करता येत नसेल तर त्यांना प्राधान्याने किमान वेतनांतर्गत तत्काळ कामावर रुजू करता येईल काय ?

श्री. दादाजी भुसे : सभापती महोदय, वित्त विभागाने दिनांक ७ सप्टेंबर, २००१ रोजी आदेश निर्गमित केला होता. त्या रोजंदारी मजूरांना नियमित करु नये. हे सर्व विभागांसाठी आहे. हा केवळ कृषी विद्यापीठ किंवा कृषी विभागापुरता मर्यादित विषय नाही. सन २००१ मध्ये निर्णय झाला होता. दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी तत्कालीन मंत्रिमंडळाने काही रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी एक विशेष बाब म्हणून निर्णय घेतला होता. त्यावेळी अकोला कृषी विद्यापीठातील २८४ कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले आहे. हा डाटा खालून आलेला होता. असे नाही की अकोला कृषी विद्यापीठाला वगळले होते. कायम करण्याचा निर्णय घेतला तर तो केवळ कृषी विद्यापीठापुरता मर्यादित असू शकणार नाही. शासनाच्या इतर विभागाकडून कर्मचाऱ्यांना कायम करण्याची मागणी येईल. त्यावेळी आर्थिक गणित बिघडतील हे देखील विसरुन चालणार नाही.

असुधारित प्रत

श्री प्रवीण दरेकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी कृषी विद्यापीठ आणि संलग्न प्रकल्पासाठी शेतकऱ्यांनी जागा दिल्याची माहिती दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या वारसांना रोजंदारी तत्वावर नोकरी दिली होती. त्यानंतर अशा सर्व कर्मचाऱ्यांना हंगामी कर्मचारी म्हणून कार्यमुक्त केले. हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. विशेष बाब म्हणून काही विद्यापीठांसाठी निर्णय केला तर आणि जो आकडा आलेला आहे तो अत्यंत अत्यल्प आहे. ही तेथील हंगामी संख्या आहे. विशेष बाब म्हणून सर्व कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याची आवश्यकता आहे. वित्त विभागाचा दिनांक १० सप्टेंबर, २००१ रोजीचा आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाचा आदेश पाहता रोजंदारीवरुन कमी केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक १८० दिवसांपेक्षा जास्त काम केले असल्यास त्याचा मोबदला शासनाने दिला पाहिजे असे सांगितलेले असताना त्या कर्मचाऱ्यांना सरळ सरळ कमी केले. हा मजूरांवर अन्याय झालेला असून, त्याचे शासनाकडून परिमार्जन कसे करणार असा माझा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे, त्यासाठी मंत्री महोदयांना निर्णय घ्यावा लागणार आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी कामावर घेणार आहात काय ?

श्री. दादाजी भुसे : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर यापूर्वीच दिलेले आहे. सन २००१ मध्ये निर्णय झाला होता त्यामध्ये असे म्हटले होते की, रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करु नये. असे असले तरी दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी तत्कालीन मंत्रिमंडळाने काही रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी एक विशेष बाब म्हणून निर्णय घेतला होता. त्यावेळी परभणी कृषी विद्यापीठातील ५५० आणि अकोला कृषी विद्यापीठातील २८४ कर्मचाऱ्यांना कायम केले आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, हा मर्यादित विषय राहणार नाही. उर्वरित ३ कृषी विद्यापीठांकडून आकडे येतील. हा विषय केवळ कृषी विद्यापीठापुरता मर्यादित विषय असणार नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एसटी महामंडळाच्या अहवालाचा खूप खोलवर जाऊन अभ्यास केलेला आहे. शासनाचे अनेक विभाग आहेत. मग कुलगुरुंपासून इतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सन २००१ रोजी निर्णय

असुधारित प्रत

श्री. दादाजी भुसे.....

दिल्यानंतर त्या पध्दतीने त्याचे पालन करणे आवश्यक होते. शासनाने दिलेल्या गाईडलाईनप्रमाणे प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे....

या लोकांना अपेक्षेवर ठेवायचे, कोणाला तरी कोर्टात पाठवायचे या बाबी जाणीवपूर्वक केल्या गेल्या आहेत काय याचा दाट संशय येतो. त्यामुळे आयुक्त, कृषी यांच्या अध्यक्षतेखाली या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल आणि चौकशीमध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदया, माझी मंत्री महोदयांच्या उत्तराला हरकत आहे. त्यांनी सांगितले की, सरळ भरतीच्या बाबतीत २००१ च्या निर्णयाच्या धर्तीवर २०१५ मध्ये खास बाब म्हणून निर्णय घेतला. त्यामुळे आता तो निर्णय सरसकट लागू करण्यात अडचण आहे, हे मी मान्य करतो. परंतु अकोला कृषी विद्यापीठात रोजंदारी किंवा हंगामी तत्त्वावर किती कामगार लागणार आहेत ? त्या विद्यापीठाकडे हजारो हेक्टर जमीन आहे अशी माझी माहिती आहे. जर त्या ठिकाणी काम करण्यासाठी मजूर लागत असतील तर २५ वर्षे काम करणाऱ्या लोकांना बाजूला ठेवून नवीन भरती करण्याऐवजी, त्यांची सेवा लक्षात लक्षात घेऊन त्या मजुरांना रुजू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल काय ? या बाबतचा निर्णय घेतला तर त्यांना न्याय मिळेल.

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदया, काही जण या गोरगरीब लोकांची दिशाभूल करुन त्यांना आशेवर ठेवतात. या मजुरांना सध्या प्रती दिन १८० रुपये मजुरी व १०० रुपये राहणीमान भत्ता देण्यात येतो. वास्तविक पाहता त्यांना साधारणत: ३००-३५० रुपयांपर्यंत प्रती दिन मजुरी मिळावयास पाहिजे. परंतु ते लोक कमी मजुरीत त्या ठिकाणी यासाठीच काम करतात की, कधी तरी आपल्याला नियमित सेवेत सामावून घेतले जाईल, अशी त्यांना अपेक्षा असते. अशा प्रकारे या गोरगरीब मजुरांची दिशाभूल केली जाते. मी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे घोषित केले आहे. राज्यातील या चार कृषी विद्यापीठांकडे १५-१६ हजार हेक्टर जमीन आहे. अकोला कृषी विद्यापीठाकडे ५ हजार हेक्टर जमीन आहे. येणाऱ्या कालावधीत शेतमजुरांची कामासाठी कायमस्वरुपी आवश्यकता असेल तर ......

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे....

आपल्याला माहीत आहे की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेला फटका बसला होता. परंतु आता राज्याची आर्थिक परिस्थिती रुळावर येत आहे. जेव्हा या संदर्भातील निर्णय होईल तेव्हा ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत आणि जे त्या ठिकाणी कामावर आहेत त्यांना प्राधान्य देण्यात येईल. या लोकांना कंत्राटी पद्धतीवर प्राधान्यक्रमाने सामावून घेण्याच्या बाबतीत सूचना देण्यात येतील.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदया, मंत्री महोदय वारंवार सांगत आहेत की, हा विषय केवळ अकोला कृषी विद्यापीठापुरता मर्यादित राहू शकत नाही. अशाच प्रकारचा प्रश्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सुद्धा आहे. तीन कृषी विद्यापीठे राज्य सरकारचे ऐकते आणि केवळ एक विद्यापीठ राज्य सरकारचे ऐकत नसेल तर ते योग्य नाही. विहित पद्धतीने नियुक्त्या केल्या नसतील तर त्यांना नियमित करता येणार नाही असे सुस्पष्ट आदेश असताना तीन विद्यापीठे हा आदेश मानतात व एक विद्यापीठ मानत नाही. यावरुन ते सर्वसामान्य रोजंदारीवरील मजुरांची फसवणूक करीत आहेत असेच म्हणावे लागेल. मी स्पेसिफिक विचारतो की, या कामगारांची, मजुरांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदया, मी यापूर्वीच सांगितले आहे की, या प्रकरणी आयुक्त, कृषी यांच्याकडून चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.अमोल मिटकरी : सभापती महोदया, माननीय कृषी मंत्र्यांनी चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझी विनंती आहे की, कृषी विभागामार्फत जे उत्तर येते वा अहवाल येतात, त्याची वस्तुनिष्ठता आणि सत्यता आपण पडताळून घ्यावी. हा प्रश्न ९५६ कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांना कंत्राटी पद्धतीवर तत्काळ रुजू करुन घ्यावे अशी विनंती आहे.

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे : सभापती महोदया, कंत्राटी पद्धतीवरील भरतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले जातील. तसेच त्यामध्ये या लोकांना प्राधान्याने सामावून घेण्याबाबत सूचना देण्यात येतील.

----------

असुधारित प्रत

**लक्षवेधी सूचना क्रमांक-९ बाबत**

श्री.आदित्य ठाकरे : सभापती महोदया, माझी विनंती आहे की, मला विधानसभेत जावयाचे असल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक-७ पूर्वी लक्षवेधी सूचना क्रमांक-९ चर्चेला घेण्यात यावी.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सदरहू लक्षवेधी सूचना अगोदर चर्चेला घेण्यास आमची काहीच हरकत नाही. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारण्यास सांगावे. कारण यापूर्वीच्या लक्षवेधी सूचनांवर अर्धा-अर्धा तास चर्चा झाली आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सर्वांनीच वेळेच भान राखून मला सहकार्य करावे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-९ चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत

**पृ.शी.** : भोकरदन (जि.जालना) शहरातून वाहणाऱ्या केळणा नदीपात्रात घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे तेथे नदी स्वच्छता अभियान राबविण्याची आवश्यकता

**मु.शी.** : भोकरदन (जि.जालना) शहरातून वाहणाऱ्या केळणा नदीपात्रात घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे तेथे नदी स्वच्छता अभियान राबविण्याची आवश्यकता, यासंबंधी श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अंबादास दानवे (औरंगाबाद तथा जालना स्था.प्रा.संस्था) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भोकरदन (जि.जालना) शहरातून वाहणाऱ्या केळणा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, नदीपात्रात साचलेल्या पाण्यावर हिरवे शेवाळ तयार झाले असून पात्रात सर्वत्र अस्वच्छता पसरल्याने नदीला गटाराचे आलेले स्वरुप, परिणामी नदीचे अस्तित्व धोक्यात येणे, शहरातील सांडपाणी नदीपात्रात सोडले जात असणे, तसेच कचरा, जागोजागी साचलेल्या घाण पाण्यात डुकरे, मोकाट जनावरे बसत असल्याने आजूबाजूच्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, परिसरात रोगराई पसरण्याची निर्माण झालेली भिती, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून नदी स्वच्छता अभियान राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.आदित्य ठाकरे (पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.अंबादास दानवे : सभापती महोदया, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे लेखी निवेदन प्राप्त झालेले आहे त्यावरुन माझे समाधान झालेले आहे. त्यामुळे मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

श्री.आदित्य ठाकरे : धन्यवाद.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : मच्छीमारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता

**मु.शी.** : मच्छीमारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, यासंबंधी सर्वश्री प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सुरेश धस, सदाशिव खोत, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री निलय नाईक, प्रवीण दटके, रमेशदादा पाटील, चंदूभाई पटेल, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रवीण दरेकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्याला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून राज्याच्या किनारपट्टीवर ७ सागरी जिल्हे असणे, सागरी किनाऱ्यांवरील भागात ट्रॉलिंग, पर्ससीन, बॅगनेट, गिलनेट, हुकलाइन अशा विविध पद्धतीने मासेमारी करण्यात येत असणे, कोकणात सागरी मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असल्याने साधारणपणे चार लाख मच्छीमार कुटूंबे या व्यवसायावर अवलंबून असणे, मत्स्य व्यवसाय हा कृषीपूरक व्यवसाय असल्याचे यापूर्वीच सरकारने मान्य केलेले असणे, तसेच या व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असून परकीय चलनही प्राप्त होत असणे, मत्स्यव्यवसायाकरिता मच्छिमारांना नौका बांधणीसाठी मोठ्याप्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागत असून नियमितपणे जाळी, नौका दुरुस्ती, नौकेवरील साहित्य, सामुग्री दुरुस्ती, खलाशी, कर्मचारी यांचे वेतन, डिझेल, बर्फ, रेशन यावर आवर्ती खर्च करावा लागत असणे, मच्छीमारांची उत्पन्नाची क्षमता

श्री.प्रवीण दरेकर....

लक्षात घेता त्यांना कर्जाऊ रक्कम उभारण्याशिवाय पर्याय नसणे, मच्छीमारांना अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत असून गेल्या दोन-तीन वर्षात ‘क्यार’, ‘महा’, ‘निसर्ग’, ‘तौक्ते’ अशा चक्रीवादळांमुळे व दरवर्षी २ महिने व्यवसायबंदीमुळे मच्छिमारांचे उत्पन्न बुडून बोटी, नौका नादुरुस्त किंवा पूर्णपणे नष्ट झाल्या असणे, राज्य शासनाने आपत्तीग्रस्तांना मदत जाहीर केली असली तरी ती अतिशय तुटपुंजी असल्यामुळे पुन्हा व्यवसाय उभा करणे त्यांना शक्य होणारे नसणे, राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने पीक कर्ज दिले जात असले तरी मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीला अधिकृत दर्जा मिळाला नसल्यामुळे त्यांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज मिळत नसणे, त्यामुळेच मच्छीमारांकडून मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीचा दर्जा द्यावा, अशाप्रकारची मागणी सातत्याने शासनाकडे केली जात असणे, या संदर्भातील प्रस्ताव मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडून राज्य शासनाला सादरही झाला असणे, तसेच, मासेमारीला मत्स्यशेतीचा दर्जा द्यावा, अशी मागणी विधानपरिषद विरोधी पक्षनेते यांनी शासनाला त्यांच्या दिनांक ६ जुलै, २०२१ च्या पत्रान्वये केली असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील मच्छिमारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख (मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, ही लक्षवेधी सूचना मच्छीमारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. मत्स्य व्यवसायाला मत्स्य शेतीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारला सादर केल्याची माहिती मंत्री महोदयांनी याच अधिवेशनात दिली आहे. या बाबत आपण एकत्रितपणे पाठपुरावा करु या. या निमित्ताने माझे स्पेसिफिक तीन प्रश्न आहेत. केंद्र सरकारकडून सदरहू प्रस्ताव मंजूर होईपर्यंत मच्छीमारांच्या बोटींची दुरुस्ती, नवीन बोट खरेदी, जाळया खरेदी करणे किंवा अन्य बाबींसाठी शासन विशेष योजना आखून मच्छीमारांना तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी उपलब्ध करुन देऊ शकेल काय, असल्यास, त्या अनुषंगाने शासन काय भूमिका घेईल ? तसेच सागरी किनाऱ्यावरील भागात ट्रॉलिंग, पर्ससीन, बॅगनेट, गिलनेट यामुळे करण्यात येणाऱ्या मासेमारीमुळे पारंपरिक मच्छीमारांचे तसेच समुद्री जीवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. हे नुकसान थांबविण्यासाठी सरकारकडे सक्षम यंत्रणा नाही अशी माझी माहिती आहे. आपण या मत्स्य शेती व मच्छीमारांवर वेगवेगळे प्रयोग करीत आहात. मच्छीमार व समुद्री जीवांचे नुकसान थांबविण्यासाठी शासन यंत्रणा उभी करणार काय ? तसेच अनेक जेट्टींची कामे रेंगाळलेली आहेत. प्रत्येक वेळी जेट्टीसाठी निधी दिल्याचे सांगितले जाते, परंतु प्रत्यक्षात मात्र निधी वितरित होत नाही. अनेक जेट्टींची कामे सुरु नाहीत. मी स्पेसिफिक विचारतो की, कोकणात किती नवीन जेट्टींची कामे सुरु आहेत, त्यासाठी किती निधी दिला, त्यापैकी प्रत्यक्षात किती निधी वितरित करण्यात आला आणि नावासह कोणत्या जेट्टी किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केला आहे. मासेमारीला कृषीचा दर्जा मिळण्यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरु आहेत. माननीय श्री.महादेवराव जानकर हे मत्स्यव्यवसाय मंत्री असताना ते या कामी दिल्ली येथे सुद्धा जाऊन आले होते. मी सांगू इच्छितो की, विभागाच्या माध्यमातून किसान क्रेडीट कार्ड देण्यात आलेले आहेत. किसान क्रेडीट कार्डसाठी ३६,१४६ अर्ज आले आहेत, त्यापैकी सुमारे ५,६५० मच्छीमारांना किसान क्रेडीट कार्ड दिलेले आहेत. त्याची किंमत २२.७७ कोटी रुपये आहे.

नंतर श्री.कांबळे.....

श्री. अस्लम शेख ....

सदर योजनेत ७ टक्क्यांची तरतूद आहे. त्या ७ टक्क्यांमध्ये ३ टक्क्यांची सवलत देणार आणि त्यांना फक्त ४ टक्केच व्याजाचे पैसे भरावे लागतील. सुरुवातीला त्यांनी १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत कर्ज घेतले तर कोणतेही तारण देण्याची काही गरज पडणार नाही. मात्र त्यापेक्षा जास्त म्हणजे ३ लाख रुपयांपर्यंत जर कर्ज घेतले तर तारणासाठी काही तरी कोलॅटरल ठेवावे लागेल. त्यामुळे लोकांना जास्त क्रेडिट कार्ड मिळावे म्हणून आपण वेगवेगळया जिल्ह्यांमध्ये कार्यक्रम देखील राबविले आहेत. केंद्र सरकारने देखील यामध्ये इंटरेस्ट घेतला आहे. पण बँकांची वस्तुस्थिती आपल्याला माहीत आहे, त्यांच्या अटी व शर्ती जास्त कडक असल्यामुळे हे गतीने जात नाही. मात्र अजुनही राज्य सरकार जास्त लोकांना क्रेडिट कसे मिळेल याबाबतीत काम करीत आहे. आपण या संदर्भात बैठक घेतली होती, जेणेकरुन आपण सहकारी बँकांमार्फत त्यांना कसे कर्ज देऊ शकतो. माननीय उद्योगमंत्र्यांनी देखील या संदर्भात बैठक घेतली होती. मी देखील किमान २-३ बैठका घेऊन पाठपुरावा केला होता, जेणेकरुन आपल्याला मच्छिमारी करणाऱ्यांना कर्ज देता येईल. मी मच्छीमार सभासदांना, नौकाधारकांना घेऊन बैठक घेतली. पिकासाठी कर्ज मंजूर करण्याच्या व्याज दरामध्ये सवलत कशी देता येईल या संदर्भात देखील विचार केला. आपण जेव्हा कर्जाची प्रक्रिया करु तेव्हा गरीब मच्छिमार व्याज भरु शकतील की नाही या संदर्भात देखील आपण विचार केला आहे. कृषीमध्ये कर्ज देण्यात येते, त्यामध्ये केंद्र व राज्य सरकार त्यांचे व्याज भरते, त्या धर्तीवर यांचेही झाले पाहिजे, या अनुषंगाने विभागाकडून कृषी विभागाच्या धर्तीवर डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना अंतर्गत ६ टक्के व्याज दराने त्यांना कसे कर्ज देणार आहोत हे आपण पाहत आहोत. केंद्र सरकार ३ टक्के व राज्य सरकार ३ टक्के त्यामध्ये व्याज भरतील, या योजनेच्या अंतर्गत पाठपुरावा करुन केंद्र सरकारकडे माहिती पाठविणार आहोत असे मी आश्वस्त करीत आहे.

सभापती महोदय, ट्रॉलिंग नेट, एलईडी अशा वेगवेगळया माध्यमांतून समुद्रात अनधिकृत मच्छिमारी चालली आहे. त्यामुळे समुद्रात दुष्काळासारखी परिस्थती

श्री. अस्लम शेख ....

निर्माण झाली आहे. आपण आता नवीन कायदा केला आहे. आधीचा कायदा इतका सक्षम नव्हता. कारण आपण कारवाई करायचो आणि त्यानंतर तहसीलदाराला आरोपी द्यायचा होता. त्यामध्ये आपल्याला हवी तशी कारवाई होत नव्हती. त्यामुळे आपण कायदा केला. आपण सर्वांना एक घेऊन कायदा केला आहे. ३ महिन्यांमध्ये म्हणजे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ पासून दिनांक ३१ जानेवारीपर्यंत एलईडी संदर्भातील ११ कारवाया केल्या आहेत. ७ प्रकरणात निकाल झाले आहेत. सरसकट आदेश देण्यात आले आहेत की, एलईडीवर कारवाई होऊन जेवढे निकाल येतील, त्यांचे सरसकट लायसन्स रद्द करायचे आहे. कमी काळात दंडाची रक्कम ६२१२५०० रुपयांपर्यंत झाली. आपण आतापर्यंत २९ लाख ४ हजार रुपये वसूल केले आहेत. पर्सेसिन, मिनी पर्सेसिनच्या संदर्भात ८१ कारवाया केल्या आहे. ७ प्रकरणांमध्ये निकाल झाला आहे. ३५३२०० रुपये एवढी दंडाची रक्कम आहे. वसूल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम २२ लाख ७३ हजार पाईंट ५० रुपये एवढी झाली होती. एकूण १८०३२०० रुपयांपर्यंत वसुली केली आहे.

सभापती महोदय, ट्रॉलिंगच्या संदर्भात ४३ प्रकरणांमध्ये कारवाई केली आहे. एक प्रकरणाचा निकाल लागला आहे. बाकीच्या प्रकरणांत सुनावणी सुरु आहे. मासळीचा लिलाव केला. मासळीच्या लिलावातील ३ लाख ५३ हजार रुपये मिळाले. आपण कारवाई करतो तेव्हा जे मासे मिळतात त्यांचा लिलाव करतो. मासे लिलावामध्ये ५५१७६ रुपये एवढी रक्कम वसूल केली आहे. १ लाख रुपये दंडाची रक्कम ठरविली, त्यातील वसुली ५५१७६ रुपये आहे. लहान-मोठ्या बोटींनी अनधिकृत मच्छिमारी करतात, त्या संदर्भातील ३२ प्रकरणांत कारवाई केली आहे. २ प्रकरणांत निकाल लागले आहेत. १३९६५० रुपये एवढी रक्कम वसूल करावयाची होती, ती देखील वसूल केली आहे. एकूण १६७ प्रकरणांत दंडाची कारवाई केली आहे. १७ प्रकरणांचा निकाल लागला आहे. मासळी विक्री करुन ८३२०२६ रुपये

असुधारित प्रत

एवढी रक्कम वसूल केली आहे. आपण विचारीत असलेल्या निधीच्या संदर्भात माझ्याकडे आता माहिती नाही. मी ती माहिती पटलावर ठेवीन.

श्री. अस्लम शेख ....

सभापती महोदय, कोकण, महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी जेटीची कामे बंद आहेत. कामे चालू होऊ शकली नाहीत. कारण असे आहे की, आपण पूर्वी निविदा काढायचो. मात्र त्या व्हायच्या नाहीत. कारण आपण पूर्वी निविदा काढत असताना सीआरझेड व एमसीझेडएम यांची एनओसी घ्यायचो नाही. मग ते काम १०-१५ वर्षे व्हायचे नाही. आपली चांगली एजन्सी आहे. सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर यांनी निविदा काढून एजन्सी मागविली होती. आपण कन्सल्टंट नेमला होता. मला थोडी माहिती मिळाली आहे, त्या संदर्भात सांगू इच्छितो की, केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये ४ प्रकल्प आहेत, त्यामध्ये अंदाजित खर्च ३६५.१० कोटी रुपये आहे, प्रगतीपथावरील प्रकल्प ४ आहेत. नाबार्ड टप्पा १६ मध्ये २० प्रकल्प असून १०२.३६ कोटी रुपये अंदाजित खर्च आहे, पूर्ण प्रकल्प १९ आहेत. नाबार्ड टप्पा २० मध्ये ९ प्रकल्प आहेत, १२० कोटी रुपये अंदाजित खर्च आहे, ९ पूर्ण प्रकल्प आहेत. नाबार्ड टप्पा २२ मध्ये ७ प्रकल्प आहेत, ६३.१६ कोटी रुपये इतका खर्च केला आहे, प्रगतीपथावर ७ प्रकल्प आहेत, रद्द प्रकल्प १ आहे. नाबार्ड टप्पा २३ मध्ये ५ प्रकल्प आहेत, अंदाजित खर्च ५१. ३७ कोटी रुपये आहे, प्रगतीपथावर ४ प्रकल्प आहेत, रद्द प्रकल्प एक आहे. नाबार्ड टप्पा २४ मध्ये २ प्रकल्प आहेत. अंदाजित खर्च ७९.२२ कोटी रुपये आहे. प्रगतीपथावरील प्रकल्प २ आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत सन २०११-१२ मध्ये १९ प्रकल्प आहेत. अंदाजित खर्च ६९.९९ कोटी रुपये आहे. पूर्ण प्रकल्प १४ आहेत. प्रगतीपथावरील प्रकल्प ४ आहेत. १ रद्द प्रकल्प आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना सन २०१६-१७ मध्ये ६ प्रकल्प असून अंदाजित खर्च १०७ कोटी रुपये आहे. प्रगतीपथावरील प्रकल्प ५ आहेत. १ प्रकल्प प्रस्तावित आहे. नील क्रांती योजनेत १ प्रकल्प आहे. अंदाजित खर्च ८ कोटी रुपये आहे. प्रगतीपथावरील प्रकल्प १ आहे. एकूण प्रकल्प ७३ आहेत. अंदाजित खर्च ९६६.२०

कोटी रुपये आहे. पूर्ण प्रकल्प ४२ आहेत. २६ प्रगतीपथावरील प्रकल्प आहेत. ५ प्रकल्प रद्द झाले आहेत.

**उप सभापती** : माननीय मंत्र्यांनी तपशीलवार उत्तर दिले आहे. आता स्पेसिफिक प्रश्नांची उत्तरे द्यावीत. अधिक माहिती पटलावर ठेवावी किंवा शेवटी द्यावी.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अतिशय चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. मला सूचना करायची आहे. केंद्र सरकारने दिनांक १ जुलै, १९७५ अन्वये मत्स्य शेती हा उद्योग कृषी उद्योगासारखा समजण्यात यावा असे सांगितले आहे. आपण तो संदर्भ दिला आणि केंद्र सरकारच्या गाईडलाईन्स मागविल्या तर मच्छीमार बांधवांना त्याचा फायदा होईल. कृषीसारखा मत्स्य शेती धंदा आहे हे अंतर्भूत होईल. एनडीआरएफच्या टीममध्ये ऊस, कापूस, धान, सोयाबीन उत्पादकांना फायदा मिळतो तसा फायदा मच्छिमारांना मिळेल. आपण त्याबाबत केंद्र सरकारच्या गाईडलाईन्स घेणार का ? माझी विनंती आहे. डाळिंबाच्या शेतकऱ्यांना पॅकेज मिळत आहे त्याप्रमाणे लम्पसम मनी, मार्जीन मनी म्हणून मच्छिमारांना काही रक्कम जाहीर करणार का ?

श्री. अस्लम शेख : सभापती महोदय, आपण पत्राच्या अनुषंगाने सांगितले आहे. मात्र त्यामध्ये स्पष्टता नाही. नाबार्डला त्यांनी सांगितले आहे की, कर्ज देताना या सेक्शनखाली कर्ज देता येते. आपण बोलल्याप्रमाणे त्यांच्याकडे अगोदर पाठपुरावा केला आहे.

नंतर श्री. खर्चे ....

श्री. अस्लम शेख...

सचिवांकडून एक पत्र दिल्ली येथे पाठविण्यात आले आहे. ॲक्वाकल्चर ला ॲग्रीकल्चरचा दर्जा मिळावा. किंवा त्या लेव्हलचे स्टेटस मिळावे. त्यांना कर्ज देतांना व्याजाची सवलत देण्याचा विचार करता येईल. बाकीचे पॅकेज राज्य सरकारने वेगवेगळया पध्दतीने दिले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, कर्जावरील व्याजाची सवलतीसाठी राज्य शासन त्यांच्या फंडातून निधी देऊ शकते. त्या दृष्टीने राज्य शासन विचार करेल काय ? नाबार्ड शेतीसाठी रि-फायनन्स देते. तसा रि-फायनान्स नाबार्ड देण्यास तयार आहे. त्याच्या व्याजाचा फरक शासन देऊ शकते. त्या पध्दतीने तरतूद करण्यात येईल काय ? मी उदाहरण देतो की, या देशात पहिल्यांदा शेतीच्या कर्जाला चार टक्के व्याज दराने मी माझ्या बँकेतर्फे रक्कम दिली होती. हे करण्याची  शासनाची मानसिकता आहे किंवा नाही हे मला बघायचे आहे. ज्यावेळी मी कर्ज दिले त्यावेळी स्व.गोपीनाथ मुंडे उप मुख्यमंत्री होते. त्यांच्या हस्ते समारंभ ठेवला होता. त्यावेळी आरबीआय  व नाबार्ड अधिकारी माझ्याकडे आले होते. ते मला असे म्हणाले की, असे तुम्हाला करता येणार नाही. तुमचे संचालक मंडळ आम्ही बरखास्त करु. मी सांगितले संचालक मंडळ बरखास्त करा मीच पुन्हा निवडून येईल. राज्य शासनाला यासाठी कोणतीही बंधने नाहीत. मच्छिमार खाते आपणाकडे आहे, आपल्या वडिलांची बोट होती मला माहिती आहे. आता आपण मुंबईचे फिशरमन आहात. राज्य शासन शेतकऱ्यांना ज्या प्रमाणे व्याजाची सवलत देते त्याप्रमाणे ती सवलत मच्छिमार बांधवांनी घेतलेल्या कर्जासाठी देण्यात येईल काय ?  अलिबाग तालुक्यात १६ कोळीवाडे आहेत, त्यापैकी दोन कोळीवाडे सोडले तर सर्वांच्या बोटी उभ्या आहेत. काल माझ्या घरी रायगड जिल्हा मच्छिमार संघटनेचे चेअरमन श्री.शशिकांत कोळी आले होते. ते मला म्हणाले की, भाई मला नोकरी द्या. त्यांच्याकडे चार बोटी होत्या. १० महिन्यांपासून बोटी समुद्रात गेल्या नाहीत. अशा हजारो बोटी कोकणात व रायगड जिल्ह्यात असून कोळी बांधवांना मच्छी मिळत नाही. मंत्री महोदय सांगतात की, सेक्युरिटी गार्ड आहेत, होड्या आहेत,

असुधारित प्रत

श्री.जयंत प्र.पाटील...

हे लोक काय करतात. आज मरतूक नाही ती सुरु होण्यासाठी मच्छिमार लोकांची आर्थिक कुवत राहिली नाही. नवगांव, थळ, सासवन येथील कोळी वाड्यांतील लोकांनी बोटी विकून टाकल्या आहेत. ही परिस्थिती अतिशय गंभीर आहे. मच्छी मिळत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यावर राज्य शासन विचार करेल काय ? ही मरतूक का होते, आपणाकडे फिशरीचे सायंटिस आहेत, तज्ज्ञ आहेत, कोकण विद्यापीठातून शिकून आलेले अधिकारी आहेत. ही मरतूक कमी का झाली याचा अभ्यास राज्य शासनाने केला आहे काय ? असे दोन प्रश्न आहेत. ज्यामुळे मरतूक कमी होते त्याबाबत खबरदारी घेण्यात येते काय ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, मी सांगितले की, मच्छिमारांना कर्ज मिळावे. ज्या पध्दतीने शेतकऱ्यांना कर्ज देतो त्याचे व्याज केंद्र व राज्य शासन भरते. विरोधी पक्ष नेत्यांनी याबाबत बैठक घेतली होती मी देखील बैठक घेतली आहे. डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत शेतकऱ्यांना देतो त्याच पार्श्वभूमीवर देण्याचा विचार आहे. या योजनेत सहा टक्के व्याज आहे त्यातील एक टक्का देखील त्यांना भरावा लागणार नाही. तीन टक्के व्याज केंद्र व तीन टक्के व्याज राज्य शासन भरते. सभागृहाच्या भावनेचा विचार करुन मी सांगतो की, तसा प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो निर्णय लवकर होणार आहे. नाबार्डला त्यांनी पत्र दिले होते यामध्ये सवलत देत असताना ऊर्जा विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग यांना आयुक्तांमार्फत पत्र देण्यात आले आहे. लवकरात लवकर यांना कर्ज देण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे. मच्छिमार लोकांची संख्या कमी होत आहे ही गोष्ट खरी आहे. आता समुद्रात मासे मिळत नाहीत याची कारणे भरपूर आहेत. पर्ससीन नेटचा दूरुपयोग झाला, नवीन यंत्रणा व टेक्नॉलॉजी आली. एलईडी चा विषय आहे, हे सर्व करीत असताना गेल्या चार ते पाच वर्षात कायद्यात तरतूद करणे गरजेचे होते. मत्स्यविभाग कायदा करीत होता पण त्या विभागाकडे अधिकार नव्हते. त्यांना ते महसूल विभागाकडे द्यावा लागले. तहसीलदार निर्णय घेत होता. अगोदर लायसन्स रद्द होत नव्हते.बोटी जप्त करण्याची तरतूद नव्हती. नवीन कायदा करताना सर्व तरतुदी

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख...

करण्यात आल्या आहेत. लायसन्स रद्द करु शकतो. बोटी जप्त करु शकतो. त्यांच्या घरातील कोणत्याही व्यक्तीला लायसन्स मिळणार नाही अशी तरतूद केली आहे. तीन महिन्यात आम्ही ११ कारवाया केल्या आहेत. ११ एलईडीचे लायसन्स रद्द करण्यात सांगितले आहे. सोमवंशी समितीने सांगितले होते की, ४०० वरुन १८० की १८५ तो आकडा मला नक्की माहिती नाही. ते करणे गरजेचे आहे. त्यांना जी वेळ दिली होती त्या वेळेनंतर मच्छिमारी होत होती. एका वर्षात या कायद्याप्रमाणे फायदा झाल्याचे आपणाला दिसून येईल. जे अनधिकृतपणे मासेमारी करतात त्यामध्ये परप्रांतिय लोक आहेत त्यांच्यावर दंडाची आकारणी खूप कमी होती. तो दंड पाचपट करण्यात आला आहे. जेथे १ लाखाचा दंड होता पाच लाख केला, पाच लाखाचा दंड १० लाख केला. १० लाखाचा दंड १५ लाख रुपये करण्यात आला आहे. वचक ठेवण्यासाठी कायदा केला आहे. त्याचा परिणाम आपणाला नक्की दिसेल.

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदया, कोकण किनारपट्टीवर गेल्या दोन वर्षात मोठी वादळे आली. निसर्ग चक्री वादळ आले, मोठ मोठी संकटे आली आहेत.कोविडचा मोठा प्रादुर्भाव झाला. मासेमारी करणाऱ्यांवर मोठे संकट आले. मंत्री महोदयांनी सांगितले की, २०२१ मध्ये कायदा केला आहे. कायद्यात सुधारणा केली आहे. कायदा अंमलात आणतांना १०,१२ बोटी पकडल्या तरी त्यांचा धंदा सुरु आहे. एलईडी पर्ससीन नेटचा धंदा सुरु आहे. त्यांच्यावर मोठी कारवाई करायला पाहिजे. आपणाकडे यंत्रसामुग्री नाही. तांत्रिक बोटी नाहीत, पोलिसांचे प्रोटेक्शन नाही. असे असले तर आमचे लोक तुमच्यासोबत जाऊन बोटी पकडून देऊ शकतील. आजपर्यंत त्यांच्यावर जो दंड आकारण्यात आला तो शुल्लक आहे. पर्ससीन नेट व एलईडीचा धंदा सुरु आहे. त्यामुळे स्थानिक मच्छिमार लोकांचे नुकसान झाले आहे. स्थानिक मच्छिमारांना उपाशी मरण्याची पाळी आली आहे.

या नंतर श्री.बोरले...

श्री.रमेशदादा पाटील........

मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, मच्छिमारांवर अन्याय झालेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, मच्छिमारांना अनेक वर्षांपासून डिझेलचा परतावा मिळालेला नाही. मच्छिमारांना डिझेलचा परतावा केव्हा देण्यात येणार आहे आणि त्यासाठी कालावधी निश्चित करण्यात येणार आहे काय ? तसेच, निसर्ग व तौक्त चक्रीवादमामुळे मच्छिमारांचे जवळपास २१ कोटी रुपयांचे व क्यार चक्रीवादळामुळे १२०० कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. आपण केवळ ६५ कोटी रुपये मंजूर केले. त्यापैकी ३० कोटी रुपयांपर्यंत मदत वाटप करण्यात आली. उर्वरित रक्कमेचे केव्हा वाटप करण्यात येणार आहे ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, मी मघाशीच या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ऑलरेडी ६० कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. आता ३९ कोटी रुपये वितरित झालेले आहेत. म्हणजे ९९ कोटी रुपये वितरित केलेले आहेत. आपण आणखी १० कोटी रुपयांचे प्रस्ताव लवकर करु. सन्माननीय सदस्यांनी निसर्ग व तौक्ते चक्रीवादळामुळे जे नुकसान झाले त्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. कोरोना महामारीच्या काळात शासनाने मच्छिमारांना १ कोटी ३७ लाख रुपयांची मदत केली. शासनाने तौक्ते चक्रीवादळाच्या वेळी मच्छिमारांना १२ कोटी ३७ लाख रुपयांची मदत केली. आपल्याला कल्पना आहे की, आपण ६५ कोटी १७ लाख रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्या पॅकेजनुसार जेवढे अर्ज प्राप्त झाले त्या सर्वांना आपण मदत दिलेली आहे. मी मागील वेळी सांगितले होते की, सभागृहाची भावना लक्षात घेऊन यामध्ये स्थिरता आणण्यासाठी मला मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. कारण कोणाला पैसे दिले याबाबत माहिती नसेल तर आपण उद्या म्हणाल की, यांनी पैसे वाटून दिले, भ्रष्टाचार झालेला आहे. आपण सोसायटीकडून ॲफिडेव्हिट घेतो की, हे मच्छिमार आहेत. आपण त्याप्रमाणे मदत देऊ. तसेच जीएसटीची पावती मागितली जाते असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला.

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख........

जीएसटीची पावती मागितल्यानंतर संबंधित सोसायटीला त्रास होतो. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मंत्रिमंडळासमोर जाऊन उर्वरित पैसे वितरित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी सागरी किंवा खाऱ्या पाण्यात होणाऱ्या मच्छिमारी संदर्भात उत्तर दिले. परंतु गोड्या पाण्यात किंवा तलाव, नद्यांमधील पाण्यात देखील मासेमारी केली जाते. सागरी किंवा खाऱ्या पाण्यात मासेमारी करण्यासाठी केंद्र शासनाची परवानगी घ्यावी लागते. परंतु तलाव किंवा नद्यांमधील गोड्या पाण्यात मासेमारी करण्यासाठी केंद्र शासनाकडून परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. आपल्याला मत्स्य व्यवसायाला मत्स्य शेतीचा दर्जा द्यावयाचा आहे. विदर्भ, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर तलाव आहेत. विशेष करुन भंडारा व गोंदिया जिल्ह्यात ४ हजार तलाव असून तेथे मच्छिमार समाज मोठ्या प्रमाणावर मासेमारी करतो. माझा प्रश्न असा आहे की, गोड्या पाण्यात किंवा तलाव, नद्यांमधील पाण्यात जी मासेमारी केली जाते त्यासाठी मत्स्य शेतीचा दर्जा देण्यात येणार आहे काय ? ज्याप्रमाणे कोस्टलवरील मच्छिमारांना नुकसान भरपाई दिली जाते त्याच प्रमाणे तलाव किंवा नद्यांमधील पाण्यात मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, कोरोना काळात व अतिवृष्टीमुळे मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. शासन ती नुकसान भरपाई देणार आहे काय ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी गोड्या पाण्यातील मासेमारी संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. आपण तोच बेस धरुन केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवितो. कारण तेथे फिड आणि सीडची आवश्यकता आहे. समुद्रात सीड टाकण्याची आवश्कता नाही. कारण ईश्वरानेच तशी व्यवस्था निर्माण केलेली आहे. परंतु गोड्या पाण्यात मासेमारी करावयाची असेल तर कृषी प्रमाणे सीड किंवा इतर साहित्य आवश्यक आहे. आपण तो बेस धरुन केंद्र शासनाकडे प्रस्ताव

श्री.अस्लम शेख........

पाठवितो की, मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा दिला पाहिजे. ज्या ठिकाणी पूर आला किंवा जेथे गोड्या पाण्यात मासेमारी करता आली नाही तेथील रक्कम आपण माफ केलेली आहे. तसा शासन निर्णय आहे. आपण शासन निर्णयानुसार त्यांना रक्कम भरण्यापासून माफी दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी नुकसान भरपाई देता येईल काय असा प्रश्न विचारलेला आहे. आपण नवीन कृषीच्या हिशोबाने हे करीत आहोत त्यामध्ये आपण हे समाविष्ट करु.

श्री.अनिकेत तटकरे : सभापती महोदया, मी सर्वप्रथम मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. शासनाने निसर्ग व तौक्ते चक्रीवादळाच्या वेळी निकष बदलून मच्छिमारांना ६ हजार रुपयांवरुन १२ हजार रुपये म्हणजे दुप्पट नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला. १० ते १५ लाख रुपयांच्या बोटी आहेत. परंतु आपण त्यासाठी जास्तीत जास्त २५ ते ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली. शासन एसडीआरएफ व एनडीआरएफच्या निकषात वाढ करण्यासाठी धोरण अवलंबणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, समुद्रातील माशांची संख्या कमी झालेली आहे. मासेमारी केल्यानंतर त्यावर प्रक्रिया करण्यासाठी शासन धोरण अवलंबणार आहे काय किंवा कोकणातील कारखान्यांसाठी तरतूद करणार आहे काय? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, मच्छी पकल्यानंतर ती साठविण्यासाठी किंवा बाजारपेठेत येण्यासाठी ठराविक कालावधी लागतो. जेथे जास्त मासेमारी होते तेथे तालुक्याच्या ठिकाणी शीतगृह उभारण्यात येणार आहे काय ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, जे मोठे लँडिंग सेंटर आहेत तेथे मच्छिमारांना व्यवस्थित भाव मिळत नाही. कारण मच्छी पकडल्यानंतर वेळेवर ग्राहक मिळाले नाहीत तर मिळेल त्या भावाने माशांची विक्री करावी लागते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मघाशी प्रश्न विचारला होता. आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु मी सांगू इच्छितो की, आपण कन्सल्टंट यांच्या मदतीने नवीन डीपीआर तयार केलेला आहे. आपण तो डीपीआर सीएसएफकडे पाठविलेला आहे. आपण एकूण

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख........

६२ प्रस्ताव तयार केलेले असून ते सीएसएफकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहेत. त्यापैकी २४ प्रस्तावांची एनओसी प्राप्त झालेली आहे आणि ते एनएफडीबीकडे पाठविलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी जे नवीन लँडिंग सेंटर्स आहेत तेथे स्टोअरेज कसे करता येईल, माशांची विक्री झाली नाही तर ते स्टोअर करणे या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. आपण या संदर्भात सकारात्मक विचार करीत आहोत. इंटरनॅशनल लँडिंग सेंटर्सवर ज्या सुविधा आहेत त्या आपल्याला देता येतील काय, त्याची कनेक्टीव्हिटी वाढविता येईल काय, थेट इनपूट करता येते काय या संदर्भात आपण माहिती घेत आहोत. परंतु कोरोना महामारीमुळे हा विषय रखडलेला आहे. आपण नवीन जेट्टी, डेव्हलपमेंटच्या कामासाठी कन्सल्टन्सी घेतलेली आहे. आपण अभ्यास गट तयार केलेला आहे. आपल्याला ही डेव्हलपमेंट प्रगतीपथावर कशी नेता येईल याबाबत अभ्यास करण्याच्या सूचना त्यांना दिलेल्या आहेत. कारण अजूनही त्याच हिशोबाने सुरु आहे. आपण प्रथमच एसडीआरएफच्या निकषाच्या पुढे जाऊन पॅकेज दिले. यापूर्वी जे पॅकेज दिले ते एसडीआरएफच्या नियमानुसार देण्यात आले. महसूल विभागाचा शासन निर्णय असून त्यानुसार तीन योजनांचा लाभ दिला जातो. त्यामध्ये इतर बाबींचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. आपण जे सांगितले त्यानुसार आपण पुढील कार्यवाही करु. (....अडथळा...) श्री.गोपालकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून सजेशन प्राप्त होईल. आपण सोमवंशी समितीनंतर नवीन करणार आहोत त्यामध्ये या सर्व बाबींचा समावेश करण्यात येईल.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित

श्री.विनायक मेटे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, केंद्र शासनाकडून ज्याप्रमाणे कृषी क्षेत्राला सवलती दिल्या जातात त्याप्रमाणे मत्स्य संवर्धनाकरिता सवलती देण्यासाठी मंत्री महोदयांनी केंद्र शासनाच्या धोरणासंबंधी माहिती दिली. परंतु त्याचा काही संबंध येत नाही. राज्य शासन या संदर्भात स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतो. शासन अशा प्रकारचा निर्णय घेणार आहे का ? असल्यास शासन त्याबाबतचा निर्णय कधी घेणार आहे ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. शासनाचे असे मत आहे की, लाभार्थ्यांनी त्यावरील व्याज का द्यावे. मत्स्य विभागाला अद्याप कृषीचा दर्जाचा मिळालेला नाही. मत्स्य विभागाला कृषीचा दर्जा देता येईल का ? याबाबतची शहानिशा करण्यासाठी व त्याकरिता गाईड लाईन्स मिळण्याकरिता सचिवांनी केंद्र शासनाकडे पत्र पाठविले होते तसेच ॲक्वाकल्चरला कृषी दर्जा देत असताना त्यासंबंधी कोणते पॅरामिटर राहणार आहेत ? कृषी विभागामध्ये ज्याप्रमाणे ट्रॅक्टर, डिझेल, इंजिन अशा विविध गोष्टी असतात. या संदर्भात नियोजन व ऊर्जा विभागाचा समावेश आहे. तसेच मत्स्य व्यवसायाला कृषी सवलत दिल्यानंतर वित्त विभागावर त्याचा आर्थिक भार पडणार आहे. या सर्व गोष्टींची माहिती मिळण्यासाठी आयुक्तांनी यापूर्वीच केंद्र शासनाकडे पत्र पाठविलेले आहे. तसेच मत्स्य व्यवसायाकरिता सकारात्मक दृष्टीने कशाप्रकारे कर्ज देता येईल व त्यांना सक्षम कसे करता येईल ? याबाबत शासन प्रयत्न करीत आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी विचारलेल्या प्रश्नातील विषय वेगळा आहे. विदर्भात विशेषत: भंडारा व गोंदिया जिल्हयात गोडया पाण्याच्या तलावात मच्छीमारी केली जाते. सन्माननीय सदस्य डॉ.परिणय फुके यांनी हा विषय अनेकवेळा उपस्थित केलेला आहे. मंत्री महोदयांनी अतिशय चांगले व तपशीलवार उत्तर दिले. परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी बगल दिली. शासनाच्या हातात ज्या गोष्टी आहेत त्यासंबंधी शासनाने कार्यवाही केली पाहिजे. बॉर्डरच्या किनाऱ्यावरील मच्छीमारांचा वेगळा

श्री.प्रवीण दरेकर ...

विषय आहे. शासनाला त्यांना मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा देता आला नाही तरी त्याच्या सदृश असलेले लाभ देण्याकरिता शासनाने घोषणा करावी. केंद्र शासनाकडून मत्स्य व्यवसायासंबंधी सवलत देण्यासंबंधी नंतर जे काही येईल ते येईल. परंतु गोडया पाण्यामधील मच्छीमारीकरिता शेतकऱ्यांप्रमाणे फिडस् व इतर गोष्टी लागत असल्याचे मंत्री महोदयांनी स्वत: कबुल केलेले आहे. त्यामुळे मत्स्य व्यवसाय करणाऱ्या मच्छीमारांना शासनाने शेतीचा दर्जा द्यावा. जेणेकरुन निम्मा प्रश्न निकाली निघण्यास मदत होईल.त्याकरिता केंद्र शासनाच्या परवानगी घेण्याची गरज नाही.

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, मी यापूर्वीच सदनाला सांगितले आहे की, गोडया पाण्यातील किंवा समुद्रालगत असलेल्या ब्रॅकेश वॉटरमधील किंवा मरीनमधील मच्छीमारी असो, या सर्व गोष्टी मत्स्य विभागाशी संबंधित आहेत. गोडया पाण्यामध्ये मत्स्य शेती करीत असताना त्यांना विविध गोष्टी आवश्यक असतात. ही बाब अमान्य करण्याचा प्रश्न येत नाही. ज्याप्रमाणे मरीनमधील मत्स्य शेती करण्यासंबंधी कायदे आहेत. त्याप्रमाणे राज्यात गोडया पाण्यात मत्स्य व्यवसाय करण्यासंबंधी कोणताही कायदा अस्तित्वात नाही. त्याच संदर्भात आमच्या विभागाकडून कार्यवाही केली जात आहे. माझ्याकडे संबंधित विभागाचा कार्यभार अडीच वर्षांपूर्वी आला. त्यातील २ वर्षे करोनामध्ये गेली. तसेच मागील ४०-४५ वर्षांपूर्वी या संदर्भात कोणीही कायदा तयार केला नव्हता. परंतु आम्ही त्या संदर्भात कार्यवाही करुन तो कायदा आपल्यासमोर ठेवला आहे. तसेच चार महिन्यांच्या काळात जवळपास १ एक कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. दंड वसूल करणे हा शासनाचा मूळ उद्देश नाही. याचे कारण मासेमारी करणारे आपल्या देशाचे नागरिक आहेत. परंतु त्यांच्याकडून चुकीच्या पद्धतीने कामे केली जात असल्यामुळे त्यांना दंड करावा लागतो. आता आपण एका टप्प्यावर पोहोचलो आहे. गोडया पाण्यातील मत्स्य व्यवसायासंबंधी व दुसऱ्या बाबी संदर्भात शासन लवकरच निर्णय घेणार आहे. किंबहुना या संदर्भात आपल्यासमवेत विभागाची एक बैठक देखील घेऊ.

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील : सभापती महोदया, मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळण्यासंबंधी सदनामध्ये सविस्तर चर्चा झाली आहे. तत्कालीन मत्स्यव्यवसाय मंत्री श्री.महादेव जानकर यांनी ३ वर्षांपूर्वी केंद्र शासनाकडे मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळण्यासंबंधी पत्र पाठविले होते. केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री श्री.पुरुषोत्तम रुपाला यांनी मला असे सांगितले होते की, मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळणे शक्य होणार नाही. महाराष्ट्रात या विषयासंबंधी आपली दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे शासनाने या संदर्भात स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज आहे. मी स्वत: दोन वेळेस केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री श्री.पुरुषोत्तम रुपाला यांच्याकडे गेलो होतो. शासनाने मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांसाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करुन स्वतंत्र विचार करणे आवश्यक आहे. शासन या संदर्भात कार्यवाही करणार आहे का ?

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, मी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षातील सन्माननीय सदस्य केंद्र शासनाकडे गेले होते. त्यावर केंद्रीय मंत्री महोदयांनी त्यांना असे सांगितले की, ही बाब शक्य होणार नाही. त्यामुळे राज्यातील मच्छीमारांवर अन्याय होणार आहे. मला माहीत होते की, तत्कालीन मत्स्यव्यवसाय मंत्री श्री.महादेव जानकर स्वत: तेथे गेले होते. त्यानंतर त्यांनी आम्हाला असे सांगितले होते की, आम्ही याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. तसेच या संदर्भात आपल्या पक्षातील सन्माननीय सदस्य केंद्र शासनाकडे गेले होते. तसेच त्यांनी सदनाला खरी वस्तुस्थिती सांगितली. आपण याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. राज्य शासन यासंबंधी सकारात्मक विचार करीत आहे. हा विषय सदनामध्ये वारंवार उपस्थित केला जात आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मंत्री महोदय, आमचे या संदर्भात समाधान झाले आहे.

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, आपल्या पक्षातील सन्माननीय सदस्य केंद्र शासनाकडे गेले व त्यांनी सदनाला खरी वस्तुस्थिती सांगितली याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच त्यांनी असाही उल्लेख केला आहे की, राज्यातील शेतकरी ज्याप्रमाणे आत्महत्या करीत आहेत त्याप्रमाणे मत्स्य व्यवसाय करणारे देखील

श्री.अस्लम शेख ...

आत्महत्या करतील. सभापती महोदय, मी यासंबंधी कोणतेही राजकारण करणार नाही. मला असे वाटते की, या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते तसेच ज्येष्ठ नेत्यांनी तेथे गेले पाहिजे. तत्कालीन मस्त्यव्यवसाय मंत्री श्री.महादेव जानकर यांना सदरहु वस्तुस्थिती माहिती असल्यामुळे त्यांनी आम्हाला माहिती द्यावयास पाहिजे होती. परंतु असे काही घडले नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी असे सांगितले की, सर्व लक्षवेधी सूचनांवर सदनामध्ये ३० मिनिटे चर्चा केली जाते. परंतु ही लक्षवेधी सूचना ४० मिनिटांपासून सुरु आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदया, आता मच्छीची सुकट झाली आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी या संदर्भात दिलेल्या उत्तरामुळे आमचे समाधान झाले आहे. आता आम्हाला मंत्री महोदयांकडून यानंतर कोणतेही उत्तर नको.

श्री.अस्लम शेख : सभापती महोदया, मी १५ वर्षांपासून सदनामध्ये काम करीत आहे. प्रथमच असे घडले आहे की, माननीय विरोधी पक्षनेते असे म्हणत आहेत की, आम्हाला या संदर्भात कोणतेही उत्तर नको.

**उप सभापती** : मंत्री महोदय, हे आपले स्कील आहे. मला असे वाटते की, मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेवर उत्तर देण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. आपण त्याबद्दल मंत्री महोदयांचे अभिनंदन केले पाहिजे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदया, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. या अधिवेशनामध्ये ११ व १४ तारांकित प्रश्न चर्चेला आल्यामुळे २ विक्रम झाले होते. आज तिसरा विक्रम झाला आहे की, विरोधी पक्षाच्या एखाद्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी अशा प्रकारे समाधानकारक उत्तर दिल्यानंतर त्यावर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आमचे याबाबत समाधान झाले आहे. आता आम्हाला मंत्री

श्री.विक्रम काळे ...

महोदयांकडून उत्तर नको. अशा प्रकारे उल्लेख करुन विक्रम केल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, या संदर्भात आमचे खरोखर समाधान झाले आहे. मंत्री महोदयांनी या बाबतीत उत्तर दिल्यानंतर त्यातून आम्हाला काय मिळाले ? याबाबत आम्हाला काही माहीत नाही. परंतु यात सदनाचा वेळ वाया जाऊ नये तसेच सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना महत्त्वाचा विषय उपस्थित करायचा आहे. म्हणून आम्ही येथे समाधान झाल्याचे सांगितले आहे. तसेच मंत्री महोदयांनी या संदर्भात बैठक घेणार असल्याचे सांगितले आहे. आम्ही सदर बैठकीच्या वेळी इतर विषय उपस्थित करु.

यानंतर श्री.गागरे ...

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख : सभापती महोदय, मच्छिमारांचा प्रश्नांवर बोलत असताना वेळ वाया जातो हे आपले म्हणणे योग्य नाही. तुमचे समाधान झाले तेथेपर्यंत योग्य आहे.

------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : बार्टी या संस्थेकडून सुरु करण्यात आलेल्या कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता

**मु.शी.** : बार्टी या संस्थेकडून सुरु करण्यात आलेल्या कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री भाई गिरकर, श्री.प्रवीण दरेकर, ॲड निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भाई गिरकर(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दर्जेदार कौशल्य प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बार्टी या संस्थेकडून कौशल्य प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यात येणे, सदर कौशल्य प्रशिक्षण केंद्र ह े सामाजिक संस्थांमार्फत चालविण्यात येत असणे, या सामाजिक संस्थामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत असून सदर योजना मागील अनेक वर्षांपासून मुंबईसह राज्यभरात कार्यान्वित असणे, या कौशल्य प्रशिक्षण केंद्रांतून अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षण घेतले असल्याची बाब समोर येणे, परंतु या विद्यार्थ्यांना मिळणारे अनुदान हे मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्याने सदर सामाजिक संस्थांना अडचणी निर्माण झाल्यााचे निदर्शनास येणे, यामुळे सदर कौशल्य प्रशिक्षण केंद्र बंद पडण्याची शक्यता निर्माण होणे, परिणामी मागासवर्गीय विद्यार्थी हक्काच्या कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित राहत असणे, शासनाच्या या धोरणामुळे संस्थाचालक व मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, मागासवर्गीय

विद्यार्थ्यांना नियमितपणे कौशल्य प्रशिक्षण मिळण्यासाठी सदर संस्थांचे प्रलंबित अनुदान तातडीने

श्री.भाई गिरकर .....

मंजुर करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

डॉ.विश्वजित कदम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, महाविकास आघाडीचे सरकार मागासवर्गीयांवर विशेषत: अनुसूचित जातीवर अन्याय करीत आहे, अशा समज महाराष्ट्रात पसरला आहे. याचे कारण असे की, बार्टी संस्थेचे अनेक उपक्रम बंद केलेले आहेत त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना फायदा मिळत नाहीत. मी प्रश्न विचारु इच्छितो की, राज्यातील मागासवर्गीयांना दर्जेदार कौशल्य प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बार्टी या संस्थेकडून कौशल्य प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यात आलेले आहेत हे आपणास माहिती आहे, यामध्ये ब्युटी पार्लर, शिवणकाम, नर्सिंग कोर्सेस, सदर प्रशिक्षण केंद्र सामाजिक संस्थांमार्फत चालविण्यात येत आहेत. या सामाजिक संस्थेमार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. ही योजना मागील अनेक वर्षापासून मुंबईसह राज्यभरात कार्यान्वीत आहे. या कौशल्य प्रशिक्षण केंद्रातून मागासवर्गीय प्रशिक्षण घेऊन त्यांना नोकरी व रोजगार प्राप्त होतो. परंतु या विद्यार्थ्यांना मिळणारे अनुदान मागील अनेक महिन्यापासून प्रलंबित असल्यामुळे सदर सामाजिक संस्था अडचणीत आल्या आहेत. यामुळे सदर कौशल्य केंद्र बंद पडण्याच्या स्थितीत आलेले आहेत. परिणामी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना हक्काचे कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित राहावे लागत आहेत. मी शासनाला विनंती करतो की, शासनाच्या या धोरणामुळे संस्थाचालक व मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शासनाबद्दल असंतोष निर्माण झालेला आहे. कारण संस्थेला मिळणारे अनुदान व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारे विद्यावेतन दोन तीन वर्षापासून मिळालेले नाही. मी आपणास विनंती करतो की, हे मिळण्यासाठी लवकरात लवकरात प्रयत्न करावेत, आपण कधीपर्यंत कराल याबाबत आश्वासन मला देण्यात यावे.

डॉ. विश्वजीत कदम : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी मांडलेला विषय आपल्या मागासवर्गीय समाजबांधवांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. विशेषकरुन मागासवर्गीय समाजातील युवक बांधव व महिला भगिनी यांना रोजगाराच्या दृष्टीने काही तरी मदत मिळण्यासाठी बार्टी संस्थेच्या माध्यमातून व एनएसडीसी संलग्न असलेल्या संस्थेच्या माध्यमातून विविध विषयावर प्रशिक्षण दिले जाते, सन्माननीय सदस्यांनी याबाबत उल्लेख केला आहे. वेल्डर, फिटर, डाटा एंट्री ऑपरेटर, सिक्युरीटी गार्ड इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. मी सांगू

असुधारित प्रत

डॉ.विश्वजीत कदम .....

इच्छितो की, २०२१ पर्यत बऱ्यापैकी बार्टीच्या माध्यमातून संस्थाचालकमार्फत विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यात आलेले आहे. २०२० पासून कोरोनाच्या संकटापासून शासनाच्या आदेशानुसार हे थांबविण्यात आले. राज्याचा सर्व निधी तिकडे वळविण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास संस्थेकडे ओढा कमी झाला. मागील वर्षीपर्यत १ कोटी ९९ लाखाची तरतूद केलेली होती. त्यात दीड कोटी रक्कम आम्ही दिलेली आहे. ५० लाख रुपये रक्कम शिल्लक आहे. ती रक्कम ३१ मार्चपूर्वी संस्थाचालकांमार्फत विद्यावेतन म्हणून आम्ही देणार आहोत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, कोरोनानंतरच्या काळातही त्यांनी प्रशिक्षण दिलेले आहे त्यामुळे त्यांचे विद्यावेतन व अनुदान केव्हापर्यत देणार आहात. आपण त्या विद्यार्थी संख्या पटाला मान्यताही दिलेली होती.

डॉ. विश्वजीत कदम : सभापती महोदय, पूर्वी अडीच कोटीची तरतूद बार्टीच्या माध्यमातून मागासवर्गीय समाजबांधवांसाठी होती. सन २०२१-२२ मध्ये ही तरतूद ५ कोटी रुपयांपर्यत केलेली आहे. सन २०२२-२३ या वर्षासाठी ही तरतूद १० कोटीपर्यत केलेली आहे. उर्वरित देय रक्कम आम्ही ३१ मार्च पूर्वी देणार आहोत हे मी आपणास सांगू इच्छितो.

श्री.अभिजीत वंजारी : सभापती महोदया, सारथी, बार्टी व महाज्योती या तीन संस्था राज्यात त्या त्या संवर्गातील होतकरु विद्यार्थ्यांकरीता निधी देते. विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, स्वयंरोजगार, राष्ट्रीय संसथांतील शिक्षणाकरीता मदत करण्यासाठी व निधीदेण्याकरीता या संस्थांची निर्मिती झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी केलेला उल्लेख बरोबर आहे. त्यांना अल्पशी मदत करुन चालणार नाही, मागील दोन वर्षांपासून किंवा त्यापूर्वीसुध्दा असे चालू आहे. सारथी, बार्टी व महाज्योती यांची निर्मिती यासाठी केली आहे की, या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम लवकर मिळाली पाहिजे, या योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. याकरीता डिसेंट्रलाईज करुन संस्था व योजना वेगवेगळया केल्या आहेत. परंतु ज्या पध्दतीने आपण तरतूद करत आहात ती वाढविण्याची गरज आहे. तरतूदीनंतर त्यांना

असुधारित प्रत

श्री.अभिजीत वंजारी .....

ताबडतोब निधी वितरीत झाला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे सांगतो की, ओबीसी विद्यार्थी शिष्यवृत्ती घेऊन विदेशात शिकत आहेत पण त्यांची टयूशन फी त्यांच्यापर्यंत पोहचली नाही. मी श्री.सिध्दार्थ गायकवाड, उपायुक्त, नागपूर यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना बोललो आहे. परंतु याची प्रक्रिया वेळकाढूपणाची आहे. ते म्हणतात की, निधी आला नाही, ट्रेझरीमध्ये आला नाही, त्यांचे बील मंजूर झाले नाही. याला अधिक स्ट्रीमलाईन करावे लागेल. त्यांच्यासाठी केलेल्या निधीच्या तरतूदीच्या वितरणाबाबत आदेश निगर्मित करावेत अशी माझी विनंती आहे.

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, कोरोना महामारीच्या काळात वेगळी परिस्थिती महाराष्ट्रात व सरकारच्या कामकाजात निर्माण झाली. त्यामुळे कोरोना काळात अडचणी निर्माण झाल्या. बार्टीच्या माध्यमातून या संस्थांशी करार केला जातो, या संस्थांकडे कोरोना टाळेबंदीच्या काळात विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला. काही रक्कम देय असल्याबाबत मी उत्तर दिले आहे की, ३१ मार्चपूर्वी सर्व बीले तपासून निधी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सारथी, बार्टी, महाज्योती या संस्थांबाबत आपण सूचविल्याप्रमाणे बैठक आयोजित करुन मार्ग काढला जाईल. धन्यवाद.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, महाराष्ट्रात किती संस्थांसोबत करारनामे केले आहेत, किती रक्कम देणे आहे, बजेटमध्ये किती तरतूद केली आहे. या वर्षी एखाद्या जिल्हयात मागणीप्रमाणे नवीन संस्था किंवा ज्या जिल्हयात संस्था नसेल तेथे किती संस्थांना मंजूरी देण्याचे नियोजन आहे हे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो.

डॉ.विश्वजीत कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आतापर्यंत आम्ही १६ संस्थांशी करार केलेले आहेत. एखाद्या जिल्हयात आणखी संस्थांची मागणी असेल तर निश्चितपणे विचारु करुन दुसऱ्या संस्थेला देखील आम्ही परवानगी देऊ.

यानंतर श्रीमती नाफडे

असुधारित प्रत

श्री.नरेंद्र दराडे :सभापती महोदया, कौशल्य प्रशिक्षण, सुरगणा, पेठ, सिन्नर येथे जे शिक्षक रोजंदारीवर घेतलेले आहेत, त्यांना कायम करण्यात येणार आहे का ? कौशल्य प्रशिक्षणांतर्गत असलेल्या विद्यार्थ्यांचे अनुदान कधी देण्यात येणार आहे ?

डॉ.विश्वजित कदम : सभापती महोदय, याबाबत स्पेसिफिक असे न सांगता उर्वरित बिले तपासून सर्व ३९ लाखाची रक्कम दिनांक ३१ मार्च,२०२२ पर्यंत देण्यात येणार आहे.

**उप सभापती :** सन्माननीय मंत्री महोदय आपण चांगले उत्तर देत आहात. आम्ही गेली दोन-तीन वर्ष पाहत आहोत, अनेक अडचणींमुळे अनेक विद्यार्थी पुणे येथे आंदोलनाला बसतात. यामध्ये प्रश्न असा येतो की,आम्ही मुंबईला निरोप देतो, तसेच, आंदोलनाबाबत तुम्हालाही कळवितो. ते विद्यार्थी तसेच आंदोलनाला तीन-चार दिवसांपासून बसतात आणि आम्हाला कळतही नाही. माझी विनंती आहे की, आपण याबाबत ज्यावेळी आमदारांची बैठक घेणार आहात, त्यावेळी आयुक्त, नोडल ऑफिसर, उपायुक्त दर्जाचा अधिकारी जे यासंदर्भात लोकप्रतिनिधींना नियमित माहिती देऊ शकतील, असे एखादे नाव सर्वांना पटलावर किंवा पत्राद्वारे कळविण्यात यावे. कारण या विद्यार्थ्यांना ताबडतोब दिलासा मिळणे शक्य नसेल तर निदान तात्पुरती सद्यस्थिती काय, हे तरी लोकप्रतिनिधींना कळणे गरजेचे आहे. विद्यार्थी उपोषणाला बसल्यानंतर सगळी धावपळ सुरु होते. आमची यामध्ये विनंती आहे की, याबाबत काहीतरी "रिड्रेसल मेकॅनिजम" किंवा त्याबाबत कोणत्या पध्दतीने संवाद या तीनही संस्थांच्या संदर्भात साधता येईल, याबाबत सांगावे. विद्यार्थी, लोकप्रतिनिधी आणि शासन यांच्या संवादाबाबत आपण शासन म्हणून काय करु शकाल, हे आपण सांगावे मी निर्देश देत नाही पण याबाबतीतील सोल्यूशन काय असावे, हे आपण सांगावे.

डॉ.विश्वजित कदम : सभापती महोदया, याबाबत आपण एक महत्त्वाची व चांगली सूचना मांडलेली आहे. निश्चितच विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, विभाग या तिघांमध्ये सवांद साधण्याच्या दृष्टीने शासन म्हणून मी

असुधारित प्रत

डॉ.विश्वजित कदम.....

कॅबिनेट मंत्रीमहोदयांशी चर्चा करुन यातून लवकरच सकारात्मक मार्ग काढण्याचा प्रयत्न करेल, असा विश्वास मी आपल्याला देत आहे.

**उप सभापती :** याबाबत आपण सामाजिक न्याय आयुक्तांना कायमच्या सूचना देऊन ठेवा, ते पुण्यातच असतात.

डॉ.विश्वजित कदम : होय.

---------------

असुधारित प्रत

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**उप सभापती :** सभागृहाची वेळ ही सात वाजेपर्यंत ठरविली होती. मलाही स्वत:ला जायचे आहे. आपल्याला त्यानंतर सभागृहाची बैठक चालू ठेवायची असेल तर आपण माननीय सभापतींना किंवा तालिका सभापतींना विचारुन घ्यावे. अन्यथा उद्या सकाळी उर्वरित प्रस्ताव घ्यायचा असेल तर .....आजचे कामकाज किती वाजेपर्यंत चालवायचे आहे, यावर सभागृहाचे काय मत आहे ?

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, उद्या या सत्राचा शेवटचा दिवस आहे. सभासदांना बोलायला मिळावे, ही आमची सातत्याने आपल्याकडे आग्रही मागणी वा विनंती असते. सभागृहात सभासद बसायला तयार आहेत, त्यांना विषय मांडायचे आहेत. सभागृहाच्या कामकाजाची वेळ रात्री ९.०० वाजेपर्यंत वाढविण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

**उप सभापती :** याबाबत आपण माननीय सभापतींना विचारुन घेऊ, तोपर्यंत अंतिम आठवडा प्रस्ताव सुरु करण्यात यावा. तसेच, तालिका सभापतींनाही किती शक्य आहे, हे विचारुन मला कळविण्यात यावे.

एकूण चर्चेकरिता असलेला वेळ २ तास ४० मिनिटे इतका आहे. त्यापैकी निम्मा-निम्मा वेळ सत्ता पक्ष व विरोधी पक्ष यांच्याकरिता आहे, हे मी आधीच सर्वांना अवगत करत आहे.

असुधारित प्रत

**गडचिरोली येथे महिलांवर सिझेरियन शस्त्रक्रिया करताना हलगर्जीपणा करण्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

डॉ.प्रज्ञा सातव : सभापती महोदया, ज्या महिला प्रसुतीकरिता महिला व बाल रुग्णालय, गांधी चौक येथे गडचिरोली भरती होतात. त्या महिलांवर या रुग्णालयात सिझर शस्त्रक्रिया करुन प्रसुती करण्यात येते. मागील काही दिवसांपासून जवळपास अशा पध्दतीने १०० महिलांवर सिझर शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. त्या दरम्यान टाके घालत असताना संबंधित डॉक्टरांनी बेजबाबदारपणे टाके घातलेले आहे. त्यात जवळ जवळ दोन इंचाची जखम खुली सोडण्यात आलेली आहे. त्यामुळे त्या महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. बाळंतपणामध्ये महिलांच्या जीवाशी खेळणाऱ्या या संबंधित डॉक्टरांवर कडक कारवाई करण्यात यावी, हा माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्या डॉ.प्रज्ञा सातव यांचा जो मुद्दा आहे, त्याची शासनाने दखल घेऊन, त्याबद्दलची वस्तुस्थिती जाणुन त्यांना आणि आम्हालाही पुढील तीन-चार दिवसांमध्ये अवगत करावे. आपण संबंधित विभागाला सांगावे.

श्री.अशोक चव्हाण : होय.

-------------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** राज्यातील नागरी व अन्य विविध समस्यांबाबत राज्य सरकार गंभीर नसणे

**मु.शी.:** राज्यातील नागरी व अन्य विविध समस्यांबाबत राज्य सरकार गंभीर नसणे या विषयावर सर्वश्री प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश धस, सदाशिव खोत, गोपिचंद पडळकर, विनायक मेटे, डॉ.रणजित पाटील सर्वश्री प्रविण पोटे पाटील, महादेव जानकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री निलय नाईक, चंदुभाई पटेल, प्रविण दटके, रमेशदादा पाटील, नागोराव गाणार, राजहंस सिंह, रामदास आंबटकर, रमेश कराड, अमरीशभाई पटेल, रामराव पाटील, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव – वि.प.स.यांचा प्रस्ताव

श्री. प्रवीण दरेकर ( विरोधी पक्ष नेते ): सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम २५९ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे काम कासवगतीने सुरु असणे, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेच्या मेगा प्रोजेक्टमध्ये तसेच कोरोना उपाययोजना कामात उघडकीस आलेली भ्रष्टाचाराची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची प्रलंबित कामे, मुंबई महानगरपालिकेने सन २००५ ते २०२२ या १७ वर्षांच्या काळात रुपये ३ लाख ५२ हजार ९९० कोटी एवढी अवाढव्य रक्कम खर्च करुनही मुंबईच्या समस्या सोडवण्यात व मुंबईकरांना किमान सुविधा पुरवण्यात महानगरपालिकेला आलेले प्रचंड अपयश, मालमत्ता करात सूट देण्याबाबत मुंबईकरांची झालेली घोर फसवणूक, मुंबईतील मराठी शाळांत व पटसंख्येत कमालीची झालेली घसरण, मुंबई महानगरपालिकेकडून

अस्वेधारित

श्री.प्रवीण दरेकर.....

अनधिकृत बांधकामे पाठीशी घातली जात असल्यामुळे अनधिकृत बांधकामांचे फुटलेले पेव, मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा दुसरा टप्पा २०१९ मध्ये सुरु होऊनही दोन वर्षात एक टक्काही काम झालेले नसणे, मुंबई महानगराची शान असलेल्या बेस्टचे खाजगीकरण करण्याचा घालण्यात आलेला घाट, मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामातील कोट्यवधींचे गैरव्यवहार निदर्शनास येऊन देखील चौकशी न करण्याच्या सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळे भ्रष्टाचाऱ्यांना मिळत असलेले प्रोत्साहन, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, ठाणे स्मार्ट सिटी प्रकल्पात झालेल्या अनियमिततेची तातडीने चौकशी पूर्ण करण्याची होत असलेली मागणी, तसेच महसूल विभागाच्या मुद्रांक शुल्क वसुलीत झालेला गैरव्यवहार निदर्शनास येऊन देखील दोषींवर कारवाई करण्यात होत असलेली दिरंगाई, आदिवासी  समाजाच्या मालमत्ता विक्रीबाबत लावण्यात आलेले कठोर निर्बंध शिथिल करण्याची होत असलेली मागणी, महामार्गांसाठी लागणाऱ्या जमिनी भूसंपादन करताना झालेला भ्रष्टाचार, शासकीय जमिनी भाडेपट्टा व कब्जेहक्काने प्रदान केल्यानंतर दिलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी होत असलेला वापर, करारनाम्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याबाबतचे सॉफ्टवेअर कार्यरत असतानाही राज्यातील उपनिबंधक, नोंदणी कार्यालयांकडून आर्थिक फायद्यासाठी ऑनलाईन सेवेला दिलेला फाटा, क्षेत्रीय वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना शासनाने बदलीच्या कायद्याचा केलेला भंग, तसेच पर्यटन उद्योगावर अवलंबून असणाऱ्यांना टाळेबंदीत मदतीचा हात न दिल्यामुळे या क्षेत्राला बसलेला फटका, कोकण व राज्यातील पर्यटन विकासाकडे सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, महालक्ष्मी येथील रेसकोर्सवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क उभारण्याची घोषणा करुनही प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नसणे, अर्थसंकल्पात वरळी डेअरीच्या जागेवर पर्यटन केंद्र आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याची घोषणा करुनही अद्याप तांत्रिक बाबीही पूर्ण केल्या गेलेल्या नसणे, राज्यातील अनेक भागात प्रदूषणात झालेली वाढ, मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी रखडल्याने वाहनांमधून होणाऱ्या प्रदूषणाने गाठलेला उच्चांक, हवामान बदलाबाबत अभ्यासक्रम विकसित

श्री.प्रवीण दरेकर....

करण्याची घोषणा झाली असली तरी दोन वर्षात कोणतीही प्रगती झालेली नसणे, लोकप्रतिनिधी व स्थानिकांना विश्वासात न घेता डोंबिवली एमआयडीसीमधील १५६ कारखान्यांचे स्थलांतर करण्याचा एकतर्फी घेतलेला निर्णय, एकूणच नागरी व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे कोट्यवधी जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदया, नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर मी माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे. आजच्या या प्रस्तावामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजे एमएमआरडीए रिजन त्यामध्ये असणाऱ्या विविध प्रश्नांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, गृहनिर्माण क्षेत्रातील अडचणींचा ऊहापोह या प्रस्तावामध्ये करण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

सभापती महोदया, एमएमआरडीए क्षेत्र म्हणजे मुंबई महानगरपालिका सह इतर महानगरपालिका आणि काही नगरपालिका होय. या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रातील साधारण २८ टक्के लोक राहतात. म्हणजे एकूण महाराष्ट्रातील ३.५ कोटी लोक या एमएमआरडीए क्षेत्रात राहतात. या नागरिकांविषयी चर्चा करत असताना आपल्याला प्रामुख्याने पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, विमानतळ व सागरी वाहतूक मुलभूत सुविधा स्वस्त दरातील घरे, मनोरंजनात्मक सुविधा, आरोग्यविषय सुविधांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.

सभापती महोदया, आपण जर अलिकडच्या काळात पाहिले तर एमएमआरडीए क्षेत्रामध्ये या सर्व सुविधांचा जर विचार केला तर सुविधांपेक्षा समस्यांचीच मोठया प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसत आहे. प्रकल्प रेंगाळलेले आहेत. प्रकल्प वेळेत होत नसल्यामुळे त्याच्या किंमती वाढत आहेत. हा सर्व बोजा शेवटी सर्वसामान्य माणसांवरच येत असतो. मेट्रोची कामे असतील, रस्ते असतील, इतर प्रकल्प असतील, पायाभूत सुविधा प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन अशा अनेक समस्यांबाबत हे महाविकास आघाडी सरकार गंभीर नाही.

श्री.प्रवीण दरेकर....

सभापती महोदय, जे प्रकल्प सुरु आहेत, त्यांच्या निविदांमधील मोठया प्रमाणावर असलेले घोटाळे उघडकीस येत आहेत. महाविकास आघाडी सरकार, मुंबई आणि ठाणे महानगरपालिका यांनी खरोखरच सुविधा देण्यासाठी प्रयत्न केले की, सत्तेचा वापर केवळ स्वत:च्या तुंबडया भरण्यासाठी केला याबाबतच्या उत्तराची अपेक्षा आम्हाला आहे. गेल्या दोन अधिवेशनांमध्ये मी या क्षेत्रातील विविध प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे. अनेक पत्रव्यवहार केले. परंतु केवळ भावनात्मक बोलून या सर्व प्रश्नांची बोळवण करण्याचे काम मंत्रीमहोदयांनी केलेले आहे. या प्रस्तावावर केवळ वांझोटी चर्चा होता कामा नये, मंत्रीमहोदयांच्या उत्तरामध्ये एमएमआरडीए क्षेत्राकरिता शासन काय करणार आहे, याचे उत्तर मिळणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने गेल्या बारा वर्षात ३.५ लाख कोटी रुपये खर्च करुन त्यांनी जो वचन नामा दिला होता, त्यापैकी २५ टक्के आश्वासने देखील पूर्ण झालेली दिसून येत नाहीत. मुंबईतील अनेक समस्या गेल्या २४ वर्षात तशाच आहेत, त्या सुटलेल्या नाहीत. २००९ ते २०२१ या बारा वर्षाच्या काळात मुंबई महानगरपालिकेने ३,५२,९०० कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

यानंतर श्री.सोनावणे.....

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अमरनाथ राजूरकर)**

श्री. प्रवीण दरेकर.......

साडेतीन कोटी रुपयांमध्ये मुंबई शहराचे शांघाय करायला काहीच हरकत नव्हती. आजही मुंबई शहर बकाल अवस्थेत पहायला मिळत आहे. सन २०१७ ते सन २०२१ या ५ वर्षाच्या कालावधीत १ लाख ५३ हजार ५८४ कोटी रुपये खर्च केले. शासनाने दीड लाख कोटी रुपयांमध्ये ती कामे पूर्ण करणे अपेक्षित होते. केवळ फसविण्याचा उद्योग या वचननाम्यातून केलेला आहे. मी माननीय सभापती महोदयांना वचननामा काय होता ते सांगणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या सन १०१७ च्या निवडणुकीत शिवसेने करुन दाखविल्याचे हजारो बॅनर मुंबईत लावले होते. आता जर असे बॅनर लावले तर मुंबईतील लोक टराटरा ते फाडून टाकतील. कारण फसविण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने करुन दाखविले आहे. ५०० फुटापर्यंतच्या घरांचा मालमत्ता कर माफ केला जाईल असे सांगितले होते. मूळात अशा प्रकारचा निर्णय घेण्यासाठी ५ वर्षाचा अवधी लागलेला आहे. निवडणुकीच्या तोंडावर कशी दिशाभूल करणारी घोषणा केलेली आहे हे मी सांगणार आहे. कारण त्यांना मालमत्ता करातून सर्वसाधारण करातून सूट दिलेली आहे. म्हणजे शिक्षण, मनोरंजन कर हे मालकत्ता करात लावले जातात. आपण फक्त सर्वधारण करात सूट दिलेली आहे. मालमत्ता कर वसूल केला जात आहे. अर्धवट कर माफ केला जातोय आणि मालमत्ता करात सूट दिल्याचा दिंडोरा पिटविला जात आहे. ७०० फुटानंतरच्या घरांना मालमत्ता करातून सूट द्यावी अशी सातत्याने मागणी केली जात आहे. त्याचा विचार या ठिकाणी केला जात नाही. ७०० चौरस फुटांवरील सदनिकाधारकांसाठी विशेष कचरा योजना विलगीकरण, गांडूळ खत प्रकल्प, रेन हार्स्वेस्टिंग, सोलर एनर्जी आणि पाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या सोसायट्यांना या मालमत्ता करात सूट दिली जाणार आहे. नवीन बांधकामांना रेन हार्स्वेस्टिंग आणि सोलर एनर्जी बंधनकारक करण्यात आलेली आहे. सीसी दिल्यानंतर ही यंत्रणा कार्यान्वित आहे की नाही हे पाहण्यासाठी कोणतीही यंत्रणा महानगरपालिकेकडे नाही. महानगरपालिकेने ही जबाबदारी का पार पाडली नाही

असुधारित प्रत

याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. तरुणांसाठी ई-वाचनालय दिली जाणार असल्याची घोषणा वचननाम्यात करण्यात

श्री. प्रवीण दरेकर.......

आली होती. आजतागाय एकही वाचनालय मुंबई शहरात सुरु झाले नाही. मुंबई महानगरपालिकेतर्फे कौशल्य विकास केंद्रे सुरु केले जातील अशी घोषणा वचननाम्यात करण्यात आली होती. मुंबई महानगरपालिकेने किती कौशल्य विकास केंद्रे सुरु केलीत याचे उत्तर नगर विकास मंत्री महोदयांनी देण्याची गरज आहे. भायखळा येथे आयटीआयसाठी आरक्षित असलेला भूखंड अल्पसंख्याक किंवा विशिष्ट समाजाला लांगूनचालन करण्यासाठी ऊर्दू भवन उभारण्यासाठीचा निर्णय घेतला होता. त्यांची केंद्रे झाली पाहिजे. पण जे कौशल्य विकास केंद्रासाठी होते ते ऊर्दू भवनासाठी दिलेले आहे आणि पुन्हा सांगणार की, आमची हिंदुत्वाची भूमिका कठोर आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत घेणार असल्याची माहिती माननीय श्री. सुभाष देसाई यांनी दिली होती. या संदर्भात माननीय श्री. सुभाष देसाई यांनी असे सांगितले होते की, बैठक आयोजित केली जाईल. १५० मराठी शाळेत महानगरपालिकेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना सामावून घेण्याची व्यवस्था करावी, अशी माझी आग्रही मागणी आहे. मध्यान्ह भोजन योजनेत दर्जेदार व पोष्टीक भोजन विद्यार्थ्यांना दिले जाणार असल्याची घोषणा केली होती. केंद्र शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना सुरु आहे. महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे केंद्र आणि राज्य शासनाच्या नियमानुसार ती राबविली जाते. सन २०२१ आणि सन २०२२ या कालावधीत महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया राबविली होती. दिनांक ७ जून, २०१९ रोजी निविदा प्रक्रियेची मुदत संपली होती. त्यानंतर पुढील २ वर्षात ही प्रक्रिया पूर्ण झाली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया रद्द करण्याची आवश्यकता होती. सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीत आहार पुरवठाधारक संस्थेची नियुक्ती झालेली नाही. ही निविदा प्रक्रिया राबविण्याचा अट्टहास कशासाठी होता याची कारणे माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला दिली पाहिजे. मीरा-भाईंदर

असुधारित प्रत

महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिकांनी मर्यादा संपल्यानंतर पुन्हा निविदा मागविल्या होत्या. परंतु, मुंबई महानगरपालिकेने जुन्या निविदा मागविता कोणते आर्थिक गौडबंगाल आहे याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी देण्याची गरज आहे. सन २०१८

श्री. प्रवीण दरेकर.......

च्या डिसेंबर महिन्यात तांदुळ अपहार प्रकरणात मुंबईतील महिला सहकारी संस्थांना आणि महिला बचत गटांना नाहक बदनाम करण्यात आले. महिला संस्थाच्या स्वयंपाकगृहाच्या व तांदुळ गोदामाची धाड टाकून चौकशी करण्यात आली आणि कटकारस्थान करीत कष्ट करणाऱ्या गोरगरीब महिला संस्थेची कंत्राटे रद्द करण्यात आली. ९५ संस्थांचे ऑनलाईन निविदा अर्ज बाद करण्यात आले. मुठभर धनाढ्य लोकांना काम देण्याचा घाट घातला होता. तशा प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार करुन तो घाट त्यांनी यशस्वी केला हा माझा आरोप आहे. मुंबई शहरात स्वातंत्र समर दालन सुरु केले जाईल अशी घोषणा वचननाम्यात करण्यात आली होती. ५ वर्षे झाल्यानंतर ती घोषणा हवेत विरली आहे. केवळ भावनिक राजकारण करुन मुंबईकरांना फसविण्याचे काम केलेले आहे. मुंबई महानगरपालिकेकडे अनेक मोकळया जागा आहेत. त्या भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. त्यातील एकही जागा मुंबई महानगरपालिकेला मुंबईतील स्वातंत्र समर दालनासाठी देता आली नाही. आज त्याची अवस्था काय आहे हे मुंबईवासीयांना समजले पाहिजे. मुंबई पूर्व किनाऱ्यावरील मोकळया जमिनीचा हिस्सा मुंबई महानगरपालिकेसाठी संपादित करुन तेथे पर्यटन क्षेत्र राबविण्याची योजना झाली. आज वस्तुस्थिती काय आहे ? मुंबई महानगरपालिकेने भूसंपादन केलच नाही. मुंबई शहरात मुंबई महानगरपालिकेला एकही पर्यटन क्षेत्र उभारता आले नाही. मढ-आयलंड हे एक पर्यटनस्थळ आहे. ते वाचविण्याचे काम शासनाला करता आले नाही. मढ-आयलंडमधील एरंगळचा बोगस नकाशाचा विषय उपस्थित केला होता. महसूल विभागातील अधिकारी त्या ठिकाणी जातात. परंतु, मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी साथ देत नाहीत. त्यामुळे कारवाया होत नाहीत. हे पर्यटनाच्या

अप्रकाशित प्रत

दृष्टीकोनातून करायला पाहिजे. त्या ठिकाणी खाजगी बांधकामे मोठ्या प्रमाणावर झालेली आहेत. परंतु, पर्यटन विकसित करायला मुंबई महानगरपालिकेला वेळ नाही. मागील अधिवेशनात मी त्याचा पर्दाफाश केला होता. माननीय महसूल मंत्री महोदयांनी त्याबाबतची माहिती दिली होती. सिल्वर बिचवर अनेक अनधिकृत बंगले आहेत. मढला सिल्वर बिचवर १८०० स्क्वे.फुटाचे कामे करण्यात आलेले आहे. एरंगळ गावात गांधी व्हिला आहे. भाटिया

श्री. प्रवीण दरेकर.......

ग्रुपने एरंगळ गावात अमन हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड यांनी त्यांच्या प्लॉटच्या पुढील झाडांची कत्तल करुन बांधकामाला सुरुवात केलेली आहे. तक्रार केल्यामुळे त्या बांधकामांना स्टे दिलेला आहे. पण त्या ठिकाणी पाया आणि भिंतीचे काम नव्याने सुरु झालेले आहे. मढ साईवाडी येथे तीच परिस्थिती आहे. मढ मंत्रा हॉटेलने ५ हजार स्क्वे.फुटाचे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. तारीफ खान नावाच्या एका व्यक्तीने ४ हजार चौरस फुटाचे बांधकाम केलेले आहे.

यानंतर श्री.

बोर्डे....

असुधारित प्रत

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अमरनाथ राजूरकर)**

श्री.प्रवीण दरेकर.....

माननीय मुख्यमंत्री एका बाजूला जाहीरपणे सांगतात की, अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालू नका आणि दुसऱ्या बाजूला महानगरपालिकेचे अधिकारी त्यांच्या डोळ्यादेखत अनधिकृत बांधकामांना संरक्षण देतात. या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, मुंबईतील अनधिकृत बांधकामे कधीपर्यंत तोडली जाणार आहेत ? मंत्री महोदयांनी या बाबत उत्तरात सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईतील उद्यानांची पुनर्रचना करण्यात येणार होती. त्या बाबतीत मुंबईकरांना मोठे स्वप्न दाखविण्यात आले. परंतु आज या उद्यानांची काय स्थिती आहे ? या उद्यानांची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. मुंबईतील किती उद्यानांची पुनर्रचना झाली हे समोर आले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबईतील पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी उद्यानात पेंग्वीन पक्षी आणण्यात आले. त्या ठिकाणी पेंग्वीन आणल्यामुळे किती पर्यटक ते पाहण्यासाठी येतात याची आकडेवारी मंत्री महोदयांनी सांगितली पाहिजे. पेंग्वीनवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करुन त्या माध्यमातून एकप्रकारे मुंबईकरांची आर्थिक लूट केली जात आहे. माझ्या माहितीनुसार पेंग्वीन बघण्यासाठी शेकडोच्या संख्येत सुद्धा पर्यटक येत नाहीत. पेंग्वीनवर करण्यात येणारा खर्च दुसऱ्या पर्यटनाच्या विकासासाठी केला असता तर चांगले झाले असते. परंतु या ठिकाणी सरकारला मात्र छंद जोपासायचा होता, त्यांना पेंग्वीनसाठी काही तरी करायचे होते. आम्हाला मुंबईकरांसाठी काही करायचे नाही ही भावना यातून दिसून येते.

सभापती महोदय, मुंबईत मोठ्या प्रमाणावर उद्यानांची उभारणी करण्यात येणार होती. नवीन मैदाने निर्माण करण्याचे ठरले होते. परंतु नवीन मैदाने ही सुद्धा एक थाप ठरली. मुंबईतील मैदानांचे आरक्षण बदलण्यात आले. सभापती महोदय, मुंबईतील किती मैदानांचे आरक्षण बदलून ते विकासकांच्या घशात घालण्यात आले

श्री.प्रवीण दरेकर.....

याची आकडेवारी देखील सभागृहाच्या माध्यमातून मुंबईकरांसमोर आली पाहिजे. एका मैदानाला तर टिपू सुलतान यांचे नाव देण्यात आले. ही खरोखरच दुर्दैवाची बाब आहे. माननीय श्री.रावते साहेब आपण त्या गोष्टीमध्ये सहभागी आहात.

सभापती महोदय, शिवसैनिकांच्या, माननीय श्री.दिवाकर रावते यांच्या आणि माझ्या जिव्हाळ्याचा एक विषय आहे. मुंबईकरांसाठी बाळासाहेब ठाकरे आरोग्य कवच योजना राबविण्यात येणार होती. आज या योजनेची स्थिती काय आहे ? २०१२ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेने सदरहू योजना राबविण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्यांना २०१७ पर्यंत ती योजना सुरु करता आली नाही. २०१७ मध्ये या योजनेचे नाव बदलून दुसरी योजना सुरु करण्याचे मुंबईकरांना वचन देण्यात आले. परंतु ती योजना सुद्धा २०२२ पर्यंत शिवसेनेला सुरु करता आली नाही. याचाच अर्थ शिवसेनेला १० वर्षात आरोग्य कवच योजना सुरु करता आली नाही. शिवसेनेकडून एवढा मोठा विश्वासघात या मुंबईकरांचा होताना दिसतो.

सभापती महोदय, उपनगरातील गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात येईल, असे शिवसेनेने सांगितले होते. गेल्या पाच वर्षात हे महाविद्यालय महापालिकेला सुरु करता आले नाही. मधुमेहावर उपचार करणारी विशेष रुग्णालये सुरु करण्यात येतील, असे देखील सांगितले होते. परंतु हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच दवाखान्यांमध्ये मधुमेहाच्या आजारावर उपचार केले जात आहेत. महानगरपालिकेने त्यासाठी एकही विशेष रुग्णालय सुरु केलेले नाही. या बरोबरच ऑन व्हील ओपीडी व्हॅन सुरु करण्यात येईल, असेही सांगितले होते. मी विचारु इच्छितो की, मुंबईकरांची किती दिशाभूल करायची, मुंबईत ऑन व्हीलच्या किती ओपीडी व्हॅन आहेत ? मुंबईतील साथीच्या आजारांसाठी प्रत्येक वस्तीत मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून पूर्वीपासूसनच आरोग्य सेवा पुरविली जात होती. परंतु जी योजना सुरु होती त्याचेही वचन शिवसेनेने दिले.

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.....

सभापती महोदय, आपत्तीचा सामना करण्यासाठी बहुरुग्ण वाहिका सुरु करण्यात येतील असे शिवसेनेने सांगितले होते. परंतु या योजनेची काय स्थिती आहे ? मुंबईत मागच्या महिन्यात एका इमारतीला आग लागली. मुंबई सतत आगी लागत असतात. ताडदेव येथे आग लागली होती. त्यावेळी नेहमीच्याच रुग्णवाहिका रुग्णांना रुग्णालयात घेऊन जात होत्या. माननीय श्री.रावते साहेब, त्या घटनेच्या वेळी बहुरुग्ण वाहिका कुठे गेल्या होत्या ? मुंबईत ज्या ज्या ठिकाणी आगीच्या घटना घडल्या त्या ठिकाणी एकही बहुरुग्ण वाहिका निदर्शनास आली नाही, ही वस्तुस्थिती आपल्याला मान्य करावी लागेल. या सर्व आपत्तींमध्ये महापालिकेच्या बहुरुग्ण वाहिका कुठे फिरत होत्या, याचे देखील उत्तर मुंबईकरांना मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, देवनार डम्पिंग ग्राऊंड येथे कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्प उभा करण्यात येईल, अशी शिवसेनेने घोषणा केली. त्या प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईतील कचऱ्याची विल्हेवाट लावून मुंबईकरांना दिलासा देणार असे आश्वासन दिले होते. कचरा प्रक्रिया केंद्रासाठी महानगरपालिकेने कंत्राटदाराची नेमणूक केली. त्याला आगाऊ पैसे सुद्धा दिले. परंतु या कामासाठी राज्य सरकारची परवानगीच घेतली नाही. सात वर्षे त्या प्रक्रिया केंद्राचे काम झाले नाही. २०१५ मध्ये कंत्राट रद्द केला, परिणामी कंत्राटदाराला दिलेले पैसे वाया गेले. त्यानंतर महापालिकेने त्या ठिकाणी स्वत: ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. परंतु आजपर्यंत त्या ठिकाणी कोणतेही काम झालेले नाही.

सभापती महोदय, २०१२ च्या निवडणुकीच्या तोंडावर गारगाई-पिंजाळ प्रकल्प उभा करण्याचे मुंबईकरांना आश्वासन दिले गेले. २०१७ पर्यंत हा प्रकल्प उभा राहू शकला नाही. आजही गारगाई-पिंजाळ हे प्रकल्प केवळ कागदावरच आहेत. आजही गिरगावपासून अनेक उपनगरांमध्ये पाण्याची टंचाई आहे. निवडणूक आली की, मुंबईकरांना २४ तास पाणी पुरवठा करण्यात येईल असे आश्वासन शिवसेना पक्षाकडून दिले जाते. २५-२५ वर्षे सत्ता असताना सुद्धा शिवसेनेला मुंबईकरांचे समाधान करता आले नाही. जुन्या विहिरी पुनरुज्जीवीत करुन ते पाणी दैनंदिन

श्री.प्रवीण दरेकर.....

वापरासाठी उपयोगात आणले जाईल, असेही आपण सांगितले. २००९ मध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर विहिरींची डागडुजी, सफाई यावर कोट्यवधी रुपयांचा खर्च केला गेला. परंतु या विहिरीतील पाणी कोणी वापरले ? पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवाल्यांनी या विहिरींतून पाणी नेले. टँकर लॉबी महापालिकेच्या विहिरीतील पाणी विकून लाखो रुपयांची कमाई करतात.

सभापती महोदय, मुंबईकरांच्या आरोग्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवडीसह वृक्ष संवर्धन करण्याची घोषणा करण्यात आली. आरे कारशेडसाठी झाडे तोडण्याच्या निर्णयाला आताच्या पर्यावरण मंत्री महोदयांनी प्रखर विरोध केला होता. परंतु १५ फेब्रुवारी आणि ऑक्टोबर महिन्यात पोलीस संरक्षणात वृक्षतोड करण्यात आली. वृक्षतोडीला विरोध करणाऱ्या वृक्षप्रेमींना पोलिसांची भीती दाखविण्यात आली. परवानगी नसताना सुद्धा वृक्षतोडीचे काम करण्यात आले. आरे वाचवा असा कंठशोष करणारे आज आरेतील वृक्षतोडीला कशी परवानगी देत आहेत ? आरेतील मेट्रो कारशेडला विरोध केला जातो, मग त्या ठिकाणी आरटीओ कार्यालय कसे चालते ? आरेतील मेट्रो कारशेडची जागा आरटीओ कार्यालयाला देण्यात आली आहे. हा पर्यटन स्थळांचा आणि पर्यावरणाचा ऱ्हास नाही काय, या बाबतचे उत्तर द्यावे लागेल.

सभापती महोदय, महानगरपालिकेच्या पूर नियंत्रणासाठी उप नगरात मोगरा आणि माहुल येथे पम्पिंग स्टेशन उभारण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु या संदर्भातील वस्तुस्थिती काय आहे ? मुंबईच्या पूर नियंत्रणेच्या कामावर महानगरपालिकेने आतापर्यंत कोट्यवधी रुपये खर्च केले. पम्पिंग स्टेशनचा पावसाळ्यात काही उपयोग होत नाही. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जाते. परंतु या कामाच्या माध्यमातून कंत्राटदारांवर कोट्यवधी रुपये उधळले जातात.

नंतर श्री.कांबळे......

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

नालेसफाईचा भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांना महानगरपालिका कसे पाठिशी घालते हे मागच्या अधिवेशनात मी उदाहरणासहित सांगितले होते. मिठी नदीचे काम जरी महानगरपालिकेने केले असते तरी पूर नियंत्रणासाठी निश्चितच चांगला उपयोग झाला असता. मिठी नदीचे काम महानगरपालिकेने कसे केले हे मी निदर्शनास आणतो. मिठी नदीवर आतापर्यंत १२५०० कोटी रुपये खर्च झाले आहेत. याही अर्थसंकल्पात २८० कोटी रुपयांची तरतूद मुंबई महानगरपालिकेने केली आहे. प्रकल्प कसे राबवितात याचा नमुना पहावा. सन २०१९ ला महानगरपालिकेने मिठी नदी पुनर्जीवन प्रकल्प हाती घेतला. ५ वर्षांत प्रकल्प पूर्ण करु अशा घोषणा केल्या, पण प्रकल्प पूर्ण झाला नाही. या प्रकल्पामध्ये कोणत्या कामांचा अंतर्भाव होता ते मी सांगतो. मिठी नदीचे खोलीकरण, जपानी तंत्रज्ञानावर आधारित बोगदा, मिठी नदीलगत कृत्रिम तलाव व पातथळ तलाव तयार करणे, नदीला बारमाही वाहते करणे, माहिम खाडीत पंप बसविणे, मिठी नदीत जलवाहतूक करणे, कांदळवनाचा विकास करणे, पर्यटनासाठी कृत्रिम जंगल वसविणे, मिठी नदी सुशोभिकरण अशी कामे होती. सन २०१९ ला प्रकल्प सुरु झाला. ३ वर्षे झाली अजून सल्लागाराची नेमणूक नाही. आपण सल्लागाराची नेमणूक ३ वर्षे करु शकलो नाही. ५ वर्षांतील ३ वर्षे संपली आहेत. मात्र तरीही या महत्त्वकांक्षी प्रकल्पाला ३ वर्षांत सल्लागार नेमू शकला नाही. प्रकल्प राबविण्याची अशी पध्दत असते का ?

सभापती महोदय, पहिल्या टप्प्याचे काम आजही अपूर्ण आहे. मिठी नदीच्या पहिल्या टप्प्यातील कामे सुध्दा अजून पूर्ण झालेली नाहीत. सरंक्षण भिंतीचे काम अपूर्ण आहे. सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण आहे. सीएसटी पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे पर्यंत असणारी रिटेनिंग वॉल, सर्व्हिस रोड आणि सिव्हर लाईनचे काम देखील आज अपूर्ण आहे. अजून या कामांची साधी निविदा देखील काढली नाही. सर्वात आवडीचा विषय आहे की, एवढी कामे राहिली आहेत, पण कंत्राटदारांना मात्र ६४६ कोटी ९३ लाख ५२ हजार रुपये देऊन महानगरपालिका मोकळी झाली आहे. पैसे

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

देण्याची घाई आहे. मिठी नदीचा वापर फक्त कंत्राटदारांचे खिसे भरण्यासाठी करणार असाल आणि मुंबईकरांच्या भल्याच्या गोष्टी करणार नसाल तर मुंबईकर आपल्या भूलथापांना बळी पडणार नाहीत. तुम्ही या संदर्भात सांगितले होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, आपण महानगरपालिकेत महौपार म्हणून काम केले आहे. मुंबई महानगरपालिका आणि बेस्ट यांचा अर्थसंकल्प एकत्र करु असे आपण सांगितले होते. आपण घोषणा केली होती. मात्र वस्तुस्थिती काय आहे ? महानगरपालिका आणि बेस्टचा अर्थसंकल्प आजपर्यंत एकत्रित झालेला नाही. दुसरीकडे यांनी काय पराक्रम केला ते पहा. बेस्टची आगारे आंदन दिली आहे, ती विक्रला काढली आहेत. प्रतिक्षानगरचे आगार रातोरात बंद केले. दिनांक १४.२.२०२२ ला डेपो बंद केला. खाजगी कंत्राटदार मातेश्वरी ट्रान्सपोर्ट लिमिटेडला हे आगार देऊन टाकले आहे. बेस्ट निवास आहे. जे काबाडकष्ट करतात, त्या बेस्टच्या कामगारांकडून ७ ते ८ हजार रुपये घेतले जातात. मात्र या कंत्राटदाराला संपूर्ण डेपोचे वार्षिक भाडे दीड हजार रुपये आहे. १ रुपया नाममात्र दराने ते दिले आहे. बेस्टकडे भाडे तत्वावर १५५४ बसगाड्या आहेत. या गाड्या उभ्या करण्यासाठी प्रतिक्षानगर बस डेपो भाड्याने दिला आहे. बेस्ट उपक्रमाला उत्पन्न मिळविण्यासाठी हा डेपो भाड्याने दिला असता तर आम्ही समजू शकलो असतो. पण वर्षाला एका बसगाडीसाठी १ रुपया अशा दराने हा डेपो दिला आहे. बेस्टला वर्षाला फक्त दीड हजार रुपये मिळणार आहेत. रामदेव हरिप्रसाद पांडे या मातेश्वरी कंपनीच्या मालकावर एवढी मेहेरनजर होण्याचे कारण काय ? बेस्टचे जाणीवर्पूक खाजगीकरण करण्याचा डाव रचल्याचा माझा आरोप आहे. बेस्टला वाचविण्याऐवजी बेस्टला गाळात घालण्याचे काम केले आहे. बेस्टच्या खाजगीकरणाचा कुटील डाव आखला गेला आहे.

सभापती महोदय, आशियातील सर्वात चांगली परिवहन सेवा म्हणून आपल्या मुंबई बेस्टचे कधीकाळी नाव होते. आज बेस्ट सेवेला घरघर लागली आहे. महानगरपालिकेने बेस्टला वाचविण्यासाठी एवढ्या वर्षांत कोणत्याही प्रकारच्या

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दरेकर ....

उपाययोजना केल्या नाहीत. आजही लाखो मुंबईकर बेस्टवर अवलंबून आहेत. बेस्ट प्रचंड तोट्यात आहे. कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी पैसे नाहीत. उद्या त्यांच्यावर एसटी कर्मचाऱ्यांसारखी आत्महत्येची वेळ येईल की काय अशी बेस्ट कर्मचाऱ्यांची परिस्थिती असताना दुसरीकडे विकासकांकडे बेस्टचे ३०० कोटी रुपये अडकले आहेत. मात्र ते घेण्यास यांना वेळ नाही. आपण हे प्रकरण पहावे. बेस्टसाठी आरक्षित असलेल्या भूखंडापैकी ५० टक्के जागा कमर्शिअल वापरण्याची परवानगी शासनाने सन २०१० मध्ये दिली, त्याप्रमाणे विकासकांमार्फत विकास करण्याचे बेस्टने ठरविले. कुर्ला बस आगार, ओशिवरा वाणिज्यिक रहिवासी संकुल, कांदरपाडा बसस्थानक, माहिम बस स्थानक, मरोळ, मरोशी बस स्थानक व यारी रोड बस स्थानक विकसित करण्यात आले. विकासकांनी बेस्टला जागेपोटी आणि डेव्हलपमेंट चार्जपोटी जी रक्कम द्यायची होती ती रक्कम आजपर्यंत दिली नाही. आपण ही योजना विकासकासाठी आणली होती की बेस्टची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी आणली होती हे समजायला मार्ग नाही.

सभापती महोदय, गेल्या १० वर्षांपासून विकासकाकडे अडकलेली रक्कम मी सांगतो. व्याजापोटी ८६ कोटी ३४ लाख रुपये, हस्तांतरण व विकास शुल्क १६ कोटी ८० लाख रुपये, कामे उशिरा केल्यामुळे दंड १४ कोटी ६५ लाख रुपये, भाडेपट्टा आकार २२ कोटी ६३ लाख रुपये, ना परतावा अधिमूल्य १९ कोटी १३ लाख रुपये, इतर ५४ लाख रुपये, विकास शुल्क २९० कोटी १५ लाख रुपये, मरोळ, मरोशी विकासकाकडून २९ कोटी ५ लाख ८३ हजार रुपये असे ४८६ कोटी रुपये अडकलेली रक्कम आहे आणि यापैकी ४० कोटी रुपये वसूल झाले आहेत. पण आजही सुमारे ४२५ कोटी रुपये विकासकांना सोडण्याचे कारण काय हे समजले पाहिजे. हे विकासक पैसे खाऊन बसले आहेत. विकासकाची काळजी महानगरपालिका घेत आहे. दुसऱ्या बाजूला बेस्ट नेस्तनाबूत होत आहे, ते पहायला आपल्याला वेळ नाही.

श्री. प्रवीण दरेकर ....

सभापती महोदय, मरोळचा विकासक तर दिवाळखोर झाला. त्याने कंपनी न्यायाधिकरण, अहमदाबाद येथे याचिका दाखल केली आहे. कोणीही ही याचिका निकाली निघावी म्हणून महानगरपलिकेकडून प्रयत्न करीत नाही. त्यामुळे असे ३०० ते ३५० कोटी रुपये अडकले आहेत. परंतु आम्हाला बघायला वेळ नाही. सागरी मुक्त मार्ग पूर्ण करु असे सांगितले. मात्र आजही तो पूर्ण झालेला नाही. सागरी मुक्त मार्गाच्या कामात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाला आहे. मी मागच्या अधिवेशनात चौकशीची मागणी केली होती. मात्र महानगरपालिका, सरकार चौकशी करायला तयार नाही. रस्त्याचे काँक्रिटीकरण व डांबरीकरण करुन खड्ड्यांचा प्रश्न निकाली काढणार असे सांगितले. महानगरपालिकेने रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर केली. पण त्यामागे मुंबईकरांना सुविधा देण्याचा मानस नव्हता, प्रत्यक्षात कोट्यवधीची गंगाजळी जमविण्यासाठी रस्त्यांची कामे केली. प्रत्येक वर्षी घोटाळे बाहेर येत आहेत. काही लोकांवर थातुरमातूर कारवाई केली जात आहे. मी त्याचा उल्लेख गेल्या वेळी केला होता. परंतु त्याच कंत्राटदारांना, ज्यांनी चुकीचे काम केले आहे, जे काळ्या यादीत आले आहेत, त्यांनाच पुन्हा पुन्हा कामे दिली जातात. खड्ड्यांचा प्रश्न २५ वर्षांत महानगरपालिका सोडवू शकली नाही. आपण डबेवाल्यांसाठी डबे भवन उभारणार होता.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर....

सफाई कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना देण्यात येणार होती. ती योजना महानगरपालिकेने सुरु केली परंतु अद्याप एक इंचही पुढे गेली नाही. आश्रय योजनेचे टेंडर फायनल केले त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. अशा प्रकारे दिलेला शब्द सरकार फिरवीत आहे. कोळी बांधव मुंबईचा आद्य रहिवासी आहे. हे सरकार कोळीवाड्याचा विकास करणार होते. कोळी समाजाने शिवसेनेला नेहमी पाठबळ दिले. नगरसेवक, आमदार यांना निवडून दिले. शिवसेनेच्या उभारणीत कोळी समाजाची मोठी मदत झाली. त्यामुळे शिवसेनेने कोळी समाजाला वाऱ्यावर सोडायला नको. कोळीवाड्याचा विकास करण्याबाबत आज काय वस्तुस्थिती आहे. महानगरपालिकेने कोळीवाड्याचा विकास केल्याचे एक उदाहरण मला मुंबईत दाखवून द्यावे. या सरकारने कोळी वाड्याचा विकास केला नाही परंतु त्यांना मालमत्ता करातून सूट दिली नाही. उलट कोस्टल रोडच्या प्रकरणात मच्छिमारांचा आवाज दाबण्याचे काम या सरकारने केले आहे.

सभापती महोदय, अनधिकृत बांधकामासंदर्भात केंद्रीय मंत्री श्री.नारायण राणे यांचा अधीश बंगला तोडण्याची नोटीस देण्यात आली. महानगरपालिकेचे पाच-पाच अधिकारी तेथे गेले होते. श्री.मोहित कंबोज यांच्या घरी महानगरपालिकेचे अधिकारी गेले होते. राजकारणातून आपणाला ज्या गोष्टी करायच्या आहेत त्या करा. त्या विषयी माझे काहीही म्हणणे नाही. चुकीचे असेल तर कारवाई करा. अनेक अनधिकृत बांधकामांची यादी मी आता वाचतो. सरकारमध्ये धमक असेल तर कारवाई करावी. मी ज्यांची नावे घेतो त्यांच्यावर सरकार कारवाई करणार आहे काय ? महानगरपालिकेचे अधिकारी कनिष्ठ अभियंता किरणदास यांनी ८५/८६ काझी सय्यद स्ट्रीट चकाला, १०७/११७, झंझीकर स्ट्रीट, २५६, नागदेवी स्ट्रीट, चकाला, चकाला,१०१ इकॉनॉमीक हाऊस, फर्स्ट फ्लँक रोड, चिंचबंदर, ३५/३७ नाखोदा स्ट्रीट,१३२, जकारिया मस्जीद स्ट्रीट,१२०/१२४ निशान पाडा डोंगरी, ८२/९४ नाखोदा स्ट्रीट व्ही.एन.रोड. २२/२४/२६, टनटनपुरा स्ट्रीट, रॅपिड हाईटस्, कोलसास्ट्रीट, पायधुनी या अनधिकृत बांधकामांची मुख्य अभियंता यांच्याकडून

श्री.प्रवीण दरेकर...

तातडीने चौकशी करा. नगर विकास मंत्री महोदय तुमच्यावर आमचा भरवसा व विश्वास आहे. अनधिकृत बांधकामे तातडीने तोडण्याचे धाडस आपण दाखवावे. कंत्राटदार विकासक व कनिष्ठ अभियंत्यांवर कारवाई करण्याचे धाडस मुख्यमंत्री महोदय दाखवतील काय ? महानगरपालिका आयुक्तांना मी पत्र दिले आहे. मी दोन स्मरणपत्रे दिली. मला महानगरपालिकेकडून चार ओळीचे उत्तर आले नाही आणि कारवाई देखील करण्यात आली नाही. वॉर्ड ऑफिसर यांच्या नजरेस ही बाब आणून दिली. आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. काही विशिष्ट लोकांचे लांगूनचालन शिवसेना संघटना करते त्यावेळी आम्हाला यातना होतात. विशिष्ट लोकांना खूश करण्यासाठी डोंगरी किंवा इतर परिसरातील बांधकामे आपण तोडत नाहीत. माननीय श्री.नारायण राणे व श्री.मोहित कंबोज आणि भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांवर राजकीय अभिनिवेषातून कारवाई केली जात आहे. सरकारच्या वागण्यातून सूडभावना दिसून येते. अनेक उदाहरणे मी देईन. परंतु सभागृहाचा वेळ जास्त जाता कामा नये. मी वडाळा येथील उदाहरण देतो. वडाळा येथील पक्ष प्रमुखांच्या बांधकामाकडे कसा कानाडोळा करतात. मुंबईत पक्षीय वातावरण सुरु आहे. मुंबईच्या वडाळा भागात सहकारनगर इमारत क्रमांक ३१ व ३२ समोर खेळाचे मैदान आहे. याठिकाणी शिवाई कला क्रीडा मंडळाने बांधकाम केले तक्रार झाल्यावर महानगरपालिकेने ते बांधकाम ताब्यात घेतले. शिवसेना पक्षाचे नगरसेवक श्री.अमेय घोले यांना २०१८ मध्ये संगणक क्लासेससाठी तात्पुरत्या स्वरुपात जागा देण्यात आली होती. तेथे वेदांत फाऊंडेशन यांनी क्लासेस सुरु केले. क्लास चालक प्रत्येक विद्यार्थ्याकडून १०६२ रुपये फी आकारतो. बेस्ट विद्युत पुरवठा कंपनीने क्लाससाठी वीज पुरवठा केलेला नाही. याचाच अर्थ चोरीची वीज क्लासमध्ये वापरण्यात येत आहे. शिवाई क्रीडा मंडळाची जागा ताब्यात घेतली असताना सहाय्यक आयुक्त श्री.ओंबाळे यांनी ना हरकत प्रमाणपत्र राजकीय दबावापोटी दिले. आपला तो बाब्या दुसऱ्याचे ते कार्टे असा हा प्रकार आहे. हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असताना श्री.अमेय घोले यांनी महानगरपालिकेच्या गार्डन विभागाला जागा दुरुस्तीसाठी पत्र दिले. महापालिकेच्या तिजोरीतून बांधकाम दुरुस्तीसाठी बेकायदेशीर

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर...

रित्या निधी दिला गेला. या बांधकामासाठी महानगरपालिकेची परवानगी नाही. हे अनधिकृत बांधकाम आहे. तरी देखील माननीय मंत्री श्री.आदित्य ठाकरे यांनी नुतनीकरण केलेल्या वास्तुचे लोकार्पण केले. अनधिकृत बांधा, बेकायदेशीर बांधा, महानगरपालिकेचे कराचे घामाचे पैसे वापरा व अनधिकृतपणे जनतेसाठी लोकार्पण करणार असाल तर हे योग्य होणार नाही. मुख्यमंत्री महोदय सांगतात की, अनधिकृत बांधकाम करणाऱ्याला पाठीशी घालणार नाही. दुसऱ्या बाजूला अनधिकृत बांधकामाच्या फीती मंत्री महोदय कापणार असतील तर करणी आणि कथनीतील फरक दिसून येतो. नगर विकास मंत्री महोदय या प्रकरणाची चौकशी करु शकतील किंवा नाही याची मला माहिती नाही. कोरोनाच्या काळात मुंबईला वाऱ्यावर सोडण्यात आले. ऑक्सीजन प्लँटच्या कामात १०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला. कोरोना काळात केंद्र सरकारने ऑक्सीजन प्लँट मंजूर केला व निधी दिला त्याची अंमलबजावणी करण्याचे काम राज्य सरकारचे होते. याबाबत महाविकास आघाडी शासनाने व महानगरपालिकेने टाळूवरील लोणी खाण्याचा प्रयत्न केला. माहिती अधिकारात माहिती मागविली असता ही बाब समोर आली आहे. ऑक्सीजन प्लँटची २६७ कोटी रुपयांची कामे सुरु केली. १९ ऑक्सीजन प्लँट उभे करायचे होते. महानगरपालिकेने नेहमी प्रमाणे निविदा काढल्या होत्या.कोविड सेंटर, रस्त्याची कामे, पेग्विंनची सुरक्षा व डेब्रिज उचलून नेण्याचे काम यासाठी संपूर्ण मुंबईत एकच कंपनी काम करते. मुंबईत दुसऱ्या कंपन्या नाहीत. महाराष्ट्रात, मुंबईत व भारतात दुसरी कंपनी नाही. या कंपनीची खासियत अशी आहे की, कोणताही अनुभव नसताना ही कंपनी कोट्यावधीची कामे लिलया करते. हा जादुई चमत्कार आहे. या कंपनीचे नाव हायवे कन्स्ट्रक्शन कंपनी असे आहे. महानगरपालिकेचा हा लाडका कंत्राटदार आहे. १० ऑक्सीजन प्लँटचे काम होते. १९ पैकी १२ कामे हायवे कंन्स्ट्रक्शन कंपनीला अनुभव नसताना देण्यात आली. ७ कामे मे.जी.एस.एन. असोसिएटसला देण्यात आली. मुंबई महानगरपालिकेने पहिल्या टप्प्यात हायवे कंपनीला ९ ठिकाणी २२२९० एलपीएम प्लँट उभारण्यासाठी २५ जून २०२१ रोजी वर्क ऑर्डर दिली. त्याची किंमत ७७ कोटी १५ लक्ष रुपये होती. काम पूर्ण करण्याची

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर...

मुदत ३० दिवसांची होती. व्ही.एन. देसाई, बी.डी.ए., बी.ए., कस्तुरबा, नायर, कूपर केईएम येथील प्लँट १९ ऑगस्ट २०२१ रोजी पूर्ण करण्यात आले. २० ऑगस्ट रोजी कुर्ला भाभा, २५ ऑगस्ट ला सायन, २६ ऑगस्ट ला जीटीबी येथील कामे करण्यात आली आहेत.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर.......

महानगरपालिकेने वेळेत काम पूर्ण न केल्यामुळे ३ कोटी ६ लाख रुपयांचा दंड लावलेला आहे. माझा दावा आहे की, दंड लावण्याचे केवळ नाटक आहे काय ?

**तालिका सभापती (श्री.अमरनाथ राजूरकर) :** सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, हा दंड केवळ दिखाऊपणासाठी आहे काय ? मी मारतो तू रड असा प्रकार आहे काय ? दुसऱ्याच दिवशी हायवे कंपनी दंड आकारल्याबाबत कोर्टात केली. सीव्हीसी गाईड लाईन प्रमाणे कंपनीला दंड लावला असेल आणि दंड भरण्याऐवजी त्या कंपनीने लिटीगेशन केले तर अशा कंपनीला दुसरे काम दिले जात नाही. परंतु ज्या प्रेमात महानगरपालिका आकंठ बुडाली आहे त्या हायवे कंपनीला दुसऱ्या टप्प्यात पुन्हा ५९ कोटी ३६ लाख रुपयांचे काम दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी दिले गेले. पुन्हा या कामातील के.जे. सोमय्या येथील काम कंपनीने १२ दिवस उशिरा पूर्ण केले.

सभापती महोदय, मी महानगरपालिका व कंत्राटदार यांच्या प्रेमाची दुसरी गोष्ट सांगू इच्छितो. तिसऱ्या टप्प्यात प्रकल्पाची किंमत १३० कोटी ३६ लाख रुपये होती. ४३,५०० एलपीएम प्लांटची उभारणी करायची होती. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात कामे पूर्ण करण्याची मुदत ३० दिवस होती. परंतु आपले कंत्राटदार अडचणीत येत आहेत म्हणून उदार अंत:करणाने ३० दिवसांची मुदत स्वत:हून ४५ दिवस करण्यात आली. मुदत वाढवण्यासाठी महानगरपालिकेने कोणती कारणे दिली ? मोठा पाऊस, वीज पुरवठा नाही अशा तकलादू ग्राऊंडवर केवळ कंत्राटदारांच्या फायद्यासाठी मुदत वाढवून देण्यात आली. हे काम जीएसएन असोसिएटला देण्यात आले. कार्यादेश दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी दिलेला आहे. मुदत वाढवून सुध्दा काम पूर्ण करण्यासाठी १२ ते ८६ दिवसांचा विलंब झाला. परंतु प्रेमाखातर फक्त १ कोटी ४ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. माझे आक्षेप काय आहेत ? निविदा तयार करतानाच बाजार मूल्यापेक्षा अवाढव्य किंमत निश्चित करण्यात आली. निविदा तयार

श्री.प्रवीण दरेकर.......

करताना विशिष्ट कंत्राटदारांना समोर ठेऊन अटी व शर्ती तयार करण्यात आल्या. निविदा काळात कोरोना मोठ्या प्रमाणावर होता. त्यावेळी ऑक्सिजन प्लांटची गरज होती, तरीही काम पूर्ण करण्याची मुदत वाढवून देण्यात आली. दंडाची आकारणी कमी करण्यात आली असाही माझा आक्षेप आहे. कंत्राटदाराने वेळेत काम पूर्ण केले नाही, दंड भरला नाही, पालिकेविरुध्द कोर्टात दावा दाखल केला. परंतु या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याऐवजी त्याला दुसऱ्या टप्प्यातील काम देण्यात आले. त्यामुळे मुंबईकरांचे १०० कोटी रुपये वाया गेलेले आहेत. कंत्राटदारांच्या प्रेमापोटी काबाडकष्ट करणाऱ्या मुंबईकरांच्या घामाच्या पैशांची लयलूट होत आहे. माझी मंत्री महोदयांकडे मागणी आहे की, या संपूर्ण प्रकरणाची अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडून चौकशी करण्यात करावी. सर्व कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे आणि माफ केलेल्या दंडाची फेरआकारणी करावी.

सभापती महोदय, "वन रुपी क्लिनीक" घोषणा करण्यात आली होती. आता आपण शिवयोग केंद्राचे गाजर दाखवित आहात. मागील वर्षी वन रुपी क्लिनीकची घोषणा केली. परंतु एकही क्लिनीक उघडण्यात आले नाही. आता मुंबईकरांना शिवयोग केंद्राचे गाजर दाखवण्यात आले आहे. मुंबईकरांच्या आरोग्यासाठी २०० शिवयोग केंद्र स्थापन करण्याची घोषणा असली तरी त्यासाठी फक्त ३० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ३० कोटी रुपयांमध्ये किती केंद्रे स्थापन होणार आहेत असा प्रश्न आहे.

सभापती महोदय, महानगरपालिकेचा कारभार अधिकारी चालवत नाहीत तर सल्लागार चालवितात. मुंबई महानगरपालिकेत अनेक चांगले, तज्ज्ञ अधिकारी आहेत, ज्येष्ठ अधिकारी आहेत. महानगरपालिकेचे प्रत्येक विभाग आहेत. परंतु, प्रत्येक वर्षी १ हजार कोटी रुपये सल्लागारांवर खर्च केले जातात. हा एक धंदा झालेला आहे. कोणताही प्रकल्प असो त्या प्रकल्पात ५-५० कोटी रुपये सल्लागारांवर उधळले जातात. मागील अधिवेशनात मी आश्रय योजनेचा भ्रष्टाचार

असुधारित

श्री.प्रवीण दरेकर.......

मांडला होता. आश्रय योजनेसाठी सल्लागारांवर २५० कोटी रुपये खर्च करण्यात आले. २५० कोटी रुपयांमध्ये काही घरे तयार झाली असती. परंतु सल्लागारांवर २५० कोटी रुपये खर्च करण्यात आले. महानगरपालिकेचा सल्लागार धार्जिणा कारभार थांबविण्यासाठी महाविकास आघाडी सरकार कोणती कारवाई करणार आहे ?

सभापती महोदय, आपल्याला सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्प १० वर्षात पूर्ण करता आला नाही. मागील १० वर्षांपासून मुंबई महापालिका सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्पाची घोषणा करीत आहे. परंतु अद्याप कंत्राटदार सुध्दा निश्चित झालेला नाही. महानगरपालिकेने सल्लागार नेमून त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले. निविदांसाठी बेस रेट ठरविताना सल्लागाराने नेमका कोणता सल्ला दिला ? ६० टक्के अबाऊ निविदा का येत आहेत ? कंत्राटदार, अधिकारी, सल्लागार यांच्या संगनमताने हे सर्व होत असल्याचा माझा आरोप आहे. हे १८ हजार कोटी रुपयांचे काम आहे. महानगरपालिकेचा हा कारभार मुंबईकरांना बघावयास मिळत आहे. आपण बोगस एसआरए योजना राबविणाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? माझ्याकडे भरत मारुती सावर्डेकर यांची एक तक्रार आलेली आहे. ऐश्वर्या लाइट कन्स्ट्रक्शन कंपनीने बेकायदेशीररीत्या एसआरए योजना राबवल्याबाबतची एका आमदाराविरोधात तक्रार आहे. ऐश्वर्या लाईट कन्स्ट्रक्शन कंपनी कोणाची आहे ? आसू निहलानी, हरमितसिंग गुप्ता नगर भूमापन क्रमांक ३६८/२, मौजे मोगरा तालुका अंधेरी ही जागा तात्पुरत्या स्वरुपात रस्ता रुंदी करणामध्ये बाधित झालेल्या झोपडीधारकांना देण्यात आली होती. तो भूखंड या कंपनीने परस्पर हडप केलेला आहे. १९८९ मध्ये मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या मालकीच्या मिळकतीवर ९० वर्षाच्या भाडेपट्टयावर मजासवाडी इन्क्लाब नगर गृहनिर्माण संस्थेचे पुनर्वसन झाले. मालमत्ता पत्रकावर १४१४ चौरस मिटरचा भूखंड दाखविलेला आहे. ऐश्वर्या कंपनीने रहिवाशांची दिशाभूल करुन एसआरए योजनेचा प्रस्ताव ठेवला. जो भूखंड लिज रेंटवर दिलेला आहे त्या भूखंडावर एसआरए योजना राबविता येते काय ? मंत्री महोदयांनी या

श्री.प्रवीण दरेकर.......

संदर्भात उत्तर दिले पाहिजे. तेथे योजना राबवियची असेल तर ती ३३ (७) अन्वये राबवावयास पाहिजे होती. परंतु ३३ (१०) अन्वये योजना राबविण्यात आली. अशा प्रकारे योजना राबविता येते काय ? तो भूखंड म्हाडाचा असल्यामुळे म्हाडाची परवानगी घ्यावयास पाहिजे होती. परंतु ती परवानगी घेण्यात आली नाही. त्या भूखंडाच्या खाली मोठ्या जलवाहिन्या आहेत परंतु कोणाचीही परवानगी न घेता उत्खनन करण्यात आले. सदर भूखंड १४१४ ऐवजी १७४१ चौरस मीटर असल्याची खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली. तो अकृषिक भूखंड आहे. विकास करण्यापूर्वी एनए परवानगी घ्यावी लागते. परंतु ती परवानगी घेण्यात आली नाही. याच पुनर्वसन प्रकल्पाच्या बांधकामाला महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायदा १९६६ अन्वये दिनांक ८.७.२०१८ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंता यांनी नोटीस देखील पाठवली होती. एफएसआयची चोरी झाली. परिशिष्ट दोनमध्ये गडबड करण्यात आली. जिल्हाधिकारी व विमान प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली नाही. एवढ्या सर्व अनियमितता केल्यानंतर ज्यावेळी तक्रार करण्यात आली त्यावेळी योजनेला स्थगिती देण्यात आली. बेकायदेशीर उत्खनन देखील करण्यात आले. गृहनिर्माण विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली किंवा तत्सम अधिकाऱ्यांमार्फत या संदर्भात चौकशी करण्यात येणार आहे काय ? कंपनीवर आणि त्यांच्या भागीदारांवर गुन्हा दाखल करुन दंडाची रक्कम तातडीने वसूल करण्यात यावी. मूळ रहिवाशांचे जे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी आणि ती बिल्डरांकडून वसूल करावी, अशा प्रकारची मागणी मी करीत आहे.

सभापती महोदय, मी कोस्टल रोडमधील भ्रष्टाचाराबाबत अनेक पत्रे पाठविली. परंतु मला कोणतेही उत्तर मिळाले नाही. मुंबईतील सर्व कंत्राटांमध्ये कंत्राटदारांना खुलेआम पाठीशी घालण्याचे काम होते.

असुधारित प्रत

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

सभापती महोदय, इर्ला पर्जन्यजल उदंचन केंद्र बांधण्यासाठी महापालिकेने २००७-०८ मध्ये प्रतिभा जीन केजिआय कंसोर्टियम या कंत्राटदाराची नेमणूक केली.

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर ....

सन २००९ पर्यंत काम पूर्ण करायचे असताना ते २०११ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्यामुळे नियमानुसार कंत्राटदाराला साडेतीन कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला. परंतु ११ वर्षांमध्ये महानगरपालिका सदर कंत्राटदाराकडून दंडांची रक्कम वसूल करु शकली नाही. ही दंडाची रक्कम मुंबईकरांची असल्यामुळे तुम्ही कंत्राटदाराला कशाकरिता पाठीशी घालत आहात ? महानगरपालिकेने कंत्राटदाराकडून दंड वसूल करण्यासंबंधी ११ वर्षांमध्ये कोणती कारवाई केली ? पांजरापोळ प्रकल्पग्रस्तांना न्याय कधी मिळणार आहे ? एमएमआरडीएने पांजरापोळ जोड रस्त्यांची अनेक कामे केली. परंतु त्यात बाधित झालेल्या ७७४७ झोपडपट्टीधारकांचे अद्याप पुनर्वसन करण्यात आलेले नाही. या संदर्भात नगरविकास मंत्री महोदयांनी तातडीने आपल्या दालनात बैठक आयोजित करावी व सर्वसामान्य लोकांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, एमएमआरडीएचा अर्थसंकल्प सादर करीत असताना महानगरपालिकांच्या निवडणुका डोळयासमोर ठेवून हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे का ? अशी शंका माझ्या मनात येत आहे. मेट्रो व इतर विकास प्रकल्पांकरिता १७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतु ७७७९.९३ कोटी रुपयांची तूट दाखविण्यात आली. एमएमआरडीएवर केंद्रीय कराचा मोठा बोजा असून तो वाद न्यायालयात सुरु आहे. तसेच ८ हजार कोटी रुपयांची तूट असताना जाहीर केलेल्या प्रकल्पांसाठी एमएमआरडीए कशाप्रकारे निधी उभारणार आहे ? हा मूळ प्रश्न आहे. तसेच प्रकल्पांच्या किंमती वाढविण्यासाठी कोण जबाबदार आहेत. सत्तेवर आल्यानंतर अनेक प्रकल्पांना स्थगिती देण्यात आल्या. प्रकल्पातील मूळ आराखडयात केलेले अनावश्यक बदल, आरे कारशेडची जागा बदलण्यासाठी शासनाने घेतलेला आत्मघातकी निर्णय, प्रकल्पांची रखडलेली कामे परिणामी अनेक प्रकल्पांच्या किंमती वाढल्यामुळे त्याचा फटका सर्वसामान्य मुंबईकरांना बसला. त्याकरिता शासन सर्वस्वीपणे जबाबदार आहे. प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी गरज असल्यास शासनाने कर्ज काढावे. परंतु मुंबईतील प्रकल्प पूर्ण होण्याची तातडीने

श्री.प्रवीण दरेकर ....

पूर्ण होण्याची आवश्यकता आहे. मुंबई आणि एमएमआरडीए रिजनकरिता सदर प्रकल्प फार महत्त्वाचे आहेत. केंद्राने दिलेल्या संधीचे सोने करण्याऐवजी राज्य शासन राजकारण करण्यात वेळ घालवित आहे. केंद्र शासनाने सन २०२२-२३ मध्ये सर्व राज्यांना मदत करण्यासाठी एक लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पुढील ५० वर्षांसाठी सदर कर्ज मिळणार असून त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारले जाणार नसल्यामुळे बिनव्याजी कर्जातून राज्य सरकार अनेक कामे करु शकेल. त्यामुळे राज्य शासनाने एमएमआर रिजनमध्ये त्या गोष्टीचा फायदा घेतला पाहिजे. राज्याच्या गुंतवणुकीकरिता केंद्र शासन प्रोत्साहन देत असल्यास राज्याच्या भविष्यासाठी सर्व राजकारण बाजूला ठेवून राज्य शासनाने केंद्र शासनाकडून मदत घेतली पाहिजे. अनेक निविदांमध्ये झालेले घोटाळे माझ्याकडे आहेत. २४ वर्षांमधील घोटाळे काढायचे असल्यास त्याची एक पुस्तिकाच तयार होऊ शकेल.

सभापती महोदया, महानगरपालिकेने १६ रुग्णालयांमधील आयसीयु सेवा सुरु करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. १४ फेब्रुवारी निविदा भरण्याची अंतिम तारीख होती. विविध कंपन्या सदर निविदा भरण्यासाठी प्रयत्न करीत होत्या. परंतु निविदा अपलोड होऊ नये याकरिता सॉफ्टवेअरमध्ये जाणुनबुजून त्रुटी ठेवण्यात आल्या. या संदर्भात कंत्राटदारांनी चौकशी केली होती. परंतु महानगरपालिकेने पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही. अशा प्रकारे मुंबईकरांच्या जिवाशी खेळण्याचे काम होऊ नये. सभापती महोदया, माझ्याकडे अनेक विषय आहेत. परंतु माझ्या सहकारी सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर आपापले विचार व्यक्त करण्यासाठी वेळ मिळावा याकरिता मी नगरविकास व महसूल विभागासंबंधी तपशीलवार बोलत नाही. सभापती महोदया, आपण मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो, धन्यवाद.

**उप सभापती** : पुढील सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारण्यापूर्वी माझ्याकडे माननीय शिक्षण मंत्री यांच्याकडून विनंती करण्यात आली आहे की, अधिवेशनाकरिता फक्त दोन दिवस राहिले असल्यामुळे सदनाने वि.स.वि. क्रमांक १४

असुधारित प्रत

**उप सभापती ....**

–महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शिक्षण शुल्क विनियमन विधेयक चर्चेला घ्यावे. मी सदनाला विचारु इच्छिते की, आपण सदर विधेयक चर्चेला घ्यावे का ?

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, सदनामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना अचानक विधेयक चर्चेला घेण्यासंबंधी विनंती करणे बरोबर होणार नाही. आम्हाला विधेयकावर सविस्तर चर्चा करायची असते. अशा परिस्थितीत सदर विधेयकासंबंधी आम्हाला काहीच माहिती नाही.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, माझी सदनाला विनंती आहे की, अधिवेशनाकरिता फक्त दोन दिवस राहिले असल्यामुळे वि.स.वि. क्रमांक १४ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शिक्षण शुल्क विनियमन विधेयक चर्चेला घ्यावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, आम्ही आपली विनंती मान्य करतो. परंतु आमची आपल्याला विनंती आहे की, आमच्या सन्माननीय सदस्यांना अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी आपण वेळ दिला पाहिजे.

**उप सभापती** : कायदा करणारे आपले सदन आहे. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. सदर विधेयक विद्यार्थी आणि पालकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपण सदर विधेयक प्रथम बघून घ्यावे. या अधिवेशनामध्ये अनेक विधेयके चर्चा करण्याकरिता राहिली आहेत. आपण १०-१५ मिनिटांमध्ये सदर विधेयकावर चर्चा करु या.

डॉ.परिणय फुके : सभापती महोदया, आमची आपल्याला अशी विनंती आहे की, प्रथम अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा घ्यावी व त्यानंतर सदर विधेयक चर्चेला घ्यावे. आम्ही त्याकरिता उशिरापर्यंत थांबवण्यास तयार आहोत.

**उप सभापती** : आपण प्रथम अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करु व त्यानंतर रात्री साडेआठ वाजता सदर विधेयक चर्चेला घेऊ.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, कायदे तयार करणे ही सदनाची प्रथम जबाबदारी आहे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, अंतिम आठवडा प्रस्ताव देखील अत्यंत महत्त्वाचा आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, त्यापेक्षा देखील कायदे तयार करणे ही सदनाची प्रथम जबाबदारी आहे. आपल्याला त्याकरिता प्राधान्य द्यावेच लागते. सभापती महोदया, सदनामध्ये एका लक्षवेधी सूचनेवर ४० मिनिटे चर्चा केली जाते व आम्ही वाट बघत असतो की, आमचे कामकाज कधी सुरु होणार आहे ? मंत्री महोदया, सदनात उपस्थित आहेत. तसेच विधानसभा देखील सुरु आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, १० – १५ मिनिटांमध्ये सदर विधेयकावर चर्चा करुन सदनाने ते मंजूर करावे. त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्तावावर सन्माननीय सदस्यांची भाषणे पुढे सुरु राहणारच आहेत.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदया, मंत्री महोदयांना आमची काळजी आहे. मी याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. सदनाच्या कामकाजामध्ये विधेयकावर चर्चा करणे याबद्दल आमचे कोणतेही दुमत नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की, सदनामध्ये आयत्या वेळी कधीही विधेयक आणायचे, तसेच ते विधेयक सन्माननीय सदस्यांना माहिती नाही, त्यावर त्यांनी अभ्यास केलेला नाही. विधेयकावर तपशीलवार चर्चा करणे हा सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे. अन्यथा सदर कायदा मंजूर झाल्यानंतर त्याचे परिणाम, दुष्परिणाम महाराष्ट्रातील जनतेवर होत असतात. अशा परिस्थितीत आम्ही सदनामध्ये उपस्थित असताना देखील आम्हाला सदर विधेयकासंबंधी कोणतीही माहिती नाही, आमचा त्यात सहभाग नसल्यास उपयोग होणार नाही. त्यामुळे विधेयक ज्याप्रमाणे महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे ते विधेयक सन्माननीय सदस्यांना माहिती असणे व त्यावर सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा करणे आवश्यक असते. सभापती महोदया, आज सकाळपासून सदनामध्ये ३-४ विधेयके अशा प्रकारे आयत्या वेळी आणण्यात आली. आता सदरहु विधेयकामध्ये

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दरेकर ....

कोणकोणत्या तरतुदी आहेत, याबाबत उद्या आम्ही जनतेला काय सांगणार ? आम्ही विधेयकावर चर्चा करण्यासाठी सदनामध्ये उशिरापर्यंत थांबण्यास तयार आहोत. परंतु आपल्याला लहर आल्यानंतर सदनात विधेयक आणून ते एका मिनिटामध्ये मंजूर करावे, याकरिता आमची मान्यता नाही.

**उप सभापती** : माननीय मंत्री आणि माननीय विरोधी पक्षनेते यांनी उपस्थित केलेली विनंती मी ऐकली आहे. दोन्ही बाजूंकडून उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये तथ्य आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छिते की, आपण येथे एकत्र काम करीत असताना असा प्रघात असतो की, अधिवेशनामध्ये शेवटच्या दोन दिवसांमध्ये विधानसभेकडून मंजूर झालेली विधेयक आपल्या सदनामध्ये मंजुरीसाठी येत असल्यामुळे ती आपल्या सदनामध्ये मंजूर करावीच लागतात. तसेच अगोदर विधेयके मिळाली पाहिजेत, त्यावर सविस्तर चर्चा करता आली पाहिजे असे आपले म्हणणे योग्य व बरोबर आहे. परंतु एखादे विधेयक अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यावर सदनामध्ये चर्चा न झाल्यामुळे प्रलंबित राहते. त्यामुळे त्याबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांबद्दल बाहेर असा संदेश जातो की, त्यांना विधेयकांवर चर्चा करण्यास वेळ नाही. अशा प्रकारे प्रश्नाला अनेक बाजू असतात. त्यामुळे आपण सदर विधेयक रात्री साडेआठ वाजता चर्चेला घेऊ.

श्री.नरेंद्र दराडे : सन्माननीय सदस्यांना सदर विधेयकावर चर्चा करायची असल्यास काही हरकत नाही.

**उप सभापती** : विधेयकावर ५-१० मिनिटांमध्ये चर्चा होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य विधेयकावर अभ्यासपूर्ण मुद्दे उपस्थित करीत असतात. तसेच सदर विधेयक रात्री साडेआठ वाजता विधेयकावर चर्चा सुरु केल्यानंतर १० ते १५ मिनिटांमध्ये मंजूर झाल्यास ठीक आहे. अन्यथा सन्माननीय सदस्यांना त्यावर सविस्तरपणे आपले विचार मांडायचे असल्यास ते त्यांनी मांडावेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत

**उप सभापती .....**

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची विनंती आहे की, त्यांना विधेयक मांडू द्यावे व चर्चेला नंतर उत्तर द्यावे.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजर आहे. आम्हाला नियम शिकवले जातात तेव्हा नियमानुसारच व्हायला पाहिजे. अशा प्रकारे मध्ये विधेयक आणून २-५ मिनिटात विधेयक मंजूर करणे असे विधिमंडळाचे कामकाज नाही. विधिमंडळात विधेयकावर तपशीलवार चर्चा झाली पाहिजे. विधेयक चांगले असले तरी त्यात काही सूचना असतात, आक्षेप असतात, त्यात सर्वांचा सहभाग आला पाहिजे. आम्ही सहकार्य करतो, नाही म्हणत नाही. परंतु त्यामुळे आम्हाला संबोधन करीत असताना पॉईंट ऑफ प्रोसीजर सर्वांसाठी लागू आहे.

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अजून काही विधेयक आता घ्यायची असतील तर तसे अगोदर कळविण्यात यावे म्हणजे तसे सभागृहाला अवगत करता येईल.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांचे मी मनापासून आभार व्यक्त करते.

-----

असुधारित प्रत

**पृ.शी.** : शैक्षणिक सुधारणा शुल्क विनिमय (सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. XIV OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF FEES) ACT, 2011)

प्रा.वर्षा गायकवाड (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-१४, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यामध्ये आणखी सुरधारणा करण्यासाठी विधेयक मांडते.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-१४, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ यामध्ये आणखी सुरधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदया, महाराष्ट्र राज्याने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था विनियम २०११ मध्ये निर्माण केलेले आहेत व १ डिसेंबर २०१४ पासून लागू करण्यात आले आहेत. त्याच्या अंतर्गत भरमसाठ फी वाढली तर २५ टक्के पालकांना पुढे जाण्यासाठी दोन समित्या असतात. एक समिती राज्यस्तरीय असते व दुसरी समिती विभागीय स्तरावर असते. राज्यस्तरीय समितीला पुर्नरक्षण समिती असे म्हटले जाते, विभागीय समितीला शुल्क नियंत्रण समिती असते. पुर्नरक्षण समितीचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश असतात. हे विधेयक आणण्यामागचे कारण असे आहे की, मुळ विधेयकातील ८ नंबरमधील ५ नंबरमध्ये आपण सुधारणा करीत आहोत. विभागीय शुल्क नियमनन समितीच्या अध्यक्षास व सदस्याचे वेतन व भत्ते ऐवजी मानधन व भत्ते ही सुधारणा करीत आहोत. याचे कारण असे की, याचा अभ्यास केला, याची समिती तयार केली तेव्हा असे निदर्शनास आले की, यामध्ये येणाऱ्या

प्रा.वर्षा गायकवाड.....

तक्रारी केवळ विभागीय स्तरावर २-३ आढळल्या आहेत. मुंबईमध्ये २३, पुण्यात २२, औरंगाबादमध्ये ४, नाशिक कोल्हापूर, लातूर, अमरावती शुन्य तक्रारी प्राप्त झाल्या, मागील काळात ही समिती तयार केली होती परंतु यासाठी वेतन व भत्ते काहीही दिले गेले नाही. आपण असा निर्णय घेतला की, जेथे मिटींग होतील तेव्हा त्याचे मानधन व भत्ते दिले गेले पाहिजेत. त्या संदर्भात लेखाशीर्ष झालेले आहे, शासन निर्णय निगर्मित झालेला आहे. पुरवणी मागणी देखील सादर केली होती. माझी सभागृहाला विनंती आहे की, २५ टक्के पालकांची काही तक्रार असेल तर समितीसमोर ते जाऊ शकतात. त्या समितीने बैठक घेतल्यावर मानधन व भत्ते मिळाले पाहिजेत. समिती करताना आम्ही तीन वेळा जाहिरात दिली होती. मागील काळात २०१५ ते २०१९ पर्यत या समितीस एकही रुपया दिला गेला नाही. त्यामुळे अशासकीय सदस्यांसाठी जाहिराती दिल्या तेव्हा त्यात कोणीही भाग घेतला नाही. याचे कारण असे की, मागील काळात त्यांना काही पैसे दिले गेले नाहीत त्यामुळे कमिटीमध्ये कोणी भागच घेत नव्हते. म्हणून आता त्यांचे मानधन ठरविलेले आहेत, त्या माध्यमातून यांच्या बैठका होतील. उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश यावर असल्याने समितीमध्ये लवकर निर्णय होतील व पालकांची तक्रारावर लवकर सोल्युशन मिळेल असे मला वाटते.

प्रश्न प्रस्तुत झाला

**उप सभापती :** आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सन्मानीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदया, मी या विधेयकावर भाषण करीत नाही. परंतु मी मंत्री महोदयांना एवढेच विचारु इच्छितो की, हे विधेयक केवळ राज्य

श्री. प्रवीण दटके .....

मंडळाच्या शाळांना लागू होईल की, सीबीएसई, आयसीएसई मंडळाच्या शाळांनाही लागू होईल ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदयk, हे विधेयक सर्व प्रकारच्या शाळांना लागू होणार आहे. सर्व शाळांचे पालक या समितीकडे जाऊन न्याय मागू शकतात.

मी सभागृहाला पुनश्च विनंती करते की, सभागृहाने सदरहू विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे, आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड २ विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शिर्षक व हेतुवाक्य हे विधेयकाचा भाग झाले.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि.क्रमांक-१४ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-१४ संमत झाले आहे.

-----------

असुधारित प्रत

## वि.स.वि.क्रमांक-१४ बाबत

**उप सभापती** : सभागृहाने सदरहू विधेयक संमत केल्याबद्दल मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे आभार मानते.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदया, सदरहू विधेयक संमत केल्याबद्दल मी माननीय विरोधी पक्ष नेते व सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानते.

------

असुधारित प्रत

**अंतिम आठवडा प्रस्तावासंबंधी**

**उप सभापती** : अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी २ तास ४० मिनिटांचा वेळ आहे. शिवसेनेकडून श्री.नरेंद्र दराडे व श्री.सुनिल शिंदे बोलणार आहेत. आज रात्रौ ९.०० वाजेपर्यंत कामकाज करायचे ठरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नावामध्ये सन्माननीय सदस्य श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण लाड हे बोलणार आहेत. इंडियन नॅशनल काँग्रेसच्या नावामध्ये डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी व श्री.राजेश राठोड हे बोलणार आहेत.

भाजपाच्या सदस्यांपैकी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांचे भाषण झाले आहे. श्री.प्रसाद लाड, श्री.भाई गिरकर बोलणार आहेत. आपण पुन्हा सदस्यांचा क्रम द्यावा. श्री.प्रवीण दरेकर, श्री.राजहंस सिंह, श्री.भाई गिरकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश पाटील, श्री.विनायक मेटे, श्री.चंदुभाई पटेल, श्री.सदाभाऊ खोत हे बोलणार आहेत. तसेच पुरोगामी गटाची नावे आलेली नाहीत, त्यांची नावे असतील तर देण्यास सांगावीत.

श्री.नरेंद्र दराडे : सभापती महोदय, आज विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलू द्यावे, आम्ही उद्या बोलू.

यानंतर श्रीमती नाफडे .....

असुधारित प्रत

श्री.राजहंस सिंह (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम २५९ अन्वये माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो प्रस्ताव सभागृहामध्ये मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदया, या प्रस्तावावर बोलण्यापूर्वीच मी निवेदन करत आहे की, मला संरक्षण देण्यात यावे. आता मी मुंबई महानगरपालिकेच्या भ्रष्टाचारावर हिंदीतून भाषण केले की, समोरील लोक अंगावर येणार म्हणून मी पहिलेच संरक्षणाकरिता निवेदन करत आहे.

सभापती महोदया,या प्रस्तावामध्येच असे आहे की, १७ वर्षात ३ लाख ५२ हजार ९९० कोटी रुपये एवढा खर्च मुंबईमध्ये खर्च केला तरीही सत्ता पक्षातील लोकांनी मुंबईची तुंबई केलेली आहे. मुंबई महानगरपालिकेत सत्ता पक्षच राज्य करत आहे. त्यांना कंत्राटदारांना सपोर्ट करण्यामध्ये जास्त आनंद होतो. मुंबई महानगरपालिकेत २५ वर्षांपासून त्यांची सत्ता आहे. २५ वर्षात मुंबईच्या रस्त्यांचे २१००० कोटी रुपयांची काम झालेली आहेत. मुंबईत एकूण २००० कि.मी.चे रस्ते आहेत. या सर्व रस्त्यांवर पाऊस पडल्यानंतर खड्डेच निर्माण होतात. पावसात मुंबई तुंबली की मुंबई दोन-तीन दिवसांकरिता बंद होते. जिस मुंबई में हजारों-करोड़ों रुपये के काम हुए, उस मुंबई का ये हाल है. मुंबई का यह दुर्भाग्य है कि मुंबई में वर्षा होती है, तो मुंबई चारों तरफ से पानी में डूब जाती है. मुंबई के नालों की सफाई के लिए हर साल १५०-२०० करोड़ रुपये दिए जाते है. नाले सफाई के नाम पर मुंबई महानगरपालिका के अधिकारी का यह कहना रहता है कि एक महिना झाला की ते म्हणतात की, मे महिन्यात आमचे ५० टक्के नाले साफ झाले, जून महिन्यात ७० टक्के नाले साफ झाले. काय मोजमाप आहे त्यांचे ? पाऊस पडला फ्लोटिंग मटेरियल वगैरे सर्व वाहून गेले की, अधिकारी म्हणणार की आमचे नाले १०० टक्के संपूर्णपणे साफ झालेले आहेत.

सभापति महोदया, अभी मीठी नदी के बारे में चर्चा चल रही थी. ब्रिमस्टोवॅड योजना के नाम पर मीठी नदी का काम शुरु हुआ. इस ब्रिमस्टोवॅड योजना को तकरीबन १२ से १४ साल हो गए है. अब तक मीठी नदी का काम ८० प्रतिशत हो पाया है.

श्री.राजहंस सिंह.............

उसके बाद नये नये प्रोजेक्ट चले आ रहे है. उद्यान बनाना है, अगल-बगल के रास्ते बनाने है. लेकिन मीठी नदी के काम के लिए कम से कम साढ़े बारह हजार करोड़ रुपये खर्च करने के बाद भी अब तक काम पूरा नहीं हुआ है. यह मुंबई शहर का दुर्भाग्य है. एक तरफ बरसात में पानी भर जाता है, तो दूसरी तरफ लोग पानी के लिए तड़प रहे है. आज मुंबई को ३,८०० एमएलडी पानी मिल रहा है. मुंबई को ४,५०० एमएलडी पानी चाहिए. हजार एमएलडी पानी का लिकेजेस है, पानी की चोरी की जा रही है. समुंदर का पानी मीठा करने के लिए जो ३,५०० करोड़ रुपये का प्रोजेक्ट लाया जा रहा है, उसमें केवल २०० एमएलडी पानी मिलेगा और उसके लिए ३,५०० करोड़ रुपये खर्च किए जा रहे है. एक हजार करोड़ रुपये खर्च करके पानी की पाईपलाईन पूरी तरह से ठीक कर दी जाए. लेकिन कॉन्ट्रेक्टर्स को पैसा देना है. चितले कमिटी ने कहा था कि मुंबई में २५ साल के बाद जो आबादी आने वाली है, उसके लिए ५,५०० एमएलडी पानी लगेगा. इसलिए गारगाई और पिंजाल नदी का पानी लाने का काम शुरु किया गया था, लेकिन वह आज तक सिर्फ वचननामा में ही है. यदि शिवसेना का वचननामा पढ़ा जाए, सत्ता पक्ष का जो वचननामा है वह भ्रष्टाचारनामा बनकर रह गया है. ऐसा हाल वहां का है. मुंबई में पानी की बहुत बड़ी समस्या है. २४ घंटा पानी देने का वादा करते रहे. लेकिन आज तक २४ घंटा पानी नहीं दे पाये.

सभापति महोदया, मुंबई में कचने की समस्या है. पांच हजार करोड़ रुपये का देवनार डम्पींग ग्राऊंड का कॉन्ट्रैक्ट दिया गया. तेथून खाद निर्मिती करण्यात येईल, असे सांगितले गेले होते. कचऱ्यातून खाद निर्माण करण्यात येईल, असे सांगितले गेले होते. सात वर्षात यातून काही खाद निर्माण झाली नाही. तो ठेका बंद झाला, त्याला बंद करुन टाकले. आता त्याचे १००० कोटी रुपयांचे वीज निर्मितीसाठी ठेका दिला गेलेला आहे. ज्या देवनार डंपिंगच्या समोर उड्डाणपूल बांधलेला आहे. तो साडेसहाशे कोटी रुपयांचा उड्डाणपूल आहे. तो उड्डाणपूल व्हेरिएशन करत करत ७५० कोटी रुपयांचा झालेला आहे. त्या उड्डाण पूलाला तिकडच्या खासदारांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देता आले नाही. माननीय मुख्यमंत्री त्या पुलाच्या

श्री.राजहंस सिंह.............

उद्‌घाटनाला गेले असता त्यांनी सांगितले की, हा उड्‌डाणपूल बरोबर नाही, याला सरळ करा. सम्माननीय मुख्यमंत्री जी के कहने के बाद भी, आज तक वहां पर जो बड़ी गाड़ियां जा रही है, वह बनाया ही इसलिए था कि गाड़ी देवनार डम्पींग ग्राऊंड तक जाए. लेकिन वह काम अब तक नहीं किया गया. अब आप सोचिए कि ये अधिकारी किस प्रकार के है. सम्माननीय मुख्यमंत्री जी के कहने के बाद भी अब तक उसे ठीक नहीं किया गया. हम लोगों की क्या औकात होगी इन अधिकारियों के साथ? इस तरह के मुंबई महानगरपालिका के अधिकारी है, ये हाल है.

सभापति महोदया, साढ़े चार हजार करोड़ रुपये का आरोग्य सेवा का काम होता है. मुंबई महानगरपालिका का एक साल का बजट साढ़े चार हजार करोड़ रुपये का है. हमारे यहाँ बड़े बड़े हॉस्पिटल्स है. नायर, केईएम, सायन और ऐसे बड़े बड़े हॉस्पिटल्स है. लेकिन आज वहां पर क्या हालत है ? तेथे बघा जाऊन मुंबईकर जनता त्रस्त आहे. लोकांना औषध भेटत नाही. मुंबई शहर में कोरोना काल में इतना बड़ा भ्रष्टाचार हुआ. कोरोना काल जिसे विपत्ति का काल कहा जाता है. मुंबई महानगरपालिका में सत्ता पक्ष के लोग बैठे है, उन्होंने सोने का अंडा देने वाली मुर्गी बना दी है. पुणा में जो कंपनी ब्लैकलिस्ट हुई है, उसी कंपनी को यहां पर पांच कॉन्ट्रैक्ट देने का काम किया गया. मुंबई शहर में ये हाल कर दिया गया. जिस कंपनी को इसका अनुभव नहीं है उसी कंपनी को जम्बो केअर सेंटर और बड़े बड़े सेंटर देने का काम दिया गया. वे किसके लोग थे, क्यों उनकी मदद की गई? यह सोच का विषय हो सकता है. लेकिन आज जो हमारे अस्पताल है, उन अस्पतालों में लोगों की हालत खराब है. वहां पर जरुरी दवाइयां नहीं मिल रही है. मैं यहाँ पर सुन रहा था. सरकारी हॉस्पिटल का ऐसा हाल था. मैं उस हॉस्पिटल का नाम नहीं लेना चाहूंगा. उस अस्पताल की चर्चा चल रही थी. मैंने सोचा कि पूरे महाराष्ट्र में इस तरह का हाल हो रहा है. आघाडी सरकार के नेतृत्व में ये हो क्या रहा है? आघाडी सरकार आने के बाद ये क्या हो रहा है, अस्पताल में दवाइयां क्यों नहीं मिल रही है? व्हेंटिलेटर के नाम पर भ्रष्टाचार है. तमाम प्रकार के भ्रष्टाचार है. लोगों को वचन देकर सन २०१७ में वे

श्री.राजहंस सिंह.............

पांच साल के लिए वहां पर सत्ता में आए. वचननामा के नाम पर केवल वचननामा ही रहा.

....यानंतर श्री सोनावणे

असुधारित प्रत

श्री राजहंस सिंह......

सभापति महोदय, आज मुंबई शहर की ऐसी हालत है. हर घर में शौचालय बनाने की एक योजना हमने महानगरपालिका से लायी. परंतु मलनिस्सारण वाहिन्याच नाहीत. मुंबई शहरात फक्त ६८ टक्के मलनिस्सारण वाहिन्या आहेत. ३२ प्रतिशत सिवरेज लाईन अभी तक नहीं बन पायी. दिंडोशी से लेकर तमाम जगहों पर स्लम की समस्याएं है. वहां पर सिवरेज लाईन नहीं है. शौचालयों की हालत बहुत खराब है. सेप्टिक टैंक के शौचालय बने हुए है. मुंबई शहर में १७ साल में साढ़े तीन लाख करोड़ रुपये खर्च करने के बाद भी हम ३२ प्रतिशत सिवरेज लाईन मुंबई शहर को नहीं दे पाये है, मुंबई की जनता के लिए यह दुर्भाग्य की बात है. जिन मुंबईकर जनता का नाम लेकर लोग चुनकर आते है, आज उनकी हालत इस तरह से करके रखी है.

सभापति महोदया, मैं मुंबई के मार्केट के बारे में कहना चाहूंगा. हम कहते है कि यहाँ के मूल मालिक कोली बांधव है, मुंबई के भूमिपुत्र है. आज उनकी क्या हालत है ? वे भूमिपुत्र है. हमने मार्केट का विकास करने के लिए दिया है. मार्केट की एक पॉलिसी लायी और वह बड़े बड़े बिल्डरों को देने का काम किया. दस सालों से वह पॉलिसी आयी है, लेकिन केवल ५-७ ही मार्केट बन पायी है. उसमें कई प्रकार के संशोधन हो रहे है. एफएसआई बढ़ायी जा रही है. आज मार्केट की हालत बहुत खराब है. आज वहां पर भाजी बेचने वाले कौन है ? वहां पर लाईसेंसधारक कौन है ? आज उनकी क्या हालत है, यह पता करने का काम, उन्हें सुख-सुविधाएं देने का काम और जबाबदारी मुंबई महानगरपालिका की है. उसमें भी मुंबई महानगरपालिका फेल है.

सभापति महोदया, मैं इतना ही कहना चाहूंगा कि पिछले २५ सालों से सत्ता पक्ष ने मुंबई महानगरपालिका को लूटने का, भ्रष्टाचार करने का काम किया है. उस बारे में सरकार की तरफ से जांच करने की जरुरत है. आपको पता ही होगा कि २० दिन पहले, प्रशासक बैठने के दो दिन पहले ६ हजार करोड़ रुपये के प्रस्ताव स्थायी

समिति में २० मिनट में ही पास कर लिए गए. स्टॅण्डींग कमिटी को अंडर स्टॅण्डींग कमिटी कहने का काम करते हुए, वहां पर सुधार समिति भी है. सुधार समिति की जांच

श्री राजहंस सिंह......

करने का काम किया जाना चाहिए. क्योंकि सुधार समिति में आरक्षण चेंज करने वाली बात पर लोगों का ध्यान नहीं जाता है. लोगों का ध्यान स्थायी समिति पर जाता है. बड़े बड़े बिल्डरों को रिजर्वेशन चेंज करके देने काम सुधार समिति में होता है. सुधार समिति का पिछले १५ साल का रिकार्ड निकालकर देखा जाएगा, तो पता चलेगा कि हजारों बिल्डरों को रिजर्वेशन चेंज करके देने का काम किया गया है. सबसे बड़ा भ्रष्टाचार का अड्ड़ा सुधार समिति है. सुधार समिति की इन्क्वॉयरी होनी चाहिए. यह काम बहुत जरुरी है.

सभापति महोदया, मैं एमएमआरडीए, मोनो रेल और मेट्रो रेल के बारे में कहना चाहता हूं. आदरणीय श्री देवेंद्र फडणवीस जी जब मुख्यमंत्री थे, तो वे रात को २.०० बजे जाकर मेट्रो का काम देखते थे. ३०० किलोमीटर के दायरे में, एमएमआर रिजन में मेट्रो का जाल बिछाया गया. जब से ये आघाडी की सरकार आयी, तब के मेट्रो के काम में बिगाड़ी आ गई. मुंबई शहर की जनता सोच रही थी कि सन २०१४-१५ में हम मेट्रो में सफर करेंगे. आज आप पश्चिम रेलवे की स्थिति देखिए. मुंबई से दहिसर जाने के लिए लोगों को तीन घंटे का समय लगता है. जनता त्रस्त है, सरकार मस्त है, माय-बाप सरकार को कुछ पड़ी नहीं है कि मेट्रो का काम किस तरह से हो रहा है. केवल कार शेड की एक जिद के लिए आरे की जो कहानी हुई वह आप सभी जानते है. उस जिदबाजी के कारण आज मेट्रो का सारा काम रुका हुआ है. आज मुंबई की जनता यह सोच रही है कि ये आघाडी सरकार आने से हम मेट्रो में सफर नहीं कर पाए है. एक बात मैं जरुर कहना चाहूंगा कि आज मुंबई की जनता में किस प्रकार से रोष है. यदि आप बेल बजायेंगे तो मैं तुरंत बैठ जाऊंगा. उसके लिए आप थोड़ी भी चिंता मत किजिए.

असुधारित प्रत

**उप सभापती** : म्हणून तर मी गेल्या १५ मिनिटांपासून बेल वाजवली नाही. आता मी भाषण संपल्याची बेल वाजवित आहे.

**उप सभापती........**

सन्माननीय सदस्य श्री. राजहंस सिंह याना ज्या भाषेतून भाषण करावयाचे आहे, त्या भाषेतून त्यांना भाषण करण्याची मुभा आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांचे भाषण १ मिनिटांमध्ये संपवावे, अशी माझी त्यांना सूचना आहे.

माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर हे आपले भाषण पाठीमागच्या आसनावर बसून ऐकत आहेत.

श्री राजहंस सिंह : सभापती महोदया, जिस प्रकार से सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस जी ने मेट्रो के काम को गति दी थी, वह गति ये सरकार नहीं दे पायी है. इसलिए मैं यहाँ पर गति देने के लिए आया हूं. ८ सालों तक ६ से ८ किलोमीटर का मेट्रो का काम चलता रहा. ३०० किलोमीटर का जाल अकेले सम्माननीय श्री देवेंद्र फडणवीस जी ने अपनी ताकत पर खिंचा था. ये सरकार मुंबई की जनता को यदि इस तरह से त्रस्त रखेगी, तो आने वाली महानगरपालिका के चुनाव में आपको मुंह की खानी पड़ेगी. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं. धन्यवाद.

---------------------

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दटके ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री. प्रवीण दरेकर व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम २५९ अन्वये उपस्थित केलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावासंबंधी मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, या सभागृहात अनेक महानगरपालिकांचे मुद्दे गाजत आहेत. मी नागपूर महानगरपालिकेतील काही विषयांकडे सार्वभौम सभागृहाचे लक्ष वेधणार आहे. नागपूर करारात नागपूरला उप राजधानीचा दर्जा मिळालेला आहे. सीपी ॲण्ड बेरार कराराप्रमाणे नागपूर शहरासाठी एक वेगळा ॲक्ट या सरकारने मान्य केला होता. त्या ॲक्टचे नाव असे होते की,......मी चुकत असेल तर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांची माफी मागतो.

सभापती महोदया, सीएनसी ॲक्टमुळे नागपूर महानगराला विशेष अधिकार मिळाला होता. ते अधिकार नागपूर करारात या शासनाने मान्य केले होते. पण दुर्दैवाची बाब अशी आहे की, हा करार म्हणजे हा कायदाच तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण ज्यावेळी मुख्यमंत्री होते त्यावेळी तो ॲबॉलिश केला होता. अशा प्रकारे नागपूरच्या जनतेची आणि नागपूरकरांची फसवणूक या कायद्याने झाली आणि जे अधिकार नागपूर महानगरपालिकेला होते. त्याच धर्तीवर मुंबईचा कायदा होता. मुंबईच्या कायद्यात प्रचंड अधिकार हे नगरसेवक, माननीय महापौर आणि त्या सभागृहाला आहेत. त्यामुळे मुंबई शहरातील नागरिकांचे अनेक इश्यूज त्यांच्या सभागृहात सुटतात आणि तिथल्या तिथे त्यांना रिलिफ मिळतो.

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

तोच अधिकार सीएनसी ॲक्ट अन्वये नागपूर महानगरपालिकेला होता. परंतु मला दुर्दैवाने सांगावे लागते की, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात हा कायदा ॲबॉलीश करण्यात आला. त्यामुळे नागपूर कराराचे हनन झाले. याची चिंता नागपूरकरांना आहे. या अनुषंगाने टॅक्सचा विषय असेल, पाणीपट्टीचा विषय असेल, बॉयलर्स तयार करण्याचे विषय असतील, त्यात काही रिलीफ देण्याचा विषय असेल तर परवानगीसाठी नगर विकास विभागाकडे जावे लागते. सीएनसी ॲक्ट ॲबॉलीश केल्यामुळे अशाप्रकारे नागपूरच्या नागरिकांचे नुकसान झाले आहे. माननीय नगर विकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे या ठिकाणी बसलेले आहेत. ते अतिशय उत्तम मंत्री आहेत. मी त्यांचे अभिनंदन करतो. मी त्यांना विनंती करतो की, नगर विकास विभागाने सीएनसी ॲक्टचा अभ्यास करावा आणि उप राजधानी म्हणून पूर्वी नागपूरकरिता जो कायदा होता तो पुन्हा बहाल केला तर नागपूरची जनता मंत्री महोदयांचे आणि महाविकास आघाडीचे अभिनंदन करेल, असे मी विश्वासाने सांगतो.

सभापती महोदया, टॅक्सच्या बाबतीत या सभागृहात खूप चर्चा झाली. मुंबई महानगरपालिकेने तेथील नागरिकांना ५०० चौ.फुटापर्यंतच्या मालमत्ता करात सूट दिली. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु नागपूर महानगरपालिका किंवा इतर सर्व महानगरपालिका ही रक्कम सहन करण्यास तयार असतील तर त्या महानगरपालिकांना सुद्धा सूट देण्यास परवानगी द्यावी. तो कायदा सुद्धा या सभागृहात संमत करुन घ्यावा, अशी मी माननीय नगर विकास मंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदया, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी नागपूरला भरभरुन दिले हे मान्य करायला हरकत नाही. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या काळातील १५३ कोटी रुपयांची कामे आज अर्धवट स्थितीत आहेत. काही नाले अर्धवट अवस्थेत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अभिजीत वंजारी राहतात त्या भागात १२ कोटी रुपये किंमतीचा जंबोरीप नाला आहे. त्या नाल्यावर ६ कोटी रुपये खर्च होऊन त्या नाल्याचे काम आज अर्धवट स्थितीत आहे. पावसाळ्यात त्या नाल्याचे पाणी लोकांच्या घरात जाणार आहे. परंतु

श्री.प्रवीण दटके....

ते काम थांबलेले आहे. रस्त्यांची कामे असतील, नाल्यांची कामे असतील, इमारतींची कामे असतील, दवाखान्यांची कामे असतील ही सर्व कामे १५३ कोटी रुपये न मिळाल्यामुळे अर्धवट अवस्थेत आहेत. आम्ही असत्य बोलत आहोत असे जर मंत्री महोदयांना वाटत असेल तर त्यांनी स्वत: नागपूरला यावे किंवा त्यांच्या राज्यमंत्र्यांनी या कामांचा दौरा करावा व खात्री करुन घ्यावी. माननीय पालकमंत्री डॉ.नितीन राऊत यांनी सुद्धा दौरा करावा. ही अर्धवट कामे पूर्ण करण्यासाठी पावसाळ्यापूर्वी निधी उपलब्ध करुन द्यावा. जर पावसाळ्यापूर्वी ही कामे झाली नाहीत तर नागपूर शहरातील जनतेचे नुकसान होईल. यामुळे भाजपाचे नुकसान होणार नाही. महाविकास आघाडीने निधी दिला नाही असा आरोप करण्यास भाजपा भाजपा मोकळी होईल. परंतु शेवटी नुकसान हे त्या भागातील नागरिकांचे होईल. माझी आपल्यामार्फत माननीय नगर विकास मंत्र्यांना विनंती आहे की, हा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी विशेष लक्ष घालावे.

सभापती महोदया, कोविडचा काळ सर्वांनी अनुभवला. मुंबईत काय झाले, इतर ठिकाणी काय झाले या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्य बोलतील. त्यावर मी भाष्य करीत नाही. कोविडच्या काळात केंद्र सरकार जर राज्य सरकारला मदत करु शकते तर राज्य सरकारने सुद्धा कोणताही भेदभाव न करता राज्यातील सर्व महानगरपालिकेला मदत करण्याची भूमिका वठवावयास पाहिजे होती. मी माहितीच्या अधिकारात काही माहिती मागविली. आमच्यावर आरोप झाले की, आम्ही पंतप्रधान सहाय्यता निधीमध्ये पैसे जमा केले. परंतु नागपूर शहरात जी जनता राहते ती या महाराष्ट्रातील जनता आहे. मी ज्या दिवशी माहिती मागविली होती त्या दिवशी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये ७१० कोटी रुपये जमा झाले होते. परंतु या ७१० कोटी रुपयांपैकी, ज्या नागपूर शहरातून मी येतो, माननीय श्री.अभिजीत वंजारी साहेब येतात, माननीय डॉ.परिणय फुके साहेब येतात त्या शहरासाठी एकही रुपया दिला गेला नाही अशी धक्कादायक माहिती मला देण्यात आली. ती माहिती मी

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

तपासत आहे. माझी माननीय नगर विकास मंत्री आणि माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण आम्हाला खूप काही देऊ नका, परंतु जे गरजेचे आहे, कोविडच्या काळात ज्याची गरज होती ते तरी द्यावयास पाहिजे होते. नागपूरला मेडीकल कॉलेज आहे, मेयो कॉलेज आहे, तीन सरकारी रुग्णालये आहेत. परंतु दुर्दैवाची बाब अशी आहे की, उप राजधानी असलेल्या नागपूर शहरात जिल्हा रुग्णालय नाही. नागपूर येथे जिल्हा रुग्णालय मागच्या सरकारच्या काळात मंजूर झाले, त्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद झाली. या रुग्णालयाची इमारती तयार होत आहे. परंतु गेल्या अडीच वर्षांपासून त्या इमारतीचे काम अर्धवट अवस्थेत आहे. कारण वितरित करण्यात आलेला निधी तेथे मिळाला नाही. माझी विनंती आहे की, या विषयाकडे सुद्धा सरकारने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदया, नागपूर शहरात विजेच्या बाबतीत मोठी अडचण निर्माण झाली आहे. आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री हे स्वत: ऊर्जा मंत्री आहेत. सामान्य नागरिकांनी वीज मीटर घेण्यासाठी कागदोपत्री सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांना एमएसईबीकडून सांगितले जाते की आमच्याकडे मीटर नसल्यामुळे तुम्ही खाजगी मीटर विकत घ्यावे. ही दुर्दैवाची बाब सर्व शहरांमध्ये आहे. मी सरकारला विनंती करतो की, तत्काळ नागपूर शहरातील नागरिकांना विजेचे मीटर उपलब्ध करुन द्यावेत.

सभापती महोदया, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेवर २००२ ते २०२२ पर्यंत प्रशासक आहेत. या बॅंकेत १५२ कोटी रुपयांचा घोटाळा झाला होता. त्या काळात पाच कंपन्यांनी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेला फसविले. या बॅंकेत १५२ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची तक्रार तत्कालीन सरकारने केली होती. परंतु आजपर्यंत ती बॅंक पुढे आली नाही. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस असतील, माननीय श्री.चंद्रशेखर बावनकुळे असतील, केंद्र सरकार असेल, नाबार्ड असेल यांच्या माध्यमातून १५६ कोटी रुपये त्या बॅंकेला देऊन त्या बॅंकेचा परवाना जीवंत करण्यात

श्री.प्रवीण दटके....

आला. या जिल्हा बँकेच्या माध्यमातून अनेक योजना शेतकऱ्यांना दिल्या जातात. पूर्वी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक २००-३०० कोटी रुपयांचे कर्ज दरवर्षी देत होती, परंतु ती जिल्हा बँक आज ३०-४० कोटी रुपये सुद्धा कर्ज देऊ शकत नाही, अशी स्थिती आहे. १५६ कोटी रुपये घेताना परवान्याच्या बाबतीत ज्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते ती आजपर्यंत न केल्यामुळे तो परवाना केव्हाही रद्द होऊ शकतो अशी शक्यता आहे. माननीय सहकार मंत्री असतील, माननीय कृषी मंत्री असतील, त्यांनी या विषयात लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, आपण महिलांच्या सुरक्षिततेबाबत फार सजग असता. अनेक महिला नेत्या या ठिकाणी बोलत असतात. नागपूर शहरात रोज अनुचित घटना घडतात. मध्यंतरी एका तरुणीला जाळण्यात आले, पाच अज्ञान मुलांनी अंमली पदार्थांचे सेवन करुन एका तरुणीवर बलात्कार केला. अशा अनेक घटना नागपूर शहरात रोज घडतात. माननीय गृह मंत्री, माननीय गृह राज्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी या घटनांना आळा घालण्यासाठी नागपूर येथे येऊन बैठक घ्यावी. आपण नागपूरचे वर्तमानपत्र उघडले तर कुठे बलात्कार, कुठे जाळपोळ, कुठे गळफास, कुठे रॉकेल उडविणे अशा अनेक घटना वाचावयास मिळतील. मला दुर्दैवाने माझ्या शहराबद्दल सांगावे लागते की, नागपूर शहर हे महिलांच्या दृष्टीने असुरक्षित झाले की काय, अशी तेथील महिलांना भीती वाटायला लागली आहे. सभापती महोदया, आपण महिलांच्या मागे खंबीरपणे उभ्या असत्या. आपल्या माध्यमातून एखादी बैठक नागपूरला होऊ शकते काय, या बाबत आपण माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, भंडारा जिल्ह्यात गोसीखुर्द नावाचा मोठा प्रकल्प आहे. या प्रकल्पात नागपूर, मौदा, कामठी येथील घाणेरडे पाणी जाते. नागपूर शहरात ५२० एमएलडी घाणेरडे पाणी निर्माण होते. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून ५२० एमएलडीपैकी ३८० एमएलडी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यातील १७०

असुधारित प्रत

श्री.प्रवीण दटके....

एमएलडी पाणी एमएसईबीला विकले जाते व त्यातून महापालिका ६५ कोटी रुपये कमविते. नागपूर महानगरपालिका देशातील पहिली महानगरपालिका आहे की ती अशाप्रकारे पैसे कमविते. ५२० एमएलडी पैकी ३८० एमएलडी पाण्यावर नागपूर महापालिका प्रक्रिया करते. परंतु उर्वरित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी शासनाने निधी उपलबध करुन दिला पाहिजे. मी माननीय श्री.अजितदादा पवार यांचे अभिनंदन करतो. २०१४ पूर्वी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार असताना माननीय श्री.अजितदादा पवार यांनी या कामात विशेष लक्ष घालून नागपूरमध्ये मोठा एसटीपी उभा केला. महानगरपालिकेचा वाटा त्यांच्या विभागाने भरला. त्या प्रकल्पातून प्रक्रिया केलेले ३८० एमएलडी पाणी एमएसईबीला देत आहोत. उर्वरित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अशाच प्रकारचा एक प्रकल्प या सरकारने करावा, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, गृह विभागाचे सुद्धा काही विषय आहेत. नुकतीच तिथीनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. शिवजयंती तारखेप्रमाणे करा किंवा तिथीप्रमाणे करा, त्या बाबत मला काही म्हणायचे नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे अराध्य दैवत असल्यामुळे शिवजयंती साजरी करण्याच्या बाबतीत अडचण नाही. परंतु शिवजयंती निमित्त मिरवणुका काढण्यावर पोलीस विभागाने अटकाव केला. शिवजयंतीला अफझल खानच्या वधाचे पोस्टर लावण्यात आले होते. परंतु पोलिसांनी ते पोस्टर काढून कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले. सभापती महोदया, हे महाराष्ट्र राज्य कोणाचे आहे ? मला कोणावर टिकाटिप्पणी करायची नाही. सर्व धर्म सम भाव हे सर्व मला मान्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्त्वावर आपण हे राज्य चालवितो. शिवजयंतीच्या वेळी अफझल खानच्या वधाचा फोटो लावला तर तो पोलीस विभागाच्या डोळ्यात तो का येतो, हे मी गृह विभागाला विचारु इच्छितो.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत

श्री. प्रवीण दटके ....

कारण कलम ३५३ व ३३५ वर एक बैठक झाली. बैठकीत कलम ३५३ व ३३५ चा मोठ्या प्रमाणात गैरवापर होतो अशी सत्ता पक्ष व विरोधी पक्ष यांतील सर्व पक्षीय आमदारांनी तक्रार केली. होळीच्या दिवशी, रंगपंचमीच्या दिवशी कॉंग्रेसचे माजी महापौर श्री. पांडुरंग हिवरकर यांच्या गाडीला पोलीस विभागाच्या एका गाडीने ठोस मारली, बाचाबाची झाली. स्वत: माजी महापौर श्री. पांडुरंग हिवरकर कॉंग्रेस पक्षाचे आहेत, पोलीस स्टेशनच्या एसीपींनी त्यांचा मुलगा जय हिवरकर यांना अटक केली आणि ३५३ कलम लावले. मारपीट संदर्भात नागपूरात छापून आले आहे. कलम ३५३ चा सर्रास गैरवापर होत आहे. कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यांना मारणे यास माझे कोणतेही समर्थन नाही. पण असा कायदा वापरत असतील तर योग्य नाही. वीज कापायला गेले, कोणी आरडाओरडा केला तर कलम ३५३, सखाद्या सरपंचावर कोणी टीकाटिप्पणी केली तर कलम ३५३ असा सर्रास गैरवापर होत आहे. विद्यार्थी परिषद, एनयूसीआय, कामगार सेना कोणीही असेल, आंदोलन झाले, आंदोलनात पुतळा जाळणे, पोलिसांशी झटापटी असे प्रकार झाले तर कलम ३५३ असा सर्रास गैरवापर होत आहे. हा नॉन बेलेबल ऑफेन्स आहे. अनेक महिलांवर गुन्हे दाखल झाले आहेत, त्या २०-२० दिवस जेलमध्ये राहिल्या आहेत. माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, याही कायद्यात योग्य बदल सुचवावेत, जेणेकरुन सामान्य माणसाला त्रास होणार नाही.

सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्षेत्यांनी मेट्रोचा विषय मांडला. नागपूरमध्ये मेट्रो सुरु झाली. माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, त्या व या काळातील माननीय मंत्री यांच्याशी निगडीत विषय आहे. मेट्रो सुरु झाली याबाबत मी त्या व या सरकारचे अभिनंदन करतो. मात्र नागपूर मेट्रोमध्ये कर्मचाऱ्यांची पिळवणूक होत आहे. कर्मचाऱ्यांना नोकरीवर लागत असताना १९ हजार रुपये पगार होता. मद्रास हायकोर्टाचा याच्याशी काहीही संबंध नाही. मात्र नागपूरच्या कंत्राटदाराने मद्रास हायकोर्टचा निर्णय नागपूरात आणला आणि त्या सर्व हजार कर्मचाऱ्यांचा पगार १९ हजार रुपयांवरुन १२ हजार रुपयांवर

असुधारित

श्री. प्रवीण दटके ....

आणला. ते कर्मचारी कामगार न्यायालयात गेले, कामगार आयुक्तांकडे गेले, केंद्र सरकारच्या, राज्य सरकारच्या कामगार आयुक्तांकडे गेले, कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय लागला. पण आजही मेट्रो तो निर्णय मानण्यास तयार नाही. त्यांनी फेरयाचिका केली. माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना विनंती आहे की, नागपूर मेट्रो या विषयाकरिता एक विशेष बैठक घ्यावी आणि त्यातून या कर्मचाऱ्यांचे विषय सोडवावेत. नागपूर मेट्रो गेटवॉल नावाची कंपनी होती, त्यांनी प्रचंड पिळवणूक केली. चुकीच्या पध्दतीने निविदा भरल्या, त्याही विषयाची चौकशी माननीय मंत्र्यांनी करावी, एवढीच विनंती आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ. परिणय फुके वाळू माफियांचा प्रश्न वारंवार उपस्थित करतात. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनीही या संदर्भात विषय मांडला आहे. मी यातील डेटा वाचून दाखवितो. सन २०१९-२० मध्ये वाळू उपसा व अवैध वाळू नेण्याची प्रकरणे ९७११ आहे, ८७ कोटी रुपये दंड मिळाला, ९६२ गुन्हे दाखल झाले, अटक करणाऱ्या व्यक्तिंची संख्या ४६३ आहे. सन २०२०-२१ मध्ये ११ हजार प्रकरणे आहेत, ९७ कोटी रुपये वसूल झाले, ११०० गुन्हे दाखल झाले, ५०० व्यक्तिंना अटक केली. किमान हजार कोटी रुपयांचे याततून नुकसान झाले आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी यामध्ये लक्ष घालावे अशी विनंती आहे.

सभापती महोदया, नागपूरात एनआयटी नावाची संस्था आहे. गोरगरीब, मध्यमवर्गीय, नोकर पेशातील लोकांनी ५७२, १९०० लेआऊटमध्ये ३०, ४०, ५० रुपये देऊन प्लॉट घेतले. मात्र त्या संदर्भात ५२ रुपये विकास शुल्काचे १६८ रुपये करण्यात आले. ही फार अडचणीची बाब आहे. कोविडचा काळ होता. गोरगरीब लोक तेथे राहतात. त्यांनी घामाच्या पैशातून खरेदी केले आहे. गरीब लोक आहेत. विकास शुल्क ५२ रुपयांवरुन १६८ रुपये केले ही बाब अत्यंत निंदनीय आहे. माझी माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना विनंती आहे की, तात्काळ १६८ रुपयांचा निर्णय परत घेऊन जुन्या पध्दतीने फक्त ५२ रुपये करावेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. कारण गुंठेवारी १ नंतर २ आली. गुंठेवारी २ मध्ये एनआयटीच्या

श्री. प्रवीण दटके ....

लेआऊटमध्ये ज्यांची घरे अधिकृत नाहीत, ती अधिकृत करण्यासाठी एक योजना आली. योजना आल्यानंतर ऑनलाईन फॉर्म भरायचा होता, ५ हजार रुपये डिपॉजिट द्यायचे होते आणि त्यानंतर त्याचे मोजमाप होऊन ते घर अधिकृत होणार होते. नागपूर सुधार प्रन्यास संस्था प्रचंड भ्रष्टाचार असलेली संस्था आहे, गोरगरीब, सर्व लोकांवर अन्याय करणारी संस्था आहे, नागपूरचा सत्यानाश करणारी संस्था आहे. ही संस्था माननीय श्री. देवेंद्र फडणवीस यांनी बरखास्त केली होती. पण दुर्दैवाने या सरकारने तिला पुनर्जीवित केले आहे. काँग्रेस, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस या सर्वांनी एकमुखी मागणी केली होती. ती संस्था बरखास्त केली होती. पण ती पुनर्जीवित केली. अधिकृत घरे करण्याकरिता गुंठेवारी २ मध्ये सर्व प्रक्रिया माननीय मुख्यमंत्र्यांच्या मागदर्शनखाली झाली. पण ही प्रोसेस एनआयटीने केली नाही, ११ महिने तसेच ठेवले.

श्री. अभिजीत वंजारी : सभापती महोदया, माझी या स्टेटमेंटला हरकत आहे.

श्री. प्रवीण दटके : सभापती महोदया, माझे भाषण झाले की हरकत घ्यावी. मी म्हणत असलेले चूक असेल तर तुम्ही म्हणाल ती शिक्षा भोगण्यास तयार आहे. मी गुंठेवारी २ बाबत माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांचे अभिनंदन करतो. त्यांनी हे आणले आहे. पण एनआयटी सारख्या संस्थेने हा कायदा ११ महिने त्यांच्याकडे दडपून ठेवला आणि नागपुरातील गोरगरीब माणसांना त्रास दिला. आपल्या माध्यमातून महाविकास आघाडी सरकारला मी आवाहन करतो की, याची चौकशी करावी आणि एनआयटीतील जे अधिकारी यासाठी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. आपण अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यास मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

----

श्री. सदाभाऊ खोत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, अंतिम आठवडा प्रस्तावावर बोण्लयासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, राज्यात, देशात, जगभरात तापमान वाढ व वातावरणातील बदलाच्या संकटाला सर्वांना भविष्यात सामोरे जावे लागणार आहे आणि यासाठी गांभीर्याने चर्चा होणे अत्यंत गरजेचे आहे. आपण ४-५ दिवसांपूर्वीच ऐकले असेल की, आयपीसीच्या अहवालानुसार सन २०५० ला मुंबई पाण्यात बुडणार आहे. अशा बातम्या आपल्या सर्वांच्या वाचनात आल्या. जगभरातील तापमान वाढत आहे. ते कमी करण्यासाठी सरकार काय पावले उचलत आहे, काय नियोजन करीत आहे हे समजणे महत्त्वाचे आहे. सन २०५० ला मानवी जात पृथ्वीतलावर वाढत्या तापमानामध्ये राहील की नाही असे विचार देशात चालले आहेत. आपण सभागृहात बसलो आहोत, हे सभागृह समुद्राच्या पाण्याची पातळी वाढल्यानंतर पाण्याखाली जाईल की काय अशाही काही बातम्या वाचनामध्ये आल्या. दक्षिण मुंबईचे अस्तित्व शिल्लक राहणार नाही अशाही बातम्या आल्या.

सभापती महोदया, पॅरिसला सन २०१५ मध्ये जगभरातील पर्यावरणवादी व पंतप्रधान जमलेले होते. अनेक करार झाले. दगडी कोळसा वापरणे भविष्यात कमी करावे लागेल, पेट्रोल, डिझेल जाळणे बंद करावे लागेल असे विचारमंथन तेथे झाले. सर्व वाढीव तापमानाचा परिणाम मानव जातीवर होणार आहे. इतर सजीव प्राण्यांचे अस्तित्व राहील की नाही हाही प्रश्न यातून निर्माण होणार आहे.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत...

मला वाटते आपल्या राज्याने याकडे गांर्भीयाने पाहणे अत्यंत गरजेचे आहे. प्राणवायू कमी होत चालला असून प्रदूषण वाढत आहे. उद्योग धंद्यांना चालना दिली पाहिजे हे मी नाकारीत नाही. हे करीत असताना प्रदूषण कसे रोखता येईल याकडे लक्ष द्यावे लागेल. त्यादृष्टीने राज्याला कृती कार्यक्रम आखावा लागेल. मोठ्या प्रमाणात खनिज संपत्तीचे उत्खनन होत आहे. मोठमोठ्या कंपन्या त्यांचे सांडपाणी डायरेक्ट नदीमध्ये सोडत आहेत. कोल्हापूर येथील पंचगंगा नदी गटारगंगा झाली आहे. तिचे अस्तित्व संपलेले आहे. नदीतील मासे जीवंत राहू शकत नाही. ते पाणी प्यायले तर त्यापासून काविळ सारखे अनेक घातक आजार लोकांना होत आहेत. झाडे लावा झाडे जगवा ही बाब चांगली आहे, झाडे कोणी लावायची, ती जगवायची कोणी, आतापर्यंतचा झाडे लावा झाडे जगवा हा कार्यक्रम पाहिला तर मला असे वाटते की, जमिनीच्या क्षेत्रफळापेक्षा लावलेल्या झाडांची संख्या जास्त भरेल. अशी अवस्था एका बाजूला असताना दुसऱ्या बाजूला हवेतील प्रदूषण कमी करण्याचे काम देशात, जगात शेतकरी करीत आहेत. याचे कारण असे आहे की, आम्ही आमच्या शेतात डाळिंब बाग, द्राक्ष बाग, ऊस लावला, धान पिकविले ही सर्व झाडेच आहेत. आमच्या बांधावरील झाडांचे आम्ही संरक्षण केले ती वाढविली. ज्या कारखानदारांनी प्रदूषण वाढविले त्यांनी झाडे लावली नाहीत. अनेक देश झाडे लावणाऱ्या व हिरवळ तयार करणाऱ्यांना कार्बन क्रेडीटचा लाभ देतात. ज्यांनी झाडे लावली त्या शेतकऱ्यांना कार्बन क्रेडीटचा लाभ मिळणे आवश्यक होते तसा लाभ दिला गेला नाही.

सभापती महोदया, माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.अमोल मिटकरी हे अभ्यासू आहेत, परवा मला थोडे दु:ख वाटले. ऊसाचे आंदोलन विरोधी पक्ष नेते व आम्ही केले. सन्माननीय सदस्य श्री अमोल मिटकरी यांनी सदाभाऊ यांचे ऊसाचे आंदोलन व माझ्या आडनावाचे इंग्रजीमध्ये रुपांतर केले व वाक्य तयार केले. त्याबाबत मला आपणाला काही म्हणायचे नाही. मला असे म्हणायचे आहे की, आम्ही ऊस खांद्यावर घेतला. तुम्ही मातीतून आला आहात, तुम्ही शेतकरी कुटुंबातून आलेला आहात. आपण सर्व मातीतली माणसे आहोत. विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत...

दरेकर, तुम्ही व मी आपण सर्व गावगाड्यातील माणसे या व्यासपीठावर आलो आहोत. गावगाड्यातील व्यथा आपण या ठिकाणी मांडू शकतो. सभापती महोदयांना माहिती आहे, मी शेतकरी चळवळीत व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम केले. जीवाचे रान करुन काळ्या मातीत राबणाऱ्या माणसाच्या घामाला दाम मिळाला पाहिजे. मी येथे बोलत असताना वातावरणातील बदल रोखण्याच्या कामात सर्वात जास्त सहभाग माझ्या गावगाड्यातील शेताभातात राबणाऱ्या शेतकऱ्यांचा आहे. त्यासाठी त्यांना काही प्रोत्साहन दिले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने प्रदूषण रोखण्याचे काम शेतकरी करु शकतो. ऊस आम्ही खांद्यावर घेतला याचे कारण त्या शेतकऱ्यांनी आपणाला विधिमंडळात पाठविले आहे.

सभापती महोदया, माझे वडील लिलावती हॉस्पीटलमध्ये भरती होते, त्यांना कॅन्सर झाला होता. विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यामध्ये आम्ही दुष्काळ दिलासा यात्रा बुलढाण्यापासून काढण्याचे जाहीर केले होते. श्री.रविकांत तुपकर व मी त्या यात्रेत जाणार होतो. मी वडिलांना विचारले की, तुमची तब्येत बिघडल्यामुळे मी माझी यात्रा रद्द करतो. वडिलांनी सांगितले की, तू यात्रा करुन ये उलट मला आणखी बरे वाटेल. मी यात्रेसाठी तिकडे १५ दिवस गेलो. तेथून मी फलटण येथील दूध परिषदेसाठी आलो. सायंकाळी दवाखान्यातून फोन आला की, तुम्ही निघून या. माझी यात्रा झाली पण माझा बाप राहिला नाही. ज्यावेळी वडीलांचे ऑपरेशन झाले त्यावेळी माननीय श्री.देवेंद्र फडणवीस हॉस्पीटलमध्ये वडिलांना भेटायला आले होते. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या वडिलांचे दोन्ही हात पकडले व त्यांना सांगितले की, मी तुमच्या सदाभाऊला मंत्री करणार, माझ्यासाठी आमदार व मंत्री होणे महत्वाचे नाही. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मला साथ दिली व मी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काम करीत राहिलो. त्यांचे प्रश्न मांडत राहिलो. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपणाला काय करता येईल यासंदर्भातील अनेक जबाबदाऱ्या माझ्यावर दिल्या. त्यामुळे मला माननीय श्री.देवेंद्र फडणवीस या माणसांचा सार्थ अभिमान आहे. त्या व्यक्तीने आमचे सर्व प्रश्न जाणून घेतले. काय करता येईल यासाठी ते

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत....

रात्रंदिवस प्रयत्न करीत राहिले. त्यामुळे जलयुक्त शिवार योजना राबविण्यात आली. जमिनीचे तापमान कमी करायचे असेल तर पाण्याची पातळी वाढवावी लागेल. म्हणून त्या काळात झाडे लावण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. जेथे बांध असेल तेथे झाडे लावली पाहिजेत. वाढते तापमान आपणाला रोखावे लागणार आहे. वाढत्या तापमानाला कसे राखावे याचे नियोजन माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यांना कळले होते की, पृथ्वीचे तापमान कमी करायचे असेल तर शेतकऱ्यांना बरोबर घ्यावे लागेल. गावागावत वन समित्या स्थापन कराव्या लागतील. त्या माध्यमातून वाढणारे तापमान रोखावे लागेल. अशी भूमिका त्यांनी घेतली. म्हणून सदाभाऊ सारखा खेड्यातील माणूस आमदार व मंत्री झाला त्याचे कारण माननीय श्री.देवेंद्र फडणवीस सारखी माणसे आमच्या पाठीशी उभी राहिली.

सभापती महोदया, जगाला व देशाला वाचवायचे असेल तर वाढत्या तापमानासाठी शेतकऱ्यांना सामावून घ्यावे लागेल. वृक्ष लागवड व हिरवळ निर्माण करण्याचे काम गावगाड्यातील शेतात राबणारा माणूस करीत आहे. त्यांना शासनाकडून प्रोत्साहित करावे लागेल. याचे नियोजन महाविकास आघाडी सरकारने करणे गरजेचे होते. या अधिवेशनात वाढत्या तापमानाची कोणतीही दखल सरकारने घेतल्याचे दिसत नाही.

सभापती महोदया, केंद्र शासनाने गंगा नदी व्यतिरिक्त देशातील २४ राज्य व दोन केंद्र शासन प्रदेशातून वाहणाऱ्या १३ नद्यांचा कायापालट करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षात यासाठी १९ हजार कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येणार आहे. अशा पध्दतीने देशात काम सुरु आहे. राज्यातील नद्यांची पात्रे दूषित झाली त्यांचे शुध्दीकरण करणारा प्रकल्प राज्य शासनाने पर्यावरणाच्या दृष्टीने हातात घ्यायला पाहिजे होता. दुर्देवाने या बाबीवर हे सरकार गांभीर्याने विचार करायला तयार नाही. जग व देश वाचवायचा असेल तर वाढते तापमान रोखण्यासाठी शेताभातात राबणाऱ्या माणसाला बरोबर घ्या व त्यांना कार्बन क्रेडीटचा लाभ दिला पाहिजे. शेतकरी जीवसृष्टी जीवंत ठेवत असल्यामुळे

असुधारित प्रत

श्री.सदाभाऊ खोत...

त्यांना कार्बन क्रेडीटच्या माध्यमातून कारखानदारांच्या खिशातील काही पैसे देण्याचा निर्णय घेतला पाहिजे. देशातील व राज्यातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन शासनाने प्रदूषण रोखण्याचे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

या नंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, नियम २५९ अन्वये मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, शासनाने १० वर्षापूर्वी मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्री दर्जाचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला. तो निर्णय स्वागतार्ह आहे. अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होणे खूप गरजेचे आहे. त्या स्मारला पर्यटक मोठ्या प्रमाणावर भेट देतील. ज्या जागेवर स्मारक होत आहे तेथे आमचे मच्छिमार बांधव पिढ्यानपिढ्या मासेमारी करीत होते. तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होणार असल्यामुळे त्यांना देखील आनंद झाला. तेथील मच्छिमार बांधवांनी स्मारकासाठी सहकार्य केले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी आम्हाला बोलावून सांगितले की, आपल्याला तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतराष्ट्रीय दर्जाचे स्मारक तयार करावयाचे आहे. या संदर्भात आपले काय म्हणणे आहे ? त्यावेळी आम्ही सांगितले की, आमचे जे नुकसान होणार आहे त्याची नुकसान भरपाई मिळणार असेल तर आम्ही आनंदाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी योगदान देऊ. तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक तयार झाल्यानंतर पर्यटक येतील. एवढेच नाही तर आमच्या कोळी समाजातील बांधवांना, मच्छिमारांना नोकऱ्या मिळतील, छोटे उद्योग सुरु करता येतील या अपेक्षेने आम्ही ती मागणी मान्य केली. परंतु आता छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम बंद आहे. शासनाने समारकाचे काम लवकरात लवकर सुरु करावे, अशी आमची विनंती आहे.

सभापती महोदया, मुंबई शहरातील गावठाणामधील कोळीवाडे, आदिवासी पाड्यांना मालमत्ता करातून सूट देण्यासंदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माननीय नगरविकास मंत्री यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कोळीवाडे, गावठाण, आदिवासी पाड्यांमधील ५०० चौरस फुटापेक्षा अधिक क्षेत्रपळाच्या घरांना मालमत्ता करातून सूट देता येणार नाही असे उत्तर दिले.

असुधारित

श्री.रमेशदादा पाटील........

पिढ्यानपिढ्या मुंबईत राहणारा, मासेमारी करणारा कोळी समाज मुंबईतील आद्य नागरिक आहेत. परंतु त्यांना मालमत्ता करातून सूट मिळणार नसेल तर यापेक्षा दुर्भाग्याची गोष्ट असू शकत नाही. शासनाने या संदर्भात विचार करावा, अशी माझी विनंती आहे. कोळी समाज तसेच आदिवासी बांधव मुंबईतील मूळ भूमिपूत्र असून त्यांची घरे वडिलोपार्जित असून त्यांचे कुटुंब देखील पूर्वीपासून एकत्रित राहत असल्यामुळे त्यांची घरे मोठी आहेत. त्यामुळे मुंबईतील गावठाणामधील कोळीवाडे तसेच आदिवासी पाड्यांना विशेष बाब म्हणून मालमत्ता करातून दिलासा देण्यात यावा, अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदया, मागील अर्थसंकल्पात वरळी डेअरीच्या जागेवर पर्यटन केंद्र आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु अद्याप तांत्रिक बाबी पूर्ण झालेल्या नाहीत. केवळ मोठ्मोठ्या घोषणा करुन कागदी घोडे नाचविले जातात. ज्या घोषणा करण्यात आलेल्या आहेत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हा होणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्यात आले तर तेथे परदेशी पर्यटक देखील भेट देतील. त्यामुळे महाराष्ट्र राज्याला आर्थिक दृष्ट्या फायदा होऊ शकतो. तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय झाले तर मुंबई शहराची व एकूणच महाराष्ट्र राज्याची शान वाढणार आहे.

सभापती महोदया, मागील दोन महिन्यांपासून वरळी कोळीवाड्यातील मच्छिमार त्यांच्या पारंपारीक व रोजगाराच्या हक्काच्या संरक्षणासाठी कोस्टल रोड प्रकल्पामध्ये उभारण्यात येणाऱ्या पुलाच्या दोन पिलरमधील अंतर ६० मीटर ऐवजी २०० मिटर ठेवण्यात यावे यासाठी निवेदने देऊन उपोषणे व आंदोलने करीत आहेत. परंतु शासनाकडून मच्छिमार बांधवांच्या तोंडाला पाने पुसण्यात येत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे सभागृहात उपस्थित आहेत. ते वरळी येथे राहतात. वरळी त्यांचा मतदारसंघ आहे. आता माननीय पर्यावरण मंत्री श्री.आदित्य ठाकरे

श्री.रमेशदादा पाटील........

साहेब तेथून निवडून आलेले आहेत. आपण तेथील स्थनिक आहात, भूमिपूत्र आहात. मुंबई शहरातील कोळीवाडे शिवसेना पक्षासोबत आहेत. परंतु त्यांच्यावर अन्याय होत असेल तर ते योग्य नाही. आपण कोळी बांधवांचे प्रतिनिधीत्व करता. परंतु त्यांना आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी मोर्चे काढावे लागतात, उपोषण करावे लागते. शासनाने कोळी बांधवांच्या प्रश्नांकडे लक्ष देऊन ते प्रश्न सोडवावेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, मुंबईतील नरीमन पॉईंट ते कफ परेड प्रस्तावित उड्डाण पूल पारंपारिक मच्छिमार बांधवांचा उदरनिर्वाह हिरावून घेणारा असून हा प्रकल्प शासनाने रद्द करावा, अशी माझी मागणी आहे. नरीमन पॉईंट ते कफ परेड उड्डाण पूल बांधण्यात येणार आहे. त्यामुळे तेथील वसाहतींवर आर्थिक दृष्ट्या परिणाम होणार आहे. तेथे राहणाऱ्या कोळी बांधवांच्या व मच्छिमार बांधवांच्या घरांवर संकट येणार आहे. शासनाने सदर उड्डाण पुलाचे काम रद्द करावे, अशी माझी मागणी आहे. शासनाने शेतकरी बांधवांचे ३३ हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. त्याच धर्तीवर मच्छिमार बांधवांचे एनसीडीसी व इतर बँकांचे थकीत कर्ज माफ करण्यात यावे. मच्छिमार बांधवांनी बोटींसाठी कर्ज घेतले होते. परंतु मागील दोन वर्षात कोरोना महामारीमुळे मच्छिमार बांधवांचे जीवन विस्कळीत झाले असून कर्जाचे हप्ते थकलेले आहेत. मच्छिमार बांधवांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. शासन शेतकऱ्यांचे कर्ज माफ करते मग कोळी बांधवांचे कर्ज का माफ केले जात नाही ? कोळी बांधव पिढ्यानपिढ्या मुंबईत राहतात. शासनाने या विषयामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, बोरीवली येथील संजय गांधी नॅशनल पार्कमध्ये आदिवासी बांधव वन विभागाच्या जागेवर वर्षानुवर्षे राहत असून त्यांची घरे त्यांच्या नावावर करुन त्यांना मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी माझी विनंती आहे. महाराष्ट्र शासनाने कायदा केला की, आदिवासी बांधव ज्या जागेवर राहतात त्या

असुधारित प्रत

श्री.रमेशदादा पाटील........

जागेचा ७/१२ चा उतारा त्यांच्या नावे झाला पाहिजे. शासनाने ५ वर्षापूर्वी या संदर्भात निर्णय घेतला. आदिवासी बांधवांचे प्रश्न सुटत नसल्यामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहे.

सभापती महोदया, नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार आहे. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याकरिता तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कोकण वैधानिक विकास मंडळ झाले असते तर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम लवकर पूर्ण झाले असते. मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळवर ताण येत असल्यामुळे नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ तयार करण्यात येत आहे. मुंबई व उप नगरातील लोकसंख्या जवळपास ४ कोटी आहे. डोंबिवली, पनवेल, कल्याण शहरातील लोकसंख्या वाढलेली असल्यामुळे त्या परिसरात देखील आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शासनाने १० वर्षापूर्वी त्या परिसरात विमानतळ तयार करण्याचा निर्णय घेतला. विमानतळासाठी जागा आवश्यक असल्यामुळे आगरी, कोळी बांधवांच्या जागा संपादित करण्यात आल्या. तसेच, गावांचे देखील शिफ्टींग करण्यात आले. आमच्या बांधवांची घरे शिफ्ट केलेली आहेत. परंतु त्यांना अद्याप कोणत्याही सोईसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तेथे विमानतळ झाले तर स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या मिळतील, उद्योगधंदे सुरु करता येतील. नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम थांबलेले आहे. शासनाने नवी मुंबई येथील विमानतळाचे काम लवकरात लवकर सुरु करावे, अशी माझी विनंती आहे. नवी मुंबई शहरात सिडकोच्या माध्यमातून विकास करण्यात येतो. परवा माननीय नगरविकास मंत्र्यांनी स्थानिक भुमिपूत्रांसाठी चांगला निर्णय घेतला. मागील ५० वर्षात अनेक पक्षाचे सरकार सत्तेवर आले. परंतु तशा प्रकारचा निर्णय कोणीही घेतला नव्हता. माननीय नगरविकास मंत्री श्री.एकनाथ शिंदे साहेबांनी निर्णय घेतला की, प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी जी घरे बांधलेली आहेत त्या घरांना सूट देऊन ती नियमित

श्री.रमेशदादा पाटील........

करण्यात आलेली आहेत. मी नगरविकास मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. अद्याप कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला नव्हता. परंतु माननीय नगरविकास मंत्री महोदयांनी हा निर्णय घेतल्याबद्दल मी महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदया, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

-----------

यानंतर श्री.सांगळे......

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके (भंडारा तथा गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री.प्रवीण दरेकर यांनी नियम २५९ अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर आपण मला माझे विचार व्यक्त करण्यासाठी संधी दिली. मी त्याबद्दल आपला आभारी आहे.

सभापती महोदया, विदर्भातील अत्यंत महत्त्वाचा असलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाकरिता अर्थसंकल्पामध्ये ८५३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या २५ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. शासनाने सदर प्रकल्पाकरिता वाढीव तरतूद केल्यास तो पूर्ण होऊ शकेल. हा प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडला असून त्यात पुनर्वसनाची अनेक कामे तसेच टेल लाईन, ट्रंक लाईनची कामे प्रलंबित आहेत. हा प्रकल्प अतिशय मोठा आहे. हा प्रकल्प पूर्ण केल्यास तेथील जनतेला मोठा दिलासा मिळू शकतो. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या काळात त्या प्रकल्पातून पाणी देण्याच्या संदर्भात असलेल्या ट्रंक लाईन्स पाईपलाईनच्या माध्यमातून पाणी देणार होत्या. सदर काम पूर्ण झाल्यानंतर पूर्व विदर्भातील संपूर्ण शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत प्रकल्पातील पाणी पोहोचण्यास मदत होऊ शकेल. नागपूर व नागपूरमधील आजूबाजुच्या ग्रामीण क्षेत्रांमधील सांडपाणी नाग नदीमधून या प्रकल्पामध्ये येत असते. त्यामुळे तयार होणाऱ्या दूषित पाण्यामुळे आजूबाजुला राहणाऱ्या नागरिकांना आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. सदर पाण्यावर ट्रिटमेंट केल्यास ते सोयीचे होऊ शकेल. नागपूर महानगरपालिकेने सन २०१० मध्ये एक डीपीआर तयार केला होता. त्यानुसार ५०० एमएलडी सांडपाणी बाहेर पडत होते. त्यापैकी फक्त ३०० ते ३२० एमएलडी पाण्यावर ट्रिटमेंट केली जात आहे. १०-१२ वर्षांमध्ये नागपूर शहरातील लोकसंख्या दुप्पट वाढली आहे. त्याचप्रमाणे एमएमआर रिजनमध्ये मोठया प्रमाणात लोकवस्त्या आहेत. कामठी, उमरेड नगरपरिषदांमधील त्या लोक वस्त्यांमधून बाहेर पडणारे सांडपाणी कनान नदीच्या माध्यमातून गोसीखुर्द प्रकल्पामध्ये जाते. या सर्व गोष्टींचा विचार करता एसटीपीच्या माध्यमातून एक डीपीआर तयार करणे अत्यावश्यक आहे. तसेच प्रत्येक गावांमधून येणाऱ्या सांडपाण्यावर ट्रिटमेंट झाली पाहिजे. ही बाब विचारात घेता शासन आणि एमएमआरडीएच्या माध्यमातून प्रत्येक ठिकाणी एसटीपी प्लांट करण्याची कार्यवाही

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके ...

झाली पाहिजे. मोहदा येथे एनटीपीसीचा मोठा प्रकल्प आहे. नाग नदीवर चेक डॅम करुन त्या माध्यमातून ते पाणी टर्शरी ट्रिटमेंट करुन एनटीपीसीसारख्या पॉवर प्लांटकरिता वापरल्यास दूषित पाण्यावर मोठया प्रमाणावर ट्रिटमेंट होऊ शकेल. सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांकडून एनटीपीसी तसेच गोसीखुर्द प्रकल्पांमधील पाण्याचा पिण्याकरिता वापर करीत आहेत. केंद्र शासनाचा असा शासन निर्णय आहे की, पॉवर प्लांटने इरिगेशनचे पाणी न वापरता ट्रिटमेंट केलेले पाणी वापरले पाहिजे. माननीय पर्यटन मंत्री यांनी या संदर्भात बैठक घेऊन कार्यवाही करण्यासंबंधी आश्वासन दिल्याबद्दल मी त्यांचे या निमित्ताने आभार मानतो.

सभापती महोदया, भंडारा जिल्हयात महिला रुग्णालय आहे. अर्थसंकल्पात तेथे नवीन महिला रुग्णालय करण्यासंबंधी घोषणा करण्यात आली. त्यात हिंगोली, यवतमाळ, बुलडाणा तसेच सांगली या जिल्हयांचा उल्लेख करण्यात आला. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस तत्कालीन मुख्यमंत्री असताना त्यांच्या काळात दिनांक ७ जुलै, २०१७ रोजी भंडारा येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय मंजूर झाले होते. तसेच त्याकरिता २९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. सदर रुग्णालयावर आतापर्यंत २२ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला असून आणखी ७-८ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. शासनाने यावर्षी त्याकरिता ७-८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्यास यावर्षी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सदर रुग्णालय सुरु करता येऊ शकेल. पालकमंत्री असताना आम्ही सदर रुग्णालयाचे सावित्रीबाई फुले रुग्णालय असे नामकरण केले होते. महिलांकरिता चांगले ते रुग्णालय होऊ शकेल.

सभापती महोदया, रेती तस्करीच्या संदर्भात दोन्ही सदनांमध्ये वारंवार चर्चा केली जाते. सर्व लोकप्रतिनिधी प्रत्येक वेळी आपापल्या जिल्हयामधील रेती तस्करीबाबत वारंवार तक्रारी करीत असतात. ही बाब विचारात घेता शासनाने वाळू धोरणामध्ये बदल केला पाहिजे. मागील अधिवेशनाच्या वेळी या विषयासंबंधी सदनामध्ये चर्चा करीत असताना माननीय सभापती यांनी असे सांगितले होते की, वाळू तस्करी करणाऱ्यांवर मकोका कायदा लागू केला पाहिजे. शासनाने वाळू

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके .....

तस्करांना पकडण्यासाठी कितीही कायदे केले व त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला तरी ते त्यातून पळवाटा काढत असतात. त्यामुळे या संदर्भात असलेली रॉयल्टी काढून टाकली पाहिजे. याचे मूळ कारण असे आहे की, महसूल आणि पोलीस विभागांमधील ५० टक्के अधिकारी रेती चोरीमध्ये सहभागी असतात. उर्वरित ५० टक्के अधिकारी रेतीची चोरी थांबविण्यासाठी कार्यवाही करीत असतात. या कारणामुळे पोलीस आणि महसूल विभागातील सर्व कामे ठप्प पडली आहेत. त्यामुळे वाळूवरील रॉयल्टी बंद केली पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पाटबंधारे विभाग असो, त्यांच्याकडून निविदा काढत असताना एक टक्का सरचार्ज करुन रॉयल्टी कपात करुन खाजगी निवासांकरिता असलेल्या घरांचे नकाशे मंजूर करतेवेळी एक टक्का बांधकाम कॉस्ट कपात केल्यास महाराष्ट्र शासनाला त्यातून जवळपास १० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळू शकतो. राज्याला संपूर्ण जिल्हयांमध्ये वाळूमधून फक्त ३ ते ४ कोटी रुपयांचा महसूल मिळत आहे. त्यामुळे शासनाने रेती धोरणामध्ये बदल केल्यास शासनाला त्यातून ७-८ कोटी रुपयांचा वाढीव महसूल मिळण्यास मदत होईल.

सभापती महोदया, उद्योग विभागासंबंधी सांगायचे झाल्यास भंडारा व गोंदिया जिल्हयातील भंडारा, तुमसर, लाखणी, साकोली, गोरेगाव किंवा देवरी तालुक्यांमधील एमआयडीसी असो, १९७० ते १९९० च्या दरम्यान मोठया प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन येथील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावेत याकरिता सर्व एमआयडीसी स्थापन झाल्या होत्या. तेथे मोठा जंगलचा भाग आहे, नवेगाव नागझीरा टायगर रिझर्व्ह फॉरेस्ट आहे. त्या बाजूला इको सेन्सेटिव्ह झोन झालेले आहेत. सर्व एमआयडीसी इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये आल्या आहेत. सन २०१५ मध्ये या संदर्भात वन विभागाने हरकती व सूचना मागविल्या होत्या. परंतु त्या संदर्भात कोणीही आपले मत व्यक्त केले नाही. परिणामी भंडारा आणि गोंदिया जिल्हयांमधील सर्व एमआयडीसींमध्ये मोठया उद्योगांकरिता बंदी टाकण्यात आली. इको सेन्सेटिव्ह झोनच्या रिस्ट्रीक्शन्समुळे तेथे कोणताही मोठा उद्योग येऊ शकत

डॉ.परिणय फुके .....

नाही. परिणामी त्या भागातील युवक मोठया प्रमाणात बेरोजगार झालेले आहेत. तेथील भागातील बेरोजगार युवक नागपूर, मुंबई, पुणे येथे रोजगारासाठी जात आहेत. तेथील भागामधील बेरोजगारांकरिता तेथे रोजगाराची संधी निर्माण करता यावी यासाठी इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये आलेल्या एमआयडीसी डी नोटीफाय करण्यासाठी राज्य शासनाने कार्यवाही केली पाहिजे.

सभापती महोदया, ओबीसी आरक्षणासंबंधी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला पाहिजे. आम्ही देखील त्यासंबंधी शासनाला मदत करु. २ वर्षांपूर्वी ओबीसी जनगणनेसंबंधी विधानसभा अध्यक्षांनी सदनामध्ये एकमताने ठराव मंजूर केला होता की, केंद्र शासनाकडून जातनिहाय जनगणना केली जाणार नसल्यास ती राज्य शासनाकडून केली जाईल. परंतु २ वर्षांपासून राज्यात ओबीसी जातीनिहाय जनगणनेसंबंधी कोणतीही कार्यवाही सुरु झाली नाही. तसेच अर्थसंकल्पात ओबीसी जातीनिहाय जनगणनेकरिता एक रुपयाची देखील तरतूद करण्यात आली नाही. अशा प्रकारे राज्यातील १२ बलुतेदार आणि १८ पगड जातीच्या लोकांना मुर्ख बनविण्याचे काम तसेच ओबीसी समजातील लोकांच्या डोळयात धुळफेक करण्याचे काम शासनाकडून होत आहे. दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षण रद्द केले. त्यावेळी न्यायालयाने त्याकरिता आवश्यक असलेला इम्पीरिकल डाटा जमा करण्यास सांगितले होते. त्या संदर्भात न्यायालयामध्ये वारंवार चुकीची कागदपत्रे व अहवाल देऊन न्यायालयाची दिशाभूल करण्याचे काम शासनाकडून करण्यात आले. परिणामी ओबीसींचे राजकीय आरक्षण संपुष्टात आले. दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी ओबीसी मागासवर्ग आयोगाने न्यायालयामध्ये चुकीचा अहवाल सादर केल्यामुळे न्यायालयाने तो अहवाल रद्द केला. त्यानंतर ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी शासनाकडून सुरु असलेली धडपड दिसावी याकरिता वेळकाढू धोरणासाठी दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी शासनाने कायदा मंजूर करुन त्याद्वारे राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार काढून ते स्वत:कडे घेतले. हा कायदा भविष्यात कितपत टिकू शकेल हे मला माहीत नाही. इम्पेरिकल डाटा जमा करुन

डॉ.परिणय फुके .....

सर्वोच्च न्यायालयामध्ये दिल्यानंतरच तेथे ओबीसी आरक्षण टिकू शकेल. ही सर्व प्रक्रिया करण्यासाठी ओबीसी आयोगाने ४३४ कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु शासनाने त्याकरिता अर्थसंकल्पात एकही रुपयाची तरतूद केली नाही.

सभापती महोदया, राज्यात पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाल्यानंतर त्या विरोधात महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षांनी राज्यांत मोठया प्रमाणात मोर्चे काढले होते. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षांनी त्यावेळी सायकलवरुन मोर्चा काढला होता. परंतु राज्य सरकारला राज्यातील पेट्रोल व डिझेलवरील टॅक्स कमी करण्याची वेळ आल्यानंतर शासनाने अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेलवरील टॅक्स कमी एक रुपयानी देखील कमी केला नाही. देशात भाजपा सत्तेवर असलेल्या इतर राज्यांमध्ये महाराष्ट्राच्या तुलनेत पेट्रोल व डिझेलचे दर प्रती लिटर ४ ते ५ रुपयांनी कमी आहेत. त्यामुळे महाराष्ट्रांच्या तुलनेत इतर राज्यांमध्ये मोठया प्रमाणात पेट्रोल व डिझेलची विक्री होत आहे.

सभापती महोदया, अधिवेशनामध्ये घोषणा करण्यात आली की, समृद्धी एक्सप्रेस हायवे नागपूरपासून गोंदिया व गडचिरोलीपर्यंत वाढविला जाईल. अद्याप समृद्धी एक्सप्रेस हायवेचा नागपूरपासून मुंबईपर्यंचा भाग रखडलेला आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या काळात समृद्धी एक्सप्रेस हायवेकरिता संपूर्ण निधी मंजूर केला होता. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट होता. परंतु महाविकास आघाडी सत्तेवर आल्यानंतर शासनाने समृद्धी एक्सप्रेस हायवेचे नाव बदलले. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे आमचे आधार स्थान व प्रेरणा स्थान होते. त्यानंतर सदर हायवेचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत

डॉ.परिणय फुके .....

दिनांक १ मे २०२० रोजी या प्रकल्पाचे कंप्लीशन होणार होते, दिनांक १ मे २०२१ रोजी या प्रकलपाचे लोकार्पण मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते होणार होते, पण ते लोकार्पण अद्याप झाले नाही. हे काम कधी पूर्ण होणार हे स्पष्ट होत नाही. या संदर्भात आपण काही तरी पावले उचलली पाहिजेत. गडचिरोलीमध्ये एअरपोर्टची घोषणा झाली, एअरपोर्टसाठी जागा कोठे देणार आहेत. गडचिरोलीमध्ये बहुतेक सर्व जागा वन विभागाची आहे. तेथे एअरपोर्ट बांधकामासाठी कोठेही जागा उपलब्ध नाही. केवळ घोषणा न करता काम झाले पाहिजे हे मी सांगू इच्छितो. माझ्याकडे मुंबई, नागपूर व पुणे महानगरपालिकेतील भ्रष्ट्राचाराच्या मोठया याद्या माझ्याकडे आहेत, पण आता सांगण्यास तेवढा वेळ नाही. मुंबई महानगरपालिकेत होणाऱ्या हजारो कोटीच्या भ्रष्ट्राचाराबाबत खालच्या सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.देवेंद्र फडणवीस यांनी मांडले आहे. तसेच त्यापेक्षा जास्त विषय विधान परिषद विरोधी पक्ष नेते श्री.प्रवीण दरेकर यांनी येथे मांडले आहेत. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सकाळी १० ते ११.४५ वाजता विशेष बैठक होईल. सदर बैठकीत आजच्या कामकाजाच्या क्रमातील प्रलंबित असलेल्या अल्पकालीन चर्चेच्या सूचना घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ८.४२ वाजता, शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ च्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित